महाराष्ट्राचे शिल्पकार

महाराजा सयाजीराव गायकवाड

ऍकनाथ पगार

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➤ **पुस्तकाचे नाव :** महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड

➤ **लेखक :** अेकनाथ पगार

➤ **प्रथमावृत्ती :** २०१८

➤ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➤ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई - ४०० ००४.

➤ **किंमत :** रु. ३२८.००



महाराजा सयाजीराव गायकवाड



लक्ष्मी विलास पॅलेस बडोदा

अध्यक्षांचे मनोगत

महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक युगपुरुषांचे निरनिराळ्या क्षेत्रात भरीव योगदान आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आपण आज शिक्षण, उद्योग, सामाजिक सुधारणा, शेती, आरोग्य या क्षेत्रात प्रगती करू शकलो आहोत. या राष्ट्रपुरुषांची ओळख करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या नावाची चरित्रमालिका प्रकाशनाचे काम सुरू केले. आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातील पन्नास मान्यवरांची चरित्रे अभ्यासकांकडून लिहून मंडळाने प्रकाशित केली आहेत.

ऑगस्ट २०१५च्या पहिल्या आठवड्यात मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष म्हणून काम पाहणे सुरू केले. मंडळाने गेल्या पन्नास वर्षांत साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात फार महत्त्वाचे काम केले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी दोन दशकांहून अधिक काळ मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांच्या नंतर वेगवेगळ्या क्षेत्रांतील दहा मान्यवरांनी हा सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे महत्त्वाचे काम केलेच आहे. ते काम सांभाळण्याची मला संधी लाभली, त्याला मी माझे भाग्य समजतो.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे शिल्पकार नव्हे, तर हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिल्पकारच होते. शिवरायांचे विस्तृत चरित्र लिहून प्रकाशित करावे, असा मागे प्रयत्न झाला; पण काहीना काही कारणाने ते काम होऊ शकले नव्हते. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी म्हटल्याप्रमाणे, हिंदुस्थानात आतापर्यंत दोनच जनकल्याणाचा ध्यास घेतलेले राजे झालेत, ते आहेत छत्रपती शिवाजी महाराज आणि सयाजीराव गायकवाड. या दोन्ही युगपुरुषांचे चरित्र 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेत मंडळाने प्रकाशित केले, याचे खूप मोठे समाधान आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अभ्यासपूर्ण चरित्र आमचे स्नेही डॉ. अेकनाथ पगार यांनी लिहून प्रकाशनाची संधी दिल्याने काळापुढे दृष्टी असलेल्या हिंदुस्थानच्या शिल्पकाराचे चरित्र प्रकाशित होत आहे.

४ ऑगस्ट, २०१८

बाबा भांड
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

लेखकाचे निवेदन

शालेय पाठ्यपुस्तकात एक धडा होता. त्यातला गोपाळ 'मी राजा व्हायला आलो आहे!' असे आत्मविश्वासाने सांगतो. आणि बडोद्याच्या राज्यगादीवर पोहोचतो, प्रजेच्या कल्याणासाठी संपूर्ण कारकीर्द गाजवतो! हे सारे अप्रूप वाटणारे होते. आपल्या आजूबाजूच्या भागात, कवळाणे गावी, मालेगाव तालुक्यात गोपाळ म्हणजेच सयाजीरावांचे १२ वर्षांपर्यंतचे बालपण गेलेले. राजाबद्दलची श्रद्धा सतत मनात असायची. महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात कवळाणे हे सयाजीरावांचे जन्मगाव हाकेच्या अंतरावर वाटायचे, ज्या महाविद्यालयात उच्च शिक्षण झाले त्या महाविद्यालयाचे नाव 'महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव' हे होते. कितीतरी उच्चपदस्थ तज्ज्ञ मंडळी, राजकारणी, वकील, शिक्षणसंस्थांचे प्रमुख बडोद्यातून शिक्षण घेऊन आलेले असायचे. महाराष्ट्रातल्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक संस्था, परिषदा यांना सयाजीराव महाराजांनी राजाश्रय दिलेला. जीवनाचे असे एकही क्षेत्र नसेल की त्या क्षेत्राला सयाजीराव महाराजांचा, त्यांच्या कृती-विचारांचा स्पर्श झालेला नाही. बदलत्या काळातही सयाजीराव महाराजांच्या कृती-उपक्रमांचे स्मरण सतत जागे होत गेले.

अशाच एका टप्प्यावर बाबा भांड यांचे सयाजीराव महाराजांसंबंधीचे वाङ्मयीन आणि सांस्कृतिक संशोधनाचे नवसर्जक काम समोर आले, त्या सर्व वाङ्मयीन वैचारिक आविष्कारातून थोर राष्ट्रपुरुष, लोककल्याणकारी आणि स्वातंत्र्यकांक्षी सुसंस्कृत राजा विचार-चिंतनाच्या केंद्रस्थानी आला. आधुनिक भारताच्या विवेकपूर्ण घडणीत सयाजीराव महाराजांचे योगदान फार मोठे आहे, श्रद्धेला सयाजीरावांच्या वैचारिक सिद्धांतांचा आधार मिळाला. इंग्रजी सत्तेला हेवा वाटेल असे सयाजीरावांचे सर्व क्षेत्रीय कार्य पाहून, त्या कार्याच्या ऊर्जास्रोतांचे महत्त्व लक्षात येत गेले, येते

आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि अध्यक्ष बाबा भांड यांच्या प्रेरक संदेशनातून 'महाराष्ट्राचे शिल्पकार : महाराजा सयाजीराव गायकवाड' या पुस्तकाचे लेखन करण्याची संधी मला मिळाली. हा ज्ञानानंदाचा विचार उत्सव व्हावा, हा लेखन-वाचन प्रवास... या लेखनामागील ही श्रद्धा-धारणा आहे. अध्यक्ष, बाबा भांड यांनी श्रद्धेला लेखन स्फुरण अशी चालना दिली, हे मोठे ऋण मी मानतो.

मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, वाचनालयांची निर्मिती, स्वातंत्र्यकांक्षी क्रांतिकारकांना मदत, अस्पृश्य व आदिवासींसाठी वसतीगृहे, उच्चशिक्षण, शेतकी शिक्षण, तौलनिक धर्मशास्त्र, आधुनिक तंत्रविद्या, कला शिक्षण, सामाजिक शास्त्रातील शिक्षण व संशोधनासाठी शिष्यवृत्ती, स्त्रियांच्या शिक्षणाची विशेष सोय, स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती, सामाजिक सुधारणा आणि कायदे, रेल्वे, कलाभवन, नवनवीन विषयांची पुस्तके, बहुभाषिक शब्दकोश, देशी भाषांना कला-कलावंतांना मदत, गौतम बुद्धांच्या पुतळ्याची प्रतिष्ठापना, विद्याव्यासंग, इंग्रजी सत्तेशी स्वातंत्र्यमूल्याची जपणूक व्हावी म्हणून सततचा संघर्ष, दुष्काळासाठी मदतसंहिता, सहकार चळवळ, शेती-शेतकऱ्यांच्या साह्यासाठी योजना, नाशिक आयुर्वेदिक विद्यापीठाची स्थापना, जागतिक धर्मपरिषदेचे अध्यक्षपद, मानववंशशास्त्र परिषदेचे अध्यक्षपद... अशी अगणित कामे सयाजीरावांनी केली, भारताच्या विकासाचे हे पहिलेवहिले कृतिकार्यक्रम होते.

ना. गोखले, न्या. रानडे, दादाभाई नौरोजी, योगी अरविंद घोष, लो. टिळक, म. फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, रियासतकार सरदेसाई, अर्थतज्ज्ञ आर. सी. दत्त अशा कितीतरी कर्तृत्ववान व्यक्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नवभारताची उभारणी केली. या महापुरुषांच्या उभारणीच्या कार्यात सयाजीराव महाराजांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग होता. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सामाजिक न्याय या मूल्यांचा सयाजीरावांच्या कर्तृत्वात मोठा वाटा आहे, सुसंस्कृत महाराजा म्हणूनही त्यांचे कार्य दिशादर्शक ठरले आहे. सयाजीराव महाराजांच्या विचार आणि कृतींना अभिवादन करण्याची संधी या पुस्तकाच्या लेखनातून मिळाली. प्राचार्य हितेंद्र आहेर, प्रा. जयवंत भदाणे; तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आभार.

- अेकनाथ पगार

अनुक्रमणिका

अध्यक्षांचे मनोगत / ५
लेखकाचे निवेदन / ७
१. स्वातंत्र्यवादी गायकवाड घराणे / ११
२. गोपाळ ते सयाजीराव महाराज / २०
३. शिक्षण आणि जडणघडण / २५
४. लोकहितकारी राज्यकारभाराचा प्रारंभ / ३६
५. सयाजीरावांचे हुजूर हुकूम / ४७
६. सयाजीरावांनी केलेल्या सामाजिक सुधारणा / ६२
७. सयाजीरावांचे शिक्षणाविषयक कार्य / ७५
८. सयाजीरावांचे कला, साहित्य व संस्कृती क्षेत्रातले कार्य / ९०
९. सयाजीरावांचे शेती क्षेत्रातील कार्य / १०३
१०. सुराज्य आणि स्वराज्य / ११०
११. महाराष्ट्राचे शिल्पकार : सयाजीराव / १२०
१२. महाराजांची भाषणे : कृतिप्रेरक ज्ञानकोश / १४०
१३. उपसंहार / १५४
१४. निवडक ग्रंथसूची / १६६



१.

स्वातंत्र्यवादी गायकवाड घराणे

प्रास्ताविक

मराठी राज्याच्या स्वराज्याचा पाया छत्रपती शिवाजी महाराजांनी घातला. स्वाभिमान, पराक्रम, कर्तृत्व, लोककल्याणकारी सर्वसमावेशक राजनीती, बाणेदार; पण उदारमतवादी राज्य यांच्या निर्मितीचा हा पाया छ. शिवाजी महाराजांनी रचला. छ. शिवाजी महाराज नवयुगाचे राष्ट्रीय महापुरुष होते. मराठ्यांचे राज्य शिवशाही, पेशवाई असे सतरावे शतक ते इ.स. १८१८ पर्यंत स्वराज्याचा ध्यास घेत मराठी मुलखात आणि उत्तरेत - दक्षिणेत नांदले. राष्ट्रीय इतिहास मराठेशाहीच्या इतिहासाने संपन्न झाला आहे.

शिवछत्रपतीप्रणित राजनीतीचा भाग असलेले गायकवाड घराणे बडोद्याच्या राज्यप्रशासनात-लोकप्रशासनात कार्यरत होते. याच घराण्यातले सयाजीराव महाराज गायकवाड इ.स. १८७५ ते इ.स. १९३९ पर्यंत लोककल्याणकारी, प्रजाहितदक्ष, द्रष्टे विचारवंत राजे होते. त्यांच्या कार्याचा मोठा प्रभाव महाराष्ट्र, गुजरात आणि संपूर्ण भारताच्या इतिहासावर पडला आहे.

स्वतंत्रता हीच सुराज्याची गुरुकिल्ली

१९३३ साली सयाजीराव महाराजांच्या ७१ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने बडोदा व महाराष्ट्रातील काही जाणत्या मंडळींनी एकत्रितपणे वाढदिवस, गौरव मंडळाची निर्मिती केली. श्री सयाजी गौरवग्रंथ काढला, महाराजांना रौप्यकरंडक अर्पण करून मानपत्र अर्पण केले. हा समारंभ दि. १८ मार्च १९३३ रोजी मुंबईतील ऑपेरा हाऊस नाट्यगृहात आयोजित केलेला होता. मुंबई-महाराष्ट्रातील जवळपास अडीचशे संस्थांचे प्रतिनिधी याप्रसंगी हजर होते, मानपत्र वाचून दाखवण्यात आले, गौरव समारंभात महाराजांनी कृतज्ञता व्यक्त करणारे भाषण केले. ते म्हणाले होते,

''याप्रसंगी मला आपल्या पन्नासहून अधिक वर्षांच्या काळातील कारभाराचे विहंगनिरीक्षण करण्याचा मोह होणे अपरिहार्य आहे. मी राज्यावर आलो त्यावेळी बडोद्यात राजा व प्रजा हे एकमेकांपासून दुरावलेले असल्याचे मला आढळून आले. म्हणून या उभयतांतील अंतर नाहीसे करून प्रजेशी एकजीव होण्याचा मी प्रयत्न केला. त्यासाठी प्रजेत शिक्षणाचा प्रसार करण्याची योजना मी हाती घेतली व इतर मार्गांनी त्यांचे सहकार्य संपादन करण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही राज्यातील कायदे कितीही चांगले असले, तरी ते त्यातील प्रजेच्या सहकारितेने केलेले नसल्यास ते त्यांना आपल्यावर लादल्यासारखे वाटतात. यासाठी मी प्रजेत स्वतः मिसळून व त्यांच्यापैकी हरेक दर्जाच्या व्यक्तींना भेटून, त्यांचे हृदगत समजून घेण्याचा प्रयत्न केला व नंतर त्यांच्या अडचणींची माहिती करून घेऊन त्या दूर कशा कराव्यात याचा विचार केला; परंतु राजा व प्रजा यांच्यात केवळ सहकारिता असल्यानेच सर्व काही भागते असे नाही, तर राज्याची उन्नती व्हावयास प्रजेने क्रमाक्रमाने खालपासून राज्यकारभाराची जबाबदारी आपल्या अंगावर घेण्यास शिकले पाहिजे. स्वतंत्रता हीच सुराज्याची गुरुकिल्ली होय व जे लोक जबाबदारीने कोणताही उपक्रम स्वतः सुरू करू शकत नाहीत ते स्वतंत्र कसले म्हणावयाचे? यासाठी त्यांनी आपल्या अंगावर जबाबदारी घेऊन तेवढ्यापुरते सरकारचे ओझे हलके केले पाहिजे व त्यास राजनीतीच्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास सवड दिली पाहिजे. माझ्या दीर्घ कारकिर्दीत मी अनुभवाने कोणता धडा शिकलो असेन, तर तो हाच होय व म्हणून त्यावरून जर भविष्यकाळाकरिता मी काही संदेश देऊ शकेन, तर तो एका शब्दात सांगता येईल. तो शब्द 'समाजसेवा' हा होय. आजपर्यंतच्या माझ्या सर्व कार्यात हीच एक दृष्टी मी ठेवली होती. माझे प्रयत्न जरी केवळ माझ्या राज्यापुरते असले तरी त्यांचा परिणाम सर्व हिंदुस्थानवर अल्प तरी झाल्यावाचून राहणार नाही, अशी मला आशा आहे. समाजसेवा हे माझे ध्येय आहे. हे ध्येय दुष्कर आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. किंबहुना ते संपूर्णपणे कोणत्याही व्यक्तीस आजपर्यंत साध्य झाले आहे, असे क्वचितच म्हणता येईल. तथापि त्याच्याइतके उदात्त असे दुसरे ध्येयच नाही, असे मला वाटते.''

...त्याचप्रमाणे समाजाच्या स्थैर्याचा पाया शिक्षण आहे... तथापि ते शिक्षण संपादन झाल्यावरही त्याचा उपयोग मनुष्य जर केवळ स्वार्थासाठी करील, तर ते

शिक्षण निरर्थक होईल. इतकेच नव्हे तर केवळ आपल्या जातीपुरता जरी त्या शिक्षणाचा उपयोग केला गेला, तरीही ते शिक्षण व्यर्थ आहे, असे माझे मत आहे. यासाठी केवळ स्वार्थाकडे दृष्टी न ठेवता एकंदर समाजाच्या कल्याणाकडे जर त्या शिक्षणाचा उपयोग केला गेला, तर आपले साध्य आपल्याजवळ येणे पुष्कळ सुलभ होणार आहे...”

(उद्‌धृत/खंड १२/महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/संपादकीय/पृ. एकोणीस-वीस)

सयाजीराव महाराजांच्या भाषणातील ‘शिक्षण प्रसाराची योजना’, ‘राज्याची उन्नती’, ‘स्वतंत्रता हीच सुराज्याची गुरुकिल्ली’, ‘समाजसेवा हे ध्येय’, ‘समाजकल्याणासाठी शिक्षणाचा उपयोग’, ‘प्रजेने घ्यावयाची जबाबदारी’ हे शब्दबंध महत्त्वाचे आहेत.

प्रजा आणि राजा यांच्यातील निकट संबंध, राजाने प्रजेत सरमिसळून जाऊन समस्याशोधन, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि स्वातंत्र्याचा सुराज्यनिर्मितीसाठी विनियोग या महाराजांच्या कृती लोककल्याणकारी सुराज्याच्या निदर्शक आहेत. गायकवाड घराण्यातले दीर्घकाळ सुराज्यसंवर्धक राजे म्हणून सयाजीरावांची कार्यनोंद घ्यावी लागते. इंग्रज सरकारच्या राजवटीआधी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची राजवट असताना तत्कालीन सत्ताधाऱ्यांशी गायकवाडांचा मैत्रीचा करार झालेला होता. इंग्रज सरकार सत्तेत आल्यावर महाराजांनी नेहमीच ‘मैत्री करार’ असल्याचे स्मरण दिले. इतर संस्थानिकांपेक्षा गायकवाडांचे संबंध वेगळे होते हे दाखवून दिले. सार्वभौमत्व-स्वातंत्र्याकांक्षा जपण्याचा आटोकाट प्रयत्न केला. गायकवाड संस्थानाला इतर संस्थानिकांपेक्षा वेगळी म्हणजेच बरोबरीची वागणूक-सत्तास्थान मिळावे याचा त्यांनी आग्रह धरला. लॉर्ड कर्झनशी याबाबतही संघर्षही झाला होता. मराठी राज्य, मराठे घराणे, स्वातंत्र्य यासाठी सत्तास्थान निर्धारित करीत त्यांनी लोककल्याणकारी समाजसेवेचा वसा घेतला होता आणि तो वसा जवळपास ६४ वर्षे जपला.

गायकवाड घराणे

छ. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत औरंगजेब बादशहाशी संघर्ष सुरू होता आणि पुढेही मराठा सरदारांनी मोगलांच्या प्रदेशात मराठ्यांचे साम्राज्य वाढते ठेवले. अशाच स्वराज्यसंवर्धक सरदारांमध्ये खंडेराव दाभाडे हे एक वीर-पराक्रमी



पहिले दमाजीराव गायकवाड

सरदार होते. गुजरात-काठेवाड परिसरात खंडेराव दाभाडे यांनी मराठा साम्राज्य टिकवले आणि वाढवले होते. या खंडेराव दाभाडे यांच्या पदरी गायकवाड घराण्यातील दमाजीराव गायकवाड हे शूर मराठी सरदार होते.

नंदाजी गायकवाड हे गायकवाडांचे मूळ पुरुष होते. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील दावडी हे त्यांचे गाव. नंदाजी गायकवाड भोर संस्थानात किल्लेदार होते. दमाजी गायकवाड नंदाजीचा नातू. शाहू महाराजांनी त्यांच्या शौर्याचा गौरव म्हणून समशेर बहादूर हा किताब दिला. दमाजीरावांचा मुलगा पिलाजीरावाने मोगल सरदाराकडून बडोद्यावर आपली राजसत्ता प्रस्थापित केली.

गायकवाडांचे संस्थान : स्वतंत्र होण्याचा स्वभाव

गायकवाड घराण्याच्या स्वतंत्र होण्याच्या म्हणजे स्वातंत्र्याकांक्षी स्वभावाचे निदान इतिहासाचार्य राजवाडे यांनी केलेले आहे. गायकवाड घराण्याने इतरांचे सत्तावर्चस्व झुगारून देण्याचे प्रयत्न केले; परंतु 'स्वातंत्र्यलब्धी' म्हणजे काय अर्थ

आहे व केवढी जबाबदारी आहे याची कल्पना या संस्थानाला बिलकुल आली नव्हती, असे राजवाड्यांचे प्रतिपादन आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे 'बडोद्यातील सुधारणा' या लेखात ऐतिहासिक आढावा घेताना म्हणतात, की "खंडेराव दाभाड्यांच्या पदरी गायकवाड नामेकरून एक शूर सरदार होता. दाभाड्यांच्या वतीने गुजरातेत तो अंमल करीत असे व मोगलांच्या म्हणजे तत्कालीन मुख्य सरकारचा अंमल झुगारून देत असे. मोगलांचा अंमल झुगारल्यावर कालांतराने बाजीराव साहेबांच्या हस्ते त्रिंबकराव दाभाड्यांचा मोड झाला व गायकवाड पेशव्यांच्या हाताखाली आला. पेशव्यांचे वर्चस्व दु:सह होऊन तत्कालीन गायकवाड ताराबाईच्या पक्षाला मिळाला आणि इ. स. १७५१ मध्ये ताराबाईच्या साहाय्यार्थ साताऱ्यावर चाल करून आला. तेथे गेंड्याच्या माळावर पराभव पावून पेशव्यांचे वर्चस्व कबूल करावे लागले. वरिष्ठ सरकार जे पेशवे यांच्या कचाट्यातून निसटून जाण्याच्या हेतूने लवकरच गायकवाडाने मुंबईच्या इंग्रज कंपनीशी स्वतंत्र तह केला आणि मराठ्यांच्या संयुक्त सत्तेत फूट पाडून ती सत्ता आपल्यापुरती पंगू करण्याचा प्रयत्न केला. नाना फडणीसाच्या कारकिर्दीत गायकवाडीत भाऊबंदकीचे तंटे माजले व गायकवाडी अगदी दुर्बल झाली; परंतु पेशव्यांचे शत्रू जे इंग्रज त्यांची कास धरून पेशव्यांचे वर्चस्व झुगारून देण्याचा उद्योग चाललाच होता. तो उद्योग दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत सफल झाला. गंगाधर शास्त्र्याच्या सहाय्याने बाजीरावाची धूळदाण झाल्यावर पेशव्यांची सत्ता नष्ट झाली व गायकवाड इंग्रजांच्या बगलेत गेले. हा बगलबच्चेपणा इ. स. १८०३ पासून आतापर्यंत ते करीतच आहेत, असा या संस्थानचा स्थूल इतिहास आहे."

(उद्धृत/खंड१२/महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपादक बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. ३८९)

राजवाड्यांनी गायकवाड संस्थान 'बगलबच्चेपणा' करीत आल्याचा निष्कर्ष मांडलेला आहे. सयाजीराव महाराजांनी मात्र 'बगलबच्चेपणा' केला नाही, त्या आधीचे गायकवाड यांनी इंग्रजांशी मैत्री करार केला. या कराराचे स्मरण इंग्रज सरकारला त्यांनी वारंवार करून दिले. सयाजीरावांनी इंग्रजांच्या अधिसत्तेला मुत्सद्देगिरीने प्रतिशह देण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न केलेला दिसतो. महाराजांच्या आधीचे गायकवाड स्वतंत्र होण्याचा, अधिसत्ता झुगारण्याचा आपल्या परीने

प्रयत्न करीत होतेच. सयाजीराव महाराजांनी अधिसत्तेसमोर संपूर्ण शरणागती कधीच पत्करली नाही. संवाद, विचारविनिमय, विनंतीपूर्वक सत्तास्थाननिर्धारण, आधुनिकतावादी कृतिविचारनियोजन या मार्गाने त्यांनी सार्वभौमत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. इतर संस्थानिकांपेक्षा गायकवाड इंग्रजांच्या बरोबरीचे आहेत, अशा कृती त्यांनी केल्या आहेत. सयाजीरावांच्या आधीचे गायकवाड आपसातल्या तंट्याबखेड्यांनी जेरीस आले होते. सामान्यतः बडोद्याचे गायकवाड स्वातंत्र्यासाठी झगडत राहिलेले होते असे म्हणता येईल.

गायकवाडांची सत्ता

नंदाजी गायकवाड यांचा मुलगा केरोजी होय. केरोजी यांना दमाजीराव आणि हिंगोजी ही दोन मुले होती. दमाजी पहिले इ. स. १७२१ मध्ये मरण पावले. हिंगोजीचा मुलगा पिलाजीराव हा दमाजींचा दत्तकपुत्र बनला. पिलाजीरावांचा मृत्यू इ. स. १७३२ मध्ये झाला.

पिलाजीला दमाजीराव दुसरे, खंडेराव (कडीचे जहागिरदार) व प्रतापराव ही तीन मुले होती. दमाजीराव दुसरे यांचा इ. स. १७६८ मध्ये मृत्यू झाला. प्रतापरावाच्या वंशावळीतील भिकाजीराव हे होते. भिकाजीरावास सखाराम, उखाजी, गबाजी, काशीराव व बाबूराव अशी मुले होती. काशीरावास आनंदराव, गोपाळराव आणि संपतराव ही मुले झाली. काशीरावांचा मुलगा गोपाळराव हे बडोद्याच्या शाखेत दत्तक गेले, हेच सयाजीराव महाराज गायकवाड होत.

दमाजीराव गायकवाडांचे पिलाजीराव सत्तेत आले. पिलाजीरावाने गायकवाडांची बडोद्याची सत्ता भक्कम केली. इ. स. १७६१ मध्ये पानिपतची तिसरी लढाई झाली. दमाजीरावांबरोबर लढाईत त्यांचे लहान बंधू प्रतापराव गायकवाडही होते. पानिपतच्या या तिसऱ्या लढाईत मराठ्यांना मोठ्या पराभवास सामोरे जावे लागले. दमाजीराव आणि प्रतापराव यांच्यातही फाटाफूट झाली. पराभवाने हिरमुसलेले, हतबल झालेले प्रतापराव महाराष्ट्रात परतले. सैरभैर झाले. दमाजीराव मात्र जीव वाचवत सैन्यासह बडोद्यात मागे आले. आपली राजकीय कारकीर्द सुरू केली.

परतलेल्या प्रतापरावांनी नवापूर परगण्यातून काही महसूल मिळविला, पुढे पेशव्यांनी प्रतापरावांचा अधिकारही काढून घेतला. प्रतापराव व त्यांची मुले काळोजीराव, गबाजीराव यांच्यासह नाशिक जिल्ह्यातल्या गिरणारे येथे शेती करू

लागले. राजकीय सत्तेपासून त्यांना दूर व्हावे लागले. इ. स. १८१७ मध्ये काळोजीचा नातू भिकाजीरावाने मालेगावजवळील कवळाणे गावी पाटिलकीचे अधिकार विकत घेतले. भिकाजीराव आपल्या मुलाबाळांसह कवळाण्याला आले, मळा-घर विकत घेतले आणि शेतीत गुजराण करू लागले. कवळाणे हे शेतकऱ्यांचे लहानसे खेडे मालेगावपासून १०-१२ मैलांवर आहे. भिकाजीरावांचा मुलगा गबाजीराव कवळाण्याची पाटिलकी करू लागला. बाबू, काशीराव, उखाजी व सखाराम हे शेतमळ्यांमध्ये कष्टत राहिले.

तिकडे बडोद्यात गायकवाडांची सत्ता सुरू होती. प्रतापरावाच्या वंशजांनी बडोद्याला फेऱ्या मारून काही आश्रय-सत्ता मिळवण्याचे प्रयत्नही केले होते. बडोद्याच्या आनंदराव गायकवाडांनी सत्ता संरक्षित व्हावी म्हणून दि. ६ जून १८०२ रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीशी मैत्री करार केला. इंग्रज शासनाने इ. स. १८२० नंतर हाच मैत्री करार पुढे वहिवाटात ठेवला. बडोद्याचे गायकवाड संस्थानिक म्हणून आपल्या हद्दीत राज्यव्यवहार करीत राहिले; पण इंग्रज शासनाची अधिसत्ता व अटी मात्र स्वीकाराव्या लागत होत्या.

सयाजीरावांच्या आधीची गायकवाडांची राजवट

सयाजीराव दैवयोगानेच बडोद्याच्या राजगादीवर आले. त्या काळात सारी अनागोंदीची परिस्थिती होती.

इ. स. १८२० मध्ये सयाजीराव दुसरे यांची राज्य कारकीर्द अस्तित्वात होती. त्यांना १८०२ च्या मैत्री कराराचे अधिकार प्राप्त झालेले होते. मुंबईचे गव्हर्नर माऊन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टनने २ एप्रिल १८२० ला बडोद्याला भेट दिली. राज्यकारभार स्वतंत्रपणे करण्याची संपूर्ण सत्ता एलफिन्स्टनने सयाजीराव दुसरे यांना दिली होती. वाटाघाटी झाल्या आणि पूर्वीप्रमाणे इंग्रज व गायकवाड यांचे सत्तासंबंध राहिले. सयाजीराव दुसरे यांना गणपतराव, खंडेराव आणि मल्हारराव ही तीन मुले होती. गणपतरावांचा मृत्यू इ. स. १८५६ मध्ये झाला. त्या काळात खंडेराव महाराज राज्यगादीवर आले, त्यांना दोन पत्नी होत्या. मूलबाळ नसल्याने रहिमतपूर येथील माने पाटील यांच्याकडील जमनाबाईंशी खंडेरावांनी विवाह केला. खंडेरावांचा भाऊ मल्हारराव हा अत्यंत सत्ताकांक्षी होता. खंडेरावांच्या विरुद्ध कट-कारस्थाने त्याने सुरू केली होती. मल्हाररावाने खंडेरावांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. यामुळे त्याला गुन्हेगारी अपराधी म्हणून तुरुंगात डांबण्यात आले.

खंडेराव महाराज गादीवर आल्यानंतर काही दिवसांत १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले. सैनिकांचा जमाव बडोदा राज्यात प्रवेश करू पाहत होता. राजपिंपळा येथे काही सैनिकही पोहोचले. खंडेराव महाराजांनी आपले सैन्य पाठवून उठाव हाणून पाडण्याचा प्रयत्न केला. या घटनेच्या संदर्भात दादूमिया म्हणतात,

"खंडेरावांनी नांदेडला आपले सैन्य धाडले. ओखामंडळ येथे वाघेर लोकांनी उठाव केला; पण ते बंड ब्रिटिश पलटणींनी मोडून काढले. बडोदे राज्याची स्थिती एखाद्या ज्वालामुखी पर्वतासारखी झाली होती. केवळ खंडेरावांमुळे तो तप्त ज्वालामुखी थंड झाला. हे उपकार स्मरून गायकवाड इंग्रजांना दरवर्षी तीन लक्ष रुपये वार्षिक खंडणी देत. ती त्यांनी उदार (?) अंतःकरणाने माफ केली. त्यांना दत्तक घेण्याचा अधिकार १८६२ मध्ये देण्यात आला आणि जी.सी.एस.आय. हा किताबही बहाल करण्यात आला."

(श्रीमंत सयाजीराव गायकवाड/दादूमिया/गंधर्व-वेद प्रकाशन, पुणे/२०१०/ पृ. ३३)

खंडेराव महाराज आणि इंग्रज सरकारचे संबंध सलोख्याचे होते. दादूमिया यांनी खंडेरावांचे इस्लामबद्दलचे प्रेमही निर्देशिले आहे. 'खंडेराव इंग्रजांसाठी 'देव' होते. हिंदूंना हा 'पीर' आवडत नसे.' असे भाष्य दादूमिया यांनी केले आहे. इ. स. १८७० मध्ये खंडेरावांचे निधन झाले. त्यांच्या पत्नी जमनाबाई गरोदर होत्या.

खंडेरावांच्या निधनानंतर मल्हारराव राज्यगादीवर आले. मल्हाररावांचे आणि इंग्रजांचे संबंध सतत संघर्षाचे राहिले. त्यांची राज्यकारभाराची पद्धतीही संतुलित नव्हती. त्यांचे राष्ट्रवादी विचारांच्या व्यक्तींशी संबंध होते. ब्रह्मानंद स्वामींना त्यांनी गुरू केले होते. गुरूच्या इच्छेनुसार मल्हाररावांनी चांदोद येथे घाट बांधला. सुरसागर तलावाच्या चारही बाजूंना कठडे बांधले, सुशोभीकरण केले, एक मोफत आरोग्य सेवा केंद्र उभारले.

बाबा भांड यांनी मल्हाररावांच्या राज्यकारभाराबद्दल म्हटले आहे की, "मल्हाररावांकडे राज्य सांभाळण्याचे गुण नव्हते. खंडेरावांच्या जवळच्या माणसांचा त्यांनी छळ सुरू केला. त्यांच्या लहरी आणि मनमानी कारभारास ऊत आला. राज्यात अनागोंदी माजली. अन्याय, जुलूम, भ्रष्टाचार सुरू झाला. बायकांच्या मागे धावणे सुरू झाले. नजराणे स्वीकारणे, जो अधिक लाच देईल त्यांना न्याय

मिळू लागला. प्रजा जेरीस आली. बेताल वागणे पराकोटीला पोहोचले. पापाचा घडा वेळ आली की भरत असतो असे म्हणतात. मधल्या काळात जमनाबाई प्रसूत होऊन कन्यारत्न झाले. मल्हाररावांना अत्यानंद झाला.”

(लोकपाळ राजा/सयाजीराव/बाबा भांड/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/आवृत्ती चौथी/२०१६/पृ. १५)

याच काळात दादाभाई नौरोजी बडोदा राज्याचे दिवाण होते. इंग्रजांचा मल्हाररावांवर रोष होताच. मल्हाररावांच्या राज्यकारकिर्दीबद्दल इंग्रज रेसिडेंट तक्रारी करीत होते. मल्हाररावाने कर्नल फेयरवर विषप्रयोग करून ठार मारण्याचा कट रचला, असा आरोप झाला. चौकशीसाठी मुंबईचे पोलीस कमिशनर शूटर व रेसिडेंट पेली हे आले. याच काळात दादाभाई नौरोजींनी दिवाणपदाचा राजीनामा दिला. मल्हाररावाला पदच्युत करून रेसिडेंटने बडोदा राज्याचे शासन ताब्यात घ्यावे, असा आदेश झाला. मल्हाररावाला अटक झाली. चौकशी समिती नेमली गेली. कर्नल फेयरविरुद्ध हेरगिरी करणे, कर्नल फेयरच्या हाताखाली अधिकाऱ्यांना लाच देऊन भ्रष्टाचारास प्रवृत्त करणे व विषप्रयोगाने कर्नल फेयरला ठार मारण्याचा प्रयत्न करणे, असे आरोप करण्यात आले होते. १८ एप्रिल १८७५ रोजी इंग्रज सरकारने मल्हाररावाला राज्यापासून पदच्युत केले. चार वर्षांची त्यांची राजवट बरखास्त करण्यात आली, मद्रासच्या तुरुंगात रवानगी झाली, तेथेच त्यांचा मृत्यू झाला.

मल्हाररावाची राजवट संपुष्टात आणली गेली, या काळात खंडेरावांच्या पत्नी जमनाबाई पुण्यात राहत होत्या. मल्हाररावांची मद्रासला रवानगी झाल्यावर जमनाबाईंना अल्पवयीन योग्य दत्तकपुत्र घेण्याची अनुमती देण्यात आली होती. सन्मानाने महाराणी जमनाबाईंना पुण्याहून मुलीसह बडोद्यात आणण्यात आले, त्यांना दत्तकपुत्र घेण्याचा आदेशही झाला होता.

नाशिक जिल्ह्यातील कवळाणे येथील काशीरावांचा मुलगा गोपाळ याचे दत्तकविधान होऊन गायकवाडांची सत्ता तेजोमय झाली. गोपाळ म्हणजेच सयाजीराव महाराज (३ रे) होत.

पानिपतानंतर महाराष्ट्रात परतलेल्या गायकवाडांचा गोपाळ ऊर्फ सयाजीरावांच्या रूपाने सत्ताधारी म्हणून प्रतिष्ठापना झाली.

●●●

२.

गोपाळ ते सयाजीराव महाराज

प्रास्ताविक

कवळाणे येथील शेती-शेतकरी, गुरेढोरे, पाऊसपाणी, ओढे-झरे-विहिरी यांच्या संगतीत वावरणाऱ्या, खेळ, शेतीत मदत करणाऱ्या गोपाळला दत्तकविधानाने महाराजापद मिळाले. हे सत्तास्थान प्राप्त होताना दैवयोगाची काही साथ लाभली. 'महाराजा' हे पद मात्र लोककल्याणाच्या कर्मयोगाने साधले गेले. महाराज आधुनिक, उदारमतवादी आणि स्वातंत्र्यवादी विचारांचे होते. प्रत्यक्ष कृती, निरीक्षण, विश्लेषण, समंजस सहविचारसभा, समिती यांच्यावर त्यांचा भर होता. परंपरा परिवर्तन त्यांना अपेक्षित होते. परंपरेत ज्या काही चांगल्या गोष्टी असतील त्या उदारमनाने ते स्वीरकारतही ! दैवयोगाला त्यांनी कर्मयोगाने परिवर्तित केले. गोपाळ ते सयाजीराव महाराज हा त्यांचा प्रवास ज्ञानलालसा, प्रजाहितदक्षता, कृतिकेंद्रित्व, सामंजस्य, विद्याव्यासंग या गुणांच्या आधाराने झाला आहे.

जन्म व बालपण

पानिपतच्या पराभवाने ताटातूट झालेले प्रतापराव महाराष्ट्रात परतले, त्यांचे महसूल वसुलीचे अधिकारही गेले. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव. मनमाड-चांदवड-उमराणे या परिसरातील गिरणारे या गावी ते शेती करू लागले होते. सरदारपद, मानमरातब, निर्णयक्षमता, सत्ता, लढवय्येपण सारे बाजूला पडले. प्रतापरावाच्या शाखेतील भिकाजीरावांच्या मुलांनी मालेगाव-मनमाड रस्त्याच्या कडेवरच्या कवळाणे या गावी पाटिलकी आणि शेतमळा विकत घेतला. भिकाजीरावाचा मुलगा काशीराव हाही कवळाणेत शेती–मातीशी झुंज देत होता. या काशीरावाला आनंदराव, गोपाळराव व संपतराव ही मुले होती. गोपाळरावच सयाजीराव महाराज बनला.

दि. ११ मार्च १८६३ रोजी गोपाळचा जन्म झाला. आईचे नाव उमाबाई होते. गोपाळचे वडील म्हणजे प्रतापरावांचे पणतू काशीराव गायकवाड. गोपाळच्या जन्माच्या वेळी कवळाणे हे अगदीच लहान खेडे होते. सर्व शंभरभर कुटुंबांचा शेती हाच मुख्य जीवनमार्ग होता. गोपाळ दिवसभर मुलांसोबत शेतकामात, गुरे चारण्याच्या कामात किंवा खेळ खेळण्यात मग्न असायचा. शाळा नव्हती आणि औपचारिक शिक्षण काही झाले नाही. सामान्य शेतकीतल्या कुटुंबातील मुलांचे बालपण जसे असते, तसे गोपाळचे कवळाण्यातले बालपण व्यतीत झाले. १२ वर्षे वयातल्या गोपाळचा हा अधिवास होता.

बडोदा राज्यगादीसाठी वारसाचा शोध

मल्हारराव गायकवाड यांच्यावर विषप्रयोगाचा आरोप झाला, त्यांना पदच्युत करून तुरुंगात पाठवले गेले होते. खंडेराव महाराजांच्या पत्नी पुण्यात लहान मुलीसह राहत होत्या. त्यांचे बडोद्यात दि. २ मे १८७५ रोजी आगमन आले. जमनाबाईंना बडोदा राज्यगादीसाठी दत्तकपुत्र घेण्याची परवानगी देण्यात आली. जमनाबाईंचे तेव्हाचे वय २२ वर्षे होते. दत्तकपुत्र गायकवाड राजघराण्यातील अल्पवयीन असावा, जमनाबाईंपेक्षा लहान असावा अशा अटी होत्या. बडोद्यात गायकवाडांची राजघराण्याशी संबंधित चार मुले होती. ही मुले पंचवीस ते तीस वर्षांची होती, त्यामुळे त्यांना दत्तक घेता आले नाही. काही संबंधितांनी अकांडतांडव करून पाहिले, एकास अनौरस ठरवले गेले. तातडीने दत्तकपुत्राचा शोध सुरू झाला.



राजमाता जमनाबाईसाहेब

गायकवाड राजघराण्यातील प्रतापरावांची शाखा नाशिक जिल्ह्यात असल्याची माहिती होती. मुंबईच्या इंग्रज गव्हर्नरने राज्यगादीचा वारस शोधण्यासाठी मोहीम

सुरू केली. गायकवाडांचे मूळगाव दावडी, जिल्हा पुणे येथेही शोध घेण्यात आला. नाशिकला असलेल्या कलेक्टर एलियट यांनी शोधाला सुरुवात केली. गायकवाड राजघराण्याचे वंशज, औरस वारस त्यांनी शोधले. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील उपाध्यायांकडे तीर्थयात्रा करणारे, धर्मविधी करणारे यांच्याकडे वंशावळीच्या नोंदी असतात. कुटुंबप्रमुख कोण? जात? केलेला विधी? दक्षिणा? अशी साग्रसंगीत नोंद उपाध्यायांच्या कागदपत्रात असते. नाशिकचे विनायकभट दीक्षित आणि त्र्यंबकेश्वरचे धोंड भट शुक्ल यांच्या दप्तरी गायकवाड राजघराण्यातल्या वारसांच्या नोंदी सापडल्या. विनायक भटांनी सांगितले, ''नाशिकक्षेत्री लोक जेव्हा यात्रेकरिता येतात, त्यावेळी कोणातरी ब्राह्मणास उपाध्येपण देऊन सर्व विधी करवितात. ज्या घराण्याचे उपाध्येपण मिळाले त्या लोकांच्या दानधर्मावर आमचा हक्क असतो. त्या लोकांचे पुढील वंशजही आमच्याकडेच येतात. तिथपासून या तीर्थक्षेत्री घराण्यातले कोण कोण लोक येऊन गेले त्यांच्या नोंदी आमच्याजवळ आहेत. ही वंशावळ नोंद धर्मशास्त्र आणि प्रचलित प्रशासनास मान्य असते. गायकवाड वंशाचे संस्थापक पिलाजीराव १७३१ साली नाशकात आले, ते आमचे यजमान आहेत. याचा अर्थ बडोद्याच्या गायकवाडांनी आम्हाला उपाध्येपण दिले. पिलाजीरावांचे पुत्र प्रतापराव आणि कवळाण्याचे काशीराव प्रतापरावांचे पणतू आहेत.''

(युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२०१२/पृ. ३४)

नाशिकचे कलेक्टर कवळाण्यात

काशीरावांची मुले, काशीरावांची भावंडे बडोदा राजघराण्यातील गायकवाडांचे वैध भावंडे-भाऊबंद असल्याचा अहवाल मुंबई-बडोदा येथे पाठवण्यास नाशिकच्या कलेक्टरने विलंब केला नाही. बडोदा रेसिडेंट दिवाण सर टी. माधवराव, महाराणी जमनाबाई यांच्या आदेशाने नाशिकचे कलेक्टर मालेगावला पोहोचले. तेथून कलेक्टर कवळाण्याला पोहोचले. लहानशा कवळाणे खेड्याला सारे अप्रूपच वाटले. कलेक्टरने काशीरावांना सांगितले, की बडोदा सरकारचे बोलावणे आहे. काशीराव आणि त्यांची मुले आनंदा, गोपाळ व संपत, भावाची मुले यांना नाशिकला बोलावण्यात आले. गोपाळराव डोंगरे यांच्याकडे उतरले. कपडेलत्ते

खरेदी करून डोंगरे सर्वांना कलेक्टर एलियट यांच्याकडे घेऊन गेले. काशीराव गोपाळराव डोंगऱ्यांची शेती करीत, त्यांच्यात स्नेहबंध होते.

सर्वांचा नाशिक-मुंबई-बडोदा असा रेल्वेप्रवास पोलीस बंदोबस्तात झाला.

राजेपद मिळवण्यासाठी आलो !

काशीराव व त्यांची मुले, भावाची मुले असे सारेजण बडोद्यात पोहोचले. त्यांची चांगली बडदास्त ठेवण्यात आली. दुसऱ्या दिवशी जमनाबाईसाहेबांसमोर एकेका मुलास आणून उभे करण्यात आले. "तुम्हाला येथे कशाला आणले आहे?" हा प्रश्न प्रत्येकाला विचारला गेला. प्रत्येकाने वेगवेगळे उत्तर धांदरटपणे दिले.

गोपाळला राणीसाहेबांनी विचारले, "तुम्हाला येथे कशाला आणले आहे?"

आत्मविश्वास आणि करारीपणे गोपाळने उत्तर दिले, "मी बडोद्याचा राजा होण्यासाठी इथे आलो आहे !" गोपाळचे हे आत्मविश्वासपूर्वक दिलेले उत्तर ऐकून सारेच भारावले. महाराणी जमनाबाईंना गोपाळच्या डोळ्यांत चमक दिसली. बाणेदार उत्तराने, समर्पक शब्दांमुळे गोपाळचे वेगळेपण महाराणी जमनाबाईंना भावले. त्या अत्यंत संतुष्ट झाल्याच; पण गोपाळच्या उत्तराने चकितही झाल्या.

गोपाळला निवडायचे महाराणींनी ठरवले. दिवाण सर टी. माधवराव आणि रेसिडेंट सर रिचर्ड मीड यांचा सल्ला घेतला. त्यांनीही गोपाळचे निरीक्षण केले, देहबोली अनुभवली. महाराणींची निवड उचित असल्याने गोपाळला दत्तक घेण्यास हरकत नसल्याचे सांगितले. रेसिडेंट यांनी गव्हर्नर आणि वरच्या सत्ताधारी सरकारला गोपाळला दत्तक घेण्याचा प्रस्ताव करून मंजुरीसाठी पाठवला. दिनांक २० मे १८७५ रोजी गोपाळला बडोद्याच्या राजगादीसाठी दत्तकपुत्र म्हणून मान्यता देण्यात आली. राजपदावर घेण्याची परवानगी मिळाल्याने सर्वांना आनंद झाला.

गायकवाड घराण्याशी संबंधितांनी या गोष्टीला विरोध केला. काशीराव व त्यांची भावंडे प्रतापराव शाखेकडून औरस वारसदार असल्याचा निर्णय धर्मशास्त्र्यांनी मान्यच केला होता. राजपदासाठी दत्तकविधानास इच्छुक असणाऱ्या स्थानिक गायकवाडांनी विरोध दाखवला. टी. माधवरावांनी मागील कागदपत्रांची छाननी करून इच्छुकांना दूर सारले. यापूर्वीही या इच्छुकांना अनौरस वगैरे ठरवण्यात आले होते. शिवाय त्यांचे वयही अधिक होते. त्यामुळे या विरोधकांना शांत बसावे लागले, काहींना शांत करण्यात आले.



बारा वर्षांचा गोपाळ राजा झाला.

कवळाण्याचा निरक्षर असलेला, शेती-मातीतला गोपाळ हा दत्तकपुत्र बनला. दि. २७ मे १८७५, गुरुवारी दत्तकविधान झाले. गोपाळचे 'सयाजीराव तिसरे' असे नामकरण झाले.

'मी इथे राजा व्हायला आलो आहे' हे उद्‌गार सार्थ ठरले आणि सयाजीराव महाराज गायकवाड यांची राजवट बडोद्यात सुरू झाली.

दिवाण सर टी. माधवराव आणि रेसिडेंट रिचर्ड मीड यांच्या उपस्थितीत दत्तकविधान आणि राज्यारोहण समारंभ झाला. महाराणी जमनाबाई यांना मोठा आधार मिळाला. गायकवाड राजघराण्यात राजगादीला औरस वारस मिळाला.

गोपाळचे सयाजीराव बनणे ही घटना अत्यंत मूल्यवान आहे. दैवयोगाचे कर्मयोगात, लोककल्याणयोगात रूपांतर घडण्याचे हे क्षण गोपाळच्या, महाराणींच्या, काशीरावांच्या आणि बडोदेकरांच्या मनात कायमचे घर करून बसले.

३.

शिक्षण आणि जडणघडण

प्रास्ताविक

गोपाळ ते सयाजीराव महाराज असा जीवनप्रवास आश्चर्यकारकरीत्या घडून आला. कवळाणे येथील शाळेत गोपाळ गेलेलाच नव्हता. जमनाबाईंना सयाजीरावांच्या शिक्षणाची काळजी वाटू लागली. सयाजीरावांच्या राजकीय शिक्षणाची, राजेपदी असलेल्या व्यक्तीच्या आचारविचारांच्या संस्कारांची सोयही महाराणींना करावी लागली. या शिक्षणसंस्कारांनी महाराजांच्या जीवनाला कर्तृत्वाचा सुंदर आकार पुढे मिळाला.

जाहीरनामा

सयाजीराव बडोद्याच्या राज्यगादीवरचे अधिकारी-महाराज म्हणून संस्थापित झाल्यावर सर. टी. माधवराव दिवाण यांच्या सहीने जाहीरनामा २७ मे १८७५ रोजी काढून जनतेत प्रस्तुत करण्यात आला.

''सर्व लोकांस जाहीर करण्यात येत आहे, की आज प्रातःकाळी नामदार गव्हर्नर जनरल साहेबांचे एजंट आणि स्पेशल कमिशनर यांनी दि. २५ रोजी काढलेल्या जाहीरनाम्याअन्वये श्री. महाराणी जमनाबाईसाहेब यांनी महाराजसाहेब यांना विधीपूर्वक दत्तक घेतले आहे आणि त्यांचा अनेक इंग्रजी व स्थानिक अधिकारी आणि प्रतिष्ठित लोक यांच्या समक्ष राज्याभिषेक करण्यात आला आहे.''

या गोष्टींची माहिती बडोदे राज्याच्या सर्व प्रजाजनांनी घेऊन श्री. महाराज सयाजीराव यांना दीर्घायुष्य व अभिवृद्धी प्राप्त होण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना करावी.''

(उद्‌धृत/युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/साकेत प्रकाशन, औरंगाबाद /२०१२/ पृ. ५०)

सयाजीराव महाराजांचे नाव राजा म्हणून सर्व बडोदे राज्यात पोहचले.

रेसिडेंटचा आदेश

सयाजीराव बारा वर्षांचे म्हणजे 'अज्ञान राजे' होते. दत्तकविधानातही कमी वयाचीच अट होती. बडोदा राज्याच्या राज्यव्यवहारात हस्तक्षेप करून रेसिडेंट दिवाण यांच्यामार्फत इंग्रज सरकार आपले वर्चस्व गाजवू पाहत होते. दत्तकविधानास मान्यताही सरकारच देत असे, दिवाणाची नेमणूकही सरकारी पातळीवरूनच होत असे. देशी राजे आणि प्रजा यांच्यावर हुकूमत गाजवण्यासाठी इंग्रज सरकार असे आदेश देत असे.

''सयाजीराव महाराज सज्ञान होईपर्यंत राज्यकारभार पुढीलप्रमाणे व्हावा-

बडोदा राज्याच्या सैन्यावर रेसिडेंटचा पूर्ण अधिकार असेल; बाकी अधिकार दिवाणाकडे असतील. नवीन कर बसवणे, जमिनीची नवीन जबाबदारी ठरविणे, दहा हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च करणे, पाचशे रुपयांहून अधिक उत्पन्नाची सरकारी कामे देणे, सरकारी जमीन बक्षीस देणे आणि न्यायाधीशांनी दिलेल्या फाशीची अंमलबजावणी करणे. या सर्व बाबींची परवानगी देण्याचे अधिकार रेसिडेंट यांना असतील.''

राजमाता गायकवाड घराण्याच्या प्रमुख आहेत. अज्ञान राजाची कारकिर्द पूर्ण होईपर्यंत त्या महाराजांच्या पालक आहेत. राजघराण्यातील सर्व व्यक्तींवर त्यांचा अधिकार असेल. राजवाड्यातील कारभार त्याच पाहतील; मात्र त्यांनी नवीन जवाहीर खरेदी करू नये. जवळच्या माणसांना अमर्याद बक्षिसे देऊ नयेत, अनावश्यक खर्च करू नये. महाराणींनी राज्यकारभारात हस्तक्षेप करू नये, अशी सक्त सूचना, आदेश देत आहे.'' (उद्धृत/पूर्वोक्त/पृ. ५६.५७)

सर टी. माधवराव

बडोदे राज्याची बिघडलेली परिस्थिती नीट करण्याचे श्रेय दिवाण सर टी. माधवराव यांना आहे. दादाभाई नौरोजी यांनी दिवाणपद सोडल्यावर सर टी. माधवराव बर्वे दिवाण म्हणून नेमले गेले. इ. स. १८७५ ते १८८१ हा त्याचा कार्यकाळ सयाजीराजांच्या जडणघडणीचा महत्त्वाचा काळ होता. महाराजांचे शिक्षण, राजशिष्टाचाराचे प्रशिक्षण, राज्यकारभाराचे प्राथमिक धडे याकडे टी. माधवरावांचे लक्ष होते. सर टी. माधवराव इंग्रजांच्या विश्वासातले होते ''एखाद्या संस्थानामध्ये अंदाधुंदी असेल, तर इंग्रज जाणूनबुजून 'वयाने सज्ञान नसलेला'

राजा आणि 'सज्ञान असलेला' दिवाण अशी परिस्थिती कृत्रिमरीत्या निर्माण करत आणि त्या काळामध्ये आपाल्याला अनुकूल अशा सर्व गोष्टी सुधारणांच्या नावाखाली पदरी पाडून घेत." असे दादूमिया यांचे आकलन आहे. (श्रीमंत सयाजीराव गायकवाड/दादूमिया/ गंधर्ववेद प्रकाशन, पुणे/२०१०/पृ. ४०)



दिवाण सर टी. माधवराव

सर टी. माधवराव यांचे मद्रासला उच्चशिक्षण झालेले होते. ते मद्रास विद्यापीठात काहीकाळ प्राध्यापकही होते. त्यांचे वडील त्रावणकोरच्या संस्थानात दिवाण होते. वडिलानंतर त्यांनी त्रावणकोर संस्थानात दिवाणपदी उत्कृष्ट कार्य केले. इ. स. १८७३ मध्ये इंदूर संस्थानचे दिवाणपद त्यांना मिळाले. तेथेही त्यांनी राजकीय स्थैर्य, शांतता व सामंजस्य निर्माण केले. मल्हाररावांची कारकिर्द अनागोंदीची ठरली होती, अशा काळात सर टी. माधवराव बडोद्याच्या दिवाणपदी आले, जमनाबाईसाहेबांच्या आणि सयाजीरावांच्या राजकीय स्थैर्यासाठी त्यांनी इंग्रज रेसिडेंट, इंग्रज सरकार यांच्या नियंत्रणात राहून चांगले काम केले. सयाजीराव 'अज्ञान राजे' म्हणून टी. माधवरावच राज्यव्यवहार पाहत आणि नियंत्रित करीत होते. सयाजीरावांच्या शिक्षणात, राज्यसंस्कारात सर टी. माधवराव यांना महत्त्वाचे स्थान आहे. राज्यव्यवहार सैद्धांतिक आणि प्रत्यक्षगत कसा करावा, याचे मार्गदर्शनही सयाजीरावांना त्यांनी केले.

शिक्षणाचा श्रीगणेशा

रेसिडेंट आणि दिवाण यांनी सयाजीरावांच्या शिक्षणाची योजना आखली. सयाजीराव निरक्षर असल्याने त्यांना अगदी बारीक-सारीक बाबींचे शिक्षण-

प्रशिक्षण देणे अपेक्षित होते. 'राजा असणे' म्हणजे काय? याचेही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शिक्षण द्यावे लागणार होते.

केशवराव पंडित आणि व्यंकटराव जोशी (भाऊ मास्तर) यांची सयाजीरावांचे शिक्षक म्हणून नेमणूक झाली.

शाळा सुरू झाली, समवेत संपतराव, चुलतबंधू गणपतराव हेही विद्यार्थी म्हणून सयाजीरावांसोबत शिकू लागले. रोज पाच तास शाळा भरायची. दिवाण माधवरावांनी या शिक्षणाला औपचारिक आणि सूत्रबद्ध रूप देणारी योजना आखली. स्वतंत्र शाळा- इमारत, क्रीडांगण, प्राचार्य, अध्यापक, अभ्यासक्रम, इतर सहयोगी विद्यार्थी अशी ही अपेक्षित योजना गव्हर्नर जनरलकडे पाठवली गेली. शाळेचा मुख्याध्यापक विशेष पात्रता असणारा इंग्रज तज्ज्ञ शिक्षक असावा, असेही योजनेत अपेक्षित होते.

रत्नागिरीचे जिल्हा न्यायाधीश मि. बर्डवूड यांनी मि. एफ. ए. एच. इलियट या तरुण आय.सी.एस. अधिकाऱ्याची सयाजीरावांचे शिक्षक म्हणून शिफारस केली. त्यावेळी इलियट हे वऱ्हाड प्रांताचे शिक्षण संचालक म्हणून कार्यरत होते. दि. १० डिसेंबर १८७५ रोजी इलियट रुजू झाले. एका लहानशा बंगल्यात शाळा सुरू झाली. पब्लिक स्कूलच्या धर्तीवर शिक्षणसंस्कार सुरू झाले. सहयोगी शिक्षणपद्धती असल्यामुळे महाराजांसमवेत संपतपराव, चुलतभाऊ दादासाहेब, गणपतराव, बाळासाहेब गुजर, गोविंदराव गुजर, सरदारांची मुले आणि मानकऱ्यांची मुले शिकू लागली. मराठी, इंग्रजी, गुजराती आणि उर्दू या चार भाषा, इतिहास, गणित व भूगोल हेही विषय होते. देशी खेळ, मैदानी व्यायाम-सराव अशी योजना केली होती.

इलियट यांचे सयाजीरावांच्या घडणीवर लक्ष केंद्रित होते. शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र यांची मर्मदृष्टी त्यांनी अंगीकारली होती. महाराजांसाठी नवी शाळा बांधून झाली. प्राचार्य इलियट व इतर शिक्षकांची निवाससोय शाळेजवळ करण्यात आली. इलियट यांच्या मार्गदर्शनाने सयाजीरावांचे अंतरंग आणि बहिरंग प्रगल्भ झाले. गुरू-शिष्यांमध्ये ज्ञानकेंद्री आत्मभाव, प्रेम निर्माण झाले.

पहिल्या वर्षाचा अहवाल इलियट यांनी पाठवला, तो असा –

"सयाजीरावांचा प्रारंभ सावकाशीने होत आहे, त्यांना ज्ञानाची तीव्र जिज्ञासा आहे. मेहनत आणि चिकाटी हे गुण त्यांच्याठायी आहेत."


सर टी. माधवराव यांनी अभिप्राय दिला, तो असा –

''महाराजांच्या शिक्षणासंबंधाने मातोश्री महाराणी जमनाबाईसाहेब अत्यंत काळजी घेतात. त्यांची ममता शिक्षणाआड येत नाही. त्यांनी महाराजांच्या शिक्षणासाठी ज्या सोयी केल्या आहेत, त्याहून जास्त चांगल्या सोयी कोणत्याही देशी संस्थानात आढळणार नाहीत. महाराजांच्या शारीरिक व नैतिक शिक्षणावर महाराणीसाहेबांची चांगली देखरेख आहे.'' (युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/साकेत प्रकाशन/२०१२/पृ. ७०)

इलियट यांनी महाराजांच्या शैक्षणिक, कौटुंबिक व सार्वजनिक कृतींचे वेळापत्रक आखले होते. इलियट सरांच्या देखरेखीखाली शिस्तीने; पण आपुलकीने सयाजीराव भारावलेले होते. सयाजीरावांच्या जीवनकार्यावर सर्वाधिक प्रभाव इलियट यांचा पडला. महाराजांच्या अंगी उद्योगप्रियता, दृढनिश्चय, आत्मसंयमन व नियमाधीनता हे स्थायी स्वरूपाचे गुण दिसून येतात, असा इलियट यांचा अभिप्राय आहे. इलियट यांनी सयाजीरावांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवले होते.

एफ. ए. एच. इलियट

सयाजीरावांच्या अंतर्बाह्य विकसनाचे श्रये इलियट यांच्याकडे जाते. गुरू-शिष्य नात्यात तज्ज्ञता आणि आत्मीयता दोन्ही दिसून येतात. सयाजीरावांचे रसिक, विद्वान, जिज्ञासू, काव्यप्रेमी, समंजस आणि स्वातंत्र्यवादी, उदारमनस्क व्यक्तित्त्व घडवण्याचे काम इलियट यांनी केले. ते ब्रिटिश सेवेत आय.सी.एस. अधिकारी होते. त्यांचे वडील मद्रासला गव्हर्नर होते. शिक्षणसंचालक पदावरून ते सयाजीरावांचे शिक्षक म्हणून आले. पब्लिक स्कूलच्या पद्धतीचा शिक्षणक्रम त्यांनी राबवला.



गुरुवर्य एफ. ए. एच. इलियट

'सयाजीरावात शिक्षणाबद्दल जिज्ञासा, इतिहासाबद्दलची आवड आणि प्रशासनातील दूरदृष्टी विकसित करण्यात या गुरूंचा मोठा वाटा आहे. प्रजाहित हे राजाचं पहिलं कर्तव्य आहे. साहित्य, कला व संस्कृती संवर्धन हेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यासोबत त्यांनी स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाची ज्योतही प्रज्वलित केली,' असे बाबा भांड यांनी इलियट यांच्या संबंधाने नोंदवले आहे. (लोकपाल राजा सयाजीराव/बाबा भांड/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/आ. ४ थी/२०१६/पृ. २६)

सयाजीरावांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर इलियट यांना सयाजीरावांनी सेटलमेंट कमिशनरपदी नेमले होते. बडोदे राज्यात इलियट यांनी राहावे, राज्याच्या विकासकामांत सहभागी व्हावे, असे त्यांना वाटत असे. रेसिडेंट व वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्यांना मात्र इलियट यांचे सयाजीरावांशी असलेले सख्यत्व आवडत नसे. इलियट यांना वरिष्ठांनी पुन्हा ब्रिटिश सत्तेत मागे बोलावून घेतले. सयाजीरावांचा इलियट यांच्याशी स्नेह कायमच राहिला. त्यांचा १९१० साली मृत्यू झाल्यावरही इलियट कुटुंबीयांच्या सुखदुःखात सयाजीराव सहभागी होत असत. या गुरू-शिष्यांचा हृद्य पत्रव्यवहार उपलब्ध आहे.

सयाजीरावांचे पहिले भाषण

सयाजीरावांच्या शिक्षणाच्या काळातच त्यांच्यावर भाषण करण्याचा प्रसंग आला. भाषा व इतर शैक्षणिक विषय, कौशल्ये सयाजीराव शिकत होते. व्यायाम, खेळ, घोडदौड वगैरेंचे कौशल्य हस्तगत करीत होते. निबंधलेखनाचे गृहपाठ करून इंग्रजीचे अध्ययन सुरू होतेच. बडोदा शहरातील सार्वजनिक बागेच्या उद्‌घाटनाचे भाषण त्यांना करायचे होते. भाऊ मास्तर, केशवराव पंडित यांनी भाषण तयार केले. दिनांक ८ जानेवारी १८७९ रोजी केलेल्या या भाषणातील काही अंश पाहू. "शुद्ध हवा, हिरवळीच्या जागा व सुंदर फुले कुणाला आवडत नाहीत ! परंतु आपल्या या शहरात वस्ती मोठी व शिवाय ती दाटही असल्याने पुष्कळ मध्यम स्थितीतल्या लोकांना आपापल्या घरालगत छोटेखानी बागबगीचे करणे अशक्य झाले आहे... या बागेमध्ये सर्वांनी आपल्या मुला-बाळांना घेऊन येत जावे, थोडा वेळ इथे मजेत घालवीत जावा. आपले आरोग्य व उल्हास यांचे इथे वर्धन करून घेऊन घरी परत जावे. या बागेत जी पांढरी बंगली आहे तेवढी मला स्वतःसाठी राखून ठेवण्याची आवश्यकता आहे. तिच्याखेरीज बाकीचा

सगळा बाग माझ्या प्रजाजनांना व इतर सामान्य जनतेला कायमचे बक्षीस म्हणून मी मोठ्या आनंदाने देऊन टाकतो." (महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह खंड १, भाग १/ संपादक /रमेश वरखेडे/महाराष्ट्र शासन/२०१७/ पृ. ६)

या भाषणातील प्रजाहितदक्षता महत्त्वाची आहे. सुंदर पर्यावरणास वापरण्याची संधी सर्वसामान्यांना प्राप्त व्हावी, प्रजाजन आनंदी, उत्साही असावेत, ही महाराजांची धारणा होती. प्रजेसाठी सार्वजनिक बाग असावी हे त्यांना वाटत होते. या घटनेमागील आनंदहेतूही या भाषणात असा आहे. तरीदेखील हे भाषण त्यांनी चांगली तयारी करून, घोटवून घेतले होते. इंग्रज अधिकारी मेलव्हिल, राजमाता जमनाबाई, शिक्षक हे सारेच या भाषणाला उपस्थित होते.

सयाजीरावांचा विवाह

महाराजांच्या शिक्षण ग्रहणाच्या काळातच त्यांच्या विवाहाची चर्चा सुरू झाली होती. अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर सज्ञान राजा होऊन राज्यारोहण होणार होते, त्या अगोदर महाराजांचा विवाह व्हावा, अशी आप्तस्वकीयांची इच्छा होती, तसेच जमनाबाईसाहेबांच्या कन्या ताराबाई यांच्या विवाहाचीही निकड होतीच. राजकन्या ताराबाई यांना सावंतवाडीचे राजेभोसले यांच्याकडून पसंती आली. ताराबाईंचा विवाह २१ डिसेंबर १८७९ रोजी बडोद्यात करण्यात आला.

सयाजीरावांसाठी वधू शोधण्याची जबाबदारी टी. माधवरावांच्या आणि खासगी अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली होती. टी. माधवराव वेगवेगळया संस्थानांत मुली बघून आले. तंजावरच्या भोसले घराण्यातील एक मुलगी पसंत केली. हैबतराव नारायणराव मोहिते यांची कन्या लक्ष्मीबाई ही तंजावरच्या राणीसाहेबांची भाची होती. टी. माधवरावांनी राजमाता जमनाबाईंना हे स्थळ सांगितले, त्यांनी समंती दिली. ६ जानेवारी १८६० या दिवशी सयाजीरावांचा विवाह झाला. समारंभास विविध संस्थानिक, राजे, आप्त, मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल आले होते. बडोदेकरांच्या दृष्टीने आनंदाचा आणि नेत्रसुखद असा विवाहसोहळा झाला. नव्या महाराणींचे चिमणाबाईसाहेब असे नामकरण करण्यात आले.

या काळातील काही घटना

सयाजीरावांच्या राज्याभिषेकास चार महिने झाल्यावर इंग्लंडचे युवराज प्रिन्स ऑफ वेल्थ भारतभेटीवर आले होते. ८ नोव्हेंबरला इंग्लंडच्या राजपुत्राचे आगमन

झाले. मुंबईत सयाजीराव, दिवाण, प्रमुख अधिकारी या समारंभात राजपुत्रांना भेटले. प्रिन्स ऑफ वेल्थने संध्याकाळी निरोप पाठवला, की त्यांना बडोद्याच्या राज्याला भेट द्यायची आहे. बडोद्यातील कारभारी पाहण्याची व शिकार करण्याची इच्छा होती.

१९ नोव्हेंबर, १८७५ रोजी प्रिन्स ऑफ वेल्थचे बडोद्यात आगमन झाले. सयाजीराव, महाराणी, दिवाण, रेसिडेंट व अधिकारीवर्गाने राजपुत्राचे शाही स्वागत केले. दुसऱ्या दिवशी शिकारीचा चित्तथरारक अनुभव राजपुत्राने घेतला. संध्याकाळी राजपुत्राच्या सन्मानार्थ शाहीभोजन समारंभ झाला. राजपुत्राने सयाजीरावांचे कौतुक केले. ''हे महाराज माझ्या मोठ्या मुलाच्या वयाचे आहेत. त्यांच्या दोन दिवसांच्या सहवासातून मला त्यांची बुद्धिमत्ता दिसून आली. त्यांच्या मातोश्री महाराणी जमनाबाईसाहेब या समजुतदार आहेत. त्यांना पूर्व आयुष्यात जे दुःख भोगावं लागलं, त्या अनुभवाने त्या सुज्ञ झाल्या आहेत. महाराजांनी शिक्षणात उत्तरोत्तर प्रगती करून आपल्या संस्थानाची सर्वांगीण सुधारणा पुढील काळात घडवून आणावी, अशी आशा बाळगतो...'' (युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/साकेत प्रकाशन/२०१२/पृ. ६५)

अशा भेटीगाठी, सभा-समारंभ यातून महाराज शाही रितीरिवाजात पारंगत होत होते.

दि १ जानेवारी १८७७ ला दिल्लीत दरबार भरणार होता. महाराणी व्हिक्टोरिया या हिंदुस्थानच्या बादशाहीण झाल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध होणार होता. या समारंभास सयाजीराव, जमनाबाईसाहेब, दिवाण, रेसिडेंट आणि अधिकारी उपस्थित राहिले. यानिमित्ताने दिल्लीदर्शन झाले. प्रवासात तीर्थक्षेत्री दानधर्माचे अनुभव घेतले. इंदूरचे होळकर, ग्वाल्हेरचे शिंदे, हैद्राबादचे निजाम व इतर संस्थानिकांशी भेटी-ओळखी झाल्या. लॉर्ड लिटन म्हणाले, ''बडोदा संस्थान आणि ब्रिटिश साम्राज्याचे अनेक वर्षे मित्रत्वाचे संबंध आहेत. त्यांचे चिन्ह म्हणून महाराणी व्हिक्टोरिया यांनी आपणासाठी हे निशाण आणि सुवर्णपदक पाठविले आहे. महाराणी बाईसाहेबांनी आपल्यासाठी 'फरदनंद-ई-खास', 'दौलत-ई-इंग्लिशिया' या पदव्या दिल्या आहेत. आता आपण इंग्लिश साम्राज्याचे खास पुत्र झाला आहात. महाराजांना पदक-पदवी प्राप्त झाली. दिल्ली दरबाराच्या घटनेने महाराजांचे अनुभव विश्व विस्तारले. देश, प्रदेश, माणसे, सत्ताधारी,

धर्मसंस्था, श्रद्धा, राजकारण यांचे दर्शन घडले, व्यक्तित्त्वात भर घालणाऱ्या अनेक घटनाप्रसंग जडणघडणीवर प्रभाव टाकणाऱ्या ठरल्या.

दिवाण टी. माधवराव प्रशासनात इंग्रज सरकारचे आदेश पाळत कारभार करीत. क्वचितप्रसंगी महाराणी जमनाबाईसाहेब किंवा सयाजीरावांपर्यंत खास मसलत करीत. टी. माधवराव मुत्सद्दी होते. इंग्रजी राज्यातील न्यायादानपद्धती त्यांनी बडोद्यात रुजवली, प्रशासकीय सुधारणा केल्या. रेसिडेंटने बडोदा राज्यात मिठाचे उत्पादन करू नये, असा आदेश दिला. टी. माधवरावांनी बडोदा संस्थानच्या उपजीविकेचा आधार काढून घेतला जाऊ नये, असे आग्रही प्रतिपादन केले. रेसिडेंटचा हस्तक्षेप आणि बडोद्याच्या प्रजेचे हित यात सुवर्णमध्य साधण्याचा टी. माधवरावांचा प्रयत्न असायचा. अफू उत्पादन, मीठ उत्पादन, शस्त्रनिर्मिती-खरेदी अशी अनेक बंधने इंग्रज सरकार घालत राहिले. टी. माधवराव सार्वभौम सत्तेला आव्हान देऊ शकले नाहीत; पण कमीत कमी बंधने कशी कमी करावीत याचा प्रयत्न करीत राहिले.

सयाजीरावांचे गुरू 'इलियट मूळतः शांत आणि मायाळू होते. आपल्यासमोर एक उत्तम राजा घडवण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे याची त्यांना जाणीव होती.' (पूर्वोक्त/८१) महाराजांवर त्या दृष्टीने शैक्षणिक, सांस्कृतिक आणि नैतिक संस्कार इलियट यांनी केले.

सयाजीरावांची १८ वर्षे पूर्ण होताच राज्यकारभार त्यांच्या हाती सोपवावा, असा जमनाबाईंचा विचार होता. शिक्षणाचा कालावधी आणखी तीन वर्षे वाढवावा, असा माधवरावांचा बेत होता. जमनाबाईंना हा बेत काही मान्य झाला नाही. टी. माधवराव उत्तम प्रशासक होते, त्यांनी सुधारणाही घडवल्या. राजापेक्षा दिवाणच अधिक ठळक होत आहे हे महाराणींच्या लक्षात आले. 'हळूहळू दिवाण सत्ताधीश बनू पाहताहेत, ही गोष्ट सयाजीरावांच्या लक्षात येऊ लागली.' (पूर्वोक्त/पृ. ९५) माधवराव सयाजीरावांच्या शिक्षण-प्रशिक्षणाची मुदतवाढ घेऊ पाहत होते.

व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांच्याशी संपर्क

राजमाता जमनाबाईंना सयाजीराव महाराजांनी प्रत्यक्ष कारभार तातडीने ताब्यात घ्यावा, अधिकार मिळावेत असे वाटत होते. माधवरावांना 'राजा' हा किताब इंग्रज सरकारने दिल्यावर सयाजीरावही शंकाकूल झाले होते. या काळात लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख अहमदाबाद येथे न्यायाधीश होते. लोकहितवादींचे

चिरंजीव बॅरिस्टर कृष्णराव यांच्याशी जमनाबाईंचा पूर्वपरिचय होता. इलियटसरांशी चर्चा करून डॉ. कृष्णारावांमार्फत राज्याधिकार प्राप्तीचा अर्ज करायचे ठरले. सयाजीराव सज्ञान झाल्याने राज्यकारभाराचे सर्व अधिकार त्यांना मिळावेत, असा अर्ज बॅ. कृष्णारावांनी तयार केला. इलियटसरांची शिफारसही जोडली. स्वतः बॅ. कृष्णराव अर्जासह लॉर्ड रिपन यांना भेटले. ७ जून १८८१ च्या पत्राने इंग्रज सरकारचा सकारात्मक निर्णय झाला. 'सयाजीराव महाराजांनी वैवाहिक जीवनास सुरुवात केली आहे. या सुमारास त्यांच्याकडे राज्यकारभार सोपवावा. २८ डिसेंबर १८८१ हा राज्याधिकाराचा दिवस ठरवण्यात यावा' दिवाण टी. माधवरावांना या आदेशामुळे धक्काच बसला. भावी राजाच्या प्रशिक्षणाचा नवा प्रशिक्षण कार्यक्रम त्यांना तातडीने हाती घ्यावा लागला.

मायनर हिंट्स

राज्यप्रशासन, राज्यकारभार, न्यायदान व कायदा व्यवस्था, महसूल रचना, शेती- औद्योगिक धोरण, धर्मसंस्था आणि राज्यकर्तव्ये, खाजगी कारभार अशा विविध खात्यांचे सखोल ज्ञान करवून देण्यासाठी विशेष व्याख्यानांचे आयोजनसत्र टी. माधवरावांनी सुरू केले. या व्याख्यानांची टिपणे आज्ञापत्रासारखी उपलब्ध व्हावीत, अशी अपेक्षा होती. 'व्याख्यान-श्रवण-शंका उपस्थिती-उत्तरे' अशी विषयमांडणी अपेक्षित होती. सहा महिन्यांत हा उद्‌बोधनवर्ग नियोजित होता. महाराजांसाठी आयोजिलेली ही व्याख्यानसत्रे इंग्रजी भाषेत होती.

रेसिडेंट पी. एस. मेलविल

प्रारंभीचे व्याख्यान, राज्यकारभारातील राजाची कर्तव्ये, राजमाता गायकवाड घराण्याच्या प्रमुख, त्यांच्याबद्दल आदर व निष्ठा बाळगा. भगिनी ताराबाईंवर प्रेम करा. सरकारी अधिकाऱ्यांच्या कामात अनाठायी ढवळाढवळ करू नये. तत्त्वशून्य लोकांपासून सावधगिरी, शक्यतो प्रजेकडून नजराणा स्वीकारू नये. न्यायदान न्यायबुद्धीने व्हावे, न्यायव्यवस्थेत हस्तक्षेप नको.

दिवाण टी. माधवराव

राज्यकारभार कसा करावा. ४६ व्याख्याने. ब्रिटिश रेसिडेंट सरकारचे प्रतिनिधी. रेसिडेंटशी सन्मानाने वागावे. पात्र व्यक्तीस दिवाण म्हणून नेमावे. राज्याच्या-राजाच्या हक्कांची जपणूक करावी. अधिकारी-सेवक-नोकर नेमवावा. कर्तृत्वाची परीक्षा व्हावी. नोकर, हुजरे, कुटुंबीय, आप्तेष्ट यांच्याशी दर्जानुसार वागावे.

व्यक्तींशी संबंध प्रस्थापित करताना त्या व्यक्तींचा अभ्यास करावा. राज्याचा पैसा काटकसरीने वापरावा. नियमितपणे वर्तमानपत्र वाचन करून समकालीन जीवनसंदर्भ जाणून घ्यावेत. रियासती, संस्थानांचे वार्षिक अहवाल यांचे काळजीपूर्वक वाचन करावे. राज्याची प्रगती राज्याच्या दृष्टिकोनावरून ठरते.

न्यायमूर्ती जे. एस. गाडगीळ व ठाणावाला - सात व्याख्याने, हिंदू कायदे

करशेठजी हस्तमजी - अठरा व्याख्याने :- जमीन व्यवस्थापन आणि जमिनीचे कायदे

काझी शहाबुद्दीन - सत्तावीस व्याख्याने :- जमीन महसूल

पेस्तनजी जहांगीर - नऊ व्याखाने :- लष्करी व्यवस्था व्यवस्थापन, जमावबंदी

विनायकराव कीर्तने - सहा व्याख्याने :- पोलीस व्यवस्था आणि तुरुंग व्यवस्थापन.

विविध जीवनक्षेत्रासंबंधीची ही व्याख्याने सयाजीरावांना राज्यकारभारासाठी उपयुक्त ठरावीत अशीच होती. तातडीचा आणि गरजेवर आधारलेला हा राज्य प्रशिक्षण कार्यक्रम होय. या व्याख्यानांच्या संहितांचे जतन करून त्यांचा छापील संग्रह करण्यात आला. राज्यकारभाराची उद्बोधक नियमव्यवस्था, विधिसंहिता असे या पुस्तिकेचे स्वरूप आहे. पुढे महाराजांनी या विधिसंहितेची 'मायनर हिंट्स' या शीर्षकाची पुस्तिका छापून घेतली आणि अधिकारी, नोकरदार यांना उपलब्ध करून दिली.

समारोप

गोपाळचे सयाजीराव हे रूपांतर म्हणजे सांस्कृतिक व शैक्षणिक संक्रमण ठरले. महाराजांना शिक्षित, सुसंस्कृत राजकारणी म्हणून घडवणारा सन १८७५ ते १८८१ असा हा काळ आहे.

गुरुवर्य इलियट, सर टी. माधवराव, इंग्रज रेसिडेंट, सोबतचे सहाध्यायी आणि महत्त्वाचे म्हणजे मातोश्री राणीसाहेब जमनाबाई यांच्या सान्निध्यात महाराजांची जडणघडण झाली. पब्लिक स्कूलच्या धर्तीवरचे शिक्षण, इलियट यांचे शिक्षण, ग्रंथसहवास, मायनर हिंट्स हे औपचारिक शिक्षण होय. आपल्या सभोवतालच्या परिस्थितीशी अनुबंध साधताना सयाजीराव घडत-वाढत राहिले. प्रत्यक्ष राज्यकारभार दि. २८ डिसेंबर १८८१ रोजी समारंभपूर्वक हाती घेतला.

४.

लोकहितकारी राज्यकारभाराचा प्रारंभ

प्रास्ताविक

प्रजेचे कल्याण करणे, प्रजेच्या सुखदु:खात सहभागी होऊन प्रजेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राजसत्तेचा विनियोग करणे, हे संस्कार सयाजीरावांवर झाले होते. त्यांच्या परिपक्वतेचा अंदाज गुरू इलियट यांना आणि मातोश्री राजमाता जमनाबाई यांना आला होता. व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांच्या आदेशपत्राने सयाजीरावांचा प्रत्यक्ष राज्यकारभार हाती घेण्याचा समारंभ झाला. सयाजीरावांना आपल्या 'राजा' म्हणून असलेल्या जबाबदारीची सम्यक जाणीव झाली.

राज्याधिकार सूत्रे

दि. २८ डिसेंबर १८८१ रोजी सयाजीरावांना संपूर्ण राज्याधिकार मिळण्याचा समारंभ झाला. मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. लॉर्ड रिपन यांचा उल्लेख 'बडोदे राज्याचे खरे हितचिंतक' असा सयाजीरावांनी केला. राज्यकारभार सूत्रे हाती येताच सयाजीराव यांनी सरोवराच्या कामाचा प्रारंभ केला. लोकोपयोगी कामे सर्वत्र सुरू करताना 'लोकांना भरीव फायदा' होईल, असा दृष्टिकोन ठेवला. बडोदा राज्यातील जनतेला सयाजीरावांबद्दल जसा आदर होता, तसाच बृहन्गुजरातमधील गुजराती मंडळींनाही आदर होता. त्यांनी २९ डिसेंबर १८८१ ला सयाजीरावांना मानपत्र अर्पण करून तो प्रकट केला.

प्रजेच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून प्रश्नाचा तळशोध घेऊन, लोकभावना जाणून घेऊन परिस्थितीत परिवर्तन करणारे निर्णय सयाजीराव घेऊ लागले. लोकसंवादाची त्यांना राज्यकारभार करताना निकड वाटत होती.

सयाजीरावांनी राज्यकारभार हाती घेताच दिवाण टी. माधवराव रजेवर गेले व पुढे काही दिवसांनी दिवाणपद सोडून दिले. सयाजीराव सारासार बुद्धीने, समंजसपणे तातडीने निर्णय घेऊ लागले होते.

लोकसंवादी भेटी

प्रजेशी भेटून प्रश्न जाणून घेण्यासाठी, महत्त्वाचे म्हणजे राज्याची प्रत्यक्ष पाहणी करून प्रश्नांची सोडवणूक व्हावी म्हणून संवादभेटीचे दौरे सुरू केले. राज्यकारभार हाती येताच या दौऱ्यांची आखणी करण्यात आली.

पहिला दौरा कडी प्रांताचा केला. यापूर्वी गायकवाड घराण्यातील राजाने कधीही अशा लोकसंवादाच्या भेटी आयोजिल्या नव्हत्या. कलेक्टर म्हणजेच सरसुभे यांना आदेश दिला गेला. २३ सप्टेंबर १८८२ पासून दौरा सुरू झाला. महसूल अधिकारी, खासगी अधिकारी, पोलीस व सैन्यदलाचे अधिकारी कामाला लागले. ''राज्यातील प्रत्येक गाव, शहर, तेथील प्रजाजनांना भेटावं, त्यांच्याशी बोलावं, शाळा, कार्यालयांना भेटी द्याव्यात, तेथील प्रश्न समजून घ्यावेत... राजा आणि रयत यांचा सरळ संवाद असावा, रयतेला राजापाशी सुखदुःखे बोलता यावीत, रयतेच्या प्रश्नांची तोंडओळख व्हावी, मुख्य म्हणजे प्रशासनाचे स्वरूप तपासावे...'' (उदधृत/युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/साकेत प्रकाशन/२०१२/पृ. ११५) ही सयाजीरावांची भूमिका लोकसंवादी होती.

ब्रिटिश हद्दीतील अहमदाबादला त्यांनी प्रथम भेट दिली, पूर्वी त्यावर गायकवाडांची सत्ता होती. ब्रिटिशांचे शहर व्यवस्थापन, शहररचना, लक्षवेधी स्थळे यांचे अवलोकन करण्यासाठी ही भेट होती.

कडी प्रांताचा दौरा ५० दिवसांचा होता. गावोगाव जाऊन पाटील, रयत, राज्याचे अधिकारी वर्ग यांच्याशी सयाजीराव यांनी थेट संवाद साधला. पिण्याचे पाणी, शिक्षणाची सोय नसणे, पीकपाण्याची दुरवस्था, शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपण, शेतकऱ्यांना सावकारांचा जाच, सारा वसुलीतील मनमानी असे प्रश्न लक्षात आले. अडचणी-प्रश्न यांच्या नोंदी घेऊन प्रश्न सोडविण्यासाठी तेथल्या तेथे हाताखालच्या आणि स्थानिक अधिकाऱ्यांना आदेश दिले गेले. तलाठी, अंमलदार यांचे दप्तरही तपासून घेतले गेले, सरकारी नोंदीची शहानिशा केली गेली.

नवसारीच्या दौऱ्यात जंगलात, दऱ्याखोऱ्यांत राहणाऱ्या आदिवासी वस्त्यांना भेटी दिल्या. नागर-शेतकी लोकांपासून दूर राहिलेल्या 'काळी परज' (आदिवासी

प्रजा) यांचे प्रश्न आणखी बिकट असल्याचे त्यांनी हेरले. संपूर्णतः जंगलावरच अवलंबून असलेल्या या प्रजेला सुधारणा, शिक्षण, विकास या प्रक्रियेत आणण्याची निकड सयाजीरावांना वाटली. वेठबिगारी, अंमलदारांची मनमानी, दुष्काळ या समस्यांनी हे लोकजीवन अवकळाग्रस्त झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. अदिवासींच्या प्रश्नांनी अस्वस्थ होत त्यांनी दिवाण काझी शहाबुद्दीन यांना सांगितले, "आम्ही आतापर्यंत राज्याचा दौरा केला. रयतेचे अनेक प्रश्न त्यांच्याकडून ऐकले; पण आदिवासींचे प्रश्न अस्वस्थ करणारे आहेत. या लोकांना आम रयतेसोबत जंगलातून बाहेर आणावं लागेल. त्यांच्या मनातील भीती दूर करण्याचा मार्ग म्हणजे त्यांच्या भागात शिक्षणाची सोय करावी. शिक्षणामुळेच ते सर्वांसोबत हळूहळू येऊ शकतील" (पूर्वोक्त/पृ. ११०)

आदिवासींच्या अवस्थेमागे व दैन्यामागे अज्ञान हेच कारण असल्याचे सयाजीरावांनी हेरले.

अमरेलीच्या दौऱ्यादरम्यान तंबूभर पादत्राणे मांडून ठेवलेली पाहिल्यावर त्यांनी एवढी पादत्राणे कशासाठी आणली आहेत, याची चौकशी केली. संबंधित नोकराने सांगितले की, 'आपली सगळी पादत्राणे सोबत आणली आहेत, खासगी अधिकाऱ्यांचा हुकूम आहे, महाराजांची इच्छा कोणते पादत्राणे वापरण्याची होईल, ते माहीत नाही. ऐनवेळेस अडचण जाणवू नये याकरिता सगळी पादत्राणे आणली आहेत." (पूर्वोक्त/पृ. १२०)

खासगी अधिकारी, नोकरवर्ग यांचे सर्वांचे मत, राजाचा लहरीपणा, राजाबद्दलचे समज-गैरसमज असे पाहून सयाजीराव व्यथित झाले. उत्तम व उत्कृष्ट जीवनमान असावे; परंतु शानशोकी, उद्धटपणा, लहरीपणा, दाखवेगिरी, हुकूमत गाजवणे असे काही. त्यांच्या स्वभावात नव्हते. हुजूर स्वारीच्या काळात आवश्यक तेवढ्यात गरजेच्या वस्तू नोकरांना द्याव्यात, यातून अनावश्यक खर्च कमी होऊन स्वारीत सुटसुटीतपणा येईल." (पूर्वोक्त/पृ. १२८) असा हुकूम त्यांनी काढला.

दैनंदिन किरकोळ खर्च (उदा. मेणबत्ती आठ आणे, गोणपाट दीड रुपया, शाळा भाडे चार रुपये) मंजुरीसाठी यायचा, प्रत्येक खर्चाला महाराजांची मंजुरी घेऊन निर्णय घेतला जायचा, हे पाहून हुकूम लिहिला -

"खर्चावर राजाचे नियंत्रण असावे; पण अगदी किरकोळ खर्चही राजाकडे मंजुरीसाठी पाठवणे उचित नाही. पन्नास रुपये खर्चाची मंजुरी खासगी कारभारी,

शंभर रुपयांपर्यंत महसूल अधिकारी यांच्या आखत्यारित करता येईल. मात्र, त्यावर दिवाणाची मंजुरी घ्यावी लागेल. यातून हाताखालच्या नोकरदारांना स्वतःच्या जबाबदारीवर काम करण्याची सवय वाढत जाईल.” (पूर्वोक्त/पृ. १२१)

दैनंदिन राज्यकारभारात काटेकोरपणा, कार्यक्षमता, गुणग्राहकता यांना सयाजीराव महत्त्व देत. राजाचा खासगी खर्च, कुटुंबखर्च यालाही काटकसरीचे बंधन घालून घेतले होते. राज्याचे महसुली उत्पन्न जनतेकडून मिळते, तेव्हा मुख्य खर्चव्यय रयतेच्या कल्याणाच्या कामावर व्हावेत, यावरच त्यांना कटाक्ष असायचा. आर्थिक हिशेबाची काटेकोरपणे तपासणी केली जायची. राजपरिवारातल्यांसाठी, खासगीचा खर्च करताना ‘ते’ हात आखडता घेतात, असे निकटवर्तीयांचे मत होते.

राज्यकारभारातही मनुष्य विकास, कार्यविभागणी, नियोजन, अंदाजपत्रक, कृती कार्यक्रम, फलित पाहिले जात होते. हाताखालचे अधिकारी, सेवक यांच्या कार्यतत्परतेची परीक्षा पाहिली जात होती. प्रारंभीचा राज्यकारभार करताना सतत कार्यमग्नता त्यांनी साधली होती. महत्त्वाचे म्हणजे विद्याव्यासंग, वाचन, ग्रंथश्रवण, जिज्ञासातृप्ती असे उपक्रमही केले जात असत. १८८२ ते १८८४ या काळात सयाजीरावांनी बडोदा राज्याचा दौरा केला, प्रजेचे प्रश्न समजावून घेत तातडीने प्रश्नांची सोडवणूक करणाऱ्या उपाययोजना कार्यान्वित केल्या. या दौऱ्याच्या कालावधीत शिक्षणापासूनची वंचितता हे प्रजेच्या दुःखाचे मूळ त्यांच्या लक्षात आले. सोनगड–नवसारीत अस्पृश्य–आदिवासी मुलांसाठी शाळा व वसतिगृह सुरू केले. जंगलावर अवलंबून असलेले वंचित–अदिवासी शिक्षणातूनच नागरीकरण–विकास या प्रवाहात येतील, असा त्यांचा होरा होता.

कुटुंबजीवनातील सुखदुःखे

विवाह आणि राज्यकारभार हाती घेण्याच्या काळात महाराजांच्या मनात रयतेशिवाय दुसरा विषय नव्हता. विद्याव्यासंग आणि राज्यव्यवहारातले दैनंदिन कामकाज यात संतुलन साधत होते. दिनांक ३ ऑगस्ट १८८३ रोजी चिमणाबाईसाहेबांना पुत्ररत्न झाले. सर्वांना आनंद झाला. चार पिढ्यांनंतर ईश्वराने हाकेला होकारात्मक प्रतिसाद दिल्याची भावना मातोश्री जमनाबाईसाहेबांची झाली होती. ‘फत्तेसिंहराव’ हे राजपुत्राचे नाव ठेवण्यात आले. दान–धर्म, सुवासिनींचे

आगतस्वागत भरपूर करण्यात आले. राजपुत्राच्या वाढ-विकसन संस्कारांची सर्वांनी काळजी वाहिली.

याच काळात जमीन मोजणी विभाग निर्माण करण्यात आला. मात्र, महाराजांच्या जीवनात शोककारी घटना घडली, ती म्हणजे ७ मे १८८५ रोजी पहिल्या राणी चिमणाबाईंचे निधन झाले. महाराज सैरभैर झाले, सारे वातावरण विषण्णतेने गडद झाले होते. राजाने दुःख कसे दाखवावे? राजकर्तव्य आणि व्यक्तिगत भावजीवनातील हानी यांचा मध्य साधता येत नव्हता. दत्तकविधानानंतर जन्मदात्यांपासून महाराज दुरावले होते. शिक्षण जडणघडणीच्या काळात 'राजा' म्हणून घडवले जात होते. विवाहानंतर महाराजांच्या चित्तवृत्ती मोकळ्या-आनंदी अशा बहरू लागल्या होत्या. चिमणाबाईसाहेबांचे आजारपण, राजपुत्राच्या बाळखेळा, चिमणाबाईंचे निधन ! महाराजांनी जवळपास तीन आठवडे स्वतःला कोंडून घेतले होते. राजमाता जमनाबाई साहेबांनी परोपरीने समजावले, राजपुत्र फत्तेसिंहाचे बालक्रीडन दाखवले, हळूहळू महाराज सावरले. राजकीय कृती कार्यक्रम बंद करणे अशक्य होते. राणींच्या निधनाचे तीन आठवड्यांचे तीव्र दुःख सोसल्यानंतर बडोद्याच्या जनतेसाठी नव्या बाजारपेठेची कोनशिला बसवली. ते म्हणाले, "ही इमारत म्हणजे एका प्रेमळ पत्नीबद्दलच्या आदराचं स्मारक आम्ही करू इच्छितो. त्या महाराणी शांत आणि परोपकारी होत्या. त्यांची स्मृती म्हणून या स्थळास 'महाराणी चिमणाबाई मार्केट' हे नाव आम्ही देत आहोत." (पूर्वोक्त/पृ. १२९–१३०) व्यक्तिगत दुःखाचे स्मरण असे जरी असले, तरी त्यातूनही लोकहितकारी काम साधण्याची ही कार्यपद्धती आदर्श अशीच म्हणावी लागेल.

मातोश्री जमनाबाईंनी महाराजांची समजूत काढली, दुसऱ्या लग्नासाठी त्यांना तयार केले. खासगी कारभारी जयसिंगराव आणे, जवळचे आप्त बाळासाहेब माने यांनी मुली पाहायला सुरुवात केली. तंजावर, सावंतवाडी, इंदोर, देवास येथील उच्चकुलीन, राजघराण्याशी संबंधित मुली बडोद्यात आणवल्या. देवासचे सरदार घाटगे यांच्या चौदा वर्षांच्या गजराबाईंची निवड करण्यात आली. २८ डिसेंबर १८८५ ला गजराबाईंशी महाराजांचा विवाह झाला. या महाराणी चिमणाबाईसाहेब (दुसऱ्या) होत. या महाराणी चिमणाबाईंना शिकवण्यासाठी महाराजांनी उत्तम शिक्षकांची सोय केली होती. जयपूरच्या महाराणी गायत्रीदेवी महाराजांच्या नात होत्या, त्यांनी 'अ प्रिन्स रिमेंबर्स' या आत्मकथनात 'बडोद्याचं

आजोळ' या प्रकरणात लिहिले आहे की, ''माझे आजोबा त्यांच्या काळाच्या बरेच पुढे होते. त्यांनी आजीसाठी शिक्षक ठेवले. अधी लिहिणं-वाचणं शिकवायला आणि मग शिक्षण वाढवायला. नंतरही त्यांनी तिला बुरसटलेल्या जुनाट भारतीय परंपरा मोडून मुक्त व्हायला आणि सार्वजनिक कार्यात भाग घ्यायला उत्तेजन दिलं. आजोबांच्या सुधारक विचारांचं ऋण मानलं पाहिजे. त्यांच्यामुळेच माझी आजी भारतीय स्त्री चळवळीची महत्त्वाची अध्वर्यू ठरली. स्त्रियांचं नेतृत्व करून ती ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्सची अध्यक्ष झाली. भारतीय समाजात स्त्रीचं स्थान यासंबंधी तिने एक पुस्तकही लिहिलं. पुराणमतवादी कुटुंबातली ही आज्ञाधारक मुलगी पुढे मुक्त आणि प्रगतिशील पत्नी बनली...''

(अ प्रिन्सेस रिमेंबर्स/गायत्रीदेवी/अनुवाद-आशा कर्दळे/ मेनका प्रकाशन, पुणे/२००४/पृ. ५)

गायत्रीदेवींना त्यांच्या बडोद्यातल्या आठवणीत पुढे असेही म्हटले आहे की, ''माझे आजोबा रुबाबदार आणि प्रेमळ होते. त्यांचे डोळे सतत हसत असायचे. आम्ही त्यांच्याबरोबरच राजवाड्याच्या भोवती घोड्यावरून चार मैलांची रपेट मारत असू... राजवाड्यावर परत आल्यावर उरलेली सकाळ ते संस्थानचं कामकाज बघण्यात घालवायचे... कोणतीही समस्या असली तरी प्रजा राजाकडेच यायची. इतर कुठलं सरकार प्रजेच्या दृष्टीने नव्हतंच. त्यामुळे माझे आजोबा आपल्या मंत्र्यांशी सल्लामसलत करत आणि लाखो लोकांच्या जीवनाशी निगडित असलेल्या प्रश्नांविषयी निर्णय घेत.'' (पूर्वोक्त/पृ. ०७) महाराजांच्या व्यक्तिगत आयुष्यात सुखदु:खांचे-यशापयशांचे अनेक प्रसंग आले. राज्यव्यवहाराच्या बाबतीत शिस्तीचे व्यवस्थापन नेहमीच असायचे. 'प्रजा सुखी तर राजा सुखी' असे राज्यव्यवहाराचे धोरण स्वीकारले होते. आधुनिकतावादी, मानवतावादी जीवनदृष्टीमुळे स्वातंत्र्य-समता-सामाजिक न्याय या मूल्यांचे राज्यव्यवहारात आचरण ते करीत असत.

ज्ञानग्रहण-शिक्षण, विद्याव्यासंग यांचा स्पर्श त्यांच्या निर्णयांना असायचा. सामाजिक समता प्रस्थापन असो वा धार्मिक कर्मकांडास नकार असो, सयाजीरावांचे धोरण नवमतवादी असायचे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, कृषिविषयक, राज्यव्यवस्थापन विषयक कितीतरी नव्या आणि मूल्ययुक्त कृती त्यांनी केल्या. त्यांच्या नवसर्जक विचार-कल्पनांचा ते पाठपुरावा मात्र करीत. कृषिविषयक

शिक्षण घेण्यासाठी खासेराव जाधव आणि राज्यकारभाराचे शिक्षण घेण्यासाठी बंधू संपतराव यांना विलायतेला पाठवले. संपतरावास म्हणाले होते,

''संपतराव, तुम्ही आणि खासेरावांना आम्ही पुढच्या शिक्षणासाठी विलायतेला पाठवायचा निर्णय घेतला आहे. राज्यकारभार नीट करायचा म्हटलं, की आपल्या माणसांनी शिकलं पाहिजे आणि त्याकरिता विलायतेला जाणे हाच एकच मार्ग आहे.'' (युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/साकेत प्रकाशन/२०१२/पृ. १२५)

म. जोतिराव फुले व सयाजीराव : संवादी विचारकृती

परदेशप्रवास, समुद्रमार्गे प्रवास यांना त्या काळात धर्मबाह्य कृत्य मानले जात असे. खासेराव जाधव आणि संपतराव यांच्या शुद्धीकरणाचा आग्रह धरला जाईल वगैरे महाराजांना माहीत होतेच. महाराजांची विचारवृत्ती, सामाजिक समता प्रतिष्ठापनेची होती. राजाने कोणताही भेदभाव बाळगू नये, जात, धर्म, लिंग भाषा, वय, प्रदेश याबाबतीत प्रजा समान मानणे, चुकीच्या परंपरा सोडून देणे, शिक्षण देणे, कर्मकांड नाकारणे, बुरसटलेल्या विचारांविरुद्ध, आधुनिकतावादी लोकसमूहमानस घडवणे, ही दक्षता ते घेत असत. पुनर्विवाह, विधवाविवाह, बालविवाहाबंदी, अस्पृश्यता पाळण्यास नकार वगैरे त्यांनी प्रत्यक्षात आणले होते.

मुंबईचे राजकीय ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व मामा परमानंद यांच्याशी त्यांचा संपर्क होता. जोतिराव फुल्यांनी पुण्यात बहुजन व मागासवर्गाच्या शिक्षणासाठी सुरू केलेले कार्य आस्थेवाईकपणे त्यांनी माहीत करून घेतले होते, पुण्यात त्यांची भेटही झाली असावी. 'जोतिरावांनी शेतकऱ्यांच्या दुर्धर अवस्थेबद्दल एक पुस्तिका लिहिली. त्यापैकी काही लेख 'राजबंधू'च्या अंकात प्रकाशित झाले; पण पुढे संपादकांनी यावरून पुढचे लेख छापले नाहीत', असे खासेराव जाधवांनी महाराजांच्या कानी घातले. अर्थात, रामचंद्र धामणस्कर या सत्यशोधकीय विचारवंताकडून महाराजांना कळविले होते. त्यांनी म. फुले यांना बडोद्यात बोलावू घेतले. भेटीत सांगितले, ''आपण तीन वर्षांपूर्वी पुण्यात भेटलो. आपल्या कार्याची कल्पना आम्हाला आहे. शिक्षणाबद्दल आपल्या मनात जे आहे, ते आपण पुण्यात अगोदर करीत आहात. हरिजनांसाठी आणि स्त्रियांसाठी शाळा काढणे, हा आपला आदर्श आमच्यासमोर आहे.'' (युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/सांकेत प्रकाशन/२०१२/पृ. १२६) म. फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकाच्या

काही प्रकरणांचे वाचन महाराजांसमोर केले. ‘शेतकऱ्याचा असूड’मधील शेतकऱ्यांची दुर्दशा, सरकार, ब्राह्मण, उपाध्याय यांच्याकडून होणारे शोषण, अज्ञान हे दुरवस्थेचे मूळ कारण वगैरे मुद्यांचा आशय म. फुले यांच्याकडून जाणून घेतला. ‘शेतकऱ्याचा असूड’च्या निर्मिती व प्रकाशनासाठी काही आर्थिक मदत दिली. या मदतीतून पुढे ‘शेतकऱ्याच असूड’ छापले गेले, म. फुल्यांचे विचार व्यापक जनसमूहापर्यंत पोहोचले.

पुढील वर्षी महाराज पुण्यात असताना न्या. रानडे यांनी म. फुले यांच्या विचारमंथनावर टीका केली. महाराजांच्या उपस्थितीतच हे घडले, महाराजांनी न्या. रानडे यांच्या भाषणावर कडाडून हल्ला केला. म. जोतिरावांनी जेव्हा ‘इशारा’ ही पुस्तिका लिहिली, तेव्हा छापील प्रती धामणस्करांमार्फत महाराजांना पाठवून दिल्या. ‘इशारा’चे वाचन केल्यावर महाराजांनी धामणस्करांना सांगितले,

“धामणस्कर, वैदिक धर्म अभ्यास आणि पूजाकार्य एका विशिष्ट जातीच्या मंडळीनेच करावे, याला कुठलाही धर्माधार नाहीय. धर्मकृत्ये इतर जातीच्या लोकांनाही करता यावयास हवी. यासाठी मराठा जातीत पुजारी तयार करण्यासाठी वैदिक शिक्षणाची शाळा सुरू करा.” (पूर्वोक्त /पृ. १२७)

म. फुले यांच्या सामाजिक समतावादी विचारांचा अवलंब करण्याची सयाजीरावांची तीव्र इच्छा होती. वैदिक शिक्षणाचा ब्राह्मणेतरांना अधिकार मिळावा म्हणून सर्व जातींना वैदिक शिक्षणाची शाळा उपलब्ध करून दिली. चाचणी परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेल्या ब्राह्मणेतरांसाठी ७५ टक्के जागा त्यांनी निश्चित केल्या होत्या. सामाजिक न्याय आणि समता या मानवी हक्कांची प्रेरणा सत्यशोधकीय विचारधारेतून त्यांनी मिळवली होती. ब्राह्मणेतरांसाठी मराठीतून वेदोक्त पाठशाळा व राजघराण्यात वेदोक्त विधीची सुरुवात १८९६ मध्ये झाली.

महाराजांनी इ.स. १८८४ मध्ये म. फुले यांच्या ‘शेतकऱ्यांचा असूड’ला आर्थिक मदत केली होती. म. फुले यांचे पुरोगामी विचार महाराजांनी अंगीकारले होते. ‘शेतकऱ्यांचा असूड’च्या प्रास्ताविकात महाराजांच्या मदतीबद्दल ऋण व्यक्त केले आहे.’

म. फुले यांनाही सयाजीरावांबद्दल आस्था होती. म. फुले यांनी श्रीमंत सयाजीराव गायकवाड, संस्थान बडोदे यांना काव्यात्मक पत्र पाठवले होते. त्यातील काही अंश पाहू.

येऊ द्या दया मना, दया मना ।। भटें केली दैना ।।
विद्याबंदी मूळ पाया केला दैनवाणा ।।
आर्याजींनी शूद्रा आणिला खरा पशूपणा ।।
वसुलाचा पैसा खर्चून ऐद्यांना ।।
कष्ट करी शेतीं खाती चटणी-भाकरींना ।।
वर्षासने भटजी नेती खुल्ला खजीना ।।
शेतकरी कष्ट करूनी करिती भरणा ।।
अक्षरशून्य शुद्रादिकां काहीच कळेना ।।
अशा मुक्यांचे बाप आतां तुम्हीच का व्हावा ।।
जोतिराव सयाजीरावाला करितो प्रार्थना ।।
वाहत्या गंगेमध्ये एकदा हात का धुवावा...

सयाजीरावांनी राज्यव्यवहाराला समाजशील सुधरणांचा आधार द्यावा, सामाजिक सुधारणांचा अवलंब करावा, अशी प्रार्थना म. फुले यांनी या पत्रातून केली. धामणस्कर हे म. फुले यांचे विचारी कार्यकर्ते होते, धामणस्करांमार्फत हे पत्र महाराजांना पोहोचविण्यात आले. म. फुले यांची समाजसुधारणापर व्याख्याने महाराजांनी बडोद्यात आयोजित केली होती.

दान-धर्म, दक्षिणा, रमणा यातून भटमंडळींची मजा होते. धार्मिक कर्मकांड करावयाला लावून शूद्र-अतिशूद्र व ब्राह्मणेतरांना लुबाडले जाते. अज्ञानातून त्यांचे शोषण होते, हे शूद्रांच्या लक्षातही येत नाही. सारे अनर्थ अविद्येने केले, हे म. फुले यांचे मुख्य प्रतिपादन आहे. स्त्री-शूद्रांना, कुळब्यांना, गोरगरिबांना शिक्षण मिळाले पाहिजे, अज्ञानामुळे सारे प्रश्न निर्माण झाले आहेत, अज्ञान हे अधोगतीचे मूळ कारण आहे, हे म. फुले यांनी सातत्याने सांगितले आहे. पुरुषी मानसिकतेतून स्त्रियांचे शोषण केले जाते, विषम वागणूक दिली जाते. राज्यसत्ताधारी लोकांकडून महसूल गोळा करताना हा पैसा ऐदी, खुशालचेंडू लोकांना अन्नदान करून उडवला जातो. ऐदी लोक खिचडी खातात आणि कष्टकरी शेतकरी चटणी-भाकरीला महाग होतो. जगाची भूक भागवणारा शेतकरी उपाशी मरतो

आणि उपाध्याय-भट-मंदिरांचे पुजारी मात्र कष्ट न करता समाधानाचे ढेकर देतात. भटजीला वर्षासन मिळते आणि हा पैसा शेतकऱ्यांच्या कष्टातून राजाच्या खजिन्यात आलेला असतो. भटजीला नमस्कार करून रोख दक्षिणा दिली जाते आणि शेतकऱ्याला कोणतीही सवलत दिली जात नाही, वसुली सक्तीने केली जाते. भट-भिक्षुकांना शालजोड्या वाटल्या जातात, त्याऐवजी उत्कृष्ट शेती करणारांना बक्षिसे दिली पाहिजेत. अक्षरशून्य शुद्रादिकांच्या, कष्टाळू शेतकऱ्यांच्या, वंचित उपेक्षितांच्या जीवनसंघर्षात सयाजीरावांनी आधार व्हावे, अशा लोकांच्या परिस्थितीत परिवर्तन घडवावे, त्यांना ज्ञान मिळावे, त्यांचे पालकत्व स्वीकरावे, अशी विनंती, प्रार्थना म. फुले यांनी केली.

सयाजीरावांच्या राज्यकारभारात, सुधारणा कामात सर्वांना शिक्षण, शेतकऱ्यांना मदत, धर्मस्थळी होणाऱ्या दान-उधळपट्टीला प्रतिबंध या कृतिसूत्रांना म्हणूना महत्त्व आले. म. फुले यांच्या सत्यशोधकीय संस्कारातून आलेल्या धामणस्करांना सयाजीरावांनी दिवाणपदही दिले होते. मामा परमानंद आणि धामणस्कर यांच्या आवाहनामुळे सयाजीरावांनी म. फुल्यांना आदरपूर्वक मदत केली. आजारपणात आर्थिक, वैद्यकीय सहकार्य मिळवून दिले.

म. जोतिराव फुले यांच्या मृत्यूनंतर मामा परमानंदांनी सयाजीरावांना विनंती केली, 'जोतिबांचे दत्तकपुत्र यशवंत आणि सावित्रीबाईंना नियमित ठराविक रक्कम बँकेत ठेव ठेवून दरमहा वीस रुपये पेन्शन सुरू झाली.' (लोकपाळ राजा सयाजीराव/बाबा भांड/ साकेत प्रकाशन/आ. ४ थी/२०१६/पृ. ५९) जोतिबांचे स्मारक झाल्यास फंडासाठी मदतीची सयाजीरावांनी इच्छा प्रकट केली होती. (पूर्वोक्त/पृ. ६०)

मामा परमानंदांनी राज्यसत्ता व लोककल्याणकारी कामे, राजाची कर्तव्ये, कायदे व न्यायव्यवस्था, राजाची योग्यता या विषयावर आवाहनात्मक पत्ररूप लेखन केले. सयाजीरावांनी आपल्या राज्यव्यवहारात या मर्मदृष्टीचा अवलंब केला.

सयाजीरावांनी राज्यव्यवहार प्रत्यक्ष हाती घेतल्यावर पहिली सात वर्षे अविश्रांत कामे केली. लोकांच्या आशा-आकांक्षा लक्षात घेऊन राज्यकारभार केला. अनेक खात्यांमध्ये सुधारणा केल्या. नियमव्यवस्था निर्माण करून प्रशासनात शिस्त आणली. राज्याचे मूळ म्हणजे प्रजा. प्रजा हाच राजाचा प्राणभूत घटक होय,

प्रजेच्या हिताचे निर्णय घेणे आणि कार्यवाही करणे, यालाच त्यांनी महत्त्व दिले. राज्यव्यवहाराची घडी बसवताना प्रजाहितदक्षता पाहिली. परिणामतः शरीरप्रकृतीची हेळसांड झाली. इंग्रजांची सत्ता, या सत्तेचा हस्तक्षेप, प्रजेचे अज्ञान, शेतकरी-कामकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळाचे सावट अशा ताणतणावामुळे निद्रानाशासारखा विकार जडला. डॉक्टरी सल्ल्यांनुसार हवापालट करणे आवश्यक ठरू लागले. देशांतर्गत थंड हवेची ठिकाणे किंवा युरोपात उपचारासाठी जाणे बाध्य झाले. प्रवास-परदेशगमन हे चैनीचे किंवा मौजमजेसाठी नव्हते. महाराजांच्या प्रवास वा परदेशगमनावर सरकारकडून बंधने घालण्याचे प्रयत्न झाले, राज्यव्यवहार-सत्ता संतुलन, कार्यविभागणी, कार्यक्रम संयोजन, सत्ता-अधिकार विकेंद्रीकरण केल्यामुळे सयाजीरावांनी राज्यकारभारात गुणवत्ता आणलेली होती. प्रत्यक्ष बडोद्यात महाराज उपस्थित नसले, तरी प्रजेची कामे उत्तमरितीने व्हावीत, अशी कार्य पद्धती व शिस्त त्यांनी निर्मिली होती.

समारोप

प्रत्यक्ष राज्यकारभार हाती येताच लोकसंवाद, लोकस्थिती सर्वेक्षण यामुळे लोकांच्या इच्छा-आकांक्षा सयाजीरावांनी समजावून घेतल्या. प्रश्न सोडवणुकीसाठी उपाययोजना केल्या. प्रश्न व उपाय लक्षात आल्याबरोबर प्रशासकीय यंत्रणा ते कार्यान्वित करीत.

राज्यातील प्रजेला शिक्षणाचे महत्त्व पटवून देत सक्षम नागरिकत्वाचे संस्कार त्यांनी केले. राजसत्ता ही प्रजेच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे, ही विचारधारा स्वीकारली आणि अधिकारी, नोकरवर्ग आदींमध्ये मुरवली.

उदारमतवादी-मानवतावादी अशी आधुनिक जीवनमूल्ये यांचा प्रभाव त्यांच्या राज्यकारभारात आढळून येतो. लोककल्याणाची तळमळ हे राज्यव्यवहारसूत्र त्यांनी उपयोजिले होते.”

५.

सयाजीरावांचे हुजूरहुकूम

प्रास्ताविक

सयाजीरावांनी जवळपास ६४ वर्षे बडोदा राज्याचा राज्यकारभार सुविहितपणे आणि नैतिक शिस्तीने चालवला. आजूबाजूला सार्वभौम ब्रिटिशांची सत्ता असल्याने त्यांची एक कायदेव्यवस्था, न्यायव्यवस्था, प्रशासन व्यवस्था होती. महाराजांनी या सत्तेशी समांतर-स्वतंत्र अशी आपली राज्यव्यवहार व्यवस्था निर्माण केली होती. रेल्वे-टपाल, स्थानिक रेसिडेंट याबाबतीत अडथळ्यांची व्यवस्था होती. ब्रिटिश सत्ताधारी सार्वभौम सत्ता राबवत असताना महाराजांनी आपली स्वतंत्र सत्ता मैत्रीपूर्ण कराराचे स्मरण देत राबवली. विविध जीवनक्षेत्रांशी संबंधित कायदेव्यवस्था त्यांनी निर्मिली होती.

हुजूरहुकूम

'हुजूर हुकूम' म्हणजे कायदे ! राजेशाहीत राजाच्या लहरीवर अनिर्बंध सत्ता चालवता येते. राजा हा 'ईश्वरी अंश' मानण्याची भारतीय परंपरा आहे. प्रजेच्या दृष्टीने राजा हा अंतिम व एकमेव स्वामी असतो. सयाजीरावांनी असा एक हुकमी राज्यकारभार स्वतःच्या ठिकाणी केंद्रित केला नाही. एकतंत्री राज्यव्यवहार हुकूमशाहीकडे झुकण्याचा संभव होता, त्यांनी ही संभवनीयता संपुष्टात आणली होती.

प्रजेच्या कल्याणासाठी सत्तावापर, राज्यव्यवहार असतो ही त्यांची 'राज-नीती' होती. राज्याचे विविध विभाग, सत्ता घटक यांचे नियंत्रण, व्यवस्थापन आणि वर्तन-धोरण ठरविताना कायदे त्यांनी केले. केवळ 'कायद्याचे राज्य' हे त्यांचे शिस्तीचे धोरण होते. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, समंजसपणा, सहिष्णुता, बहुसांस्कृतिकतेचे संतुलन ही मूल्यव्यवस्था त्यांनी स्वीकारलेली होती, त्या मूल्यव्यवस्थेचे परिचालन करताना हुजूरहुकूम त्यांनी काढले.

'हुजूरहुकूम' हे लिखित स्वरूपातच कार्यान्वित व्हावेत, अशी त्यांची शिस्त होती. ६४ वर्षांच्या राज्य कारकिर्दीत त्यांनी सुमारे ७५,००० वर हुजूरहुकूम काढले. या प्रसंगोपात्त कायद्यांची नोंद 'आज्ञापत्रिका' या सरकारी गॅझेटमध्ये प्रजेसाठी छापील स्वरूपात प्रकाशित केली जात असे. सयाजीरावांच्या या हुजूरहुकुमांची भाषा खास कायद्याच्या परिप्रेक्ष्यातून संरचित केली जात असे.

प्रजा, अधिकारीवर्ग, नोकर, विविध राज्यविभाग-खाती, प्रशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांपर्यंत हुजूरहुकूम पोहोचवले जात असत.

नियम-कायदे यांचे पालन सर्व स्तरांतील अधिकारी, कर्मचारी, सेवक, खातेनियंत्रक, विभागीय संस्था यांनी करणे अपेक्षित होते. प्रश्नस्थिती, आवश्यकता यांचा काळजीपूर्वक आढावा घेऊन ही नियमव्यवस्था निर्माण केली जाई.

गुजराती, मराठी आणि इंग्रजी भाषेत हे हुजूरहुकूम काढले गेले आहेत. बडोदा राज्यात प्रजेला मराठी किंवा गुजराती भाषा वापरातल्या होत्या, शिक्षित-अधिकारीवर्ग, वरिष्ठ सरकारी अधिकारी किंवा ब्रिटिश संस्थेसंबंधित अधिकारी इंग्रजीतून व्यवहार करीत म्हणून इंग्रजीतूनही प्रसंगोपात्त हुजूरहुकूम काढले गेलेले दिसतात.

हुजूरहुकूम : लवचिकता व प्रगमनशीलता

या हुजूरहुकुमात स्थळ, काळ, परिस्थिती, प्रदेश, आवश्यकता यासंदर्भाने परिवर्तनही केले जाई. जीवनसंदर्भ-कालिक परिस्थिती बदलली, की हुजूरहुकुमात बदल घडवले जात किंवा नवे हुजूरहुकूम निर्माण केले जात. राजकीय, सामाजिक सुधारणा घडवून आणताना हे हुजूरहुकूम असणे आवश्यक होते, प्रसंगोपात्त बदलणेही आवश्यक होते. विशिष्ट पद्धतीने या दुरुस्त्या व पुरुत्या केल्या जात असत.

जाहीर प्रगटने, सूचना, हुकूम ग्रामपातळीवर पोहोचवली जात, खेड्याच्या मध्यवर्ती ठिकाणी, पार, चौक, चावडी, ग्रामसंस्था कार्यालय येथे हुजूरहुकूम लावले जात, या हुकुमांकडे लोकांचे लक्षही वेधले जात असे. राजनिर्णय, राज्यव्यवहार, राजाशी संवाद, आज्ञा स्वीकृती, अपेक्षा स्वीकृती असे सारे या प्रक्रियेत अपेक्षित होते.

हुजूरहुकुमांची भाषा थेट आशय प्रक्षेपित करणारी, काटेकोर व असंदिग्धता असलेली सुस्पष्ट अशी आहे. त्यामुळे शब्दांचे कीस पाडण्याची वेळ प्रजेवर किंवा अधिकारी वर्गावर येत नसे.

अत्यंत काळजीपूर्वक विचारविनिमय करून हुजूरहुकूम काढले जात असत. हुजूरहुकूम नुसते 'काढून' उपयोगाचे नसतात. हुजूरहुकुमांची अंमलबजावणी, कार्यवाही होणे आवश्यक असते. हुजूरहुकुमांची अंमलबजावणी तटस्थता-न्यायबुद्धी अशा पद्धतीने होत असे. सामाजिक न्याय आणि मानुषता यांची सांगड घालून ही अंमलबजावणी व्हावी, असे त्यांना अपेक्षित होते.

राज्यकारभाराची सूत्रे

सयाजीरावांच्या राज्यकारभारविषयक नीतीचे प्रतिबिंब त्यांच्या हुजूरहुकूमात उमटलेले दिसते. राज्यसत्ता केवळ एका केंद्रीय व्यक्तीत समाविष्ट करून राज्यव्यवहार कसा चालेल? 'राज्यहित-प्रजाहित' हेच मुख्य लक्ष्य असल्यामुळे प्रत्येक हुजूरहुकूम याच दोन तत्त्वांवर आधारलेला असल्याचे दिसते.

देशी संस्थानांत राज्यकारभार चालवण्याचे काम का बिकट झाले आहे, याची कारणमीमांसा त्यांनी केलेली दिसते. काही सोय, सुधारणा, जनाहितकारी योजना करायची असल्यास इंग्रज सरकारच्या नियंत्रणात असू शकतात. राजा व राज्याचे हित या बाबतीत इंग्रज सरकारचा सहानुभूतीचा भाव कमी होताना दिसतो. स्थानिक प्रजा व नोकर यांच्यात शिक्षणाचा आणि स्वामित्वाचा अभाव हे एक कारण दिसते. हुजूरहुकुमात याबद्दलचे प्रतिपादन मोठे मौलिक आहे-

''हिंदुस्थानात एकंदरीने पाहता सात्त्विक राजभक्तीचा भाव फार क्वचित दिसतो. स्वार्थबुद्धी व अज्ञान यांचेच प्राबल्य बहुशः दृष्टीस पडते आणि ज्या प्रमाणाने राजसत्ता निर्बल दिसते, त्या प्रमाणाने अनिष्ट परिणाम जास्त दिसू लागतात, असा अनुभव येतो. हरेक मनुष्य आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न करतो आणि राज्याच्या किंवा प्रजेच्या हितासाठी पाहिजे तितका प्रयत्न कोणी करीत नाही. यामुळे राज्य चालविण्यात दुनियेच्या व्यवहाराप्रमाणे वर्तन ठेवून व जनस्वभाव समजून घेऊन योग्य अशी वागणूक राज्यकर्त्यास ठेवावी लागते...''

(निवडक कायदे अर्थात हुजूरहुकूम/सयाजीराव गायकवाड/साकेत/२०१३/ पृ. ७)

लोकव्यवहार आणि जनस्वभाव लक्षात घेऊन राज्यकर्त्यास कृती करावी लागते, असे सयाजीरावांचे धोरण होते.

हे ‘हुजूरहुकूम’ अत्यंत स्पष्टतेने अर्थाभिव्यक्ती करणारे आहेत. अर्थनिर्णयात अडचणी राहू नयेत म्हणून स्पष्टीकरणे दिलेली आहेत. यात राज्यकर्त्याचे ‘कायदा करण्यामागचे हेतू, अपेक्षा, कारणे, अपेक्षापूर्तीचे मार्ग’ स्पष्टतेने सांगितलेले आहेत. कायद्याची काटेकोर भाषावापराची पद्धत आणि कायद्याची अंमलबजावणी करणारे, पालन करणारे यांच्या बौद्धिकतेची स्थिती असा संयोग साधण्यासाठी निवेदनात संकोच-विस्ताराचे धोरण ठेवलेले होते. राज्यकर्त्याच्या वर्तणुकीचे स्वरूप काय असते, हे वरील हुजूरहुकुमात दर्शविले आहे.

“...ताब्यातील नोकरांचे गुण–दोषांची परीक्षा वरिष्ठास करता येणे हा सुराज्यव्यवस्थेचा मुख्य उद्‌देश आहे...”

“चांगले काम करणारास उत्तेजन व वाईट काम करणारास शासन करणे हा राज्यकारभाराचा हेतू आहे...”

“दिलेले अधिकार प्रामाणिक विचाराने, स्वतंत्र व सक्तीने वापरण्याचा गुण देशी राज्यात बऱ्याच अंशी दुर्मीळ असतो. देशी राज्यात उपरी अंमलदार कडक व हुशार नसले तर हाताखालील कामाची शिस्त व टापटीप ढिली होऊन पुढे ती नष्टही होईल...”

“पूर्वीच्या कारकीर्दितील गैरशिस्त पद्धती सुधारण्यात याव्यात...”

“जुने प्रकार इष्ट दिसल्यास ते सारासार विचार करून चालविण्यास हरकत नाही...”

“राजा, रयत व राज्याचे हित ही एकच आहेत, अशी आमची समजूत आहे...” (पूर्वोक्त/पृ. ८ ते ११)

या आणि अशा कितीतरी हुजूरहुकुमांत सयाजीराव सत्ताधीश, अधिकारी, उपाधिकारी, कर्मचारी, सेवक यांच्या वर्तनव्यवहाराबद्दल नियमव्यवस्था घालून देताना दिसतात.

प्रजा असो वा सेवक वा राज्य या साऱ्यांचे हित साधणारा राज्यव्यवहार, नियम, कृती त्यांना महत्त्वाचे वाटत होते. नियम व्यवस्थानिर्मिती, नियमव्यवस्थेचा आशय, नियमांच्या कार्यवाहीच्या कृती यातील अंतिम लक्ष्य प्रजाहित हेच असते, असावे हे सयाजीरावांच्या राज्यकारभारात आणि हुजूरहुकुमात दिसते.

राज्याच्या प्रत्येक घटकाच्या कर्तव्यपालनामागे नैतिकता-समता-प्रजाहितदक्षता निर्माण करणारा राज्यव्यवहार त्यांनी केला.

साऱ्या सुधारणा, उत्तम-आदर्श कृती कायद्याच्या परिभाषेत कार्यान्वित करणारा त्यांचा राज्यकारभार होता. कायद्याने सकारात्मक बदल होतो, विकास होतो, शिस्त येते, प्रजाहित जपले जाते, हे खरे असले तरी कायद्यांचे पालन होताना प्रजा, अधिकारी व सेवक यांची मानसिकता महत्त्वाची असते. कायद्याचे पालन स्वयंस्फूर्तीने, स्वयंशिस्तीने होणे त्यांनी अपेक्षिले होते. कायदा करताच तात्काळ सुधारणा झाली, असे होत नाही. कायदा पालनासाठी ज्यांना कायदा लागू केला आहे, त्यांचे उद्बोधन-विचार जागरण होणे आवश्यक आहे, हे त्यांनी पुरेपूर ओळखलेले होते. अपेक्षित शिस्त, सुधारणा, कायद्याची आवश्यकता, अपेक्षित फलित याबद्दलची जागरूकता प्रजा, अधिकारी, सत्ताधारी राजा यांच्यात निर्माण होणे त्यांनी बाध्य मानले होते. कायद्याची बांधिलकी लोकहिताशीच असते, हे राज्यकारभारविषयक सूत्र त्यांनी अंगीकारले होते. उदा. पुढील काही हुजूरहुकुमातील आदेश सूचना पाहू.

"देशाच्या समृद्धतीच्या साधनांची माहिती तयार ठेवावी, म्हणजे कार्यक्रम ठरविण्यास सुलभ पडेल...."

"भावी सुधारणेच्या योजनांची प्रथम धारणा ठरवून ठेवावी व धारणेपैकी पूर्ण झाल्याची नोंद ठेवीत जावे."

"राजपद्धतीत दोष काढण्यासाठी सूचना व इशारे दिले जातात. ते समजून घेऊन देशाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केला पाहिजे."

"...बिकट परिस्थितीतही जितकी संधी मिळेल, तिचा उत्कृष्ट उपयोग करून घेऊन राज्यहित सांभाळण्यासाठी व रयतेच्या सुख-समृद्धीची उन्नती करण्यासाठी दरेक मनुष्याने आपल्याकडून होईल तितकी तजवीज करावी..." (पूर्वोक्त/पृ. १२-१३)

विविध जीवनक्षेत्रीय कृती-उपक्रमांसाठी केलेले हुजूरहुकूम अत्यंत प्रगतिशील असावेत, पुरोगामी राज्यव्यवहार असावा ही त्यांची धारणा होती. इंग्रज सरकारपेक्षा सयाजीरावांचे फायदे अधिक प्रगत, सुधारणावादी आणि सक्षम असे होते.

"दुसऱ्या राज्यातील सुधारणेचे निरीक्षण करून आपल्याकडे त्यातील फायदेकारक बाबी दाखल करण्याची तजवीज करावी," असा आदेशच त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी काढलेला होता.

टिप्पणी लेखन

निर्णयासाठी अनेक प्रकरणे सयाजीरावांपर्यंत येत असत. सारा कागदपत्रांचा फापटपसारा, बुद्धिभेद व्हावा अशी अनावश्यक माहिती, तपशील सतत घेत असल्याने टप्याटप्याने निर्णय घेणारी व्यवस्था त्यांनी निर्माण केली होती. प्रत्येक स्तरावर कागदपत्रांची पूर्तता, प्रकरणाचे आकलन होऊन नियमानुसार निर्णय घेऊन निर्णयाची संक्षिप्त नोंद असावी, निर्णयकर्त्याचे अभिमत असावे, एका दृष्टिक्षेपात वरिष्ठाला प्रकरणाची माहिती होऊन उचित निर्णयनोंद व्हावी, म्हणून सयाजीरावांनी टिप्पणी लेखनाची पद्धत संशोधिली आणि कार्यवाहीत आणली.

टिप्पणी लेखनाबाबतचे काही निर्देश पाहू -

''महत्त्वाच्या व बिकट प्रश्नांचा ऊहापोह करणे उपयुक्त असते. म्हणून किरकोळ कामात आमचा वेळ घेणे ठीक नाही.''

''टिपणे ज्या त्या खात्याचे अधिकाऱ्यांकडून करविली जावीत म्हणजे त्यांचे अभिप्राय समजतील...''

''टिपणांत पूर्ण माहिती असावी; परंतु अप्रासंगिक उल्लेख करू नयेत...''

''महत्त्वाच्या हकिकती टिपणात दाखल व्हाव्यात, त्यात पुनरुस्ती होऊ नये व दिलेली माहिती संक्षिप्त असावी...''

''मंजुरीच्या मागणीची साधक-बाधकता तपासावी.''

''टिपणांतील शिफारशी स्पष्ट असाव्यात.''

''टिपणे साधारणतः देशी भाषेतच असावीत व इंग्रजी उतारे असल्यास त्याचे तर्जुमे असावेत. अभिप्रायही देशी भाषेतच असावेत''

''टिपणांचे साधनिक कागद हजर होऊन दाखवावे.'' (पूर्वोक्त / पृ. १७ ते १९)

प्रशासकीय निर्णयात तत्परता, वस्तुनिष्ठता, संविधानात्मकता यावी म्हणून टिप्पणी लेखनाची ही पद्धती सयाजीरावांनी रूढ केली, टिप्पणी कशी असावी-नसावी याचे नमुनेही उदाहरणांदाखल दिले. कोणत्या शासन नियमानुसार मंजुरी/ नामंजुरी शिफारस केली, तेही संबंधितांना नमूद करावे लागे. हुजूरहुकुमाचे कागद संदर्भात असतील तर ते पुरावे द्यावेत, अशी त्यांची अपेक्षा होती. ही टिप्पणी लेखनाची सुटसुटीत आणि उचित पद्धती पुढे इंग्रज सरकारनेही स्वीकारली.

स्वातंत्र्योत्तर काळातील शासकीय प्रकरण मान्यतेत हीच टिप्पणी लेखनाची पद्धत रूढ झालेली दिसते.

रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी 'श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात' टिपण पद्धतीची आठवण सांगितली आहे -

''रोजची कामे पाहून हुकूम देताना सावधपणाने वागून एकंदर कारभाराचा मेळ ते घालीत. पूर्वी त्याजपुढे हुकुमासाठी कामे रुजू होत, त्यात काय मुद्यांवर निर्णय पाहिजे त्याचा पत्ता लागत नसे. ही अव्यवस्था मोडून त्यांनी स्वतःची पद्धत सर्वथा नवीन उत्पन्न केली. तीत निर्णय करण्याचे मुद्दे क्रमवार शेवटी दाखविलेले असून, प्रत्येक मुद्यावर खात्यांचा व इतरांचा अभिप्राय अल्प शब्दांत नमूद करण्याची शिस्त ठरली. आरंभी प्रकरणावर एक कोष्टक असे, त्यावरून नजर फिरविताच एकदम कामाचे संपूर्ण स्वरूप लक्षात येई. ही पद्धत पुढे उत्तरोत्तर इतकी पसंतीस उतरली, की अनेक संस्थानिकांनी व प्रत्यक्ष हिंदुस्थान सरकारनेही तिचा पुष्कळसा अवलंब केला. तेणेकरून उगाच भाराभार कागद वाचण्याचे श्रम वाचून निकाल काय पाहिजे ते सहज कळू लागले. महाराजांकडे रुजू होणाऱ्या कामास 'टिपण' हे नाव पडले.''

(श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात/रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई/एस. जगन्नाथ आणि कंपनी, पुणे २/१९५६/पृ. १८)

टिप्पणी लेखनाचा हा सयाजीरावांच्या कारकिर्दीतला आरंभीचा प्रयोग होता. तो उपयुक्त ठरल्याने आजवर प्रशासनात टिकून राहिला आहे.

न्यायदानाबाबतच्या कार्यतत्परतेचा निर्देश एका हुजूरहुकुमात आहे - ''न्यायाच्या कामास लागणारी मुदत व निकालातील न्यायाचे तत्त्व यांच्याबद्दल ब्रिटिश हिंदुस्थानात जे धोरण असते, त्यापेक्षा आपण काहीतरी वरचढ केले पाहिजे व रयतेस सत्वर व संगीत न्याय मिळण्याची सवड देण्यात आपल्या न्यायाधीशांनी दुसऱ्या राज्यापेक्षा वरचा दर्जा दाखविला पाहिजे.''

(हुजूरहुकूम/सयाजीराव गायकवाड/साकेत प्रकाशन/२०१३/पृ. १६)

विलंबाने न्याय मिळणे हा एक प्रकारचा अन्यायच असतो, न्यायदानात तत्परता असावी, तसेच निर्णय हे न्याय्य व तटस्थ आणि समतेवर आधारलेले असावेत, असा त्यांचा आग्रह होता. कायद्यानुसार राज्य चालावे, लोकवर्तन कायद्याचे पालन करणारे असावे या त्यांच्या धोरणांचा लौकिक सर्वदूर पसरला.

हुजूरहुकूम, न्यायदान, कायदापालन, सामाजिक सुधारणा वगैरे सयाजीरावांचे कार्य ब्रिटिश सरकारच्या हेव्याचे कारण ठरायचे. बडोदा राज्याचे कायदे, कायद्याची अंमलबजावणी आणि प्रजेचे शांत व सुखकारक जीवन ब्रिटिशांच्या प्रदेशापेक्षा वरच्या दर्जाचे होते. जे ब्रिटिशांना सार्वभौम सत्ताधारी असतानाही जमत नव्हते, ते बडोद्यात सयाजीरावांनी करून दाखवले होते. बडोद्यातले कायदा, शांतता, सुव्यवस्था हे सारे व्यवहार सयाजीरावांच्या हुजूरहुकुमाने उत्तमरीत्या चालत होते. ब्रिटिश अधिकाऱ्याने गुणवत्तापूर्ण प्रशासन करणे शक्य नव्हते, तेथे अधिकारांची उतरंड होती.

शिक्षणविषयक हुजूरहुकूम

शिक्षणाशिवाय माणसाचे उन्नयन होऊ शकत नाही, मानवी जीवनाची गुणवत्ता आणि मूल्यवत्ता शिक्षणाने होते. शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे मुख्य साधन आहे, या विचारांमधूनच शिक्षणविषयक हुजूरहुकूम त्यांनी काढले आणि अंमलबजावणी नीट व्हावी, अशी व्यवस्थापन यंत्रणा उभारलेली होती.

शिक्षणदान हे मोठे परोपकारी कार्य आहे, या कार्यात यशस्वी होणाराच देशाचा खरा उद्धारकर्ता असतो. शिक्षणविषयक धोरणांची काही सूत्रे पुढील हुजूरहुकुमांतून सहज लक्षात येतील. ती अशी,

'देशातील अज्ञानाची स्थिती सुधारण्यास शिक्षण ही संजीवनी असल्यामुळे सक्तीचे मोफत शिक्षण देण्याची योजना सुरू केली आहे.'

'प्राथमिक शिक्षणाच्या योजनेमुळे सरकारचा उत्पन्न पैदा करण्याचा हेतू बिलकुल नसून केवळ प्रजेच्या उन्नतीसाठीच सक्तीच्या शिक्षणाचा मार्ग योजलेला असल्यामुळे या कृतीस अवरोध न करिता तिला विकास पावण्यास व तिजपासून लाभकारक परिणाम उत्पन्न होऊ देण्यास प्रजेने मदत केली पाहिजे.

'पढिक व औपचारिक शिक्षणात तात्त्विक शिक्षणाचा, शास्त्रीय शिक्षणाचा व व्यापार-धंद्याच्या शिक्षणाचा समावेश झाला पाहिजे.'

'शालेय शिक्षण, विद्येतून मानसिक शक्ती वाढवावी व विद्यार्थ्यांचे आचार-विचार सुधारावे. विद्येच्या योगाने चांगले नागरिक निपजले जाऊन विद्येचा अंतिम लाभ लोकांस मिळेल.'

'मुलास प्राथमिक शिक्षण देण्याच्या योजनेत पालकांच्या उपयुक्त व योग्य अशा व्यावहारिक सूचनांकडे लक्ष द्यावे.'

'रयतेच्या ज्ञानात वृद्धी करण्यासाठी ठिकठिकाणी संग्रहस्थाने असावीत. परदेशात उपयुक्त धंदे शिकविण्यासाठी विद्यार्थी व अमलदार पाठवावेत. कला, साहित्य व एकंदर प्रकारचे शिक्षण देशी भाषेत दिले तरच ते समाजात भिनून जाते.'

'शुद्धलेखनपद्धतीच्या नियमांकडे पुरते लक्ष द्यावे, लेखन कौशल्याचे संस्कार करावेत.'

'परदेशी शिक्षणास विद्यार्थी किंवा नोकर यास पाठवण्यात येते, तेव्हा राज्यास खास उपयोग होईल अशाच विषयाचे शिक्षण त्याने घ्यावे.'

'विशिष्ट शिक्षणाची लेखी भाषणे तयार करावी व भाषणांची पुस्तके छापून घ्यावीत, प्रजेत वितरित करावीत.'

'विशिष्ट ज्ञानाच्या बाबतीत (संगीतादी कला, क्रीडा) तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. संस्कृत पाठशाळा अमुक एका वर्गासाठी नसून हिंदूतील सर्व जातींसाठी आहे. विद्वान व कीर्तिवान लोकांचे स्मरण ताजे राहावे या हेतूने कीर्तिमंदिर बांधण्यात आले आहे. तेथे दरवर्षी विद्वान व कीर्तिवान तज्ज्ञांची व्याख्यानमाला घ्यावी...'

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा सयाजीरावांनी प्रथमच केला. इंग्लंडमध्येही त्या काळात शिक्षण सक्तीचे आणि मोफत दिले जात नव्हते. मुलांना शाळेत पाठवले नाही तर दंड केला जाऊ लागला. मुलींचे, उपेक्षित, वंचितांचे, आदिवासींचे आणि बहुजनांचे शिक्षण या कायद्यामुळेच होऊ शकले. सक्तीबद्दल पालकांमध्ये नाराजी होती; परंतु पालक संवादातून सक्ती-दंड याबाबतीत समोपचार साधला जावा, अशी अपेक्षा होती. देशी भाषा शिक्षणाचे माध्यम असावे, हिंदीचा अभ्यासक्रमात समावेश करून राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्यनिष्ठा, देशप्रेम यांचे संस्कार अपेक्षिलेले होते. संस्कृतचे शिक्षण, वेदांचे शिक्षण, उपाध्यायाचे शिक्षण सर्व जातीतल्या विद्यार्थ्यांना मिळावे, असा कायदा करण्यातून सयाजीरावांचे शिक्षणातील चौरस नेतृत्वच उभे राहिले आहे. संस्कृत किंवा वेदविद्या त्यामुळे सर्वांसाठी खुले झाले. शिक्षण घेताना भेदभाव होऊ नये म्हणून सयाजीराव सावध होते.

प्रजा निरक्षर असेल, तर राज्य नीट चालू शकत नाही. प्रजेच्या जीवनाला मूल्यही प्राप्त होत नाही म्हणून शिक्षणविषयक हुजूरहुकूम त्यांनी काढला. धंदेशिक्षण-विज्ञानशिक्षण-तंत्रशिक्षण-कलाशिक्षण असे विस्तारकार्य त्यांनी केले.

राज्याने परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवलेल्या विद्यार्थ्याला परत आल्यावर राज्याची सेवा-चाकरी करणे बंधनकारक होते. परेदशी शिक्षणासाठी पाठवलेल्या विद्यार्थ्याचा खर्च जनतेच्या पैशातूनच होतो म्हणून जनतेसाठी त्या व्यक्तीने सेवा करणे उचित ठरते. राजाने दिलेली शिष्यवृत्ती जनतेच्या कररूपाने जमा झालेल्या गंगाजळीतूनच उद्भवलेली असावी, अशी भावना यामागे सयाजीरावांची होती.

अर्थविषयक हुजूरहुकूम

राज्याचा खर्चवेच, राजाचा खासगी खर्च, नोकरदारांचे वेतन, राज्याच्या सर्वांगीण सुधारणेची हाती घेतलेली कामे, सांस्कृतिक व कलाविषयक कृतींसाठीचे खर्च असा मोठा खर्च राज्याला करावा लागतो. हा खर्च भागविण्यासाठी महसूल जमा केला जातो. राज्यकारभार चालविण्यास आवश्यक खर्च करावाच लागतो म्हणून राज्याचे ठरविलेले उत्पन्न फक्त वसूल व्हावे असे नाही, तर महसूल वाढवण्याचे मार्ग-उपाय योजावेत, तरच खर्चाची तरतूद करता येते. उत्पन्न वाढावे म्हणून काही मार्गही सुचवलेले होते. उदा. पडतर जमिनीत लागवड करणे, वेरा-कर यात वाढ करणे, व्यापारास उत्तेजन देणे, बचत बँका काढून पैसे एकत्र करणे, शेतकीतले उत्पन्न वाढवणे, शेतकरी प्रजेसाठी पतपेढ्या काढून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करणे, जंगलांची स्थिती सुधारून जंगल संपत्तीत वाढ करणे, अबकारी खात्याचे उत्पन्न योग्य प्रमाणात वाढवणे इ.

राज्याची शिल्लक रक्कम व्याजी लावून उत्पन्न वाढवावे, करमाफीचे धोरण स्वीकारू नये, राज्याच्या जमा-खर्चाच्या बिनचूक नोंदी करून कागदपत्रे आगाऊ वाचण्यास द्यावेत, अंदाजपत्रकाची निर्मिती, खर्चबाजूची जंत्री करणे, खर्चधोरणात काटकसर व उपयुक्तता यांची सांगड घालणे, वाढणाऱ्या खर्चांचा आधीच अंदाज घेणे वगैरे दूरदर्शी सुधारणा सयाजीरावांनी आर्थिक धोरणाच्या बाबतीत केल्या होत्या. राज्याच्या खर्च-उत्पन्नाला विचारात घेऊन वार्षिक पंधरा लाखांची बचत त्यांनी अपेक्षिलेली असायची. आर्थिक शिस्त, अंदाजपत्रक, काटकसर, गुणवत्तापूर्ण खर्च यांना त्यांच्या आर्थिक धोरणात, कायद्यात खूप मोठे महत्त्व होते. राजसत्ता आर्थिक बाबतीत विश्वस्त असते, प्रजाहित हेच आर्थिक हुजूरहुकुमात महत्त्वाचे ठरले.

नेहमीच्या खर्चात आपत्ती-दुष्काळ यासाठी तीन वर्षांच्या उत्पन्नाइतकी म्हणजे सुमारे सात कोटी रुपयांची रक्कम कायम शिल्लक असावी, हा राखीव निधी संकट-दुष्काळ यांच्यासाठी वापरण्याचा आदेश महाराजांनी काढलेला दिसतो. 'इतकी मोठी रक्कम (सुमारे सात कोटी) अर्थातच बिनव्याजी ठेवायची नसून ती सुरक्षित राहील व हवी त्या वेळी मिळू शकेल अशा रीतीने व्याजीने लावून ठेवावी,' अशी सूचनाही हुजूरहुकुमात आहे.

हिशेब पाहणाऱ्या अधिकाऱ्यांनी ब्रिटिशांच्या जमा-खर्चाची माहिती, नोंदी यांचे निरीक्षण करावे, प्रसंगी ब्रिटिशांच्या लेखा शाखांना जाऊन शिकावे, राज्याच्या हिशोब नोंदी ब्रिटिश हिशेब अधिकाऱ्यांकडून तपासून घ्याव्यात, अशी हिशेब तपासणी त्यांनी अपेक्षिलेली होती.

आर्थिक बाबींमध्ये कठोर तपासणी, खर्च औचित्य, काटकसर यांना महत्त्व देणारे आदर्श असे अर्थविषयक हुजूरहुकूम त्यांनी काढले होते.

नोकर व सेवकविषयक हुजूरहुकूम

राजाचे राज्यकारभाराबद्दलचे प्रजाहितकारी हेतू साध्य करण्यासाठी अधिकारी व सेवक लायक आणि राजनिष्ठ असावेत, या विचारातून हुजूरहुकूम वेळोवेळी काढले गेलेले दिसतात.

नोकरांच्या नेमणुका दूरदर्शीपणाने कराव्यात, मराठे, मुसलमान, राजपूत अशा वर्गांतील लोकांत काही गुण असतात म्हणून त्यांची काही संख्या नोकरांत ठेवावी. शिक्षणात मागे पडलेल्या लोकांना दुर्लक्षित न करता त्यांना नोकरी द्यावी. गुणग्राहकतेने इतर संस्थानांतील, इंग्रज सरकारमधील लोकांना नोकरीत घ्यावे, असे लोक तीन वर्षांच्या कराराने सेवेत ठेवावेत. विशिष्ट ज्ञानाचा नोकरतज्ज्ञ बाहेरून आणावा, त्याच्याकडून स्थानिक लोक, सेवक व अधिकारीवर्ग प्रशिक्षित करून घ्यावा.

सरकारी नोकरीत स्त्रियांस दाखल करण्यास हरकत नाही. त्यांच्याशी सभ्य वर्तन ठेवावे.

बाहेरील तज्ज्ञाची नेमणूक स्पष्ट करार-अटींवर करावी, खर्च तपशीलही नोंदवून घ्यावा, चांगले काम करणाऱ्या नोकराची कदर व वाईट नोकरास शिक्षा...

अशा तऱ्हेचे नोकरविषयक हुजूरहुकूम सयाजीरावांनी काढले आणि अंमलात आणले. राज्यव्यवहार करताना प्रजेशी थेट संबंध या वर्गाचा येतो, नोकर जर

प्रजेशी सामंजस्याने वागले नाहीत किंवा लोककल्याणकारी कामे त्यांनी नीट केली नाहीत, तर राजाबद्दलचे प्रजेचे मत बिघडते. नोकरवर्ग हा राज्याचा म्हणजेच प्रजेचा सेवक आहे, सेवेकरी वर्गाचे कामकाज, आचारव्यवहार, लोकसंपर्क कार्यक्षम आणि अभिजात सेवाभावाचा असण्याबद्दल सयाजीराव जागरूक होते.

प्रजेचे कल्याण करणारे अंमलदार हे देशी भाषेत पारंगत असावेत, प्रजेची भाषा त्यांना पूर्णपणे अवगत असावी, वरिष्ठ अधिकाऱ्यास राजकीय व इतर ज्ञान असावे, तो विद्याव्यासंगी, विषयतज्ज्ञ असणे त्यांनी अपेक्षिलेले होते. कामगिरी करताना अधिकारी व नोकरवर्गाने लोकांकडून आतिथ्य पाहुणचार स्वीकारू नये. राज्यकर्त्यांचे नातेवाईक किंवा जातभाई असेल तरी त्यांच्या गैरवर्तनाबद्दल इलाज सक्ताईने घेतले पाहिजेत. अंमलदाराला हिंदी व युरोपियन रितीरिवाज शिकवले जावेत, सरकारी कामात आपले कर्तव्य नीट करीत गेले पाहिजे, ही गोष्ट जातीसंबंधाने स्पर्शदोष न मानता सर्व खात्यांतील नोकरांनी लक्षात ठेवावयाची आहे.' (पूर्वोक्त/पृ. ३७)

वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ अधिकारी, विभागप्रमुख, खातेप्रमुख, सहायक, नोकर, खासगी सेवक अशा सर्व नोकरवर्गासंबंधी 'आचारसंहिता' या हुजूरहुकुमात पाहावयास मिळते.

समता, सामाजिक न्याय, कार्यतत्परता, तज्ज्ञता, हुशारी, अभिरूची संपन्नता, प्रजाहितदक्षता, लोककल्याणकारी सेवाकार्य अशा मूल्यांचे आचरण व संस्कारशील प्रकटीकरण या हुजूरहुकुमांमध्ये आहे. सेवाशर्ती, पेन्शन योजना, सेवामुक्ती, बक्षिसे-दंड अशा साऱ्यांचे अनुपालन-विवरण नोकरवर्गाच्या हुजूरहुकुमांमध्ये आले आहे. नोकरशाही व्यवस्था, सेवाभाव आणि लोककल्याण या तत्त्वांवर आधारलेली असावी, स्वामीनिष्ठ आणि योग्यताधारक असावी, ही सयाजीरावांची धोरणे उचितच आहेत. बिनचूक आणि नीतिमान कार्य नोकरांनी करावे यासाठी शिस्त निर्माण करणारी आचारसंहिता महत्त्वाची आहे, प्रशासकीय सेवकांना दिशादर्शक आहे. मानकरी, सरदार व आसामदार व्यक्तींसाठीही असेच हुजूरहुकूम काढले गेले होते.

न्यायदान व्यवस्थेसंबंधीचे हुजूरहुकूम

न्यायाधीशांच्या पदावर वकिलीचे काम केलेले लोक घ्यावेत, एलएलबी होऊन चार वर्षे तरी वकिली त्यांनी केलेली असावी. सरकारकडून दाद मागण्याची

टप्प्या-टप्प्यांची पद्धती सयाजीरावांनी केलेली होती. खुद्द महाराज हे रयतेने दाद मागण्याचे अखेरचे स्थान ठरविलेले होते.

न्याय मिळविण्यासाठी नातेवाईक, लटपटे-खटपटे लोक, स्वार्थी, लुबाडणूक करणारे, लाचखोर अंमलदार अशा मध्यस्थांना स्थान राहू नये, अशी न्याय मिळण्याची व्यवस्था सयाजीरावांनी कार्यान्वित केलेली होती, तसेच 'सरकारकडून किंवा सरकारमार्फत दाद मागण्याच्या बाबतीत रयतेने परकीय हुकुमतीकडे दाद मागू नये,' असा आदेशही होता. तपासकाम पूर्ण करून, उभयतांचे साक्षी-पुरावे याआधारे तथ्य काढले जावे. शहानिशा न करता घाईगर्दीने, कोणाच्या मध्यस्थीने, पक्षपातीपणे निर्णय घेऊ नये, यासाठीच्या दक्षता कोणत्या-कशा घ्याव्यात याबद्दलचे हुजूरहुकूम सयाजीरावांच्या न्यायी-न्यायप्रिय प्रतिमेला झळाळी देणारे आहेत.

'प्रजाजनांना कोणत्याही बाबतीत अखेरची दाद मागण्यासाठी हुजुरापर्यंत जाण्याची अबाधित परवानगी आहे, तसेच न्यायाची अखेरची सार्वभौम सत्ता या नात्याने हुजुरांच्या नजरेस आणण्यासारख्या ज्या महत्त्वाच्या बाबी असतील, तर त्या त्यांच्यापुढे याव्यात आणि कोणत्याही फिर्यादीच्या अथवा अडचणींच्या प्रसंगी दाद मागण्याची सर्व साधने आजमावून पाहिली असताही संतोषकारक दाद न मिळाल्यास अखेरचा उपाय म्हणून हुजुरांकडे जाण्याची श्रद्धा प्रजाजनात राहावी.' (पूर्वोक्त/पृ. ४२) अशी न्यायदान-न्याय मागणी नियमव्यवस्था सयाजीरावांनी केली होती.

कोणावर अन्याय होऊ नये, अन्याय झाल्यास न्याय मिळावा, उचित न्यायदान व्हावे, वेळेत न्याय मिळावा, साऱ्या घटनापटाची-प्रकरणाची-अर्जाची पूर्ण परीक्षा व्हावी आणि न्याय वर्तनव्यवहार असावा म्हणूनच या हुजूरहुकुमांची दखल कायद्याच्या इतिहासकारांना घ्यावी लागते.

स्थानिक स्वराज्याची स्थापना करणारे हुजूरहुकूम

'रयतवर्गास आपापल्या गावांच्या जरुरियाती स्वतःच्या देखरेखीखाली पुऱ्या करता याव्यात, या उद्देशाने गावपंचायत, तालुका पंचायत व प्रांतपंचायत याप्रमाणे स्थानिक पंचायतीच्या संस्था स्थापण्यात आल्या' (पूर्वोक्त/पृ. ५३) असे प्रकटन करून सयाजीरावांनी स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधी हुजूरहुकूम काढले.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकार, संख्या, शैक्षणिक पात्रता, कार्यपद्धती, सरकारी मदत, या संस्थांनी करावयाची कामे, खर्च तरतूद, स्थानिक पातळीवरील उभारावयाचा निधी वगैरेंची तपशीलवार मांडणी या हुजूरहुकुमांमध्ये आहे. यातील काही अपेक्षित तरतुदी पाहू -

'स्थानिक संस्थांस शिक्षण देण्यासाठी व्याख्यानांची योजना करावी.'

'पूर्ण विचार करूनच स्थानिक संस्थाना अधिकार द्यावेत.'

'परदेशांत लोक स्वतःवर कर लादून जबाबदारी घेऊन अध्यक्ष निवडून स्वतःची व्यवस्था करतात, हे हिंदुस्थानातील लोकांनी ध्यानात घ्यावे.'

''राज्यातील नोकरांशिवाय रयतेतील चांगल्या व अनुभवी माणसांची नेमणूक स्थानिक संस्थांच्या अधिकारावर करावी.'' (पूर्वोक्त/पृ. ५४-५५)

स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्यकारभार, स्व-कल्याणकारी कामात सहभाग देणारे हे लोकशाहीची पूर्वतयारी करणारे कायदे आहेत. या संस्थांचे प्रतिनिधी तज्ज्ञ-शिक्षित, लोकांचे हित जपणारे असावेत. हे निर्देश तर अत्यंत महत्त्वाचे आहेत, समकालीन संस्थांना मार्गदर्शक आहेत.

सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रासंबंधीचे हुजूरहकूम

प्रगत समाज-संस्कृती असणारी आपल्या राज्याची रयत असावी म्हणूनच सुधारकी-पुरोगामी हुजूरहुकूम सयाजीरावांनी काढले, अंमलात आणले. 'सामाजिक व नैतिक स्थिती' यांचा विचार ते सातत्याने करीत आले होते. प्रजेची सामाजिक व नैतिक स्थिती उच्चस्थानी असावी, असेच त्यांना वाटत होते.

'लोकांची सामाजिक सुस्थिती ठेवणे' हा राजाचा धर्म त्यांनी आचरणात आणला होता. 'सामाजिक रितीरिवाजात इष्ट ते फेरफार लोकांच्या मागणीवरून कायद्याने करण्यास हरकत नाही, असेच त्यांचे मत होते. सामाजिक सुधारणा त्यांनी पुरोगामी-समाजवादी-उदारमतवादी भूमिकांमधून केल्या आणि सुधारणांना कायद्यांचा आधार दिला. 'जनसमाज सुधारणा करीत नसला, तर सरकारने इलाज केला पाहिजे' म्हणजेच सामाजिक सुधारणांचे कायदे करण्याचा आणि अंमलात आणण्याचा पवित्रा सरकारने घेतला पाहिजे. सणात-कायदे करून सामाजिक सुधारणा होत नाहीत म्हणून आधी जनस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण करावे, समाजातील रितीरिवाज व रूढीबंधने यांचा मूळ हेतू ध्यानात येण्यासाठी त्यांची माहिती एकत्र करावी... जाणत्या लोकांचे समाजसुधारणाविषयक विचार

समजून घ्यावेत... सार्वजनिक संस्थांची कार्यप्रणाली, उद्दिष्टे समजून घ्यावीत' किंवा 'लग्नप्रसंगी संस्कृती भाषेतील मंत्राचा अर्थ पुरोहिताने देशी भाषेत समजावून सांगावा' असे सामाजिक सुधारणावादी नियम सयाजीरावांनी केलेले होते.

रयतेच्या सांपत्तिक परिस्थितीत सुधारणा व्हाव्यात, त्यांना सवलती मिळाव्यात, रयतेच्या परिस्थितीत परिवर्तन व्हावे म्हणून सर्व समाजघटक, अधिकारी, नोकर यांनी प्रयत्न करावेत, अशी प्रजेच्या सर्वांगीण उन्नतीची योजना निर्माण करणारी नियमव्यवस्था सयाजीरावांनी निर्माण केली होती. मागासलेले लोक, गोरगरीब लोक आणि शेतकरीवर्गाच्या हितांचे रक्षण व्हावे म्हणून त्यांनी विशेष हुजूरहुकूम काढले. पाटबंधारे, कालवे, शेतकीसाठी पाणीयोजना याबाबतीत सयाजीरावांनी सर्वंकष नियोजन केले आणि शेतीची उत्पादकता वाढवणारे कार्यक्रम हाती घेतले. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रंजन, क्रीडन, ज्ञानसंग्रहण या प्रजेच्या गरजांची पूर्ती व्हावी, सुखशांतीचे जीवन वाट्याला यावे म्हणून कृती कार्यक्रम आखले. प्रजेची नैतिक व भौतिक परिस्थिती सुधारण्यासाठी हजारो हुजूरहुकूम काढले, त्यांचे कृतीत रूपांतर होऊन फलप्राप्ती व्हावी म्हणून लक्ष घातले. या कायदा-सुव्यवस्थेमुळेच बडोदे हे आदर्श राज्य ठरले.

समारोप

हे हुजूरहुकूम प्रगतिशील राज्ययंत्रणेचे निदर्शक आहेत. प्रजेच्या नैतिक आणि भौतिक परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणूनच हुजूरहुकूम काढले गेले. सयाजीरावांनी इंग्रजी सार्वभौम सत्तेसमोर आदर्श राज्यव्यवहाराचा नमुनाच ठेवला होता.

शिक्षण, शेती, प्रशासन, समाज, न्यायदान, नोकरवर्ग या क्षेत्राच्या उन्नत दशेसाठी केलेले हे हुजूरहुकूम समकाळातही दिशादर्शक आहेत. अत्यंत सूक्ष्मतेने विविध क्षेत्रांचा, प्रश्नांचा अभ्यास करून राज्य-यंत्रणा-प्रजा यांना कार्यतत्पर व नीतितत्पर ठेवण्यासाठी हुजूरहुकुमांचा वापर केला. जितके अधिक नियमन, विधिसंहिता तितके स्वातंत्र्य, संकुचित होण्याचा धोका असतो. मात्र, सयाजीरावांच्या ६४ वर्षांच्या राज्यकारभारातील हजारो हुजूरहुकुमांनी राज्य-प्रजा-सेवक यांच्या वर्तनव्यवहाराला सुव्यवस्थेचे-सुसंगतीचे-शांततेचे आणि प्रगतिशीलतेचे रूप मिळाले.

●●●

६.

सयाजीरावांनी केलेल्या सामाजिक सुधारणा

प्रास्ताविक

सामाजिक सुधारणा करण्याचा मार्ग शिक्षणाने निर्माण होतो. नवविचारांचा प्रवेश समाजाच्या समूहमानसात पोहोचवण्यासाठी प्रजेला शिक्षण देऊन विचारी बनवणे हे सूत्र सयाजीरावांनी स्वीकारलेले होते. राज्यकारभार ज्या प्रजेच्या हितासाठी करायचा त्या प्रजेला अधिकाधिक वैचारिक, नैतिक आणि भौतिकदृष्ट्या उन्नत करण्याच्या प्रयत्नांतून सयाजीराव सुधारणा घडवून आणू पाहत होते. त्याकरिता प्रत्यक्ष कृती कार्यक्रम आणि कायदेही त्यांनी निर्माण केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रकट केलेला आदरभाव

सयाजीरावांच्या सामाजिक सुधारणांचा गौरव करताना श्रद्धांजलीपर लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की,

"...अस्पृश्य जातीवर त्यांचे फार मोठे उपकार झाले आहेत. त्यांच्याइतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही कार्य केले नाही. ते मोठे समाजसुधारक होते व बडोदे संस्थानात सामाजिक सुधारणांविषयी जे कायदे करण्यात आले ते युरोप व अमेरिकेतील कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राच्या तद्विषयक कायद्यापेक्षा पुढारलेले आहेत. त्यांनी सर्व सामाजिक घाणेरड्या चालींचा अभ्यास करून त्यातील दोष काढून टाकण्यात पुढाकार घेतला. स्वतःच्या प्रजेच्या कल्याणासाठी इतके सतत प्रयत्न दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकांनी केले नाहीत... कित्येक बाबतीत त्यांनी ब्रिटिशांना उदाहरण घालून दिले व त्यांच्या हुकुमतीखाली कधीच गेले नाहीत... महाराष्ट्रीय असले तरी आपल्या गुजराती प्रजाजनांविरूद्ध पक्षपात त्यांनी केला नाही..." ('जनता' वृत्तपत्र/११.२.१९३९) 'महाराष्ट्रातील एक विभूती', 'सामाजिक सुधारणांचा पुढारी', 'अस्पृश्यांचा एकमेव कैवारी',

'संस्थानिकातील द्रष्टा' असे सयाजीरावांचे प्रतिमान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारले आहे.

जातीभेदांस नकार

जातिसंस्थेमुळे सामाजिक समता, मानुषता, मानवी हक्क यांच्यावर आघात होतात. एक माणूस दुसऱ्यापासून दुरावतो, एक माणूस दुसऱ्याला गुलामगिरीच्या गर्तेत ढकलून देतो, हे अनुचित असल्यामुळे अस्पृश्यता निवारणाच्या कामांना त्यांनी गती दिली.

अस्पृश्यता निवारण हे काम केवळ कायदा केल्याने होण्यासारखे नाही किंवा क्षणार्धात ही सुधारणा होईलच असेही नाही, हे त्यांनी ओळखलेले होते. कोणतीही सामाजिक सुधारणा हळूहळू होते, त्यासाठी लोकांचे मत बदलले पाहिजे ही जाणीव त्यांना होती.

अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संमेलनाचे अध्यक्ष म्हणून २३ मार्च १९१८ च्या भाषणात ते म्हणाले होते, "उच्च जातींना ज्या शैक्षणिक सोई-सवलती आहेत त्याच अस्पृश्यांनाही मिळाव्यात म्हणून आपण नेटाने प्रयत्न करू व उदारमतवादाचा पुरस्कार करून लोकजागृती करू." जातीयता-वर्णभेद हे सारे मनुष्यनिर्मित आहेत. भौतिक-सामजिक परिस्थिती अशा कुप्रथांना जन्माला घालतात, असे त्यांनी स्पष्ट शब्दात मांडले. मनुस्मृतीतील अस्पृश्यतेसंबंधीचा नियमही ते नाकारतात. धर्माच्या नावाखाली अज्ञानाचा आणि कुबुद्धीचा गोंधळ त्यांना जातीभेदांमध्ये दिसतो. जन्मावरूनच जात-वर्ण ठरवणे आणि माणसांच्या गुणकर्मांना नाकारणे-हे सारेच थोतांड आहे. स्पर्श-अस्पर्शाची कल्पना समूळ नष्ट व्हावी, असे त्यांना वाटत होते.

अस्पृश्यता निवारणासाठी १८८२ साली १८ शाळा अस्पृश्यांसाठी काढल्या. 'कर्ते सुधारक' ही सयाजीरावांची भूमिका होती. समतेचा विचार मांडणे, जातीभेदांना नकार देणे हे त्यांनी प्रत्यक्षात आणले होते. अस्पृश्यांसाठी शाळा काढणे, विद्यार्थी मिळवणे, सवर्णांना समजावणे, शिक्षक मिळवणे, अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या निर्वाहाची सोय करणे ही कामे करताना त्यांना अडचणी भरपूर आल्या. या शाळांमध्ये भरपूर पगार कबूल करूनही हिंदू शिक्षक मिळाले नाहीत. सयाजीरावांनी आर्य समाजातले आणि मुस्लिम समाजातील शिक्षक मिळवले. १८९१-९२ मध्ये बडोदे, अमरेली, पाटणा व नवसारी येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे काढली,

त्यांच्या जेवणा-खाण्याची व राहण्याची सोय केली. कपडे, लेखन साहित्य व अभ्यास-पुस्तके पुरवली. या चार वसतिगृहांमुळे पाच-सहा वर्षांत अस्पृश्य विद्यार्थ्यांची संख्या दुपटीने वाढली. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी खास शिष्यवृत्त्या ठेवल्या. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समतानिर्मिती कार्यातही सक्रिय सहभाग घेतला. सामाजिक परिषदांना उदार आश्रय दिला, सभा-बैठकांमध्ये मार्गदर्शन केले.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबईत १९०४ साली सामाजिक परिषद आयोजित केली, अध्यक्षस्थानी सयाजीराव होते. त्याचवेळी अखिल भारतीय एकेश्वरी परिषद झाली. 'प्रार्थना समाजाच्या रात्रीच्या शाळांचा बक्षीस समारंभ आम्ही केला व त्याचे अध्यक्षस्थानही महाराजांनी स्वीकारले. इतकेच नव्हे तर या समारंभाच्या शेवटी रात्री आमच्या राममोहन आश्रमात सर्व जातींचे मोठे सहभोजन झाले, त्याचे अध्यक्षही महाराजच होते. त्या बक्षीस समारंभात चांभार जातीच्या ज्या एका लहान मुलाने धिटाईने भाषण केले व ज्याचे महाराजांनी आपल्या भाषणात प्रेमाने अभिनंदन केले. तोच मुलगा रा. शिवरकर हल्ली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सेक्रेटरी होऊन त्यांच्या स्वजातीच्या उन्नतीच्या कार्यात मदत करीत आहे..." (श्री. महाराजांचे अस्पृश्योद्धारक कार्य/विठ्ठल रामजी शिंदे/महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/ पृ. ३०२) अशी आठवण वि. रा. शिंदे यांनी सांगितली आहे. सर्व्हेस्टर ऑफ इंडिया सोसायटी, सोशल सर्व्हिस लीग, सेवासदन, डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया अशा पुरोगामी, सुधारकी आणि सामाजिक समता प्रस्थापिक करू पाहणाऱ्या संस्थांना महाराजांनी त्यांच्या कार्यात उत्तेजन दिले होते. उपरोक्त लेखातच वि. रा. शिंदे यांनी महाराजांच्या समता प्रस्थापनेच्या आस्थेसंबंधी पुढील उल्लेख केला आहे.

"पुणे शहर व लष्कर येथे राहणाऱ्या निरनिराळ्या अस्पृश्य वर्गातील लोकांनी आपापसात वर्गणी करून महाराजांच्या अस्पृश्योद्धार कार्याचा जाहीर गौरव करण्यासाठी एक मानपत्र अर्पण केले... महाराजसाहेब परत बडोद्याला गेल्यावर लगेच पुणे येथील महार समाजाचे प्रमुख पुढारी रा. शिवराम कांबळे व रा. श्रीपतराव थोरात या दोघांना महाराजांनी बडोद्यास खास आमंत्रण देऊन नेले, त्यांच्याशी विचारविनिमय करून त्यांचा योग्य सत्कार केला व त्यांना उघड

रीतीने राजमहालात आमंत्रित करून आपल्या टेबलावर सहभोजन केले...'' (पूर्वोक्त/पृ. ३०५)

बडोद्यातील अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या गुरुकुल धर्तीवरच्या आश्रमास वारंवार भेट देत, विद्यार्थ्यांशी संवाद साधत, प्रसंगी या विद्यार्थ्यांना राजवाड्यात बोलावून त्यांच्यासमवेत मेजवानी, सहभोजन असे उपक्रम ते करीत. इ. स. १८८३ ते १९३२ अखेर अस्पृश्यांच्या शाळांच्या आणि विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढच होत राहिली. १९३२ मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांना वेगळ्या शाळा नकोत म्हणून संमिश्र शिक्षणव्यवस्थेत त्यांना बरोबरीचे स्थान दिले गेले. सवर्णांच्या शाळेतच अस्पृश्य विद्यार्थ्यांचे सहशिक्षण सुरू केले गेले. अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिल्या जात, तसेच शिक्षणही मिळत होते. अत्यंजांच्या शाळांना हिंदू शिक्षक मिळत नव्हते; परंतु १९३२ अखेर अत्यंज वर्गातलेच १६६ शिक्षक अध्यापनाच्या क्षेत्रात दाखल झाले.

सयाजीरावांनी स्थापन केलेल्या सहकारी पतपेढ्या (२४ खेडी-२४ पतपेढ्या) ३६० अस्पृश्यवर्गीय सभासदांना लाभ देत होत्या. (१९३२)

दवाखाने, कोर्ट, सरकारी कचेऱ्या, ग्रंथालये अस्पृश्यांना खुली करण्यात आली होती. सयाजीरावांनी त्यांचे खंडेरावाचे मंदिर अस्पृश्यास खुले केले आणि तारेने हुकूम पाठवला – 'सर्व हिंदू धर्मीयांना जातपात मनात न आणता सरकारी देवळात प्रवेश करू द्यावा, तसे करण्यास खासगी देवळाच्या मालकांची मने वळवावी. कारण परमेश्वर सर्वांवर सारखेच प्रेम करतो.' (पूर्वोक्त/पृ. ३०७)

कलाभुवनमध्ये आदिवासी व अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी राखीव निधी ठेवलेला असायचा, त्यांचे शिक्षणशुल्क माफ केले जात असे.

सार्वजनिक विहीर किंवा गावविहीर बांधल्यावर त्या विहिरीचा वापर अस्पृश्यांसह सर्वांना करता यावा असा हुकूम १९३१ साली काढण्यात आला होता. राज्याच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारती, हौद, विहिरी वगैरे वापरण्याचा हक्क सर्वांप्रमाणे अस्पृश्यांना असल्याचे प्रकटन १९३८ मध्ये काढलेले दिसते, अस्पृश्यांच्या हक्क संरक्षणाची जबाबदारी बडोदे सरकारने घेतली होती.

सामाजिक व आर्थिक घडामोडींमध्ये अस्पृश्यांनी सहभाग वाढवावा हे सयाजीरावांचे धोरण होते. उदा. स्थानिक नागरी प्रक्रिया संहिता १८/५ नुसार 'ऋणको जर दलित वर्गातील असेल, तर न्यायालयाने त्या कर्जप्रकरणाचा पुन्हा

योग्य तो आढावा घ्यावा आणि जर सरकार त्या ऋणकोच्या अज्ञानाचा फायदा घेत व्याजाची अवाजवी रक्कम दाखवून लुबाडत आहे असे दिसून आले, तर कर्जाची रक्कम योग्य तऱ्हेने कमी करावी.' (पूर्वोक्त/पृ. ३२५)

सामाजिक मागासलेपण निर्मूलन कायद्यानुसार अस्पृश्य समजणे हा गुन्हा ठरल्याचे निर्देश दिले गेले. हरिजन आणि अस्पृश्य आणि तत्सम हिंदूंचे मागसलेपण दूर करण्यासाठी समता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुता यांची प्रतिष्ठापना व्हावी म्हणूनच असे समताधारित, मानवी हक्क संरक्षणाचे कायदे सयाजीरावांनी केले होते. जगभरचे प्रवास, विद्याव्यासंग, पंडितमैत्री, वाचन-चिंतन यामुळे सामाजिक समता हे उदारमूल्य त्यांनी आपल्या वर्तनव्यवहारात आणि राज्यकारभारात अंगीकारलेले दिसते.

सार्वजनिक वापराचे रस्ते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक उपयोगाच्या किंवा सरकारी निधीवर चालणाऱ्या निधर्मी संस्थांमध्ये अस्पृश्यांना वापर करण्याचा अधिकार देण्यामागे समता हेच तत्त्व स्वीकारलेले होते.

आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी अस्पृश्यांच्या सहकारी संस्था निर्माण केल्या (संस्था १०९, सदस्य संख्या-२४०८) काही अशा संस्थांना बिनव्याजी कर्ज देऊन भांडवल पुरवठा केला जात असे.

सुधारणावादी कायदे निर्मिती व अंमलबजावणी

सामाजिक सुधारणांचा प्रारंभ सयाजीरावांनी शिक्षणसोयी निर्माण करून केला. सोनगड येथे आदिवासींच्या शिक्षणासाठी शाळा, लेखन साहित्य, वसतिगृह यांची निर्मिती केली. ज्ञानाने स्थल–कल–परिस्थिती, स्वत्व, विश्वबंधुत्व यांची जाणीव होते. ज्ञानप्राप्तीतूनच व्यक्ती किंवा समष्टी यांचा अभ्युदय होतो म्हणून ज्ञानसंस्थांच्या वाढीवर व गुणवत्तेवर त्यांनी भर दिलेला होता.

सामाजिक व धार्मिक रूढी-परंपरांमधील टाकावू भाग, निरुपयोगी समज-कर्मकांड त्यांनी नाकारले होते. समुद्रमार्गे पहिला प्रवास करताना शुद्धीकरण-वाळीत टाकणे यातील फोलपणा लक्षात आलेला होता. पुढे जवळजवळ दरवर्षी जलप्रवास व परदेशप्रवास ते करीत गेले आणि धार्मिक निर्बंधही सैल होत गेलेले दिसतात. (पूर्वोक्त/पृ. १५०) स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करणारे कितीतरी कायदे त्यांनी केले आणि त्यांची अंमलबजावणी केली.



मुलींचा शिक्षण वर्ग

स्त्रियांसाठी प्रसूती रुग्णालये, स्त्री स्वास्थ्यासाठी आर्थिक मदतनिधी, शिशू सप्ताह प्रदर्शन, प्रशिक्षण शाळा अशा सोयी केल्या.

मुलींना शाळेत पाठवण्याचा आग्रह आयुष्यभर ते करीत होते. स्त्री-पुरुष समतेचे तत्त्वही त्यांनी अंगीकारले होते. शाळा, व्यवसाय, शिक्षण संस्था, नोकरी येथे स्त्रियांना हक्काने सहभाग मिळवण्यासाठी त्यांचा आग्रह होता. बालविवाह प्रतिबंधक कायदा त्यांनी केला होता. विवाहाच्या प्रसंगी मुलींचे वय १६ वर्षे असावे, असे त्यांच्या मनात होते, प्रस्तावित वय १४ वर्षे मांडले गेले, सामाजिक इच्छा, लोकमत पाहून बारा वर्षे हे ठरविले गेले. त्यांच्याकडे त्यांच्या कुटुंबातील एका विवाहासाठी मागणी आली, सयाजीरावांनी मागणी करणारांना सांगितले होते, की बालविवाह बंदी कायदा आम्हीच लागू केला आहे, त्याचे काटेकोरपणे आम्ही पालन करतो, सबब आपली मागणी सुचवणे बेकायदेशीर आहे. प्रजेसाठी जे धोरण तेच राजासाठी असल्याचे सयाजीरावांनी आपल्या कृतींमधून दाखवले. राजघराण्यातील स्त्रियांना पडदापद्धती स्वीकारावी लागत होती, राजवाड्यात हे सारे असायचेच, सयाजीरावांना पडदापद्धती अमान्य होती. जेव्हा एका सुनेने पडदापद्धती अनुसरली नाही तेव्हा ते मनातून सुखावले होते. जे राजशिष्टाचार-

उपचार, वर्तनव्यवहर स्त्रीला कमी लेखतात, त्यांचे अनुसरण होऊ नये असेच त्यांना वाटत होते. युरोपातील स्त्री जीवन आणि आपल्याकडील बंधने यांची तुलनाही ते करीत होते.

स्त्रियांसंबंधीची सहृदयता असल्याने स्त्रियांच्या सामाजिक प्रतिष्ठेसाठी कायद्यांची निर्मिती केली. कायदे कार्यान्वित करण्यापूर्वी विचारविनिमय, चर्चा, पाहणी समित्या असे सारे केले जाई. लोकसमूहमानस प्रागतिक विचारकृती करणारे व्हावे म्हणून विवेक जागरण व्हावे, असे त्यांचे धोरण होते. जेथे शक्य असेल तेथे भाषणांमधून लोकांच्या विवेकबुद्धीला आवाहन केले जायचे. उदा.

"...तुम्हाला सुखी व्हायचे असेल आणि बालविवाहाचे परिणाम अनिष्ट होणे शक्य आहे असे तुम्हास वाटत असेल, तर बालविवाहाची चाल बंद करा..."

...बालविवाह बंद केले तर त्यामुळे पुष्कळच फायदे होणार आहेत. मुलींच्या शरीरप्रकृतीत इष्ट सुधारणा होईल आणि पुढची पिढी सुदृढ व निकोप प्रकृतीची होईल. स्त्री शिक्षण व पुरुष शिक्षण ही जोडगोळी म्हणजे राष्ट्राची भरभराट करण्याचे एक संयुक्त साधनच आहे. तुमची पिढी धैर्यशाली, शीलसंपन्न आणि सशक्त व्हावी अशी तुमची इच्छा असेल, तर बालविवाहाची चाल कोणत्याही दृष्टीने इष्ट नाही..."

(भोर येथील शाळेच्या बक्षीस समारंभाचे भाषण-१६ सप्टेबंर १९०७)

किंवा

"लग्नाचे किमान वय ठरविणे हाही एक मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. याबाबतीत शास्त्राधार काय आहेत, तेही चालू पिढीच्या धर्मगुरूंनी ताठ मानेने पाहिले पाहिजेत... पैशाच्या लोभाने होणारा कन्याविक्रय व वधू-वरांच्या वयाचा विचार न होता होणारे जरठ-तरुणी विवाह हे प्रकारही विचारात घेतले पाहिजे. विषम विवाहामुळे ते दांपत्य स्वतः दुःखी होते व अनाचारालाही वाव मिळतो..."

(बडोद्यातील संस्कृत पाठशाळेच्या वार्षिक समारंभाप्रसंगी २६ एप्रिल १९१७)

इ. स. १९०४ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा करताना लोकमान्यता मिळवताना अडचणी आल्या. मुलीचे वय १४ वर्षांवरून १२ वर्षे ठरवावे लागले होते. १९२८ साली बालविवाह प्रतिबंधक कायद्यात पुढील सुधारणा करण्यात आल्या.

“१) आठ वर्षांखालील मुलगा अथवा मुलगी यांचे लग्न करण्यात आले असता ते रद्द झाले आहे, असे समजण्यात यावे. २) दोन्ही पक्ष आणि विवाह लावणारे गुरुजी या दोघांनाही अशा विवाहासाठी जबाबदार धरून पाचशे रुपये दंड किंवा एक महिन्याची कैद किंवा दोन्ही अशा शिक्षा ठरविण्यात आल्या. ३) आठ वर्षांवरील मुला-मुलींच्या विवाहासाठी वरील दंडाची रक्कम पन्नास रुपयांवरून दोनशे रुपये इतकी वाढविण्यात आली.” (महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण/सौ. मंदा हिंगुराव/अनु. डॉ. सुषमा करोगल/साकेत प्रकाशन/२०१५/ पृ. ६०)

इ. स. १९३२ साली ब्रिटिश इंडियन ॲक्ट १९३० अनुसार मुलाचे वय १८ व मुलीचे वय १४ इतके केले आहे. इ. स. १९३७ साली बालविवाह बंदीविरुद्ध गेल्यास दंडाची रक्कम एक हजार रुपये केली गेली. विशेष म्हणजे अशा दंड वसुलीतून मिळालेल्या रकमेपैकी दहा हजार रुपये रक्कम बाजूला काढून त्या रकमेतून मुलींना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिल्या जाऊ लागल्या.

सयाजीरावांनी सामाजिक सुधारणांसाठी केलेले पुढील चार कायदे सर्वांत पुरोगामी आणि महत्त्वपूर्ण ठरल्याचे मानले जाते.

१) जाती-अस्पृश्यता निवारण कायदा, २) हिंदू-विधवा पुनर्विवाह कायदा, ३) विशेष विवाह कायदा, ४) बालविवाह प्रतिबंधक कायदा.

घटस्फोट

सयाजीरावांनी हिंदू विवाहविच्छेद कायदा करून ब्रिटिश प्रदेशातील लोकांनाही आश्चर्याचा धक्का दिला. हिंदू परंपरेत ‘विवाहसंस्कार’ मानला जातो आणि इतरत्र मात्र ‘विवाह-करार’ मानला जातो. करार मोडून टाकता येतो आणि संस्कार आजन्म धारण करावा लागतो.

सयाजीरावांनी सल्लागार समितीला जगभरातील विवाहविच्छेद कायद्यांचा अभ्यास करण्यास सांगितले. प्राचीन हिंदू संहितांचा अभ्यासही त्यांना अपेक्षित होता. स्वतः सयाजीराव जवळपास दहा वर्षे या प्रश्नाचे चिंतन करीत राहिले. सल्लागार समितीचे सभासद, तज्ज्ञ व सहकारी यांच्या विचारमंथनातून घटस्फोट मिळण्यासंबंधी काही समान बाबी समोर आल्या. उदा. सात वर्षे गायब होणे, परागंदा होणे, संन्यास घेणे, एकांतवासी होणे, धर्मांतर, क्रौर्याचा पुरावा, तीन वर्षांपर्यंत एकमेकांच्या सहवासात राहून कोणतेही कारण न देता एकमेकांचा

परित्याग करणे, तीन वर्षांपेक्षा अधिक काळ व्यसनाधीन बनणे, भौतिक-संसारिक कर्तव्यांसाठी अकार्यक्षम असणे, व्यभिचार करणे इत्यादी 'पतीचे नपुंसकत्व आणि पतीला अनैसर्गिक वर्तन करावयाची सवय असल्यास पत्नीला घटस्फोट मिळण्याची तरतूद करण्यात आली... लग्नाच्या समयी पत्नी इतर पुरुषांमुळे गर्भवती असल्यास व पतीस याबाबतीत माहिती नसल्यास, तसेच एक पती हयात असताना स्त्रीने दुसऱ्या पुरुषाशी विवाह केल्यास पतीला घटस्फोट घेण्याचा हक्क प्राप्त झाला.' (महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण/मंदा हिंगुराव/साकेत प्रकाशन/२०१५/पृ. ६४)

अनिच्छेने 'संस्कार' म्हणत एकत्र राहण्याने व्यक्तीची आणि समाजाची शांती-सुव्यवस्था ढासळते, राष्ट्राची हानी होते. घटस्फोटाच्या कायदेशीर अधिकारामुळे स्त्रियांना सुरक्षितता आणि दिलासा मिळाला. ब्रिटिशांपेक्षा या कायद्याचे वेगळेपण होते, ते असे -

"विवाहासाठीचे पक्ष (वर-वधू) एकाच वतनाचे हिंदू असतील किंवा दोघेही जैन, शीख किंवा बौद्ध धर्माचे असतील तर जो वारसा कायदा वडिलांना लागू असेल तो अशा लग्नाद्वारे होणाऱ्या मुलांना लागू असेल. समान परिस्थितीत असणाऱ्या अन्य पक्षांचा दत्तकाचा अधिकार जाणार नाही." (बडोद्यातील सामाजिक कायदे/एन. बी. पाडळे/महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/२०१७/पृ. १७१)

वारसाहक्क

हिंदू स्त्रियांना मिळकतीत वाटा मिळण्यासंबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. त्यात दोन स्त्री सभासदही होत्या. हिंदू कायदा सुधारणा समितीने १९३० साली विचारविनिमय व अभ्यास करून बदल सुचवले. १६ नोव्हेंबर १९३३ च्या आज्ञापत्रिकेत हे बदल लागू केले गेले. उदा. संयुक्त कुटुंबातील समान वारसाहक्क असणाऱ्या व्यक्तीची विधवा त्या व्यक्तीची वारस ठरते, कुटुंबाच्या संपत्तीची भागीदार ठरते, रु. १२,००० पर्यंतच्या मिळालेल्या मालमत्तेची वारसाहक्कानुसार संपूर्ण मालक ठरते, फक्त पतीच्या असलेल्या मालमत्तेत तिला वारसा हक्काने तिच्या मुलांबरोबर त्यांच्याइतकाच समान अधिकार प्राप्त होतो, अविवाहित मुलगी कुटुंबाच्या मालमत्तेत समानपणे मुलाच्या हिश्श्याच्या चौथ्या भागाइतका हक्क मागू शकते, विवाहित; परंतु

विधवा झालेली स्त्री काही विशिष्ट परिस्थितीत आपल्या वडिलांच्या कौटुंबिक मालमत्तेवर भरण-पोषणासाठी हक्क सांगू शकते, विधवा सुनेला वारसा हक्काच्या यादीत मृत सासऱ्याच्या आईखालोखालचे स्थान देण्यात यावे, मृत झालेल्या मुलीची मुले जिवंत मुलीबरोबरचा वारसाहक्क सांगू शकतात इ.

अशा तरतुदींमुळे स्त्रियांच्या वडिलोपार्जित आणि पतीकडील संपत्तीत वारसाहक्क पक्का झाला. बडोदे राज्यातील स्त्रियांना कायदे-सामाजिक सुधारणा-योजना यांचा चांगला लाभ झाला. स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचे बळकटीकरण होण्यास मदत झाली. हिंदू विधवांच्या स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून त्यांचे आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक आणि मानवी अधिकार सुरक्षित झाले. समता, व्यक्तिस्वातंत्र्य, मालमत्ता संपादन हक्क अशा बाबी सयाजीरावांनी स्त्रीविषयक सुधारणांमध्ये लक्षात घेतल्या, अप्रत्यक्षपणे त्यांना अंतर्भूत करवून घेतले.

विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार देणारी सुधारणावादी तरतूद महत्त्वाची आहे. धर्मप्रथांच्या नावाखाली स्त्रियांच्या पुनर्विवाह-प्रतिबंधास मिळालेली मान्यता, सयाजीरावांनी दूर केली. 'इच्छा असल्यास' असे व्यक्तिस्वातंत्र्य त्यांनी स्वीकारलेले दिसते.

पुरुषांना अनेक लग्ने करू देणे आणि स्त्रियांना वैधव्य किंवा घटस्फोट यामुळे पुनर्विवाह न करू देणे हे स्त्रियांवर अन्याय करणारे आहे. समाजरचनेतील हे दोष सयाजीरावांनी काढून टाकण्याचे कार्य हाती घेतले होते. विधवा स्त्रियांच्या परिस्थितीबद्दल कळकळ व्यक्त करताना ते म्हणाले -

''त्या जणू समाजाच्या बाहेर फेकल्या गेल्याप्रमाणे असल्याने समाजाच्या भागच नव्हत्या. तिच्या जवळचे सगळे स्त्रीधन काढून घेतले जात असल्यामुळे ती पूर्णतः परावलंबी झालेली असे. दोन वेळच्या अन्नाच्या मोबदल्यात घरातले न संपणारे काबाडकष्ट उपसणे इतकेच तिचे अस्तित्व उरलेले असायचे...''

१९०१ मध्ये विधवांच्या पुनर्विवाहाचा कायदा करण्यात आला. हिंदू उच्चवर्णीय आणि स्त्रियांनी या कायद्याला पाठिंबा दिला. (महाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण/मंदा हिंगुराव/साकेत प्रकाशन/२०१५/पृ. ५५)

पुनर्विवाहाची गोष्ट

'श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात'मध्ये रियासतकार गो. स. सरदेसाईंनी एका गाजलेल्या पुनर्विवाहाची आठवण सांगितली आहे.

इंग्लंडमध्ये उच्चशिक्षण घेतलेले गणेश सदाशिव भाटे हे १९०८ मध्ये सयाजीवांच्या सेवेत दाखल झाले. त्यांची पहिली पत्नी निवर्तली होती. भाटे तरुण होते. त्यांनी वीस वर्षांची एक विधवा पुनर्विवाहासाठी पसंत केली होती. त्यांच्या आई-वडिलांना हे लग्न व पसंती मान्य नव्हते, सामाजिक रोषाचे त्यांना भय होते. पुराणमतवादी आई-वडिलांनी मुलाचे तोंड पाहणार नाही, लग्न मोडून टाकू अशी धमकी दिली होती. सरदेसाईंनी हा सारा घटनाक्रम सयाजीरावांपर्यंत पोहोचवला. बडोद्यातील सनातनी उपाध्यायांनी पुनर्विवाहास नकार दिला होता. सयाजीरावांनी हा पुनर्विवाह घडून आणण्याचे ठरविले. विधवा-पुनर्विवाहाची सामाजिक सुधारणा व्हावी असेच त्यांचे मत होते. सयाजीरावांनी त्यांच्या आश्रित उपाध्यायांना आज्ञा केली. सरकारी पातळीवर गाजावाजा करून नामांकितांना निमंत्रणे दिली गेली. चिमणबागेच्या वाड्याला लागून विस्तीर्ण मंडप उभारला. तीन-चारशे प्रतिष्ठित, स्वतः सयाजीराव, अधिकारीवर्ग, पुण्या-मुंबईचे नामांकित या पुनर्विवाह समारंभास उपस्थित राहिले. बॅ. मुकुंदराव जयकर व सयाजीरावांनी आशीर्वादपर भाषण केले. नवरदेव भाटे यांनी कृतज्ञतापर भाषण केले. 'लक्ष्मी-विलास' राजवाड्यात विवाह भोजनाच्या पंगती झाल्या. भोजनाप्रसंगी भाट्यांच्या वडिलांना सांगण्यात आले की, 'भोजन तुम्हास नको असेल तर करू नका; पण भोजनाप्रसंगी महाराजांजवळ बसून गोष्टी बोलण्यास काय हरकत !' ते पंगतीत आले. महाराजांच्या बाजूस त्यांचा पाट मांडला, समोर मिठाईचे ताट ठेवले गेले. पुढे तर भाट्यांचे वडील उपस्थितांना आग्रह करू लागले..." (श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात/गो. स. सरदेसाई/एस. जगन्नाथ आणि कंपनी, पुणे/१९५६/पृ. ७७)

हा प्रसंग विधवा पुनर्विवाहास चालना देणारा ठरला. भाटे यांच्या पत्नी लीलाबाई भाटे होत. त्यांना कलावती व रोहिणी भाटे या कन्या झाल्या. रोहिणी भाटे या प्रसिद्ध नृत्यशिक्षिका, नृत्यांगना, शास्त्रीय नृत्यसाधक म्हणून नावारूपाला आल्या. कथक नृत्यप्रकाराचे तज्ज्ञ कौशल्य त्यांच्या ठायी होते. नृत्यकलेवर सैद्धांतिक लेखनही त्यांनी केले होते.

ग. स. भाटे यांचा हा पुनर्विवाह सयाजीरावांनी राज्याचे 'सुधारणावादी धोरण' म्हणून घडवून आणला होता. सुधारणांचे अग्रणी म्हणून या घटनेकडे पाहावे लागेल.

स्त्रियांना मतदानाचा अधिकार

'स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणारा पहिला महाराजा' अशी सयाजीरावांची ओळख मंदा हिंगुराव यांनी करून दिली आहे. राजकीय निर्णयप्रक्रियांमध्ये स्त्रियांचा सहभाग असावा, असे त्यांचे धोरण होते. लोकसंख्येत स्त्रियांचा निम्मा वाटा असतो, कुटुंब-समाज-राष्ट्र यांच्या घडणीत त्यांचे स्थान महत्त्वाचे आणि पुरुषांच्या बरोबरीचे असते, तेव्हा राजकीय घडामोडींमध्ये स्त्रियांना उचित प्रतिनिधित्व मिळावे, असे सयाजीरावांना वाटत असे. लोकलबोर्डस्, नगरपालिका, लेजिस्लेटिव्ह कौन्सिल यांच्यात स्त्रियांना कायदेशीर सदस्यत्व त्यांनी दिले होते. स्त्रियांच्या सामाजिक स्थानाची प्रतिष्ठा त्यांना महत्त्वाची वाटत होती. स्त्रियांचा राजकीय प्रक्रिया, निर्णय यातला सहभाग व्यक्तिस्वातंत्र्य-समता प्रस्थापन करणारा ठरेल, याची शाश्वती त्यांना होती, हे द्रष्टेपण महत्त्वाचे आहे.

सुधारकी बाणा

म. फुले यांच्या वैचारिकतेतून सयाजीरावांना प्रेरणा मिळाली होती. न्या. रानडे, गोखले अशा विचारवंतांशी त्यांचा संवाद होता. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, ब्राह्मोसमाज अशा देशी विचारधारांचा अभ्यासही त्यांनी केलेला होता. महाराष्ट्रातील सुधारकी चळवळी, अस्पृश्यता निवारण, सामाजिक परिषदा, शिक्षण परिषदा यांच्याबद्दल आस्था होती, यातून प्रगतिशील सामाजिक जाणिवा जागृत झाल्या होत्या.

सयाजीरावांचे चरित्रकार स्टॅन्ले राईस म्हणतात,

''...महाराजांनी रयतेच्या मनात आधुनिक विचारसरणी रुजवण्याचा प्रयत्न केला. राज्याची आणि रयतेची प्रगती हेच त्यांचे अंतिम ध्येय राहिलेले आहे. जात आणि पडदा पद्धतीच्या विरोधात ते आहेत... समाजाकडे ते समग्रतेने पाहत होते. सर्व जाती त्यांच्यालेखी चांगल्याच आहेत. राज्याच्या अर्थव्यवस्थेत प्रत्येक जातीला तिचे विशिष्ट काम ठरवून दिले आहे. केवळ राजा, त्याचे अधिकारी, वकील, पुरोहित, व्यापारी एवढेच नव्हे तर लेखक आणि कलाकारांना तसेच कचरा उचलणाऱ्या व सफाई कामगारांनाही समाजाच्या कल्याणासाठी संस्कृतीमध्ये स्वतःची अशी जागा आहे. मानवतेच्या याच भावनेने महाराजांनी समाजातील सर्वांत हीन वर्गासाठी काम केले आहे. राज्याच्या सामाजिक प्रगतीची काळजी घेत, सर्वांना समान संधी देण्याच्या भावनेतून, स्त्रियांचा दुबळेपणा घालवण्याचा

प्रयत्न त्यांनी केला. ते स्त्रियांचे कैवरी आहेत. विचार आणि भावनांनी ते हिंदू होते तरीसुद्धा त्यांनी युरोप व अमेरिकेत पुष्कळ प्रवास केला... त्यांच्या युरोपियन अनुभवांचा उपयोग त्यांच्या स्वतःच्या देशासाठी व्हावा आणि भारतीय समाजव्यवस्था एका तर्कनिष्ठ पायावर उभी राहावी, केवळ या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले..."

(सयाजीराव-एक समाजसुधारक/चिमणलाल एम. डॉक्टर/महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. १६५)

सयाजीराव महाराजांनी समतावादी आणि प्रगतिशील विचारांनी सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. जातीय विषमतेला सातत्याने नाकारले. धर्म-प्रदेश-जात-भाषा-लिंगभाव यावरून होणारे भेदाभेद त्यांनी मान्य केलेले नव्हते, किंबहुना भेदाभेद संपवणारा विशाल मानवतावाद त्यांनी अंगीकारला होता.

समारोप

बालविवाहबंदी, पुनर्विवाह प्रोत्साहन, विवाहविच्छेदास अनुमती, स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियांचा राजकीय प्रक्रियांमध्ये सहभाग, अस्पृश्यता निवारण, अस्पृश्य-आदिवासींना शिक्षण व शिष्यवृत्ती, स्त्रियांना नोकरीत स्थान, पडदापद्धतीस नकार, स्त्रियांना आत्मनिर्भरता देणारे शिक्षण, सर्व जातीगटांना नोकरी व शिक्षणात स्थान, स्त्रियांचे आरोग्य, व्यायाम, क्रीडन यासाठी सोयीसुविधा, समुद्रपर्यटन आदी कृती व कायदे करून सयाजीरावांनी सामाजिक सुधारणा केल्या.

जुन्या सामाजिक चालीरिती, रूढी-परंपरा यांची चिकित्सा करून आपली प्रजा सुधारकी विचार-कृती करणारी असावी, या दृष्टीने केलेले हे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. प्रजेच्या कल्याणात सुधारणांचे महत्त्व त्यांना वाटत होते. समताधिष्ठित आणि ज्ञानकेंद्री समाजाचे स्वप्न साकारण्याचे कामही करीत होते. तत्कालीन ७५० हून अधिक संस्थानिकांमध्ये सयाजीरावांसारखा 'समाजसुधारक संस्थानिक' आपल्या वेगळेपणामुळे संस्मरणीय ठरतात.

७.

सयाजीरावांचे शिक्षणविषयक कार्य

प्रस्ताविक

वयाच्या बाराव्या वर्षांपर्यंत शिक्षणाशी संबंध नसलेल्या सयाजीरावांना दत्तकविधानानंतर जवळपास सहा वर्षे अक्षर ओळख, गणित, इतिहास, शास्त्र या विषयांचे शिक्षण दिले गेले. गुरू एलियट सर, सर टी. माधवराव, मातोश्री जमनाबाई यांनी केलेल्या शैक्षणिक, नैतिक संस्कारांमधून सयाजीरावांनी स्वतःची बौद्धिक प्रगती केली. प्रत्यक्ष राज्यकारभार हाती घेताच 'प्रजाकल्याणासाठी शिक्षण', 'राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षण' आणि 'व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण' ही सूत्रे स्वीकारली. त्यांच्या विद्याव्यासंगामुळे आणि बडोदे राज्यातील शिक्षणविषयक कृतींनी शैक्षणिक सुधारणांचे महत्कार्य अस्तित्वात आले.

सयाजीरावांच्या आधीची शैक्षणिक परिस्थिती

प्रजेला शिक्षण मिळावे हे देशी राजांच्या लक्षात आलेले नसल्यामुळे ब्रिटिश राजवटीच्या आधी शिक्षणसुविधा निर्माण झाल्या नाहीत. ब्रिटिशांनी औपचारिक शिक्षणाच्या शाळा काढल्या. मिशनऱ्यांनीही शाळा निर्माण केल्या होत्या. ब्रिटिश संपर्कातून संस्थानांमध्ये हळूहळू शिक्षणसुविधा होऊ लागल्या होत्या.

इ. स. १८७० पर्यंतच्या बडोद्यातील राज्यकर्त्यांनी शिक्षणाकडे लक्ष दिलेले नव्हते. नवसारीला इ. स. १८५६ मध्ये पारशी विद्यार्थ्यांसाठी सर कावसजी जहागीर मदरसा काढला होता. बडोद्यातील कॅन्टोनमेंट विभागात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अँग्लो-व्हरनॅक्युलर शाळा काढली होती. बडोदा राज्यात 'पंड्याजींची शाळा' अशा काही खासगी शाळा होत्या, २०० प्राथमिक शाळांमध्ये आठ हजार मुले शिकत होती, हे वरवरचे शिक्षण होते, त्यात आधुनिक अभ्यासविषय शिकवले जात नव्हते. वाचन, लेखन, व्यावहारिक गणन हे शिकवले जात होते. ब्राह्मण शिक्षक घरी-धर्मशाळांमध्ये फी घेऊन शिकवत असत.

इ. स. १८७१ मध्ये सरकारी खर्चाने शिक्षण देण्याची पद्धती स्वीकारली गेली. बडोद्यात १८७१ साली एक सरकारी हायस्कूल आणि चार प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. दोन मराठी आणि दोन गुजराती अशा चार प्राथमिक शाळा होत्या. सरकारी शाळांमध्ये ८०० विद्यार्थी शिकत होते. इ. स. १८७३ मध्ये पेटलाद येथे इंग्रजी शाळा सुरू झाली. मल्हारराव होळकर यांनी धार्मिक शिक्षणासाठी चार वेदशाळा १८७३ मध्ये काढल्या.

इ. स. १८७५ मध्ये मुलींसाठी गुजराती शाळा आणि मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी उर्दू शाळा काढण्यात आली. सर टी. माधवरावांनी शिक्षणविकासात लक्ष घातल्याने बडोदे शहरात नऊ संस्कृत, तीन मराठी, तीन गुजराती आणि उर्दू शाळा, एक हायस्कूल असे सुरू झाले. पेटलाद, पाटण अशा मोठ्या गावांमध्ये शाळा होऊ लागल्या. पुढे सयाजीरावांनी राज्यकारभार हाती घेताच 'शिक्षणातून विकास, सर्वांसाठी शिक्षण' असे धोरण स्वीकारले आणि शिक्षणक्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या.

प्रारंभीच्या शैक्षणिक सुविधा

राज्यकारभार हाती घेतल्यानंतर सयाजीरावांनी बडोदा राज्याचा दौरा केला, लोकसंवाद साधत सुखदुःखे समजावून घेतली. प्रजेच्या अविकसनाचे कारण प्रजेचे अज्ञान असल्याचे त्यांच्या लक्षात आले. जंगलातील आदिवासींना भेटले तेव्हा त्यांचे दैन्य पाहून सयाजीराव अंतर्बाह्य हादरून गेले. अस्पृश्यतेचा, दारिद्र्य आणि अज्ञानाचा अडथळा त्यांना दिसला.

एका आदिवासी पाड्यावर झालेला संवाद -

"पोरं शाळंत जाताय काय?"

"शाळंत जाऊन काय करायचं महाराज?"

"सरकारी मानसं कशी वागतात तुमच्याशी?"

"सावकारापेक्षा बरी हायीत."

"पोटासाठी मजुरी बरी भेटती काय?"

"मालकाचं रीन फेडण्यात जिनगानी पुरत नायी..."

...पाडाप्रमुखास धीर देऊन म्हणाले, "तुमच्या पोरांसाठी शाळा काढण्याचा हुकूम देतो आम्ही. मात्र पोरं शाळेत आली पाहिजेत." (युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/साकेत प्रकाशन/२०१२/पृ. ११८)

आदिवासी प्रजेला 'काळी प्रजा' असे संबोधले जात असे. आपल्या प्रजेपैकी हे अगदीच दुरावलेले लोक आहेत, वेठबिगारीने गांजलेले लोक आहेत, त्यांच्या विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. ज्ञानाने व्यक्ती, समाज, राष्ट्र घडते हे लक्षात घेऊन अस्पृश्य-आदिवासी प्रजेच्या शिक्षणाला गतिमान करायचे धोरण त्यांनी आखले.

इ. स. १८८२ मध्ये सोनगड-नवसारी येथे अस्पृश्य-आदिवासी मुलांसाठी शाळा व वसतिगृह सुरू केले. पुढे दहा वर्षांनी अस्पृश्यांसाठी खास दहा नव्या शाळा काढल्या. वंचित-उपेक्षित समाजातून, तळागाळातून ज्ञानाचा पाया रचण्याचा प्रयत्न होता. राज्यसत्तेने सर्वांनाच उन्नत केले पाहिजे; पण जे दीर्घकाळ आणि अधिकाधिक दुर्बल घटक आहेत, त्यांच्याकडे आधी-अधिकचे लक्ष देणे आवश्यक असते. गरीब-वंचित-उपेक्षित-मागास यांच्या उन्नयनाचा मार्ग शिक्षणसंधीतून व्हावा हा त्यांचा दृष्टिकोन होता. संपूर्ण राज्यसत्ता, अधिकार हाती घेतल्यावर शिक्षण, शेती, पाणी, रेल्वे, रस्ते, सांस्कृतिक संस्था, आधुनिक उद्योग, सहकार या क्षेत्रांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. शिवाय सर्व सुधारणांचा पाया शिक्षणानेच रचता येतो हेही ओळखले होते.

इ. स. १८८० मध्ये शाळांची संख्या १८० होती, विद्यार्थी संख्या १७४६५ होती. इ. स. १८८९-९० मध्ये शाळांची संख्या ४४४ म्हणजे जवळपास अडीच पटीने वाढली. यात फक्त मुलींसाठी काही शाळा काढल्या होत्या, त्यांची संख्या ३५ होती. ४०६१९ मुले आणि ३१४५ मुली शिक्षण घेत होत्या. शिक्षणावर खर्च वाढलेला होता.

इ. स. १८९१ मध्ये खेडेगावात ग्रामीण शाळा काढल्या. ग्रामव्यवस्थेत शाळा आणि शिक्षक यांना महत्त्व देण्यात आले. ''खेडेगावातील लोकांत शिक्षणाची आवड उत्पन्न करणे व अत्यंत गरीब अशा लोकांमध्येदेखील शिक्षणाचा प्रसार करणे ही शिक्षकांची कर्तव्ये समजली जात.'' (बडोदे राज्यातील प्राथमिक शिक्षण/भालचंद्र चिंतामण लेले/महाराज सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. ७१) इ. स. १८९२ यावर्षी सक्तीचे मोफत प्राथमिक कायदा करून सुरू केले. जेथे १६ विद्यार्थी जमणे शक्य असेल तेथे ही प्राथमिक शाळा सुरू झाली. इ. स. १८९२ च्या अखेरीस शाळांची संख्या ५७२ झाली. इ. स. १८९३ साली ६४१ वर पोहोचली. दि. १६ मार्च

१८९३ ला सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा अंमलात आला, हे क्रांतिकारी पाऊल मानले जाते. त्यात मुलींच्या शिक्षणाचा, अस्पृश्य-आदिवासींच्या शिक्षणाचा विस्तार होण्यास मदतच झाली.

सक्तीने प्रजेला ज्ञानार्जनासाठी तयार करणे, कायद्याने बांधून घेणे ही अशक्यप्राय गोष्ट होती. मात्र, सयाजीरावांनी आधी अमरेली शहर व तालुक्यातील ९ गावांना प्रायोगिक तत्त्वावर कायद लागू केला. या अभूतपूर्व व ऐतिहासिक घटनेने ब्रिटिशांचे लक्ष वेधले गेले, इतर संस्थानिक खडबडून जागे झाले. ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांना शिक्षण ही थोडी-बहुत जबाबदारी वाटत होती. मात्र, देशी संस्थानिकांच्या लक्षात शिक्षणाची जबाबदारी आलेली नव्हती.

बडोद्यातील शैक्षणिक परिस्थिती पाहून महात्मा गांधीही भारावून गेले होते, 'बडोदे एक आदर्श हिंदी संस्थान' या लेखात ते तौलनिक विचार मांडतात -

"राज्यकारभाराच्या दुसऱ्या कोणत्याही खात्यात महाराजा गायकवाड यांची दूरदृष्टी व उदारता शिक्षणातल्याइतकी ठळकपणे दिसून येत नाही आणि त्यांचे परिणामही इतर कोणत्याही खात्यात अधिक सत्य व स्पष्ट नाहीत. राज्याच्या महसुलापैकी शिक्षणावर खर्च होणाऱ्या रकमेचे शेकडा प्रमाण बडोद्यात ६.५, तर बंगालमध्ये १.१७, मुंबई मध्ये १.४४, मद्रासमध्ये १.३३ आणि एकूण खालसा हिंदुस्थानात सुमारे १ आहे. एकूण लोकसंख्येच्या मानाने शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण बडोद्यात ८.६ तर बंगालमध्ये ४, मुंबईत ६.२, मद्रासमध्ये ३.०९ आणि सर्व खालसा हिंदुस्थानात ३ पेक्षा कमी आहे. बडोद्यातील लोकसंख्येवर दरडोई शिक्षणासाठी ७ आणे खर्च होतात, खालसा हिंदुस्थानात सुमारे एक आणा खर्च होतो." (महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची / बाबा भांड/महाराष्ट्र शासन/पृ. ४५३)

विख्यात अर्थतज्ज्ञ आणि सयाजीरावांचे कर्तृत्वसंपन्न मंत्री रमेशचंद्र दत्त यांनी बडोदा राज्याच्या राज्यकारभाराचा वृत्तांत प्रसिद्ध केला होता. त्यातील सांख्यकीय तपशील म. गांधींना उद्धृत करावासा वाटला, ही घटनाही महत्त्वाचीच आहे. शिक्षणावर करावयाचा खर्च हा खर्च नसून सुसंस्कृत माणूस घडवण्यासाठीची गुंतवणूक असते, हेच सयाजीरावांनी ओळखले होते. शाळागृह, अध्ययन-अध्यापन सामग्री, पेटी वाचनालय, शिक्षकांचे वेतन, शालेय किरकोळ खर्च, तपासणी, परीक्षा या सर्वांवर हा खर्च करावा लागत होता. शिक्षकांना बडोदे सरकारचे

नोकर आणि ज्ञानसंवर्धक म्हणून प्रतिष्ठेचे मानले जात होते. ब्रिटिश सरकारपेक्षा वेतनही समाधानकारक दिले जात होते. 'खेड्यातील शाळा-मास्तराला पुन्हा जिवंत केले आहे' हे शिक्षकांबद्दलचे म. गांधीजींचे भाष्य याच लेखात आले आहे. इतर राज्यांच्या तुलनेत शिक्षणात बडोदे अग्रेसर राहिले याचे कारण सयाजीरावांचे शैक्षणिक कर्तृत्व हेच आहे.

प्राथमिक शिक्षणाचा हा कायदा मे १९०७ मध्ये संपूर्ण बडोदे राज्यात लागू करण्यात आला होता. कायद्याच्या अंमलबजावणीत अडचणी येत होत्याच. उदा. प्लेग, दुष्काळ, परंपरागत संकुचित जीवनदृष्टी, अज्ञान, गरिबी. सयाजीरावांनी प्रबोधनाची भूमिका स्वीकारलेली होती. युरोपच्या प्रवासानंतर त्यांच्यात तौलनिक विचारचिंतनाची सवय लागली. सयाजीरावांचा विद्याव्यासंग होता. जगभरातल्या उत्तम ग्रंथांची आणि उदारमतवादी तज्ज्ञांशी सहज मैत्रीही होती. गुणग्राहक वृत्तीने चांगले सहचर, अनुचर, स्नेही, मार्गदर्शक, शिक्षणक्षेत्रातले कर्तबगार विचारवंत त्यांनी निवडले. चर्चा, संवाद, सहविचार, सहमती असे सारे मार्ग अनुसरून शिक्षणविस्तार साध्य केला.

हा कायदा करताना दिवाण मनीभाई यांना १६ मार्च १८९७ च्या पत्रात म्हटले होते,

"...खर्चाचा साधारणतः अंदाज हात आखडून ठेवला असण्यापेक्षा अधिक मोकळा ठेवून मी यासंबंधीचा हुकूम देण्यासाठी पुढे सरसावलो आहे... ...सक्तीच्या शिक्षणाची सुरुवात करण्याआधीची पहिली पायरी म्हणजे प्रत्येक विभागात शिक्षण देण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा पुरवठा करण्यात आला पाहिजे... या योजनेनुसार प्रत्येक जाती-जमातीची मुले आणि मुली यांना शिक्षणाची साधने पुरवण्यात यावीत... पडदापद्धत पाळणारे लोक आपल्या मुलींना शाळेत पाठविण्यास हरकत घेतात... त्यांनी या मुलींना सरकारी शाळेत पाठविणे आवश्यक आहे. सरकारने वेळावेळी निश्चित केलेल्या इयत्तेइतके शिक्षण त्यांच्या मुलांना दिले पाहिजे... आपल्या प्रजेला शिक्षण देणे यासारखी सर्वोत्तम गोष्ट नाही. माझे ध्येय, वीरजिगिषा आणि इच्छा त्यांच्या पूर्ततेसाठी व माझ्या योजनांच्या सफलतेसाठी शिक्षण ही अत्यावश्यक बाब आहे." शिक्षणप्रसाराची तीव्र जाणीव आणि आर्थिक तरतूद यांची सांगड त्यांना घालायची होती. पालकांचे सहकार्य मिळणेही तितकेच गरजेचे होते. मुलींच्या शिक्षणाकडे वा त्यांच्या सामाजिक

वर्तनाकडे पाहण्याची सामाजिक दृष्टी संकुचित होती. अशा परिस्थितीत सक्तीचा काय परिणाम होईल याचा सहानुभूतिपूर्वक विचार सयाजीरावांनी केलेला होता.

शैक्षणिक उन्नतीच्या योजना आखताना वर्तमान आणि भविष्य यांची जोडणी त्यांना आवश्यक वाटत होती. तीव्रतेने वाटणे, त्याचे कृतीत रूपांतर कसे करावे? प्रत्यक्ष योजना कार्यान्वित झाल्यावर कोणते परिणाम संभवतील? कार्यवाहीत अडचणी कोणत्या? अडचणी सोडवण्याची उपाययोजना कोणती असेल? कार्यवाहीत उपयोगाचे सक्षम लोक, घटक कोणते? या सर्वांचा आढावा ते घेत होते

शिक्षणविषयक सुधारणा

खेड्यापाड्यापर्यंत शिक्षण पोहोचल्याशिवाय प्रजेचे आणि राष्ट्राचे कल्याण होणार नाही, हे ओळखून प्राथमिक शिक्षणाचा कायदा राज्यभर लागू करण्यात आला. शाळा, विद्यालये, शिक्षक प्रशिक्षण, विद्यालये, उच्च शिक्षणसंस्था यांची स्थापना सयाजीरावांनी केली.

प्राथमिक शाळांची संख्या वाढली, विद्यार्थी संख्याही वाढू लागली. इंग्रजी शाळांची, विद्यालयांची निर्मिती आवश्यक ठरली. सक्तीने का होईना, प्रजेला शिक्षणाचे महत्त्व आणि उपयोगिता कळू लागली.

इंग्रजी, गणित, शास्त्रे, भाषा असे विषय विद्यालयांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले. मुलांच्या शिक्षणाइतकेच मुलींच्या शिक्षणास महत्त्व दिले गेले. पुढे बडोदा कॉलेजची स्थापना होऊन उच्चशिक्षणात आधुनिक सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिकांवर आधारलेले शिक्षण उपलब्ध करून देण्यात आले.

परदेशी शिक्षणासाठी होतकरू आणि बुद्धिमान विद्यार्थ्यांना, सेवेतील अधिकारीवर्गाला पाठवले जाऊ लागले. परदेशातल्या म्हणजे युरोप, अमेरिकेतील शिक्षण संस्थांना सयाजीरावांनी भेटी दिल्या. पाश्चात्त्य संस्कृती व शिक्षण यांचे चिकित्सक आकलन त्यांनी करून घेतले. आपले विद्यार्थी, होतकरू अभ्यासक तेथून शिकून आले, की त्यांच्या ज्ञान-कौशल्यांचा लाभ आपल्या प्रजेस आणि राज्य प्रशासनाला होऊ शकेल, याची त्यांना खात्री होती. परंपरागत देशी शिक्षणाला उच्च व आधुनिक ज्ञानशाखांचे बळ मिळून ज्ञानकेंद्री आणि जीवनमूल्यकेंद्री प्रजा-समाज निर्माण होईल, असे त्यांना वाटत होते. युरोप, अमेरिकेचे शिक्षण, शिक्षणपद्धती आणि ज्ञाननिर्मिती आपल्या स्थानिक-देशी संदर्भांना समृद्ध करेल ही त्यांची धारणा होती.



मुलींचा गृहविज्ञान विषयाचा वर्ग

परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

सॅनेटरी इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, धातुशास्त्र आणि खाणी, शिल्पशास्त्र, शिक्षणशास्त्र, संशोधनशास्त्र, तालिम, औषधनिर्माणशास्त्र, व्यापारशास्त्र, बागांचे निर्मितीशास्त्र, वनस्पतिविद्या, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्रे, नाणकविद्या, इतिहास, छपाई तंत्रशास्त्र, स्टेशनरी, ग्रंथालय, ग्रंथपालनशास्त्र, कृषिशास्त्र, कृषितंत्र, सहकार, बालसंगोपन व बालकशिक्षण, हॉटेल व्यवस्थापन, पोलीस कवायत, कायदा, न्यायशास्त्र, शिक्षणशास्त्र अशा कितीतरी ज्ञानशाखा, अभ्यासशाखा यांची तज्ज्ञता यावी, ही आधुनिक आणि लोकापयोगी विद्या ग्रहण करता यावी म्हणून अनेक अधिकारी, सेवक, प्रजाजनांतील पदवीधर, बडोदे राज्याबाहेरील अभ्यासू विद्यार्थी यांना युरोप व अमेरिकत विद्यापीठांमध्ये शिक्षणासाठी पाठवले गेले. तज्ज्ञता निर्माण करणे, नवे ज्ञान-कौशल्य ग्रहण करणे व तज्ज्ञतेचा विनियोग राज्याच्या प्रशासनास, शिक्षण, उद्योग संस्थांना, विविध व्यवस्थापनांना करून देण्यासाठी गुणग्राहक वृत्तीतून सयाजीरावांनी शिष्यवृत्ती योजना सुरू केल्या. लक्षावधी रुपये या शिष्यवृत्त्यांवर खर्च केले गेले. बडोदा राज्याबाहेरील हुशार व गरजू ज्ञानसाधकांना यातून अर्थसाहाय्य मिळून परदेशी शिक्षणाचा, आधुनिक ज्ञानाचा लाभ घेता आला. बडोद्याच्या प्रजेपैकी पदवीधर

व्यक्तीला परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जात असे. या योजनेच्या अटींनुसार अर्ज-जामीन, विमा, करारनामा असे कागदपत्र विद्याधिकाऱ्याला सादर करावे लागे. तीन वर्षांपर्यंत परदेशी राहून शिक्षण घेता येणे, अशी तरतूद होती. सहा महिन्यांचा अभ्यासाचा प्रगती अहवाल पाठवावा लागे. 'परदेशाहून आल्यावर जास्त पगार द्यायचा, की नाही हे हुजुरांच्या मर्जीवर अवलंबून असेल. राज्यात परत आल्यानंतर काही वर्षे राज्याची नोकरी करावी लागेल आणि तसे न करता आले, तर सगळी रक्कम एकाचवेळी राज्य परत घेऊ शकते,' असाही या शिष्यवृत्तीचा नियम होता.

शिष्यवृत्ती कर्जयोजनेतून परदेशाहून शिकून आलेल्या उमेदवाराला राज्य नोकरी देत असे. ज्या पदावर नेमणूक केली जाईल ते त्याने स्वीकारावे. पगारातून दर महिन्यास कर्जफेड करावी लागत असे. शिक्षणासाठी कर्ज घेऊन त्याची परतफेड करावी लागणार असल्याची कागदपत्रे सादर करावी लागत. शिष्यवृत्तीवर सरळव्याज लावले जात होते. सामान्यतः ५ टक्के व्याज द्यावे लागत असे.

राज्यातील नोकरांना ५ वर्षे नोकरी केल्यावर एक वर्षाची भरपगारी रजा दिली जाई. शिष्यवृत्तीतून शिक्षण घेऊन परत आल्यावर किमान पाच वर्षे राज्याची नोकरी करणे बंधनकारक केले होते. परदेशी तज्ज्ञशिक्षण घेतल्याबद्दल विशेष लाभ पगाराचा द्यायचा किंवा नाही, हा निर्णय हुजुरांचा असायचा.

या तीन प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अनेक अभ्यासक, विचारवंत, अधिकारी यांना झाला, त्यामुळे बडोदे राज्याची बौद्धिक श्रीमंती वाढली. विविध शिष्यवृत्तींतून विविध विषयांत-ज्ञानशाखांत परदेशी शिकून तज्ज्ञता मिळवलेल्यांनी बडोदा राज्याच्या विकासात वाटा उचलला. हे लोक शिक्षक, मुख्यध्यापक, उद्योजक, प्राध्यापक, तांत्रिक अभियंते, औषधनिर्माणक, बंदर अधिकारी अशा तऱ्हेच्या नोकऱ्यांमध्ये आले होते. केमिकल टेक्नॉलॉजी, शेती, बागकाम, हॉटेल व्यवस्थापन, रंगनिर्मिती, औषधनिर्मिती, विद्युत अभियांत्रिकी अशी नवीन क्षेत्रे या लोकांनी हिंदुस्थानात स्थापित केली.

परदेशी शिक्षणासाठी धर्म व जातीचा भेद न करता नवे ज्ञान आपल्या राज्यात यावे, होतकरू, अभ्यासू लोक परदेशी शिक्षणातून तज्ज्ञ व्हावेत, जगातले उत्तमोत्तम, आधुनिक ज्ञान, कौशल्य, तंत्र यांनी आपल्या प्रजेचा विकास व्हावा म्हणून शिष्यवृत्ती योजनांनी उच्चशिक्षणाचा मोठा विकास झाला.

बडोदा महाविद्यालयातही जगभरातले तज्ज्ञ यावेत, पाश्चात्त्य विचारवंत, संशोधक यावेत, त्यांच्या ज्ञानाचा देशी विद्यार्थ्यांना लाभ व्हावा, असा प्रयत्न सयाजीराव करीत. जागतिक दर्जाचे आणि कीर्तीचे शिक्षक बडोदा कॉलेजच्या शैक्षणिक विकासात सहभागी झाले होते.

सैद्धांतिक शिक्षणाबरोबरच कलाशिक्षण, तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण असे रोजगाराभिमुख शिक्षण मिळण्याची सोय त्यांनी आपल्या राज्यात केली. परंपरागत धंदेशिक्षण-कलाशिक्षण हे बरेचसे अनौपचारिक पद्धतीचे होते; परंतु नवनवे उद्योग-व्यवसाय-तंत्र पद्धतशीर शिक्षणातून, प्रशिक्षणातून दर्जेदार बनतात, असे त्यांना वाटत होते. शेती, बागकाम, हॉटेल यांचे शास्त्र असते. तज्ज्ञतेने या क्षेत्रांत संशोधन, प्रशिक्षण केल्याने व्यवसायांची गुणवत्ता वाढते. म्हणूनच नवनवीन व्यवसाय क्षेत्रे हेरून त्यातील शिक्षण, प्रशिक्षणाची सोय सयाजीरावांनी केली. तांत्रिक शिक्षणासाठी 'कलाभवन' ही योजना साकार केली. इ. स. १८९० मध्ये कलाभवनाच्या इमारतीचा पायाभरणीचा समारंभ झाला. उपयोजित कलांच्या शिक्षणासाठी 'कलाभवन' सुरू केले गेले. तांत्रिक शिक्षणाचा हा आरंभ होता. मेकॅनिकल इंजिनिअरिंग, चित्रकला, शिल्पकला, सुतारकाम, रंगकाम, ब्लीचिंग व कॅलिको प्रिंटिंग हे अभ्यासक्रम शिकवले जाऊ लागले. पुढे मृत्तिकाशिल्प, स्थापत्यशास्त्र, रसायनशास्त्र, वस्त्रोद्योग, वास्तुकला यांचे शिक्षण सुरू करण्यात आले.

कलावंत, उद्योजक व व्यवसायतज्ज्ञ निर्माण करणारे हे अखिल हिंदुस्थानातले पहिलेच आधुनिक प्रशिक्षण केंद्र म्हणून नावारूपास आले.

स्त्री शिक्षण

स्त्रियांना समतेचे आणि बौद्धिक विकसनाचे मार्ग मोकळे करताना शिक्षणाचा आधार असतो. स्त्रियांना शिकूच द्यायचे नाही, स्त्रिया बाहेर पडता कामा नयेत, स्त्रिया दुर्बल असतात वगैरे समजुती, जुन्या चालीरिती याबद्दल सयाजीरावांची भूमिका स्त्रीस्वातंत्र्यवादी होती. त्यांनी पुरुष शिक्षणाबरोबर स्त्री शिक्षणाची विशेष काळजी घेतली. राष्ट्राची अर्धी शक्ती असलेल्या स्त्रियांच्या शिक्षणाचा हक्क मान्य केलाच पाहिजे असे त्यांचे स्त्रियांची बाजू घेणारे विचार होते. '१८८५च्या जाहीरनाम्यानुसार स्त्रियांच्या क्षमता विकसित करण्यासाठी शिक्षण हा मूलमंत्र घेऊन त्यांनी आपले शैक्षणिक धोरण ठरविले.' (महाराजा सयाजीराव

आणि स्त्रीशिक्षण/मंदा हिंगुराव/प्रस्तावना रमेश वरखेडे/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२००५/पृ. तेरा) सक्तीच्या मोफत शिक्षण योजनेचा लाभ मुलांबरोबरीने मुलींनाही व्हावा, अशी अपेक्षा त्यांची होती.

शाळेत प्रवेश घेण्याचे मुलींचे वय सात ते दहा असे ठरविण्यात आले होते. इ. स. १९१३ ला ते मुलींसाठी सात ते बारा असे वाढविण्यात आले. मुलींचा शिक्षणप्रक्रियेत सहभाग वाढता राहावा ही भावना यामागे होती. शेतकरी घरातल्या मुलींची शैक्षणिक उपस्थिती शेतकऱ्यांच्या नाराजीची होती. विशिष्ट दिवस गैरहजर असल्यास दंडाची तरतूद केली होती. शेतीकामाच्या काळातल्या गैरहजेरीत सूट द्यावी लागली होती.

इ. स. १९०६ साली कायदा लागू केल्यावर शाळांची संख्या वाढली. मुला-मुलींची संख्याही वाढली. इ. स. १९१५ साली मुला-मुलींच्या शाळा वेगळया करण्यात आल्या. मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्यामुळे मुलींचे शिक्षणातले प्रमाणही वाढले. काही शाळा संमिश्र होत्या.

इ. स. १८८५ मध्ये महाराजांनी स्त्री शिक्षण या विषयावर नोंद प्रसिद्ध केली -

''मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व यावर मी विशेषतः अधिक भर देईन. बुद्धिमान आणि सुशिक्षित आईची करडी नजर, प्रेमळ देखरेख हे लहान मुलांच्या मनाची जडणघडण करणारे सशक्त घटक आहेत. अनिष्ट गोष्टींचे उच्चाटन करण्याचा हा सर्वांत योग्य असा मार्ग आहे. स्त्री-पुरुष विकास अथवा पतन एकत्रच होत असते. आमच्या समाजिक जीवनात मुलींना त्यांचे काम उत्तम रीतीने पार पाडता यावे, यासाठी मुलींच्या शाळा सुरू करण्याबाबत मी विशेष लक्ष पुरवेन.''

परदेशी स्त्री शिक्षण धोरण व परिस्थिती यांची तुलना करून सयाजीरावांनी स्त्री शिक्षणविषयक कृती कार्यक्रम हाती घेतला. म. फुले यांच्या स्त्री शिक्षणविषयक कार्याची माहिती त्यांनी घेतली होती. स्त्रिया म्हणजे राष्ट्रातील अर्धी शक्ती होय, नव्या पिढीला, मुलांना सुसंस्कृत मातांचा लाभ व्हावा, त्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे त्यांना अगत्याचे वाटत होते. इतकेच नव्हे, तर शाळांमधून शिक्षण घेऊन बाहेर पडून निरनिराळया कार्यक्षेत्रांत त्यांनी प्रवेश करावा, '...या ठिकाणी जे ज्ञानरूपी वरदान लाभले ते इतरांना प्राप्त करून दिल्याखेरीज राहावयाचे नाही' असा निर्देश मुलींना त्यांनी दिला होता.

समाजव्यवस्थेचा पाया शिक्षण आहे, शिक्षणजन्य शक्तींचा विनियोग स्वबांधवांची सेवा चोखपणे व मनःपूर्वक करण्यासाठी शिक्षण असते. स्त्री-पुरुष समतेचा विचार शिक्षणातून कृतीत रूपांतरित करता येतो. अशा दृष्टिकोनातून स्त्री शिक्षण प्रसाराला त्यांनी अग्रक्रम दिला. स्त्री-पुरुष समतेसाठी चाललेल्या चळवळींसंबंधी त्यांना आस्था होती. महाराणींचा स्त्रीशिक्षण, स्त्रीसुधारणा, सामाजिक समता प्रस्थापन अशा कृती उपक्रमांत सहभाग असल्यामुळे त्यांना आनंद वाटत असे. स्त्रीशिक्षण, आरोग्यसंवर्धन, स्त्री सुसंस्कृतीकरण, संस्कार उपक्रम यांना पाठिंबा दर्शविताना महाराणी त्यांच्यासमवेत असत. व्हाईसरॉय आयर्विन आणि लेडी आयर्विन यांच्या सन्मानार्थ मेजवानी दिली गेली. या भाषणात सयाजीराव म्हणाले, ''पुरुषांच्या शेजारी असलेल्या स्त्रीचे निसर्गदत्त स्थान ऊर्फ समानतेचे हक्क प्राप्त करून घेण्याच्या चळवळीची लाट सध्या हिंदी स्त्रियांमध्ये उठलेली आहे. स्त्रियांच्या राजकीय आकांक्षांचे किंवा स्त्री स्वातंत्र्याच्या पुरोगामी कल्पनांचे जे दृश्य आधुनिक युरोप खंडात अद्यापि दिसत आहे, त्याच्यासंबंधी मी आज बोलत नसून माझा रोख खरे म्हणाल तर मातृत्वाची जबाबदारी, स्त्री शिक्षण, सुश्रूषा म्हणजे आजारी किंवा दुःखित यांचे दुःख हलके करणे इत्यादी अधिक घरगुती स्वरूपाच्या गोष्टींवर आहे. याबाबतीत चाललेली स्त्री चळवळ श्रीमंत महाराणीसाहेबांना विशेष आवडते.'' (२१ जानेवारी १९३०/उद्धृत/महाराजा सयाजीराव आणि स्त्रीशिक्षण/मंदा हिंगुराव/साकेत प्रकाशन/२०१५/पृ. ९७)

कुटुंब, समाज, राष्ट्र आणि व्यक्ती यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रारंभ शिक्षणप्रक्रियेतून होतो. प्रत्येक व्यक्ती स्त्रीच जन्माला घालते. जन्मदात्री असणारे स्त्रीरूप ज्ञानशक्तीचे रूप व्हावे म्हणून स्त्री शिक्षणाचा आग्रही आणि पुरोगामी उपक्रम सयाजीरावांनी आयुष्यभर राबवला.

स्त्री-शिक्षणः संख्यात्मक व गुणात्मक विकसन

प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन अशा विविध पातळ्यांवर स्त्रियांना शिक्षणसुविधा दिल्या, विशेष गुणवत्ता शिष्यवृत्तीत मुलींच्या उपस्थितीला उत्तेजन दिले गेले. जवळपास कारकिर्दीची ६० वर्षे सातत्याने शिक्षणकेंद्रीय राजनीतीसाठी विनियोगात आणली.

मुलींच्या अभ्यासक्रमात सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच भरतकाम, चित्रकला, पाकशास्त्र, गृहअर्थशास्त्र, संस्कृत, विणकाम यांचा समावेश केला होता. खास


कुशल शिक्षक त्यासाठी मुलींच्या शाळांमध्ये नेमले जात. देशी खेळांसाठी वेळापत्रकात स्वतंत्र तासाची योजना केली जात असे. खेळांच्या स्पर्धा, बक्षिसे, संगीत शिक्षण, आरोग्य शिक्षण, व्यायाम अशा विविध विषयांचे प्रात्यक्षिक शिक्षण मुलींना दिले गेले. सर्व पातळ्यांवर दरवर्षी मुलींच्या शाळा, मुलींची संख्या, मुलींची उपस्थिती यात सातत्याने वाढ झाली.

व्हरनॅक्युलर एज्युकेशन ॲक्ट १९१३ नुसार स्त्री शिक्षणासंबंधीच्या कायद्यातील काही तरतुदी अत्यंत स्तुत्य आणि द्रष्टेपणाच्या निदर्शक आहेत. उदा. प्रकृती उत्तम राहावी म्हणून शारीरिक शिक्षणावर विशेष लक्ष ठेवावे, व्यायाम, खेळ व कसरती शिक्षकाने स्वतःच्या देखरेखीखाली करून घ्याव्यात. शिवणकामासाठी नेमलेल्या तज्ज्ञ शिक्षकाने मुलींकरवी, लोकनिधीतून शिवणकाम साहित्य-साधने उपलब्ध करावीत, ९-१० वर्षांपर्यंतच्या मुलींना शिवणकामाचे शिक्षण सक्तीचे आहे, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिकेने शिवणकाम, भरतकाम उत्तम कसे होईल यात लक्ष घालावे, सुंदर नमुन्यांचा संग्रह करावा. दैनंदिन उपयोगाचे शिवणकाम, भरतकाम आलेच पाहिजे. पाकशास्त्र, गरबा, पाठचिकित्सा हे शिक्षण-विषय मुख्याध्यापकाने शिकवावेत, इतर शिक्षकांनाही हे विषय शिकवता यावेत. मुलींना स्वयंपाक करावा लागल्यास त्या ठिकाणी मुख्याध्यापक पूर्णवेळ उपस्थित असावा. आठवड्यातून एक दिवस आरोग्य विज्ञानाचा असावा. मातीच्या प्रतिकृती, शैक्षणिक साहित्य, विज्ञान साहित्य अध्यापनाआधी उपलब्ध करून ठेवावे.

ज्यांची मातृभाषा गुजराती नाही त्यांनी गुजराती भाषा शिकून घ्यावी. अधिकारीवर्गाला गुजराती भाषा आलीच पाहिजे. त्यांची परीक्षा विद्याधिकारी, विभागीय विद्याधिकारी व मुख्याध्यापक दरवर्षी नोव्हेंबर व जूनमध्ये घेतील.

प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षण, शिक्षण-प्रशिक्षण, क्रीडा प्रशिक्षण यात वाढ घडवून आणण्यात आली.

मुलींच्या माध्यमिक विद्यालयांची संख्या वाढली. आरोग्य शिक्षणाकडे खास लक्ष दिले गेले. मराठी व गुजराती माध्यमाच्या दोन कन्या विद्यालयांच्या निर्मितीने मुलींच्या माध्यामिक शिक्षणाचा प्रारंभ झाला, या विद्यालयांशी संलग्नित शिक्षक प्रशिक्षण विद्यालय सुरू केले गेले. मुलींच्या शारीरिक शिक्षणाला अगत्यपूर्वक उत्तेजन दिले गेले, सयाजीरावांनी वेळोवेळ्या शारीरिक शिक्षणासंबंधी निर्देश



मुलींना शारीरिक शिक्षण दिले

दिले, पाहणी अहवाल मागविले, कन्या विद्यालयांना भेटी दिल्या, शिक्षण निरीक्षक, शिक्षण संचालक, शिक्षण परीक्षक नेमून स्त्रियांचे शिक्षण गुणवत्तापूर्ण कसे होईल याकडे लक्ष दिले. कन्या शाळांच्या पारितोषिक वितरणांना, क्रीडा स्पर्धांना, रंजन उपक्रमांना उपस्थित राहून प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

महाराणी गर्ल्स हायस्कूल ही बडोद्यातील पहिली माध्यमिक शाळा होय. इ. स. १९१७ साली मिस निडहम यांची मुख्याध्यापिका म्हणून नेमणूक केली गेली. इ. स. १९३०-३१ ला इंडियन वुमन्स युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम या शाळेला जोडण्यात आला. १९३५ च्या वार्षिक पारितोषिक वितरणात सयाजीरावांनी स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियांचे सामाजिक स्थान, शिक्षणातून होणारा विकास या मुद्यांची मांडणी केली होती. ते म्हणाले,

''पाश्चात्य संस्कृतीचे केवळ अनुकरण करणारे शिक्षण येथे दिले जात नाही. पूर्वीच्या काळी आपल्या घरातील स्त्रिया पुरुषांइतक्याच चांगल्या शिकलेल्या असत. समाजकार्य आणि वेदांतविषयक चर्चा यातही महत्त्वाचा भाग घेण्याइतके शिक्षण पूर्वी स्त्रियांना दिले जाई. अर्थात, सध्याच्या पिढीतील तुम्हा स्त्रियांनादेखील आलेल्या संधीचा फायदा न घेण्याचे काहीच कारण दिसत नाही. पुरुषाप्रमाणे

तुम्हालाही साहित्य, तसेच इतर क्षेत्रांत हळूहळू काम करून स्वतःचे सत्त्व प्रस्थापित का करता येऊ नये?... स्त्री आणि पुरुष हे काही परस्परांचे शत्रू नाहीत, एकमेकांना एकमेकांची जरूरी आहे. आयुष्यातील परमोच्च ध्येय जे गृहसौख्य, ते साधून जगाच्या आणि मानवजातीच्या कल्याणाकरिता उभयतांनी सहकार्य करीत पुढे गेले पाहिजे. असे जोपर्यंत झाले नाही तोपर्यंत शिक्षणाचा हेतू सफल झाला असे म्हणता येणार नाही... आपण स्त्रियांना शक्य तितके स्वातंत्र्य दिले पाहिजे. या कामी अर्थातच शिक्षणाची, विचारांची आणि उद्योगप्रियतेची जरूरी आहे.'' (उद्‌धृत/पूर्वोक्त/पृ. ११४) सयाजीरावांनी स्त्री शिक्षणाचे फलित काळाच्या पार्श्वभूमीवर आधीच ओळखले होते.

उच्चशिक्षणाच्या क्षेत्रातही बडोदा कॉलेजच्या स्थापनेनंतर मुलींच्या उच्चशिक्षणाची तरतूद करण्यात आली. इ. स. १८८२ ला अस्तित्त्वात आलेल्या बडोदा कॉलेजचे संलग्नीकरण मुंबई विद्यापीठाशी इ. स. १८९० मध्ये झाले. बडोदा कॉलेजमध्ये गृहविज्ञानशास्त्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला होता. इ. स. १८८२ मध्येच स्त्री शिक्षिकांसाठी फीमेल ट्रेनिंग कॉलेज काढले गेले होते. पुरुष ट्रेनिंग कॉलेजमधील शिक्षकांच्या पत्नी आणि विधवा स्त्रियांना प्रारंभी विद्यार्थी म्हणून प्रवेश दिला होता. विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना, शिक्षण उत्तेजननिधी, बुद्धिमान आणि प्रावीण्य असलेले तज्ज्ञ शिक्षक, शिक्षिका, प्रशिक्षक यांची उपलब्धता करून दिली गेली. विशिष्ट ज्ञानक्षेत्रातील तज्ज्ञ आपल्याच स्त्री वर्गात निर्माण व्हाव्यात म्हणून होतकरू स्त्रियांना अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठी पाठवले जाऊ लागले. उदा. मिस राधाबाई पोवार यांना अध्यापनशास्त्राच्या शिक्षणासाठी अमेरिकेच्या टीचर्स कॉलेज युनिव्हर्सिटीत पाठवण्यात आले. (१९१४-१५) तसेच इ. स. १९१७-१८ मध्ये मिसेस स्नेहलता पगार यांना बालसंगोपन शास्त्रातील प्रशिक्षणासाठी अमेरिकेत पाठवले गेले होते. गाईडचे पथकही निर्माण केले गेले.

स्त्रियांना प्रौढ शिक्षणवर्गांची सोय करण्यात आलेली होती. वय, सामाजिक बंधने यामुळे शिक्षण घेऊ न शकलेल्या स्त्रियांसाठी झनाना वर्ग (प्रौढ शिक्षण-स्त्रियांचे वर्ग) काढले गेले. वाचन, लेखन, जमाखर्च, विणकाम, भरतकाम यांचे शिक्षण दिले जाई. या वर्गातील स्त्रियांची परीक्षा घेतली जात असे.

स्त्रियांची मंडळे, क्लब, सहविचारसभा, व्याख्यानमाला अशा विविध कृती उपक्रमांमुळे बडोदा राज्यातील स्त्रियांचे शैक्षणिक विकसन घडवून आणण्याची

अभूतपूर्व कामगिरी सयाजीरावांनी केली आहे. उदा. पडदानशीन स्त्रियांसाठी महिला लायब्ररी (१९०७), सेंट्रल लायब्ररीत स्त्रियांसाठी स्वतंत्र कक्ष, मुलींसाठी संगीत शिक्षणाच्या शाळा, गर्ल्स गाईड, श्री. चिमणाबाई स्त्री उद्योगालय, स्वयंनिर्भर करणाऱ्या स्त्रियांच्या प्रशिक्षणाच्या संस्था, श्री. महाराणी चिमणाबाई स्त्री समाज संस्था, कन्या आरोग्य मंदिर, भगिनी समाज संस्था, प्रसूतिगृहे आणि शिशुकल्याण संस्था इ.

प्रजेसंबंधीचे उत्तरदायित्व सातत्याने निभावणारे सयाजीराव हे स्त्री शिक्षणाचे अग्रगण्य प्रणेते म्हणून ओळखले जातात. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून स्त्री शिक्षणविषयक संस्था, कायदे, निधी, सुविधा त्यांनी उपलब्ध केल्या. महाराणी चिमणाबाईसाहेब यांनाही स्त्री शिक्षणकार्यात समवेत घेऊन स्त्री-पुरुष समतेचा वस्तुपाठ निर्माण केला.

समारोप

राज्याचे आणि प्रजेचे हित शिक्षणातून साधता येते, हे ओळखून शिक्षणक्षेत्रात मूलभूत कार्य सयाजीरावांनी केले. सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा, आदिवासी व अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शाळा, वसतिगृहे, स्त्री शिक्षणात वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, कर्जाऊ शिष्यवृत्ती, शिक्षक प्रशिक्षण, स्त्रियांसाठी प्रौढ शिक्षणवर्ग, महिला मंडळे, तज्ज्ञ शिक्षकांची नियुक्ती व देशी तज्ज्ञांची निर्मिती, कलाभवनसारख्या संस्था, खेड्यांसाठी पेटी वाचनालय, जाती-भाषाभेद किंवा धर्मभेद न मानता सर्वच प्रजेच्या शिक्षणाच्या उत्थानाचे कार्य त्यांनी केले. हिंदुस्थानात नवे अभ्यासक्षेत्र, नवे अभ्यासविषय, नवे शैक्षणिक तत्त्वज्ञान सयाजीरावांनी सुस्थापित केले.

इतिहास, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, संस्कृती, विद्या, मानव्यविद्या, मानववंशशास्त्र यांचा विद्याव्यासंग केल्यामुळे सयाजीरावांनी बडोदे राज्यात नवे शिक्षण रुजवले. राजाचा, राजसत्तेचा शिक्षणाविषयक दृष्टिकोन लोकजीवन सुंदर, उदारमनस्क कसा करू शकतो, हे पाहायचे असेल, तर सयाजीरावांच्या आदर्श शैक्षणिक कृती कार्यक्रमांना अग्रस्थान द्यावे लागते.

ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानाचे प्रजेच्या कल्याणासाठी उपयोजन ही सयाजीरावांच्या शैक्षणिक कार्याची त्रिसूत्री आहे. विद्याव्यासंगातूनच त्यांनी आपल्या राज्यात शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या.

८.

सयाजीरावांचे कला, साहित्य व संस्कृती क्षेत्रातील कार्य

प्रास्ताविक

राज्यसत्ता सुसंस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी असेल, तर प्रजेचा अभ्युदय होणे स्वाभाविक आहे. कला, क्रीडा, वाङ्मय, कृषी, उद्योग, सहकार, राज्यप्रशासन, धर्मकारण, राजकारण, समाज, भौतिक विकसन आणि आत्मिक विकसन, आरोग्य अशा विविध जीवनक्षेत्रांत सयाजीरावांनी सांस्कृतिक नेतृत्व केले. विद्याव्यासंग, बाह्य जगताचे आकलन, सौंदर्यसंवर्धक विचारचिंतन केले. पाश्चात्त्य आणि देशी परंपरांतले मूल्यवान संस्कार घटक कोणते ते ओळखले. देशी कलापरंपरा, संस्कृती, संसाधने, धर्म-तत्त्वज्ञान यांचा युरोपियन संस्कृती संकेतांशी मूल्यस्वरूप आणि तौलनिक विचार केला. सुसंस्कृत राज्यनिर्मितीचा, लोककल्याणकारी सुधारणांचा निश्चय केला आणि तडीस नेला, त्याचे मूर्त रूप म्हणजे बडोदे राज्याने अनेक क्षेत्रांत उत्तुंग व सुसंस्कृत कृतींचे अस्तिव साकारले आहे.

कला व कलावंतांना उत्तेजन

'एखाद्या देशाची संस्कृती काय तोलाची किंवा मोलाची आहे, हे तुम्हाला ठरवायचे असेल, तर त्या देशाच्या ललितकला विचारात घ्या. संगीत, चित्र व शिल्प याच कला राष्ट्राच्या सुधारणेच्या अचूक सूचना करणाऱ्या आहेत... या तीन कलाच राष्ट्राच्या आत्म्याला उज्ज्वल व चैतन्ययुक्त करीत असतात...' (सयाजीराव गायकवाड यांची भाषणे/खंड २/साकेत प्रकाशन/२०१३/ पृ. ७४)

दि. १० मार्च १९२९ बडोदे संगीत परिषदेचे उद्घाटन करताना वरील विचार सयाजीरावांनी व्यक्त केले होते. 'संगीतकलेत मी कुशल नाही, तथापि संगीताचे सौंदर्य मी ओळखतो,' असेही ते म्हणाले होते. कला सौंदर्यग्रहणाची

क्षमता, रसिकता त्यांनी जोपासली होती. कला सौंदर्य आणि आनंद यांचे सर्जन करतात, रसिक मनात स्थिरचित आनंदस्थिती निर्माण करतात, मानवी भावना, संवेदना यांचे विशुद्धीकरण करतात, हेच त्यांना सूचित करायचे होते.

राज्यगादीवर आल्यावर सरकारी आश्रय अधिक निश्चित स्वरूपाचा व पद्धतशीर केला. संगीतशाळेची स्थापना केली. शिक्षणातही संगीतादी कलांचा अभ्यासक्रमात समावेश केलेला होता. संगीतशाळेला साधने, उत्तम संगीत शिक्षक उपलब्ध करून दिले. निर्भेळ असलेले संगीत हा आपला थोर वारसा आहे. 'त्या संगीताचा आपल्या चित्रकलेशी व हिंदी जनतेच्या अंतःकरणातील बलिष्ठ भावनांशी फार जिव्हाळ्याचा संबंध आहे.' असा कलांतर्गत संवादी संबंध हिंदी लोकांच्या बलिष्ठ भावनांशी ते जोडत होते. ललितकलांचे आंतरिक सौंदर्यशास्त्र लोकभावाविष्कारांशी संलग्न करणारे सयाजीराव संगीत कलेचे आस्वादक होते. त्याचप्रमाणे कलास्वरूपशास्त्राची चिकित्सा करू शकणारे मीमांसक होते, असे म्हणावे लागेल.

सयाजीरावांच्या संगीत विभागात मौलाबक्ष यांचे चिरंजीव अल्लाउद्दीन याला पाश्चात्त्य संगीताची माहिती व्हावी म्हणून १८९६-९७ मध्ये विलायतेत पाठवले. संगीत खात्यात मौलाबाद (गवई), फैस महंमद (गवई), अल्लाउद्दीन मौलाबक्ष (गवई), इनायतखान (सतारवादक), नासरखा (पखवाजी), गुलाबसिंग (तब्बलजी) असे ४८ संगीतातले कलावंत सेवेत होते. हिंदी गायनमंडळ (ऑर्केस्ट्रा) सुरेल गीत-संगीत मेळ साधत होते. ख्याल गाणारे गवई, ख्याल, ठुंबऱ्या, गझल, कवाली गायिका, हिंदुस्थानी नर्तिका, तंजावरी नर्तिका संगीत विभागात असत.

सार्वजनिक बागेत दर मंगळवारी युरोपियन पद्धतीचा बँड वादन करीत असे, पाश्चात्त्य गीत-संगीत, राष्ट्रगीते वगैरे सादर केले जात असे.

सयाजीरावांच्या उपस्थितीकाळात पाश्चात्त्य व हिंदुस्थानी संगीत कार्यक्रमांचे सादरीकरण केले जाई. सर्व हिंदुस्थानातील गायक, नर्तक, वादक, भांड, तमाशेवाले, फिडल वादक, रंजक नकलाकार, जादूगार बडोद्यात कला सादरीकरणासाठी येत, त्यांची परीक्षा घेणारी समितीही होती. परीक्षक समितीने निवडलेल्या कलावंतांना दरबारप्रसंगी, सण-उत्सवाप्रसंगी किंवा सयाजीरावांच्या उपस्थितीत कला सादरीकरणाची संधी दिली जात होती.

उस्ताद मौलाबक्ष हे १८८६ मध्ये गायनशाळेत प्राचार्यपदी नियुक्त केले होते. त्यांनी नोटेशन लिहिल्या, संगीतावर पाठ्यपुस्तके लिहिण्यात मदत केली.

त्यांचे चिरंजीव अल्लाउद्दीन यांची सांगीतीक कारकीर्द अत्यंत श्रवणीय आणि नावीन्यपूर्ण ठरली. पौर्वात्य संगीत आणि युरोपियन संगीत यांच्या समन्वयाच्या शक्यता शोधण्यासाठी सयाजीरावांनी त्यांना संगीत शिक्षणासाठी विलायतेत पाठवले होते. अल्लाउद्दीनही सयाजीरावांच्या संगीत विभागात नोकरी करीत. अल्लादियाखाँ यांच्या शिष्या लक्ष्मीबाई जाधव दरबार गायिका म्हणून ओळखल्या जात. हिराबाई बडोदेकर यांच्या शालीन गायनासही सयाजीरावांनी उत्तेजन दिले होते. अखिल भारतीय संगीत सभांचे आयोजन, संगीत महाविद्यालयांची निर्मिती, संगीत विषयासाठी पाठ्यपुस्तके, गायक, वादकांना, नृत्य कलावंतांना उदार आश्रय, सयाजीरावांनी हे सारे प्रयत्न कला उत्तेजनेसाठी केले. प्रसिद्ध संगीततज्ज्ञ कलावंत भातखंडे यांच्याकडून हिंदुस्थानी संगीत क्रमिक पुस्तकमाला (भाग १ ते ४) तयार करवून घेतली. 'संस्कृत लक्ष संगीत' आणि 'संस्कृत अभिनव रागमंजिरी' या भातखंडे यांच्या पुस्तकांनाही प्रकाशन, प्रसारासाठी अनुदान दिले होते. सयाजीरावांच्या कलांना उत्तेजन देण्याच्या भूमिकेचे समर्थन करताना दाजी नागेश आपटे यांनी म्हटले आहे, "... सुसंस्कृत कलेचा आदर्श लोकांपुढे न मांडल्यास त्याच्याअभावी असंस्कृत बहुजन समाज मूळच्या देहस्वभावावर जाईल व त्यायोगे संस्कृतीची हानी होईल. ही आपत्ती न यावी एतदर्थ आपण स्वतः उत्तमोत्तम कलेचे नमुने लोकांपुढे ठेवून त्याच्याकडे त्यांची प्रवृत्ती करावी, हे आपले कर्तव्य आहे असे जाणून ते या कलांच्या उन्नतीसाठी व्याप सांभाळत आहेत." (महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. २०५)

संगीताप्रमाणेच नाट्यसंगीत, संगीत नाटके यांना सयाजीरावांनी राजाश्रय दिला. बडोदे येथे नाटकांचे प्रयोग व्हावेत, तेथील रसिकांपर्यंत पाहोचावे असे मराठी संगीत रंगभूमीवरील कलावंतांना वाटत असे. सयाजीरावांनी नारायण राजहंस म्हणजे बालगंधर्व यांना १९१३ पासून पाच हजारांचे वर्षासन दिले होते. 'बालगंधर्वदेखील बडोद्याच्या राजाश्रयाचा जाहिरातींच्या पत्रकावर आणि फलकांवर बडोद्याच्या राजाश्रयाचा कृतज्ञतापूर्वक खास उल्लेख करीत... १९१९ मध्ये राजमहालातील छोट्या नाट्यगृहामध्ये "एकच प्याला'चा प्रयोग झाला... बालगंधर्वांनी सिंधूची अशी बहारदार भूमिका केली, की महाराजांनी वर्षासनाखेरीज

एक हजार रुपये अधिक देण्याचा हुकूम दिला...” (श्रीमंत सयाजीराव गायकवाड/ दादूमिया/गंधर्व-वेद प्रकाशन, पुणे/२०१०/पृ. १७१)

सयाजीरावांनी युरोपचा पहिला प्रवास केल्यावर (१८८७) तेथील ललितकलांचे अवलोकन केले. कला सौंदर्याचे हे ‘दर्शन’ त्यांच्या कलासक्तीचे प्रेरक कारण ठरले. देशी कलांशी काही एक परिचय त्यांना होता, देशोदेशीचे कलादर्शन त्यांच्या सौंदर्यदृष्टीत भर घालणारे ठरले. चित्रकला, शिल्पकला, संगीत, साहित्यकला, मूर्तिकला, वास्तुकला अशा ललितकलांनी ते भारावलेले होते. युरोपातील कलादर्शनप्रसंगी त्यांचे हिंदुस्थानी ललितकलांचे संस्मरण जागे होत असे. व्हेनिसच्या सेंट मार्क मंदिराचे वर्णन करताना त्यांनी नोंदवले आहे, “या मंदिरातील अत्यंत सूक्ष्म व भरघोस नक्षीकाम पाहिले म्हणजे पदोपदी हिंदुस्थानातील शिल्पकलेची आठवण होते व इटलीतील अशा सर्व नक्षीकामांचे उगमस्थान हिंदुस्थानात असल्याची जाणीव होते...” (उद्‌धृत/महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/ संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. १९०)

हिंदुस्थानी कलाविश्व आणि युरोप, अमेरिका, जपान असे वैश्विक कलाविश्व यांच्यातील तौलनिक संबंध, संदर्भ ते लक्षात घेत. उन्नत, अभिजात स्फूर्तिदायक अशा कलांची प्रतिष्ठापना आपल्या राज्यात व्हावी, असे त्यांना वाटत असल्यामुळे त्यांनी कलावंत, कला यांना राजाश्रय दिला. इ. स. १८९३ साली इटलीहून ‘फेलिसी’ या शिल्पकाराला बडोद्यात आणले. त्याच्याकडून अनेक मूर्ती, शिल्पे घडवून घेतली. आरसपानी व ब्रांझचे हे पुतळे आहेत. उदा. श्रीमंत महाराणीसाहेब, वडील काशीराव गायकवाड, पुत्र श्री. फत्तेसिंहराव, पाणी वाहणारा भिस्ती, नर्तिका, दोन चित्ते, सारंगीवादक, संन्याशी, हातात बंदूक घेतलेला अरब शिकारी इ. जॉर्ज फॅंस्टन, अल्बर्ट टॅफ्ट अशा परदेशस्थ शिल्पकारांप्रमाणेच फणींद्रनाथ बोस, महाराष्ट्रीय शिल्पकार म्हात्रे, फडके, गोखले, तालीम, कोल्हटकर, करमरकर अशा देशी कलावंतांची मूर्तिकला, शिल्पकला बडोद्यात प्रदर्शित व संस्थापित केली. ज्युबिली बागेत बसवलेला कमला उतस्थ बुद्धाचा प्रचंड पुतळा त्यांनी जपानहून आणलेला आहे. पौरस्त्य कामगिरीचा उत्तम नमुना म्हणून हा पुतळा वाखाणला जातो.

लंडन येथील ‘वेस्टमिन्स्टर’ ॲबे येथील प्रसिद्ध राष्ट्रपुरुषांचा प्रतिमासंग्रह पाहून सयाजीरावांनी ‘कीर्तीमंदिर’ हे स्मारक उभारले. प्रसिद्ध व स्फूर्तिदायी

व्यक्ती, पूर्वज यांचे हे स्मारक आहे. येथे प्रतिमादर्शनाबरोबरच प्रतिवर्षी उत्तमोत्तम वक्त्यांची व्याख्याने आयोजित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

चित्रकला ही सयाजीरावांच्या आस्थेची कला राहिली होती. इटालियन कलावंत फेलिसीकडून काही चित्रे सयाजीरावांनी काढून घेतली होती. फेलिसी शिल्पकार, मूर्तीकार म्हणून कुशल कलावंत होता. सयाजीरावांच्या सेवेत जवळपास चार-पाच वर्षे तो राहिला. १८९७ मध्ये महाराणींचे उत्कृष्ट चित्र त्याने रेखाटले होते. व्हॅन (फौं) उईक यांची दुर्मिळ सुंदर चित्रांची खरेदी सयाजीरावांनी केली. चित्रकला दालन १९२१ मध्ये निर्माण झाले. उत्तमोत्तम चित्रांचा, कलाकृतींचा हा संग्रह आहे.

भारतीय चित्रकारांचे मुकुटमणी मानल्या गेलेल्या राजा रवीवर्मा यांच्याकडून अनेक जगप्रसिद्ध चित्रांची, तसबिरींची निर्मिती बडोदे राजाश्रयामधून झाली. भारतीय संस्कृतीला केंद्रवर्ती मानून चित्रे काढण्यासाठी राजा रवीवर्मा यांना बडोद्यात निमंत्रित करण्यात आले होते. पौराणिक कथांचा चित्रांमधून वेधक आणि सुंदर आविष्कार झाला होता. उदा. श्रीरामचंद्रांचा विवाह, श्रीकृष्णाची दृष्ट, गंगा व शंतनू, मत्स्यगंधा, विश्वामित्र मेनका, कीचक व सैरंध्री, हरिश्चंद्र-तारामती, राधा-माधव, भरतवंऽस व माया, यतिवेषधारी अर्जुन व सुभद्रा, नलदमयंती, द्रौपदी वस्त्रहरण इ. इ. स. १८९० मध्ये राजकुटुंबापैकी ७ व्यक्तींच्या मोहक तसबिरीही राजा रवी वर्मा यांनी काढल्या. राजा रवी वर्मा यांनी काढलेल्या या चित्रांचा संग्रह 'राष्ट्राचा एक अमूल्य खजिना' असल्याचे दाजी नागेश आपटे यांनी नोंदविले आहे.



राजा रविवर्मांनी रेखाटलेले तैलचित्र : सयाजीराव

चित्रकलेचे शिस्तशीर शिक्षण घेण्यासाठी रा. बुधवारकर यांना युरोपातील कला संस्थांमध्ये पाठवण्यात आले. 'कलाभवन' या संस्थेत चित्रकला विभागाचे मुख्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यांच्या देखरेखीखाली प्रतिभावंत चित्रकारांची जडणघडण झाली. बुधवारकर हे उत्तम चित्रकार होते. त्यांच्याकडून काही चित्रे काढून संग्रहित करण्यात आली. तसेच फैसी रहमान या देशी चित्रकाराकडून सन १९११ ते १९१५ या काळात राजकुटुंबातील ६ व्यक्तींची चित्रे आणि काही देखावे यांची चित्रे काढण्यात आली. भुलभुलावणी, स्वामी नारायणाचे मंदिर, विश्वामित्री नदीवरील कामनाथ महादेवाचे मंदिर, सूरसागर तलावाच्या पश्चिमेचे दृश्य ही चित्रे नावाजली जातात, त्यांचे सौंदर्य आजही तितकेच टवटवीत आहे.

सयाजीरावांनी स्वतंत्र चित्रदालन निर्माण करून चित्रांचा आस्वाद आणि सौंदर्यानंद, चित्रस्वरूप परिचय यांची व्यवस्था केली. प्रजेच्या कलास्वादात अभिरूची संपन्नता यावी म्हणून देशी, विदेशी चित्रकारांच्या मूळ चित्रांचा तसेच काही देशोदेशीच्या चित्रांच्या प्रतिकृतीही उपलब्ध करून दिल्या. देशी चित्रांची संख्या सुमारे ४०० आहे. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य कलांचा मिलाफ होऊ शकतो का? सौंदर्य कल्पनांमध्ये काही साम्य आहे? मिथकांचे प्रतिभावंत मने कोणता अर्थ शोधत आहेत? असा प्रश्नशोध सयाजीरावांच्या चित्रकलाविषयक कामगिरीतून अनुभवता येतो.

छायाचित्रकला शिक्षणाची सोय 'कलाभवन' मध्ये होती. छायाचित्र कलावंत रा. शितूत हे 'कलाभवन'चे विद्यार्थी होते, सयाजीरावांनी इ. स. १९०० च्या सुमारास कलाभवनला भेट दिली. रा. शितूत यांचे प्रावीण्य पाहून त्यांना फोटोग्राफीच्या क्षेत्रात कार्य करण्यास सांगितले. रा. शितूत यांनी सयाजीरावांच्या प्रेरणेने आणि राजाश्रयाने 'विविध कलामंदिर' या नावाची फोटोग्राफीची संस्था काढली.

भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हेदेखील इ. स. १८९५ मध्ये 'कलाभवन'मध्ये विद्यार्थी म्हणून दाखल झाले. 'कलाभवन'चे प्रमुख टी. के. गज्जर हे कल्पक कलावंत व प्राचार्य होते. औतकाम, सुतारकाम, लोहारकाम, घड्याळ दुरुस्ती, मशीन ड्रॉईंग, फोटोग्राफी असे व्यवसाय शिक्षण व कला शिक्षण 'कलाभवन'मध्ये मिळायचे. दादासाहेब फाळके यांचे छायाचित्रणाचे

शिक्षणसंस्कार 'कलाभवन'मधले ! दादासाहेब फाळके यांनी म्हटले, ''मला सयाजीराव महाराजांची राजधानी बडोद्याने यशस्वी चित्रपट निर्मात्याचा विकास होण्यासाठी ज्या ज्या अंगभूत गुणांची जरूरी असते ते मिळवण्यास मदत केली. आज जे माझे वैभव आहे त्याचे श्रेय माझ्या बडोद्याच्या वास्तव्याला आणि कलाभवनच्या तंत्रज्ञानाला आहे...'' (महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/ संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. २१८)

भारतीय कला, युरोपियन कला, सर्व आधुनिक तंत्रसाधने यांचा शोध-बोध घेत सयाजीरावांनी कलासक्त मने निर्माण केली.

समारोप

कलांना आणि कलावंतांना उदार आश्रय दिला, प्रजेची कलाभिरूची तर वाढवलीच; पण सौंदर्यशास्त्रीय कलाभान सदैव जागृत ठेवले. कलासंग्रह, कलादालने, कलाप्रदर्शने, कला सादरीकरणाचे प्रसंग, उत्सव, कलावंतांची सभा, संमेलने यांच्याकडे व्यक्तिगत लक्ष देत, वित्तीय साह्य करीत ललितकलांचे सुंदर वातावरण बडोदे राज्यात त्यांनी निर्माण केले. शिल्पकला, वास्तुकला, चित्रकला, मूर्तिकला यांना उत्तेजन देणारा महाराजा म्हणूनच सयाजीरावांच्या कामांकडे पाहिले जाते.

लोकोपयोगी आणि लोकशिक्षण करणारे इंग्रजी भाषेतील ग्रंथ देशी भाषांमध्ये भाषांतरित व्हावेत, लोकांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक व्हावा म्हणून उपयुक्त भाषांतर शाखा त्यांनी निर्माण केली होती.

'भाषेत जर चांगले ग्रंथ निपजले नाहीत, तर लोकशिक्षणाचे सर्व प्रयत्न लंगडे पडतात.' असे ते म्हणत. देशी भाषांमध्ये चांगले ग्रंथ तयार व्हावेत हे कार्य वाङ्मयनिर्मिती म्हणून महत्त्वाचे आहे. त्यांचा ललित साहित्य आणि अललित साहित्य (माहिती, तत्त्वज्ञान, शास्त्रे) असा दोन्ही प्रकारच्या साहित्याकडे ओढा होता. स्वतःच्या वाङ्मयीन कार्याबद्दल ते (१७ वे महाराष्ट्र साहित्य संमेलन, २७ डिसेंबर १९३२, कोल्हापूर) म्हणतात-

''सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे व ते लोकांनी विसरून जाऊ नये म्हणून ग्रामपुस्तकालयांची स्थापना करणे हे माझे प्रथम प्रयत्न झाले. राष्ट्रकथामाला, ज्ञानमंजूषा, महाराष्ट्र ग्रंथमाला वगैरे पुस्तकमाला काढण्यात सुमारे अडीच लक्ष रुपये खर्च झाल्यावर सन १९१२ साली दोन लाखांचे निधी वेगळे ठेवून त्याच्या व्याजात ग्रंथ प्रकाशनाची व्यवस्था मी केली, त्याचप्रमाणे शुद्ध अभिजात

ग्रंथ कसरीच्या भक्ष्यस्थानी पडून नष्ट होऊ नयेत म्हणून प्राच्य ग्रंथमाला, तसेच सयाजीराव छात्रवृत्त्या, नाटक मंडळीस नेमणुका, राजकवीची नेमणूक, गुजराती व मराठी पुस्तकांचे उल्लेखालय (रेफरन्स लायब्ररी) कॉलेजात अध्यापकवृत्ती वगैरे अनेक मार्गांनी बडोदे राज्याची लोकभाषा असलेल्या गुजरातीप्रमाणेच मराठी भाषेच्या व मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाची साधने मी निर्माण केली आहेत...''

(महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह भाग २/संपा. रमेश वरखेडे/महाराष्ट शासन/२०१७/पृ. २११)

ज्ञानलालसा, सौंदर्यग्रहण लालसा, अभिरूची संवर्धन, लोकशिक्षण ही साहित्याची प्रयोजने त्यांना वाटत असत. 'वाङ्मय हे समाजाचे चित्र असते' हे त्यांचे मत चिंतनीय आहे. साहित्य ही जीवनवारी कला असल्याने त्यांनी लेखकांना आवाहन केले, 'आपल्या भोवतालच्या लोकांच्या आयुष्यक्रमाचे आपण निरीक्षण करावे, त्याचे मनन करावे, त्यासंबंधीचे लेखन करावे व तो सुधारण्याच्या मार्गाचे शोधन करावे. त्यात पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्या व दरबारी लोकांप्रमाणेच खेड्यांतील लोकांच्या जीवनाचाही विचार करावा.' जीवन वास्तवाचे चित्रण, वंचित-उपेक्षितांचे चित्रण आणि सुधारणावादी विचार, लोकशिक्षण हे साहित्यमूल्य सयाजीरावांना महत्त्वाचे वाटत होते.

साहित्यनिर्मिती व संवर्धन

उदात्त विचार व उत्कृष्ट कल्पना यांचा प्रसार भाषेतून होतो. प्रजेची आत्मिक आणि भौतिक प्रगती साहित्य-शिक्षण याद्वारे होते, हे संस्कार सयाजीरावांनी आपल्या जडणघडणीच्या काळातच आत्मसात केलेले होते.

संतांचे साहित्य, पौराणिक साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, संस्कृतिशास्त्र, अशा साहित्यावर सयाजीरावांचा प्रतिभाधर्म पोसला गेला होता. विद्याकला, अभिरूची यांची जडणघडण झाली होती. योगी अरविंद, न्या. रानडे, लो. टिळक, गुरू इलियट, रीडर गो. स. सरदेसाई, आर. सी. दत्त अशा अनेक कर्त्या विचारवंतांचे सान्निध्य सयाजीरावांना लाभले होते. विविध विषयांच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सभा, परिषदांमध्ये त्यांना तज्ज्ञ मार्गदर्शक, व्याख्याते, अध्यक्ष म्हणून उपस्थित राहावे लागत असे. जिज्ञासू वृत्तीतून आणि प्रजाहितदक्षतेतून साहित्यकला, ग्रंथ, ग्रंथकार, वाचनालये यांची उभारणी त्यांनी केली.

'कैसर टू सुलतान'सारख्या ग्रंथांची इंग्रजी टिपणे-भाष्ये त्यांनी लिहिली. पत्रवाङ्मय, प्रवासवृत्त, हुजूरकुहूम, दुष्काळातील दैनंदिनी, भाषणे यासारख्या साहित्याची निर्मिती केली. सयाजीराव केवळ साहित्यप्रेमी नव्हते, स्वतः विचारवंत-लेखक होते. लेखक असल्यामुळे ग्रंथनिर्मिती, ग्रंथवितरण, ग्रंथप्रसारण, लेखक मार्गदर्शन असे साहित्यिक कार्य त्यांनी सुमारे ६४ वर्षे केले. रीडर गो. स. सरदेसाईंकडून ग्रंथवाचन, अर्थनिर्णयन ते करून घेत असत. इंग्रजी भाषेची त्यांची तयारी हळूहळू होत गेली; परंतु साहित्यनिर्मिती देशी भाषांमधून व्हावी, खूप मोठ्या जनसमूहापर्यंत साहित्यकला पोहोचावी असेच त्यांना वाटत होते. सरदेसाई म्हणतात -

''माझ्या नोकरीची सुरुवात रीडर म्हणून झाली. महाराजांचे रोजचे टपाल व वर्तमानपत्रे पाहून ती त्यांच्या सवडीप्रमाणे वाचून दाखविणे, खासगी पत्रांची उत्तरे लिहिणे, महाराज पुस्तके वाचीत त्यातले कठीण शब्द काढून टिपणे करणे, असें हे सामान्य कारकुनी काम फार तर दोन-तीन तास मला पुरे. बाकीचा माझा वेळ रिकामा जातो, हे तात्काळ महाराजांच्या नजरेस आले. मॅकिआव्हेलीचे 'प्रिन्स' व सीलींचे 'एक्सपॅन्शन ऑफ इंग्लंड' ही पुस्तके त्यांनी वाचली. मराठीत त्यावेळी या नवीन पाश्चात्त्य विचारांची पुस्तके नव्हती हे जाणून त्यांनी मला त्या पुस्तकांचे मराठी भाषांतर करण्याचे काम दिले... दोन्ही पुस्तके महाराजांच्या खर्चाने छापून निघाली...'

(माझी संसारयात्रा/गोविंद सखाराम सरदेसाई/केशव भिकाजी ढवळे, मुंबई/१९५६/पृ. ९५)

ग्रंथलेखन, प्रकाशन व ग्रंथप्रसार

आधुनिक युरोपियन ज्ञान, माहिती व शास्त्रे यांच्या परिचयानंतर असे माहितीपर साहित्य देशी भाषांमध्ये उपलब्ध व्हावे म्हणून विषय-परिचयपर, लोकोपयोगी, व्यवहारोपयोगी साहित्य सयाजीरावांनी तयार करवून घेतले. उदाहरणार्थ-पाकशास्त्र-पाश्चिमात्त्य पाकशास्त्र (तीन भाग), सूपशास्त्र, भोजनदर्पण, भोजनदर्पणकला, पाकशिक्षण पाठ्यपुस्तके, महाराष्ट्रीय स्वयंपाक, 'टेबल सर्व्हिस', सयाजीपाकरत्नाकर इ. किंवा राजघराण्यातील कृत्ये, त्या कृत्यांच्या बाबतीत करावयाची पूर्वतयारी या विषयाचे 'राजवाडादर्पण' (शंकर मोरो रानडे) हे पुस्तके १८८८ साली प्रसिद्ध करण्यात आले. देशी भाषांमध्ये शास्त्रीय ग्रंथ तयार करून घेण्यासाठी

‘श्री सयाजी ज्ञानमंजूषा’ व ‘श्री सयाजी लघू ज्ञानमंजूषा’ या शास्त्रीय ग्रंथमाला सुरू केल्या होत्या. ‘कलाभवन’चे प्रमुख प्रो. गज्जर यांनी ‘बहुभाषाकोश’ सिद्ध केला. जैनांचे ग्रंथ, प्राकृतातील ग्रंथ, संस्कृत ग्रंथ यांची मराठीत, गुजरातीत भाषांतरे-रूपांतरे व्हावीत म्हणून राष्ट्रकथामाला, महाराष्ट्र ग्रंथमाला सुरू झाल्या. नोकरांसाठीही आचारसंहिता, कर्तव्यकर्मे, गणवेष, शिष्टाचार संकेत सांगणारी पुस्तके तयार करवून घेण्यात आली. क्रीडा ग्रंथमालेत राष्ट्रीय खेळ, जुने खेळ, पाश्चात्त्यांचे खेळ यांची सांगोपांग माहिती देणारी पुस्तके प्रकाशित करण्यात आली. श्री रा. स. आठवले, गो. स. सरदेसाई, ना. गो. कालेलकर, श्री. देवधर आदींनी ही पुस्तके लिहिली.

एडवर्ड गिबनने ‘रोमी कैसरकीचा उदय व पूर्ण अस्त’ (दी डिक्लाईन ॲण्ड फॉल ऑफ द रोमन एम्पायर) हा इतिहासग्रंथ लिहिला. सयाजीरावांनी त्यावर आधारलेला भाष्यग्रंथ-सारांशग्रंथ इंग्रजीत लिहिला. राजारामशास्त्री भागवत यांनी सयाजीरावांच्या ग्रंथाचे मराठी भाषांतर केले, हा सयाजी साहित्यमालेच्या अगोदरचा हा ग्रंथ आहे. सन १९०९ मध्ये बडोद्यास महाराष्ट्र साहित्य संमेलन झाले, लवकरच गुजराती साहित्य संमेलन भरले, त्यात साहित्याच्या अभिवृद्धीसंबंधी विचार मांडले. तसेच मराठी, गुजराती व हिंदी या भाषांमधून स्वतंत्र, रूपांतरित व भाषांतरित ग्रंथ निघावेत म्हणून दोन लाख रुपये ठेवीवरील व्याजातून सयाजी साहित्यमाला, बालज्ञानमाला सुरू केल्या. या मालांमधून ३०० च्यावर पुस्तके प्रकाशित झाली. उदा. संस्कृत वाङ्मयाचा इतिहास, सुधारणा आणि प्रगती, हिंदुस्थानचा लष्करी इतिहास, सरदेसाईंच्या रियासतींचे काही भाग, मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया, मुंबई ईलाख्यातील जाती, राजनीतिशास्त्राची मूलतत्त्वे, जातकातील निवडक गोष्टी इ.

‘श्रीसयाजीशासनशब्दकल्पतरू’च्या अष्टभाषी राज्यव्यवहारकोशाची निर्मिती करवून घेऊन तो प्रसिद्ध केला, ‘महाराष्ट्र शब्दकोश’ कार्यास मदत केली. ग्रंथनिर्मिती व प्रकाशनावर लाखो रुपये सयाजीरावांनी खर्च केले. साहित्यनिर्मिती व प्रसारणासाठी प्रचंड कष्ट, खर्च करणारे सयाजीराव हे साहित्य, भाषा, संस्कृती, ज्ञान यांचे उद्धारकर्ते ठरले.

ग्रंथालयांची निर्मिती व प्रसार

प्राथमिक शिक्षणाच्या सोयी केल्यानंतर ग्रामवाचनालये व पेटीवाचनालये, फिरते वाचनालय अशा ग्रंथप्रसाराच्या योजना सयाजीरावांनी हाती घेतल्या. ज्ञाननिर्मितीनंतर ज्ञानसंग्रहण व ज्ञानउपलब्धता यांची व्यवस्था करणे त्यांना आवश्यक वाटले.

युरोप–अमेरिका भेटीवर असताना तेथील सार्वजनिक ग्रंथालयांचे अवलोकन त्यांनी केले. प्रजेला ज्ञानसंपन्न करून लोकशिक्षण व लोककल्याण साधताना मोफत सार्वजनिक वाचनालयांच्या कल्पनांना त्यांनी मूर्त रूप दिले. अमेरिकेतील बॉर्डन हे ग्रंथालयशास्त्राचे तज्ज्ञ त्यांनी बडोदे संस्थानातील ग्रंथालयाचे संचालकपदी नेमले. बडोदे संस्थानातील ग्रंथालयांचे व्यवस्थापन, नोंदणी, देवघेव, सुविधा यांच्या शास्त्रीयता व शिस्त बोर्डन यांनी निर्माण केली. ग्रंथपालन, संग्रहण, वितरण अशा गोष्टी पाश्चात्त्य ग्रंथालयांच्या धर्तीवर होऊ लागल्या. इ. स. १९१५ ते १९२१ या काळात श्री. कुडाळकर यांनी बडोद्यातून 'लायब्ररी मिसलेनी' नावाचे मासिक चालवले. १९२५ मध्ये बडोदे संस्थान ग्रंथालय व त्याच्या शाखा स्थापन झाल्या, या संघाची वार्षिक संमेलने, सभा होऊ लागल्या. संस्थानातील ९८२ ग्रंथालयांना किफायशीर किमतींत पुस्तके व मासिके वितरित होऊ लागली. इ. स. १९१० पासून सार्वजनिक मोफत ग्रंथालयांत सातत्याने संख्यात्मक वाढ झाली. बडोदे–सेंट्रल लायब्ररी हिंदुस्थानातील एक आदर्श संस्था म्हणून नावारूपाला आणण्याचे श्रेय सयाजीरावांचे आहे. त्यांच्या इच्छेनेच इ. स. १९१५ मध्ये ओरिएन्टल लायब्ररीची स्थापना झाली. हस्तलिखिते, प्राकृत भाषेतील ग्रंथ, आदिम संस्कृत ग्रंथ, जुन्या पोथ्या यांचे संग्रहण झाले. इ. स. १९२७ मध्ये ओरिएन्टल इन्स्टिट्यूटची स्थापना झाली. तेथील ग्रंथालय त्यांच्या संग्रहामुळे जागतिक दर्जाचे मानले जाते.

सेंट्रल लायब्ररीचा 'दृश्यपाठ शिक्षणशाखा' हा अनोखा प्रयोग अत्यंत यशस्वी ठरला. चित्रपटाद्वारे ज्ञान, रंजन व माहिती संस्कार या हेतूने या शाखेमार्फत ग्रामीण, दुर्गम व अशिक्षितांपर्यंत चित्रपटांचे दर्शन घडवले जात होते. फिरती वाचनालये, ग्रामीण वाचनालये व पेटी वाचनालये ही ग्रामीण भागात ज्ञानार्जन करणारी केंद्रे ठरली, या सर्व संयोजनात सयाजीरावांचे द्रष्टेपण जाणवते.

ओरिएन्टल इन्स्टिट्यूट (प्राच्यविद्यामंदिर)

सयाजीरावांच्या ज्ञानसंग्रहणाचा व विद्याव्यासंगाचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्राच्यविद्यामंदिर या अभिनव संस्थेचा लौकिक आहे. इ. स. १९२६ साली ही संस्था स्थापन करण्यात आली.

अमूल्य व दुर्मिळ अशा तीस हजारांहून अधिक हस्तलिखित पोथ्यांचे संग्रहण व जतन–संवर्धन येथे केले जाते. वेद, महाकाव्ये, पुराणे, स्मृती, धर्मशास्त्र, कामशास्त्र, व्याकरण, काव्यशास्त्र, ज्योतिषविद्या, तत्त्वज्ञान, छंदशास्त्र, वास्तुकला, तंत्रविद्या, जैन वाङ्मय, बौद्ध वाङ्मय, संगीत या विषयाच्या हस्तलिखित पोथ्यांचा हा संग्रह भिन्न लिपी, भिन्न-भिन्न भाषा, भिन्न सांस्कृतिक अवशेष असा संपृक्त व संपन्न आहे. संस्थेच्या 'गायकवाडज् ओरिएन्टल सिरीज'द्वारे संस्कृत, पाली, प्राकृत, अपभ्रंश, उर्दू व फारशी भाषांच्या अन्यत्र प्रकाशित न झालेल्या पुस्तकांचे प्रकाशन होत आले आहे. जागतिकदृष्ट्या महत्त्वाचे हे दुर्मिळ व संदर्भमूल्य असणारे वाङ्मय आहे. प्राच्यविद्या संशोधनाचा आधारस्तंभ म्हणूनच या संस्थेची निर्मिती सयाजीरावांनी केली.

'धर्म' विषयक भूमिका

संस्कृतीचे धर्म हे एक महत्त्वाचे अंग आहे. रूढी, परंपरा, सामाजिक चालीरिती यांचा धर्माशी संबंध जोडला जातो. सयाजीरावांनी जातीभेद, धर्मभेद, लिंगभेद, कर्मकांड, परंपरागत पौराहित्य हक्क वगैरेंना टाळले होते. युरोपीय धर्मकल्पना आणि हिंदुस्थानी धर्मकल्पना यातील नीती, वर्तन, मानवी कल्याण, सहिष्णुता, सहकार्य या धर्मतत्त्वांचा तौलनिक व चिकित्सक विचार केला होता. प्रसंगोपात्त धर्मपरिषदा, धार्मिक संमेलने, धर्मासंबंधीच्या विवेकी चर्चा, धर्मसंबंध व्याख्यानमाला या ठिकाणी 'धर्म' या विषयावर मतेही मांडली होती. तत्त्वज्ञान परिषदांची, मानवंशशास्त्र परिषदाची उद्‌घाटनेही सयाजीरावांच्या चिंतनशील व्याख्यानांनी झाली होती.

'प्रजेचे कल्याण', 'प्रजेत ज्ञानजागरण', 'प्रजेत विवेक जागरण', 'प्रजेचे मानवी हक्क संरक्षण' ही तत्त्वे त्यांनी राजधर्म म्हणून आचरणात आणली होती. कालबाह्य धर्मसमजुती या समोपचाराने, सामंजस्याने, कालावधी घेऊन घालवण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

धर्म आणि धार्मिक समजुती यात सहिष्णुतेऐवजी सहकार्य असावे, असे त्यांचे मत होते. वैयक्तिक आयुष्यक्रमात आणि सामाजिक घडामोडीत धर्माची भूमिका मार्गदर्शकाची असावी. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या सोडवणुकीत धर्मतत्त्वे साह्य करू शकतात. कॅथोलिक आणि प्रोटेस्टंट, हिंदू आणि मुसलमान, मुसलमान आणि शिख, हिंदू आणि हिंदू असा धर्मांमध्ये संघर्ष असल्यास त्याचा परिणाम जागतिक राजकारणावर होतो, असा निष्कर्ष त्यांनी काढला. त्यासाठी विश्वबंधुत्वाचे सूत्र प्रतिपादित करताना येशू ख्रिस्त, श्रीकृष्ण, बुद्ध, झरथुष्ट्र, महंमद, कन्फ्यूशियस, मोझेस यांच्या उपदेशांतील साधर्म्य त्यांनी संशोधिले आहे. वाईट दानत, अंधश्रद्धा, अवनती यामुळे सत्य झाकले जाते. रूढी आणि जीर्ण मतांचा त्याग करावा, जुन्या धर्मग्रंथांची चिकित्सा करावी. 'खरा धर्म अभागी आणि दुःखी लोकांची काळजी घ्यावयाला व त्यांना सुखी करावयाला सांगतो आणि सर्व लोकांबद्दल सद्भाव बाळगावयाला शिकवितो' अशी धर्मसंबद्ध कल्पना उदार मानवतावादाची दिशा दाखवते. 'उज्ज्वल मानवता' हे त्यांच्या धर्मविषयक कल्पनेच्या मुळाशी आहे. 'सद्धर्म, विश्वबंधुत्व आणि ईश्वराच्या भक्तीची विस्तृत दृष्टी' हा सयाजीरावांना अपेक्षित धर्म आहे. तेथे जाती, संप्रदाय, रंगभेद यांना स्थान नाही आणि तेथे सर्वांना भ्रातृभाव आणि सद्विचार यांनी एकत्रित केले जाते, असे आचरणाचे धार्मिक स्वरूप सयाजीराव दर्शवितात.

राजधर्म आणि संस्कृतिव्यवहार यातील संवादी-मानव कल्याणकारी तत्त्वांना सयाजीरावांनी महत्त्व दिले होते.

समारोप

विद्याव्यासंगी व्यक्तित्त्वामुळे प्रतिभावंत कलावंतांच्या निर्मितीशीलतेचा आदर करीत साहित्यादी ललितकलांना सयाजीरावांनी उत्तेजन दिले आणि श्रीमंतही केले. वैश्विक दर्जाची कला आपल्या राज्यातून निर्माण केली. ज्ञानसंकलन व ज्ञानप्रसारण करताना ग्रंथनिर्मिती, ग्रंथलेखनास उत्तेजन, ग्रंथालयांची स्थापना अशा गोष्टींची स्थापना केली. विश्वबंधुत्वाचा धर्मविचार आपल्या वाणीने आणि करणीने पुढे आणला. सुसंस्कृत राजा कलांचा आणि कलावंतांचा आश्रयदाता असतो. यादृष्टीने कलाक्षेत्रातील कारकीर्द विचारात घ्यावी लागते.

९.

सयाजीरावांचे शेती क्षेत्रातील कार्य

प्रास्ताविक

सयाजीरावांच्या आयुष्याची प्रारंभीची बारा वर्षे खेड्यात आणि शेतीच्या परिसरात गेली होती. राजेपद प्राप्तीनंतरही शेतकरी प्रजेच्या हिताची चिंता त्यांना वाहावी लागली.

शेतीतले नवे ज्ञान

शेती व शेतकरी यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीची माहिती सयाजीरावांना होती. बडोदे राज्यात सुमारे ७५ टक्के प्रजा शेतीवर अवलंबून होती, इतर व्यवसाय किंवा पूरक व्यवसाय मर्यादित होते. राज्यकारभार हाती आल्यावर त्यांनी शेतकरी आणि खेडी यांची प्रत्यक्ष पाहणी केली. जमिनीची प्रत, सिंचनसुविधा, पाऊसमान, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती, शेतकऱ्यांमधील शिक्षणाचा अभाव या साऱ्या गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या. मोसमी पावसाच्या अनियंत्रितपणाची त्यांना जाणीव झाली. दुष्काळ आणि शेतकरी यांच्यात संबंधच आहेत. दुष्काळाचे सातत्य आणि अज्ञान यामुळे कष्ट करूनही शेतकऱ्यांना गरिबीचे चटके बसत. सयाजीरावांनी ब्रिटिश सरकारच्या दुष्काळ सर्वेक्षण आयोगाचा अहवाल वाचला. हा अहवाल मि. टेम्पल यांनी १८८० मध्ये तयार केलेला होता. वारंवार दुष्काळ पडतो, याची कारणे कोणती? दुष्काळावर मात करण्यासाठी कोणती उपाययोजना करावी? या प्रश्नांचा अहवालात विचार केलेला होता. सयाजीरावांनी अहवालाचा अभ्यास केला, बडोदा राज्याच्या शेतीशी तुलनाही करून पाहिली.

शेतकीत नवे ज्ञान येणे आवश्यक असल्याचे त्यांनी ओळखले होते. १८९० साली खासेराव जाधव यांना शेतीतले नवे ज्ञान शिकण्यासाठी विलायतेला पाठवले. नवे तंत्र, नव्या पद्धती, नव्या शेतकीप्रक्रिया, शेतकीतली यंत्रे-साधने, शेतीपूरक

व्यवसाय आदींचा अभ्यास खासेरावांनी केला. खासेराव जाधव नवे ज्ञान शिकून परत आल्यावर त्यांच्याशी चर्चा-संवाद साधत बडोद्यात शेती-शेतकरीविषयक सुधारणाकार्याला चांगली गती आली. शेतसारा मिळवणे एवढेच राज्याचे कर्तव्य नसते, शेतकरी ज्ञानाने संपन्न व्हावा, म्हणजेच भरघोस उत्पन्न काढून संपन्न होईल, असे शेतीधोरण त्यांनी अंमलात आणले.

शेतकऱ्यांसंबंधीची आस्था

शेतीपद्धतीत नावीन्य आणून शेतकऱ्यांच्या परिस्थितीत बदल घडवण्याकडे सयाजीरावांचा सुरुवातीपासून कल होता. ग्राम-जीवन प्रदर्शनापुढच्या काळात त्यांनी उत्तेजन दिले. शेती, शेतीपूरक उद्योग, काटकसर, दुष्काळावर मात करण्याचे उपाय, शेतीसाठी सिंचन सुविधा अशा विषयांवर झालेले काम, अपेक्षित परिणाम, शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी म्हणून नमुना असा सर्वांसमोर यावा, यासाठी हे प्रयत्न असायचे. 'शेतकऱ्यांच्या सामाजिक, नैतिक व आर्थिक परिस्थितीत कोणत्या सुधारणा घडवून आणणे शक्य आहे, हे पटवून देणे आणि त्यांच्या मनात इच्छा उत्पन्न करणे' असे धोरण त्यांनी राबवले, यात शेतकऱ्यांची वैयक्तिक इच्छाशक्ती आणि कृतिशीलता यासंबंधाने अपेक्षाही असायच्या. शिक्षण प्रसारातून प्रजेला जागे करण्याचे काम हाती घेतले, प्रत्यक्ष खेड्यात, शेतात जाऊन पोहोचले. शेतकीच्या पद्धतीत आधुनिक सुधारणा, उपयोजणे अवघड होते; परंतु प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू ठेवली. आपल्या कृषी-कामगिरीचा आढावा घेताना ते ग्राम जीवनप्रदर्शन, बडोदे, १ जानेवारी १९३६ रोजी म्हणाले -

''कर्ज दणे, तगावी देणे, जमिनीचे बारीक तुकडे होण्याचे थांबविणे, सरकारी पतपेढ्या काढणे या व अशा मार्गांनी आम्ही शेतकऱ्याला कर्जबंधनातून, तसेच दुष्काळ आणि पीक नासाडी यांच्या भीतीपासून मुक्त करायला सुरुवात केली. प्राथमिक शिक्षणानेही बळावणाऱ्या सुरक्षिततेच्या भावनेने आणि विशाल दृष्टीने आत्मविश्वासाची आणि स्वतःच्या हिमतीवर कार्य करण्याची सुचिन्हे दिसू लागली...''

(महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह भाग २/महाराष्ट्र शासन/ २०१७/पृ. ३५४)

शेतकी आणि औद्योगिक पद्धतीशी संलग्न अशा प्रकारची शिक्षणपद्धती त्यांनी अवलंबिली. परंपरागत कारागिरांच्या कला, व्यवसायांना धंदे शिक्षणाची जोड दिली. फळे, फुले, शेतकी यांच्या प्रदर्शनातून पाहणाऱ्यांच्या मनात शेतकीबद्दल,

शेतकऱ्यांच्या कष्टाबद्दल जाणीव जागृती झाली. महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांना सुनियोजित शेतीची स्फूर्ती मिळाली. इ. स. १८९७ सालीच सयाजीरावांनी स्वतंत्र शेतकी खाते सुरू केले होते. विहिरी खोदणे, पाणी अडविणे-जिरवणे, जमिनीची धूप थांबविणे याबाबतीत प्रबोधन उपक्रम राबवला गेला. शेतीकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन त्यांनी प्रचलित केला.

दुष्काळ आणि उपाययोजना

इ. स. १८९९ ला प्लेग आणि दुष्काळाचे भयंकर संकट आले. सयाजीरावांनी दुष्काळ निवारण अधिकारी नेमला, दुष्काळात शेतकऱ्यांच्या हालांचे सर्वेक्षण केले. स्वतः सयाजीरावांनी कडी, अमरेली, बडोदा आणि नवसारी जिल्ह्यांचा दौरा केला. शेतकरी, गुरे, ढोरे, शेती यांची दुर्दशा पाहून तातडीने मदतकार्य सुरू केले व उपाययोजनांची सूत्रे कार्यवाहीत आणली. उदा.

नागरिकांचे प्राण वाचविण्यात प्राधान्य, गरीब-कंगालांना आश्रय, अन्नपाणी पुरवणे, उचल म्हणून अल्प का होईना रोख रक्कम कर्जाने देणे.

रस्ता वाहतूक, रेल्वे वाहतूक यांची वेगाने उपलब्धता करून देणे, रस्ता, रेल्वे यांची आपत्ती व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका असते. धान्य, खाद्य, चारा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात ने-आण करता येईल.

दुष्काळी परिस्थितीत तग धरून राहायचे असेल, तर विहिरी खोदणे, पाटबंधारे धरणे, कालवे काढणे.

सिंचनसुविधा

१८८६ ते १९३० या काळात बारा हजारांहून अधिक विहिरी खोदण्यात आल्या. शेतकऱ्यांना ऑईल इंजिन, कृषिपंप, ट्रॅक्टर अशी यंत्रे, साधने उपलब्ध करून दिली गेली. जलव्यवस्थापनाचे ज्ञान-कौशल्य निर्माण व्हावे म्हणून उद्‌बोधन उपक्रम घेतले. शेतकी खात्यातील अधिकारी व सेवक यांनी प्रत्यक्ष शेतांना भेटी देऊन मार्गदर्शन करणे अपेक्षित होते. कार्यालयातून शेतीची कामे करण्याऐवजी शिवारांमध्येच उतरावे लागते. प्रात्यक्षिकांमध्ये आपल्या ज्ञान-कौशल्यांचा वापर शेतकी खात्याने करावा, असे स्पष्ट निर्देश सयाजीरावांनी दिले होते.

दि. ८ मार्च १९३० च्या प्रतापसिंह सरोवराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते म्हणाले-

"पाणी हे सेवक म्हणून फार चांगले आहे; पण मालक म्हणून फार अनिष्ट आहे. तुम्ही त्याला चांगले वागवले, वापरले तर ते तुमच्या फार उपयोगी पडणार

आहे; पण तेच तुम्ही त्याला वाईट कामाला लावा, त्याचा दुरुपयोग करा, की शेकडो अकल्पित मार्गांनी ते तुमचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही.”

(महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह खंड २/संपा. रमेश वरखेडे/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. १५३)

हा पाणी वापरासंबंधीचा गंभीर इशारा आहे. भूमिगत पाण्याचा वापर, पावसाच्या पाण्याचा वापर, तलाव-पाटबंधारे, धरणे यांतील पाण्याचा वापर याबाबतची ही धोरणप्रणाली महत्त्वाची आहे. लक्षावधी रुपये सिंचन सुविधांवर राज्याने खर्च केले, लोकसहभाग आणि लोकांचे स्वावलंबन त्यांना अपेक्षित होते. राज्यकर्तव्य म्हणून ही शेतकीसंबंधी खर्चिक कामे करताना शेतकऱ्यांच्या सहकार्याचा, सहभागाचा विश्वास त्यांना वाटत होता.

दुष्काळ पाहणी व उपाययोजनांची दैनंदिनी

दि. ११ डिसेंबर १८९९ ते मार्च १९०० या काळातील प्रत्यक्ष पाहणी, भेटी संवाद, उपाय, स्थिती यांच्या नोंदी सयाजीरावांनी केल्या. दुष्काळ निवारणाच्या कार्याचा हा दस्तऐवज ‘नोटस् ऑन फेमिन टूर बाय हिज हायनेस दी महाराजा गायकवाड’ या नावाने प्रसिद्ध केलेला आहे. पाहणी नोंदींचे निष्कर्ष आजही मार्गदर्शक ठरू शकतील असे आहेत. दुष्काळाच्या संकटासाठी शाश्वत विकास कामे आरंभावीत, दीर्घकालीन उपाययोजना महत्त्वाच्या असतात, अशी तथ्ये त्यांनी सांगितली आणि शेतीसाठी अशी कामे सातत्याने पूर्ण केलीत. सयाजीरावांच्या पत्रव्यवहारात पाऊस, पिके, दुष्काळ आणि शेतीतील सुधारणा याबद्दलचे उल्लेख सतत आले आहेत. राज्याच्या शेतकरी प्रजेची ते सतत काळजी करीत असत.

त्यांनी पाश्चात्य कृषिशास्त्र, कृषितंत्रज्ञान भारतीय शेतीत आणले, शेतसारा पद्धतीत बदल केले, शेतकरी पतपेढ्यांची स्थापना केली, जलसिंचन सुविधा निर्माण केल्या, शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत केलीच; पण निसर्ग–पाणी या पर्यावरणीय घटकांचे संरक्षण करण्याचा इशारा दिला. कृषी–पूरक उद्योग, जोडधंदे यांना प्रोत्साहन दिले, कृषिविषयक प्रदर्शनांचे आयोजन व्हावे असे हुकूम काढले. म. फुले यांचे ‘शेतकऱ्याचा असूड’मधील विचारही त्यांनी अमलात आणलेले दिसतात. शेतकऱ्यांमधील अज्ञान आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यांची सोडवणूक व्हावी, असे शेतकीतले धोरण ‘शेतकरीकेंद्री’ राहिले.

शेतकरी आणि सहकारी मंडळ्या

शेतकरी, कामकरी, व्यापारी वा अन्य व्यावसायिकांच्या सहकारी संस्था निर्माण होण्यास सयाजीरावांनी उत्तेजन दिले. ग्रामपातळीपर्यंत या सहकारी संस्था असाव्यात असा प्रयत्न केला. सहकारी संस्थांसाठी नियम, कायदे करून त्यांना करसवलतीही दिल्या. सहकारी संस्थांचे मोठे जाळे बडोदे राज्यात निर्माण केले.

शेतकरी जीवन किंवा ग्रामजीवन यांच्या दृष्टीने सहकारतत्त्वांना मोठे महत्त्व असल्याचे ओळखून शेतकीतल्या सुधारणा असोत वा सामाजिक सांस्कृतिक सुधारणा असोत; सहकारी संस्थांमुळे त्या सुधारणा सुलभ होतात आणि तळागाळातल्या व्यक्ती, समाजांना मदत मिळते. जर्मनी, डेन्मार्क, हॉलंड या देशांतील सहकारी मंडळ्यांनी घडवलेल्या सुधारणांचा इतिहास सयाजीरावांनी अभ्यासला होता. बडोद्याच्या शेतकरी किंवा व्यवसायिक प्रजेच्या जीवनमानात सुख-शांती, समाधान, वित्त आणि ज्ञान पोहोचायचे असेल, तर सहकाराचा अवलंब व्हावा, असे धोरण त्यांनी आखले होते. सहकारी मंडळ्यांना प्रोत्साहनपर आर्थिक व इतर मदत त्यांनी केली.

दि. २० फेब्रुवारी १९१४ रोजी बडोदे राज्यातील सहकारी मंडळ्यांची पहिली परिषद झाली. त्याप्रसंगी त्यांनी सहकार चळवळीचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले,

‘‘जो शेतकरी पूर्वापार पद्धतीने थोड्याशा उसनवारीकरिता सावकाराचे घर पाहत असे व जबर व्याज भरीत असे तोच शेतकरी आज या चळवळीमुळे आपल्या पतीवर माफक दराने घेऊ शकतो... शेतीसाठी किंवा घरकामासाठी लागणारे जिन्नस त्याला घाऊक भावाने मिळवून देणे, शेतीसंबंधीचे नवनवे शास्त्रीय प्रयोग त्याला माहीत व प्राप्त करून देणे, विमा पद्धतीने त्यांच्या धंद्याला स्थैर्य आणून देणे वगैरे आर्थिक फायदे सहकारी चळवळीमुळेच शेतकऱ्याला होतात. नैतिक व सामाजिक पतपेढ्यांद्वारे या बचतीचा विनियोग दूरदृष्टीने करणे हे दोन गुण शेतकऱ्यांच्या अंगी या चळवळीमुळे येतात...’’

(महाराजा सयाजीराव गायकवाड यांची भाषणसंग्रह : खंड एक/संपा. रमेश वरखेडे/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. ३१२)

सयाजीरावांच्या उत्तेजनामुळे शेतकऱ्यांच्या सहकारी पतपेढ्या जवळपास २३६ तोपर्यंत अस्तित्त्वात आल्या होत्या. शेतकऱ्यांना परस्परांच्या सहकार्याने कर्ज

मिळणे सुलभ झाले, महत्त्वाचे म्हणजे सावकाराकडून होणारी लुबाडणूक थांबली. सहकार्यातून आत्मनिर्भरता, नफ्यात सर्वांचा वाटा, सर्वांच्या संकटात सर्वांनी एकी करून संकटातून सोडवणूक करणे वगैरे चांगले दृश्य परिणाम झाले. जातीपाती, विशिष्ट व्यवसाय, विशिष्ट जातीनेच करणे, स्पर्श–अस्पर्श मानणे, उच्च–नीच मानणे, ही भेदमूलक व्यवस्था नष्ट करण्याचे विचार जागृतीचे आणि खेड्यांचे संजीवन म्हणून सहकारी पतपेढ्यांना त्यांनी महत्त्व दिलेले दिसते. शेती व सहकार यांची उन्नती करण्याची जबाबदारी जिल्ह्याच्या लोकल बोर्डाकडे त्यांनी सोपवलेली होती, या सर्व कार्यवाहीकडे काळजीने पाहिले जाई. राज्याच्या अधिकाऱ्यांनीही सहकारी संस्थांच्या कामकाजात लक्ष घालावे व ही चळवळ निर्दोष राखावी असे निर्देशही दिलेले होते. 'ग्रामसहकार' ही योजना त्यांनी लागू केली होती. औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रातील सहकारी संस्थांनाही सयाजीरावांनी उत्तेजन दिले. गणदेवी येथे सहकारी तत्त्वावर साखर कारखाना काढण्यात स्वतःच पुढाकारही घेतला होता.

सहकारातून विकास

प्रारंभी सहकारी पतसंस्था अल्पदराने कर्जपुरवठा करू लागल्या. पुढे शेतमाल विक्री, कृषी साहित्य खरेदी, धान्य व चारा संग्रह, बागायती शेतीस पंप, इंजिन, पाणीपुरवठा, जमिनीचे एकत्रीकरण बचत, ग्रामसुधारणा, समाज सुधारणा अशी कामे सहकारी संस्था करू लागल्या. मध्यवर्ती सहकारी बँकांची स्थापना होऊन या कामांना चांगलीच चालना मिळाली. १९२६ साली 'श्री सयाजी सहकारी सेवा संघ' स्थापन झाला. बडोदे राज्यातील सर्व सहकारी संस्थांचे हे महामंडळ होते. ते केंद्रस्थान म्हणून कार्यरत होते. 'ग्रामजीवन', 'सहकार्य आणि शेती' ही नियतकालिके संघातर्फे प्रसिद्ध केली जायची. खेड्यांची पुर्नघटना आणि उच्च जीवनमूल्यांचे आचरण सहकारी चळवळीतून झाले. सहकारविषयक प्रगतिशील कायदे सयाजीरावांनी केले. सामूहिक विकसनाचे हे तत्त्व शेतकरी, उद्योजक व व्यापारी यांच्या हिताचे ठरले. १९३१ साली सहकारी संस्थांची संख्या १०६३ झाली, त्यात शेतकरी सहकारी संस्थांची संख्या ८७१ होती. बचत, शेतकऱ्यांना वित्तीय पुरवठा, कापूसविक्री, पेयजल, गुरेढोरे पोषण, बी-बियाणे पुरवठा, गवताचारा, विद्यार्थी साहाय्यक साधनांपैकी, गोदाम - साठवण, गृहनिर्माण ही कामे केली जात.

दि बँक ऑफ बडोदा लिमिटेड

बडोदे राज्यात'बाबाशाही' नावाचे स्वतंत्र नाणे चलनात होते. दरम्यानच्या काळात ब्रिटिश सरकारचे चलन स्वीकारावे, असा आग्रही आदेश असायचा. पुढे हे चलन स्वीकारावे लागले. सयाजीरावांना राज्याची बँक असणे गरजेचे वाटत होते. दि. २० जुलै १९०८ रोजी बँकेची स्थापना करण्यात आली.

मोठ्या जनसमूहाची या बँकेने गरज भागवावी, कर्ज देणे, हुंड्यांची देवघेव करणे, ठेवी ठेवणे, कला, उद्योगधंदे व व्यापार यांची प्रगती करणे अशी उद्दिष्टे सयाजीरावांनी दिनांक ९ जुलै १९०८ रोजी उद्‌घाटनाप्रसंगी सांगितली होती. अंतर्गत कारभाराचे स्वातंत्र्य आणि निवडून आलेले संचालक मंडळ या सवलती सरकारने दिल्या होत्या. सहकाराचे तत्त्व बँकेने अनुसरावे, महत्त्वाचे म्हणजे व्यापारविषयक व्यवहाराच्या आधुनिक पद्धती लोकांना शिकवाव्यात ही अपेक्षा सयाजीरावांनी व्यक्त केली होती.

"शास्त्रीय व औद्योगिक बाबतीतील आपल्या राष्ट्राची दुर्बलता ओळखणे व ती दूर करण्यासाठी दृढनिश्चयपूर्वक झटणे हीच तत्त्वतः स्वदेशी चळवळ होय. आर्थिक स्वातंत्र्य मिळविणे हेच स्वदेशी चळवळीचे अंतिम साध्य व हेतू आहे..." (सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह : खंड १/पृ. १७८)

बँकेने आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देऊन स्वदेशी चळवळीचे ईप्सित साध्य करावे, अशी भूमिका सयाजीरावांनी घेतली होती. या बँकेचे अधिकृत साठ लाखांचे भांडवल होते. प्रजेच्या व्यापार उद्योगात या बँकेचे मोठे योगदान राहिले. बँकेच्या अहमदाबाद, मुंबई येथे शाखा झाल्या. शाखाविस्तार दूरवर होऊन बँकेने मोठा विकास साध्य केला. सयाजीरावांचे या बँकेच्या स्थापनेत मोठे श्रेय आहे.

समारोप

शेतकरीहित, शेतकीतल्या सुधारणा, सहकारातून शेतीचा, उद्योगांचा अभ्युदय ही महत्त्वाची कामे सयाजीरावांच्या कारकिर्दीत झाली. दुष्काळासंबंधीचे उपाय, दुष्काळ निवारणाच्या शाश्वत उपाययोजनांमधून सयाजीरावांची शेतकरीनिष्ठा दिसते.

१०.

सुराज्य आणि स्वराज्य

प्रास्ताविक

सयाजीरावांचे आयुष्य विलक्षण घडामोडी, संघर्ष, त्याचप्रमाणे संस्कृतीकरण यांनी भरलेले होते. अकल्पितपणे राजपदप्राप्ती झाल्यावर तज्ज्ञता, सुज्ञता, जिज्ञासा, बौद्धिक क्षमता, सांमजस्य यांच्या बळावर सुराज्य आणि स्वराज्य निर्माण व्हावे, असे प्रयत्न केले. सयाजीरावांना ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांनी मांडलिक मानले. मात्र, सयाजीराव नेहमीच सार्वभौम राज्यसत्ताधिकारी आहोत, असे दाखवून देत राहिले. भारतीय स्वातंत्र्याकांक्षेशी एकनिष्ठ राहिले, क्रांतिकारकांना मदत केली आणि आपली राजसत्ता आधुनिक सुधारणा करून सुराज्य निर्मितीसाठी वाहून घेतली. 'हिंदुस्थानात दोनच खरे राजे झाले. छत्रपती शिवाजी महाराज आणि सयाजीराव गायकवाड' असे चक्रवर्ती गोपालाचारी यांचे मत आहे. 'सुराज्य आणि स्वराज्य' हे सयाजीरावांच्या जीवनाचे सूत्र आहे.

ब्रिटिश राजसत्तेशी संघर्ष

सयाजीरावांचा जन्म स्वातंत्र्याकांक्षी घराण्यात झाला होता. देशाला स्वातंत्र्य मिळावे असे वाटणारे कदाचित तेच पहिले आणि एकमेव राजे असावेत.

कारकिर्दीच्या प्रारंभापासूनच ब्रिटिश सत्ताधिकारी सयाजीरावांच्या राजकीय कृतींकडे संशयग्रस्ततेने पाहत आले होते. मुत्सद्देगिरीने आणि मार्गदर्शक स्नेहीमंडळींमुळे ब्रिटिशांच्या हस्तक्षेपांना ते शह देत आले.

दुसऱ्या परदेश प्रवासाच्यावेळी इलियट यांची सोबत ब्रिटिश अधिकाऱ्यांनी प्रतिबंधित केली. तेव्हा व्यक्तिगत स्नेही म्हणून इलियट यांना परदेश प्रवासात सोबत घेतले. सयाजीरावांच्या कार्यात ब्रिटिशांनी अडचणी आणल्या; कारण सयाजीराव ताटाखालचे मांजर व्हायला तयार नव्हते. शिवाय सयाजीरावांनी

राज्याच्या सर्वांगीण सुधारणांना महत्त्व दिले. उत्कृष्ट राज्यप्रशासन, लोककल्याणकारी, लोककेंद्री शासन पाहून ब्रिटिश राज्यव्यवहारापेक्षा सयाजीराव वरचढ ठरू लागले होते, ब्रिटिश अधिकाऱ्यांना हेवा वाटणे स्वाभाविकच होते. पुण्यातील न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, रामकृष्ण भांडारकर, पुढे लो. टिळक अशा ब्रिटिशांना विरोध करणाऱ्या नेत्यांमध्ये सयाजीराव वावरत. एफ. ए. एच. इलियट हे सयाजीरावांचे शिक्षक आयरिश होते. ब्रिटिशांविरुद्ध सयाजीरावांना उभे करण्याचा इलियट यांचा प्रयत्न असावा, अशा संशयानेही सयाजीवांच्या कार्यात हस्तक्षेप वाढत राहिला.

बापट प्रकरणातील कोंडी व सुटका

सयाजीरावांनी इलियट यांना बारखळी जमिनींचे निर्णय करण्यासाठी सेटलमेंट अधिकारी म्हणून नेमले. वासुदेव बापट हे त्यांच्या मदतीला अधिकारी म्हणून नेमले. वासुदेव बापट हे लोकमान्य टिळकांचे वर्गमित्र होते. बापटांनी बारखळी खात्यातले निर्णय करताना लाच घेतल्याचे आरोप करण्यात आले. रेसिडेंट कर्नल बिडुल्फ आणि दिवाण यांनी कटकारस्थान करून बापटांविरुद्ध कमिशन नेमले. या काळात सयाजीराव परदेशी होते, इलियट रजा घेऊन विलायतेला गेले होते. कर्नल बिडुल्फने हे कुभांड रचले हे फेराजशहा मेहता यांच्या लक्षात आल्याने त्यांनी दावा चालवण्यास नकार दिला होता. बापटांची बाजू घेऊन लोकमान्य टिळकांनी खटला लढवला. चौकशी कमिशनने बापटांनी लाच घेतल्याचा पुरावा नसल्याचे सांगितले. 'बडोदे सरकारातील सरकारी नोकर या नात्याने जो कायदेशीर मेहनताना घेण्याचा अधिकार आहे, त्याव्यतिरिक्त इतर बेकायदेशीर ऐवज घेण्याबद्दल अपराध शाबीत झाला आहे.' असा निर्णय करताना सहा महिन्यांची साधी कैद व बाबाशाही दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा करण्यात आली. १६ मे १८९६ चा हा निर्णय सयाजीरावांना कळविण्यात आला. हा हस्तक्षेप व कारस्थान एकप्रकारे सयाजीरावांविरुद्ध होते. सयाजीराव तातडीने परतले. अरविंद घोष यांच्या सल्ल्याने त्यांनी वेगवेगळे तीन तज्ज्ञांकडून पुनर्विलोकन अहवाल मागविले. दि. ९ ऑक्टोबर १८९५ रोजी सयाजीरावांनी अंतिम निर्णय दिला, ''रा. वासुदेव सदाशिव बापट यांना त्याजवरील आरोपासंबंधाने निर्दोषी ठरविण्यात येत आहे. तथापि या प्रकरणासंबंधाच्या सर्व हकिकतीचा विचार करिता, रा. बापट यांना इतउप्पर या राज्याच्या नोकरीत ठेवणे इष्ट नाही. म्हणून त्यांना

नोकरीतून मुक्त करण्यात येत आहे." (स्वातंत्र्य लढ्याचे पाठीराखे सयाजीराव/ बाबा भांड/साकेत प्रकाशन/२०१६/पृ. २३) कर्नल बिडुल्फचा कारस्थानी स्वभाव ओळखून कमिशनच्या निर्णयाचा पुनर्विचार, पुनर्विचार अहवालातील तथ्य, त्या तथ्यांचा अंतिम निर्णय, या साऱ्या प्रकरणात सयाजीरावांची मुत्सद्देगिरी दिसते. सयाजीरावांच्या गैरहजेरीत कर्नल बिडुल्फ राज्यव्यवहारात हस्तक्षेप करू पाहत होता. 'अंतिम निर्णय' हा सयाजीरावांचा आहे, हे ब्रिटिश अधिकाऱ्याच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न होय. बापट यांना राज्याच्या सेवेतून जावे लागले, तरी त्यांना सयाजीरावांनी पेन्शन मात्र मंजूर केली. लो. टिळकांनी केलेल्या युक्तिवादात बापट निर्दोष होते. तज्ज्ञ पुनरावलोकनकर्त्यांनीही निर्दोष ठरवले होते.

लॉर्ड कर्झनच्या परिपत्रकाचा प्रतिवाद

इ. स. १८९९ मध्ये लॉर्ड कर्झन हे नवे व्हाइसरॉय म्हणून आले. देशी राजे ब्रिटिशांचे अंकित-गुलाम आहेत ही त्यांची धारणा होती. देशी राजांना निर्बंध लावण्याचा व आपले सार्वभौमत्व सिद्ध करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असायचा. सयाजीराव सतत परदेशी जातात म्हणून त्यांनी परिपत्रक काढले. हे परिपत्रक सर्व राजांना पाठवले गेले. 'राजांनी वारंवार सफरीवर जाणे कर्तव्यच्युती मानली जाईल, खासगी कामासाठी दौरा नसावा, परदेश सफरीसाठी यापुढे मंजुरी घ्यावी, प्रवासात चारित्र्य आणि सवयी यावर लक्ष ठेवले जाईल.' असा आशय परिपत्रकात होता. परिपत्रक सर्वांना पाठवले गेले तरी लक्ष्य सयाजीराव होते. रेसिडेंटमार्फत दिवाणांना कळविले गेले, की कर्झन बडोद्यास भेट देतील, सयाजीरावांनी स्वागत करावे. परिपत्रक आणि भेटीची योजना सयाजीरावांना मान्यच नव्हती. महाराणींच्या शस्त्रक्रियेसाठी सयाजीराव परदेशी होते, त्यांनी उपस्थितीस नकार दिला. हिंदुस्थानात कधी परत येता येईल हे सांगता येत नाही, कळवून टाकले !

क्रांतिकारक अरविंद घोष हे या काळात सयाजीरावांचे खासगी सचिव होते. सयाजीरावांनी स्वाभिमानपूर्वक आपलेच सार्वभौमत्व असल्याचे अरविंदांच्या मदतीने परिपत्रकाबद्दल नापसंती प्रकट करणारे पत्र पाठवले -

"आपले सर्क्युलर ज्या शब्दात आणि ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आले. त्या दोन्ही गोष्टी अयोग्य आहेत. राजे लोकांना सल्ला द्यायचा असला, तर

त्यांच्या इभ्रतीला धक्का पोहोचणार नाही अशा पद्धतीने द्यावा. जाहीर परिपत्रकाचा डंका वाजविल्याने आमची मानहानी झाली.''

''या देशातच राहून हौसमौजेसाठी आणि विलायती समाजातल्या स्त्रियांवर लाखो रुपये उधळणारे राजे दिसत नाही काय?... कायदेकानून झुगारून देऊन प्रजेवर जोरजुलूम करणाऱ्या राजांविरुद्ध काय केले?... मात्र परदेशात जाणाऱ्या राजांनीच असे कोणते पाप केले आहे, की ज्यांच्याविरुद्ध हे सर्क्युलर काढावे लागले. ज्यांच्याशी इंग्रज सरकारने दोस्त सरकार म्हणून बरोबरीच्या नात्याने तह केले होते, त्यांची अवस्था एखाद्या कारकुनापेक्षाही अधिक वाईट केली आहे...'' (उद्‌धृत/पूर्वोक्त/पृ. ३१) येथे गायकवाड संस्थान हे अंकित नाहीत, गुलाम नाहीत तर ब्रिटिशांना गायकवाडांशी तह करावा लागला होता, मैत्री करार झाला होता, हे लॉर्ड कर्झनला सडेतोडपणे सांगितले गेले. ब्रिटिश सत्तेअंतर्गत येत असलो तरी आपण सार्वभौम सत्ता-अधिकारी आहोत हेच सयाजीरावांना सूचित करायचे होते.

दिल्ली दरबार आणि संघर्षक्षण

इंग्लंडच्या व्हिक्टोरिया महाराणींच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव प्रिन्स ऑफ वेल्स हे सातवे एडवर्ड म्हणून राज्यगादीवर आले. लॉर्ड कर्झनला आपली स्वामीनिष्ठा दाखवण्यासाठी संधी मिळाली. नव्या बादशहाच्या नावावे स्वागत दरबार दिल्लीत भरविण्याचा चंग त्यांनी बांधला. त्यांना भारतात 'सार्वभौम सत्तेचे प्रतिनिधी' म्हणून स्वतःला प्रस्थापित करायचे होते. सर्व राजांनी दिल्ली दरबारात उपस्थित राहणे बंधनकारक केले. हत्तीवर बसून जंगी मिरवणुकीत कर्झनला मिरवून घ्यायचे होते. सयाजीरावांनी राजमाता जमनाबाईंच्या दुःखद निधनाचे कारण देत मिरवणुकीत उपस्थित राहणार नाही असे कळवून टाकले. 'गैरहजर राहिल्यास बादशहाचा अपमान होईल, असा अर्थ केला जात असल्याने नाइलाजाने हजर राहावे लागले. नाइलाजाने केलेले वर्तन स्वयंस्फूर्तीचे आणि खुशीचा देखावा करण्यासारखे होईल.' असे कळवून सयाजीराव मिरवणुकीला गेले नाहीत.

१ जानेवारी १९०३ रोजी दिल्ली दरबाराचे आयोजन होते. सयाजीरावांना सुचवले गेले, की लाल रंगाचे गणवेष नोकरांना नको, ऐनवेळेस नोकरांचे गणवेष वेगळया रंगाचे करवून घ्यावे लागले. स्वतःचा गौरव करून घेणाऱ्या कर्झन यांना दरबारात सयाजीरावांनी सांगितले, ''प्रिन्स ऑफ वेल्सच्या राज्यारोहणानिमित्ताने

त्यांचे हार्दिक व निष्ठापूर्वक अभिनंदन! माझ्या या भावना आणि नववर्षाच्या शुभेच्छा बादशहाकडे आपण पोहोचत्या कराव्यात." यात लॉर्ड कर्झनचा काही गौरव नव्हता, 'प्रिन्स ऑफ वेल्स' आणि 'मी' बरोबरीचे आहोत, कर्झन हे नोकर आहेत, त्यांची जबाबदारी माझ्या सदिच्छा प्रिन्स ऑफ वेल्स यांच्यापर्यंत पोहोचवणाऱ्या नोकराची आहे ! असे हे सूचन सयाजीरावांच्या स्वाभिमानाचे आणि धूर्तपणाचे आहे.

सयाजीराव आणि कर्झन यांच्यात नंतरच्या काळात कारणपरत्वे पत्रव्यवहार होत राहिला, या पत्रांमध्ये सयाजीरावांचा कणखरपणा, स्वातंत्र्यवादी आणि अस्मितावादी स्वभाव दिसून येतो. सयाजीरावांनी साम्राज्याच्या संरक्षणासाठी राज्याच्या उत्पन्नाचा काही ठराविक भाग खर्च करावा असे कर्झनने १७ एप्रिल १९०४ च्या पत्रात कळवले. तेव्हा अरविंद घोष, दिवाण श्रीनिवास राघवाय्यंगार यांच्या सल्ल्याने पूर्वेतिहास, कागदपत्रे तपासून कर्झनला रोखठोकपणे कळविले, "हिंदुस्थान सरकारच्या वेळोवेळीच्या अडचणीच्यावेळी आम्ही मदत केली आहेच; परंतु आपल्या नवीन योजनेच्या संदर्भात आमची नापसंती आहे... संस्थानिकांचे मत विचारात घेतले जात नाही... संस्थानिकांना आपल्या अंतर्व्यवस्थेत पूर्ण स्वातंत्र्य द्यावे, तसेच साम्राज्याच्या सल्लामसलतीत भाग घेण्याचा अधिकारही द्यावा..." हे १ ऑगस्ट १९०४ रोजी लिहिलेले पत्र सयाजीरावांच्या स्वातंत्र्यवादी मागणीचे पत्र आहे. स्वराज्यनिर्मितीचा सयाजीरावांचा हा विचार स्वातंत्र्यचळवळींना बळ देणारा ठरला.

राष्ट्रीय चळवळ आणि सयाजीराव

अ. भा. राष्ट्रीय कॉंग्रेसने सनदशीर पद्धतीने लोकांचे प्रश्न, स्वातंत्र्यविषयक धारणा ब्रिटिश सरकारपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न चालवले होते. कॉंग्रेसची अधिवेशने होत, तेव्हा काही अधिवेशनांना सयाजीराव उपस्थित राहिले, संस्थापकांपैकी काही कॉंग्रेस पुढाऱ्यांचा सयाजीरावांशी संपर्क असायचा. बडोदे सरकारचे काही अधिकारी, कर्मचारीही कॉंग्रेसच्या चळवळीत होते.

इ. स. १८९२ मध्ये लिबरल पार्टीचे उमेदवार म्हणून हाऊस ऑफ कॉमन्ससाठी निवडणुकीला दादाभाई नौरोजी उभे राहिले. निवडणुकीच्या खर्चासाठी रुपये १५,००० सयाजीरावांनी दिले. निवडून आल्यावर लिबरल पार्टीने पक्षनिधीची मागणी केली. दादाभाईंकडे पैसे नव्हते, त्यांनी पद सोडायचे ठरवले. सयाजीरावांनी

पुन्हा रुपये १५,००० दिले. दादाभाई नौरोजींच्या नातवाला पुढे सयाजीरावांनी बडोद्याच्या सेवेत नोकरीही दिली. पुणे येथे १८९५ साली काँग्रेसच्या अधिवेशनास आर्थिक मदत दिली. इ. स. १८९७ मध्ये लंडनच्या वेल्बी कमिशनसमोर भारताची बाजू मांडण्यासाठी तीन सदस्यांचे शिष्टमंडळ गेले, त्यातील ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा प्रवासखर्च सयाजीरावांनी दिला. १९०२ व १९०६ साली अहमदाबाद व कलकत्ता येथे काँग्रेसच्या अधिवेशनात उद्योग व सामाजिक अधिवेशनाचे अध्यक्ष सयाजीराव होते, अधिवेशनात सहभागी होऊन त्यांनी तेथे भाषणेही केली.

काँग्रेस ब्रिटिशांविरुद्ध लढा देत होती, सयाजीरावांनी ब्रिटिशांची इतराजी होईल म्हणून निर्भयपणे या सभा-अधिवेशनांमध्ये सहभाग घेतला. लो. टिळक हे जहाल मताचे नेते सयाजीरावांच्या संपर्कामध्ये काँग्रेसमधील वावर, काँग्रेसच्या अधिवेशनात सहभाग, बडोद्याच्या सेवेतील डॉ. आर. सी. दत्त, अरविंद घोष, टोपण नावाने ब्रिटिशविरोधी लेखन करणारे कर्मचारी या घटनांमुळे ब्रिटिश सरकार सयाजीरावांवर नाखूश होते, सयाजीरावांनी पर्वा न करता राष्ट्रीय चळवळी, संस्था, व्यक्ती यांना सर्वतोपरी साह्य केले.

इ. स. १९०२ च्या अधिवेशनात राष्ट्रवादाची मांडणी करणारे भाषणच सयाजीरावांनी केले. "... हिंदुस्थानला प्रचंड राष्ट्रीय चळवळीची आज गरज आहे, त्या चळवळीत प्रत्येक व्यक्ती स्वतःकरिता किंवा जातीकरिता समान राष्ट्रीय ध्येयाचा बंधुभाव आपण स्थापू या... राष्ट्रीय कला, राष्ट्रीय वाङ्मय भरभराटीचा व्यापार हे जेव्हा हिंदुस्थानात दिसतील तेव्हा आणि फक्त तेव्हाच तुम्हाला राष्ट्रीय स्वातंत्र्याची मागणी करता येईल..." (उद्धृत/स्वातंत्र्य लढ्याचे पाठीराखे सयाजीराव/बाबा भांड/साकेत, प्रकाशन/२०१६/पृ. ४१) तर इ. स. १९०६ सालच्या कलकत्ता अधिवेशनात देशी उद्योगधंद्यांचा अस्त, युरोपातून येणारा पक्का माल, यात होणारे आर्थिक शोषण यांचा विचार मांडला होता.

लंडनमधील राष्ट्रवादी युवकांना उत्तेजन

इंडिया हाऊस व इंडियन मजलीस या स्वातंत्र्यवादी युवक संघटनांच्या क्रांतिकारकांशी सयाजीरावांचे संबंध होते. श्यामजी कृष्ण वर्मा, अरविंद घोष, केशवराव देशपांडे हे सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते सयाजीरावांशी परिचित झाले. अरविंद घोष आणि केशवराव देशपांडेंना सयाजीरावांनी बडोद्याच्या सेवेत आणले.

लंडनच्या हाईड पार्कमध्ये सयाजीराव श्यामजी कृष्ण वर्मांसोबत फिरायास जात, तेथेच क्रांतिकारक मादाम कामा, तारकनाथ दास, बिपीनचंद्र पाल यांच्या भेटी झाल्या.

लंडनमध्ये ब्रिटिशांकडून सयाजीरावांच्या हालचालींवर नजर ठेवली जात असे. पुढे प्रत्येक परदेश प्रवासात व हिंदुस्थानातही गुप्तहेरांचा ससेमिरा लागत होता.

सावळाराम यंदे व आपटे यांची बडोद्यात वृत्तपत्रे होती. 'बडोदा वत्सल', 'सयाजी विजय', 'पुढारी', 'चाबूक' ही वृत्तपत्रे ब्रिटिश सरकारविरुद्ध मजकूर छापत, या वृत्तपत्रांना सयाजीरावांचा आश्रय होता. ब्रिटिशांविरुद्ध क्रांतिकारी गटही बडोदे राज्यात कार्यशील झाला, यातले काही क्रांतिकारक बडोदे सरकारच्या सेवेत होते. सयाजीरावांचे आप्तेष्ट व राज्याचे कलेक्टर खासेराव जाधव, केशवराव देशपांडे यांच्या जेथे नेमणुका असतील तेथील स्वातंत्र्य उपक्रमांना ते मदत करीत. अरविंद घोष, प्रो. माणिकराव, आर. सी. दत्त, खासेराव जाधव यांच्यामुळे बडोदे राज्यात क्रांतिकारी गट, संघटना, मेळे निर्माण झाले. ब्रिटिशांविरुद्ध वातावरण निर्माण होऊ लागले. अरविंद घोषांचे धाकटे बंधू वारिंद्रकुमार घोष बडोद्याला आल्यावर त्यांनी छोटूभाई पुराणी यांना बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षणही दिले.

स्वातंत्र्याचा क्रांतिकारी मार्ग

सयाजीरावांच्या प्रदेशात ब्रिटिशांविरुद्ध राजद्रोहाच्या चळवळी घडत आहेत, संघटना, व्यक्ती, गट कार्यरत आहेत, असा संशय वाढीस लागला. लॉर्ड मिंटो यांनी १९०९ साली देशी राजांना राजद्रोहात्मक कारवायांचा बंदोबस्त करण्याचे फर्मान काढले होते. सयाजीरावांनी कळवले, 'आमच्या राज्यात या तऱ्हेचे घटना-प्रकार नाहीत.' व्हाईसरॉयने ब्रिटनमधील भारतमंत्र्याकडे सयाजीरावांविरुद्ध खूप आरोपपत्र पाठवले. त्यात म्हटले होते की, 'सयाजीराव हे खूप हुशार, धूर्त आणि छत्रपती शिवरायांसारखे डावपेच खेळणारे आहेत. नको ते काम करतात आणि मागे कोणताही पुरावा ठेवत नाहीत.' सयाजीराव ब्रिटिशांच्या कचाट्यात सापडले नाहीत, तसेच क्रांतिकारकांना मदत करणेही त्यांनी टाळले नाही.

ब्रिटिशांविरुद्ध विचार मांडणारे लेखन, पुस्तके, प्रचार साहित्य यावर बंदी असतानाच्या काळात ब्रिटिश अधिकारी असे साहित्य जप्त करीत, संबंधितांची धरपकड करीत, जरब बसवित. बडोदे राज्यात असे छापे मारण्यासाठी मुंबई

राज्यातून व्हिसेंट नावाचे सी.आय.डी.प्रमुख आला. बॅ. केशवराव देशपांडे पूर्वी राहत असलेल्या नवसारीच्या बंगल्याशेजारच्या घरातून 'वनस्पती नी दवाओ' या पुस्तकाच्या पाचशे प्रती जप्त केल्या. मुखपृष्ठावर वेगळे नाव असलेले हे पुस्तक म्हणजे अरविंद घोषांचे 'वुईच वे फ्रीडम'चा गुजराती अनुवाद होता. कलेक्टर खासेरावांनी व्हिसेंटला विचारले, 'महाराजा गायकवाड यांच्या संस्थानात छापा घालायचा परवाना तुमच्याकडे आहे काय?' व्हिसेंटला परत जावे लागले. बॅ. केशवराव देशपांडे यांनाही अडकवण्याचा प्रयत्न झाला, त्यातून ते सहिसलामत बचावले. प्रो. माणिकराव, खासेराव जाधव, माणिकरावांचा आखाडा, चांदोद येथील गंगनाथ भारतीय राष्ट्रीय विद्यालय, वर्तमानपत्रे, व्यक्ती गट व संस्था यांनी ब्रिटिशांविरुद्ध गुप्तपणे चळवळी चालवल्या. सयाजीराव आपल्या क्रांतिकारक अधिकाऱ्यांच्या पाठीशी सदैव उभे राहिले. महत्त्वाचे म्हणजे ब्रिटिशांच्या धाक-दडपशाहीला भीक घातली नाही.

स्वातंत्र्यचळवळींना प्रोत्साहन आणि गोपनीय कागदपत्रे

सयाजीरावांनी मुत्सद्देगिरी करीत लोककल्याणातून सुराज्य निर्माण केले. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, कलाविषयक आणि सांस्कृतिक सुधारणांमुळे 'सुराज्य' निर्माण केले.

तसेच ते केवळ संस्थानिक, मांडलिक किंवा परप्रकाशित राजे नव्हते. कारकिर्दीच्या प्रारंभापासूनच त्यांच्या मनात ब्रिटिश सत्ताविरोधी, स्वातंत्र्यवादी, राष्ट्रवादी विचार खदखदत होते. वेळोवेळी ब्रिटिश रेसिडेंट, गव्हर्नर किंवा व्हाईसरॉय यांच्याशी त्यांचा संघर्ष झाला. ब्रिटिशांची खुशामत न करता त्यांनी आपले स्वातंत्र्य, राज्याचे स्वातंत्र्य, प्रजेचे स्वातंत्र्य अबाधित राखले. त्यांच्या प्रत्येक कृतीत अडथळा आणला जायचा, कृतीपासून परावृत्त केले जायचे किंवा संशयाने पाहिले जायचे. साऱ्या कारकिर्दीत त्यांच्याविरुद्ध ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना ब्रिटिशविरोधक म्हणून, देशद्रोही कारवायांचे जनक म्हणून अडकवण्याचा प्रयत्न केला. यासंबंधीच्या गोपनीय अहवालांच्या कागदपत्रांच्या उतरंडी तयार झाल्या. दहा वर्षे सीआयडीने पाळत ठेवून त्यांच्याविरुद्ध केस तयार केली होती. 'ब्रिटिश सरकारला सयाजीरावांकडून धोका आहे,' असा हा गुप्तवार्ता अहवाल लंडनच्या ब्रिटिश लायब्ररीत 'व्हेरी सीक्रेट ए बँडेड बॉक्स केस' म्हणून संग्रहित आहे. अलीकडेच ही कागदपत्रे बाबा भांड यांनी मिळवली. साठ वर्षे अशी कागदपत्रे उघड केली जात नाहीत; परंतु

आता हा कालावधी पूर्ण झाल्याने या कादपत्रांच्या फाईल उपलब्ध झाल्या आहेत. तेथे सयाजीरावांच्या विरुद्ध तयार केलेल्या गुप्त अहवालांच्या सुमारे १६०० हून अधिक फायली आहेत. यातील काही फायलींच्या अभ्यासातून बाबा भांड यांनी 'स्वातंत्र्यलढ्याचे पाठीराखे सयाजीराव गायकवाड' हे पुस्तक सिद्ध केले आहे.

इतर संस्थानिक ज्या काळात ब्रिटिशांना संपूर्ण शरण गेलेले होते, तेजोहीन झाले होते, त्या काळातच सयाजीराव हे एकमेव संस्थानिक ब्रिटिशांशी संघर्ष करीत राहिले. कधी उघडपणे, कधी गुप्तपणे स्वराज्याचा संकल्प कृतीत आणत राहिले. सयाजीरावांच्या स्वातंत्र्यवादी विचारकृतींना देशद्रोही मानले गेले. उदा.

गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग्जचे आरोपपत्र

सयाजीरावांचा ब्रिटिशांना विरोध आहे, ते धोकादायक आहेत, राजद्रोही आहेत असे पत्र हार्डिंग्जने नोव्हेंबर १९११ मध्ये भारतासाठी सचिव मारक्विस ऑफ क्रू, के. जी. यांना पाठवले होते, त्यातील काही भाष्ये पाहा -

''राजद्रोह आणि अनागोंदी निर्माण करणाऱ्या शक्तींचा बंदोबस्त करण्याच्या सरकारच्या प्रयत्नाला सहकार्य करण्यास सयाजीराव गायकवाड यांनी नकारच दिला... साम्राज्य सेनेच्या योजनेस हिंदुस्थानातील सर्व राजांनी अनुमती दर्शविली असताना हेच एकटे या योजनेस विरोध करतात... त्यांचे वागणे बेशिस्तपणाचे असून, प्रत्येक घटनेत त्यांची कृती हिंदुस्थान सरकारच्या धोरणाविरुद्धची असते... बडोदा संस्थानातील सशस्त्र दलातील सैनिकांची संख्या निश्चित करण्याचे सर्वाधिकार इंग्रज सरकारचे असताना महाराजांनी या घोषणेस विरोध केला... महाराजा गायकवाड हे स्वतः हिंदुस्थानातील मराठ्यांचे नेता आहेत, असे समजत असल्याने हे घडत आहे... ब्रिटिशांच्या सर्व ज्ञात विरोधकांना बडोदा संस्थानच्या सेवेत घेतले त्यांचे सार्वभौम असल्याचे बेमुर्वतखोर वर्तन वारंवार घडत आहे. त्यांची ही महत्त्वाकांक्षा ब्रिटिश सरकारच्या भवितव्यास धोका पोहोचविणारी आहे... अरविंद घोषांच्या बडोद्यात येण्याने ब्रिटिश सरकारविरुद्धच्या शक्तीला मोठे बळ मिळाले... बडोदा संस्थानात ब्रिटिश सरकारविरुद्ध भडकविण्यात स्थानिक वृत्तपत्रांचा मोठा वाटा आहे... एका जहालमतवादी मंडळीच्या अड्ड्याची माहिती समोर आली. माणिकराव नावाचे एक व्यक्ती आखाडा चालवितात. बडोद्यातील राजद्रोही चळवळीचे हे मुख्य ठिकाण आहे, या आखाड्याला बडोदे सरकारकडून अभय

दिले जाते... दिवाणांनी कबूल केले, की बडोद्यातील मराठे अधिकारीच जहालमतवादी आहेत... संस्थानात राजद्रोही व्यक्ती आणि संस्थांना महाराज थेट पाठिंबा देतात... राजद्रोही विचाराचे विनायक दामोदर सावरकर यांचे जवळचे मित्र शंकर वाघ यांचा मुलगा शिवाजीरावाच्या सेवेत न्हावी म्हणून आहे, तो राजद्रोही गटाशी संबंधित असल्याचे कळवूनही त्याला नोकरीत ठेवून घेतले... संत निहाल सिंह ब्रिटिशांविरोधी स्फोटक भाषणे करतो, लेखन करतो, या व्यक्तीस गायकवाड यांनी बडोद्यास पाहुणा म्हणून बोलावले... त्यांची उक्ती कृती आणि जहालमतवादाविषयी सहानुभूतीच प्रकट करते... स्फोटक देशद्रोही साहित्य छापून मुंबईत वितरित केले गेले, त्याची छपाई आणि वितरण केंद्र बडोदा होते...” (उद्धृत/स्वातंत्र्यलढ्याचे पाठीराखे सयाजीराव/बाबा भांड/साकेत प्रकाशन/ २०१६/पृ. १०३ ते ११९)

सयाजीराव आपल्या सार्वभौमत्त्वाबद्दल आणि स्वातंत्र्याबद्दल नेहमीच जागरूक राहिले. सिद्धही करीत राहिले.

समारोप

सयाजीराव प्रजापालकत्व स्वीकारणारे प्रजाहितदक्ष राजा असल्याने सुराज्यनिर्मितीचे काम त्यांनी आयुष्यभर केले. सुधारकी विचारांच्या कृती, पाश्चात्त्य संस्कृतीतले आदर्श, मानवता विचार, कला तसेच कृतीतील नावीन्य-विवेक याद्वारे ‘सुराज्य’ स्थापले आणि वाढवले. ब्रिटिश अमलात ‘स्वातंत्र्य’-‘स्वराज्य’ हे ध्येय ठेवल्याने स्वातंत्र्य चळवळींना, स्वातंत्र्यवादी-क्रांतिकारी व्यक्ती-संस्थांना पाठबळ दिले. त्यांना स्वातंत्र्याकांक्षेतूनच ब्रिटिशांशी सदैव संघर्ष करावा लागला आणि ‘स्वराज्य’ हे ध्येय कृती-उक्तीतून प्रकट होत राहिले. सुराज्याचा पाया स्वराज्य भावनेत असल्याचे त्यांनी द्रष्टेपणाने ओळखले होते.

●●●

११.

महाराष्ट्राचे शिल्पकार : सयाजीराव

प्रास्ताविक

'भूगोलाच्या दृष्टीने माझे राज्य महाराष्ट्रापासून दूर असले तरी एकाच समाजपुरुषाचे आपण दोघे परस्परसंबंध असे अवयव आहोत, असे मी मानतो.'

किंवा

"मी पुण्यास परका नाही. आपल्यापैकी मी एक आहे... कालवशात आमचे पूर्वज याच प्रांतातून गुजरात देशात तलवार गाजवून नशीब काढण्यास गेले आणि तेथे कायमची वसाहत करून राहिले. तथापि, आमची वतनाची गावे पुण्यापासून १०-१५ कोसाच्या अंतरावर आहेत. त्यामुळे आम्हाला पुणे प्रांताबद्दल आणि त्यातील मराठा बांधवांबद्दल आपुलकीची भावना वाटत असते..."

ही उद्‌धृते पाहिल्यास सयाजीरावांची महाराष्ट्रभूमी-लोक याबद्दलची आस्थाच दिसते. मराठीपण आणि महाराष्ट्र बाणा त्यांच्या कृती-उक्तींमधून सतत प्रकट होत राहिला.

मराठी राज्याचीच एक शाखा बडोदेकरांनी, गायकवाड यांनी निर्मिली आणि वाढवली. सयाजीरावांची बालपणातली अव्वल वर्षे महाराष्ट्र भूमीतली होती, बडोद्याचे अधिपती झाल्यावरही महाराष्ट्राशी वैचारिक, राजकीय आणि सांस्कृतिक बंध नेहमीच वर्धिष्णू राहिला.

विचारप्रवर्तन

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणूनच ओळखले जाते. विचारप्रवर्तनाच्या चळवळी येथेच झाल्या आहेत. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य, स्वधर्म, सुराज्य, अस्मिता आणि अन्यायाचा विवेकी प्रतिकार या मूल्यांचा संस्कार मराठी मातीच्या समूहमानसावर केला होता. संत तुकोबांचे रोखठोक अध्यात्म

असो वा विश्वात्मकतेच्या पसायदानाचे सर्वकल्याणकारी अशी श्री संत ज्ञानदेवांची ज्ञानदेवी असो, हे मराठीपण या भूमीचे वैचारिक बोधचिन्ह आहे. वारकरी संत, एकूणच संतसाहित्य हे महाराष्ट्र संस्कृतीचे प्रमुख अंग आहे. देशी भाषांच्या जागरणातूनच मराठीपण टिकवले गेले. सामाजिक सुधारणा, धर्मसुधारणा, सांस्कृतिक सुधारणा, शैक्षणिक उत्थान आणि स्वराज्य ही हक्कमागणी हे सारे महाराष्ट्राने घडवलेले आहे. याच परंपरेचे पाईक सयाजीराव ठरतात.

शिक्षणप्रसार, अस्पृश्यांसाठी शिक्षणसुविधा, समाजसुधारणा, अस्पृश्यताविरोधी चळवळी किंवा पुढे राजर्षी शाहू महाराज, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिकतेचा वसा महाराष्ट्राने कृतीत आणला.

शिक्षण प्रसाराचे कार्य, अस्पृश्यता निवारणाचे कार्य, धर्मसुधारणांचे कार्य किंवा स्वातंत्र्य चळवळीचे क्रांतिकार्य ज्याप्रमाणे महाराष्ट्रात घडत-वाढत राहिले, त्याचप्रमाणे सयाजीरावांनी बडोद्यात या कामांचा प्रारंभ केला. सुधारकी विचारांचे कृतिवीर सयाजीरावांच्या आस्थेचे विषय राहिले. पुरोगामी व्यक्ती किंवा संस्था यांच्याशी सयाजीरावांचे संवादी संबंध राहिले. सक्तीचे मोफत शिक्षण तर संपूर्ण देशात प्रथमच सयाजीरावांनी सुरू केलेले होते.

अस्पृश्यता निवारण, सामाजिक समता प्रतिष्ठापना करणाऱ्या मराठी समाज सुधारकांशी व त्यांच्या कार्याशी सयाजीराव सतत वैचारिक देवघेव करीत. बडोदे सरकारही अशा व्यक्ती किंवा संस्था यांना सहकार्य करीत राहिले. पुरोगामी आणि स्वराज्याकांक्षी मंडळीत म. फुले, लो. टिळक, आगरकर, लोकहितवादी, न्या. महादेव गोविंद रानडे, ना. गोपाळ कृष्ण गोखले, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज या आणि अशा कर्तृत्ववानांचा संवाद-संबंध सयाजीरावांशी होता. यातल्या कितीतरी व्यक्ती किंवा संस्था आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार ठरतात. या शिल्पकारांना सर्व प्रकारचे साह्य शक्य तेवढ्या वेळी सयाजीरावांनी केले आहे. यातल्या काही विचारवंतांनी सयाजीरावांना राजधर्म-प्रजा-धर्म, समाजधर्म यांचे पालन करताना मार्गदर्शनही केले. या संवादी संबंधांतून महाराष्ट्राची जडणघडण झाली आणि सयाजीरावांची पर्यायाने बडोदे राज्याचीही झाली.

संस्था : सहकार्य व उत्तेजन

सामाजिक, शैक्षणिक उत्थान करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन, प्रेरणा व आर्थिक सहकार्य सयाजीरावांनी केले. या संस्थांना अधूनमधून भेटी दिल्या. अध्यक्षस्थान

भूषवून व्याख्यानांमधून उद्‍बोधितही केले. चांगले काम जेथे सुरू आहे, त्यांचे कामकाज पाहून त्यांना प्रोत्साहित करायचे आणि त्यातील नवे, उपयुक्त आपलेसे करून बडोद्याच्या प्रजेत पोहोचवायचे अशी त्यांची कार्यपद्धती होती. काही संस्थांनी सयाजीरावांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना मानपत्रे अर्पण केली, तर काही संस्थांच्या कार्यास गती यावी म्हणून बौद्धिक व आर्थिक पाठबळही दिले. सामान्यतः शिक्षण, समाज सुधारणाविषयक परिषदा, शिक्षणसंस्था, वसतिगृहे, बुद्धविहार, कन्या शाळा, स्त्री सुधारणाविषयक कार्य करणाऱ्या संस्था, सांस्कृतिक उपक्रम, नागरी उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था यांच्या उपक्रमात त्यांनी भाग घेतला. मुंबई, पुणे, सातारा, भोर येथील संस्थांच्या कार्याबद्दल जिज्ञासा त्यांना असायची. सभा, समारंभ, खास कार्य अशाप्रसंगी मार्गदर्शक भाषणे द्यायची. या संस्थेच्या विचार-नेतृत्वास बडोदे येथे निमंत्रितही करायचे, प्रसंगी महाराष्ट्रातली गुणी-विद्वान माणसे बडोद्याच्या सेवेत न्यायची हे सारे मराठीपण-पुरोगामीपण यांचेच उपक्रम होते. सयाजीरावांनी संबोधित केलेल्या संस्था पाहा -

सार्वजनिक सभा, पुणे (२९/१२/१८८१), ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई (२९/३/१९०१), न्यू स्कूल, पुणे (११/६/१९०४), महाराष्ट्र स्त्री शिक्षण मंडळी (८/७/१९०४), सामाजिक परिषद, मुंबई (३०/१२/१९०४), भोर येथील शाळा बक्षीस समारंभ (१६/९/१९०४), डिप्रेस्ड क्लास मिशन शाळा, (मुंबई-पुणे, २६/९/१९०९ / १८/१०/१९०९), द्वारकेविषयी चर्चा, मुंबई (१८/१०/१९०९), आर्यन ब्रदरहूड-सामाजिक चर्चा (३०/११/१९१०), मुंबई मराठी ग्रंथालय, नवीन इमारत पायाभरणी (१७/१२/१९१०), ग्रंथ संपादक मंडळी, मुंबई (१७/१२/१९१०), हिंदू क्लब मुंबई वार्षिक संमेलन ३ रे (१८/१२/१९१०), बॉम्बे सॅनिटरी असोसिएशन (५/४/१९११), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत उद्‍घाटन (७/११/१९१२), भारतीय अस्पृश्यता निवारण संमलेन, मुंबई (२३/३/१९१८), उदोजी मराठा वसतिगृह, नाशिक (१२/३/१९१८), तत्त्वज्ञान परिषद, मुंबई (१९/१२/१९१७), ग्रंथ प्रकाशक मंडळी मुंबई रौप्यमहोत्सव (१७/१/१९३०), आनंदविहार मुंबई-बुद्धविहार उद्‍घाटन (२/५/१९३१), मराठा समाज, पुणे (२०/३/१९३३), मुंबईत भेट (२२/३/१९३३), उपनगर म्युनिसिपालटी, पुणे मानपत्र प्रदान (१८/४/१९३३), स्टुडन्टस् लिटररी ॲण्ड सायंटिफिक

सोसायटी, मुंबई-शाळा (२६/२/१९३४). करसनदार मुळजी शतसांवत्सरिक उत्सव, मुंबई (१९/३/१९३४), मानपत्र व गौरव, सातारा (१४/४/१९३३), आदिवासी परिषद साल्हेर-बागलाण (१९३७) इत्यादी सयाजीरावांनी सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन, सांस्कृतिक विषयांवर या मराठी संस्थांना वैचारिकदृष्ट्या पाठबळ दिले. शाळा, वाचनालये, नागरी सुधारणा संस्था-मंडळ्या यांनी सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्र घडवला आणि संस्थांना वैचारिकतेने प्रभावित केले होते, ते सयाजीरावांनी. या संस्थांमध्ये तज्ज्ञतेने मार्गदर्शन करणारे सयाजीराव राजकीय नेतृत्वाच्या जोडीने किंबहुना अधिक बौद्धिक नेतृत्व करीत होते. स्त्री-पुरुष समता, सामाजिक समता, अस्पृश्यता निवारण आणि या सर्वांचा पाया म्हणजे शिक्षण होय. महाराष्ट्राच्या वैचारिक आणि शैक्षणिक उत्थानात ते अग्रभागी होते. महाराष्ट्राच्या उत्थानात भाग घेताना भारतातील इतर सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय संस्थांनाही ते संबोधित करीत होते.

वैचारिक पाठबळाबरोबरच आर्थिक साह्य तर महाराष्ट्राबरोबरच भारतीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनाही सयाजीरावांनी केले. चिं. वि. जोशी यांनी अशा संस्थांची नावे व रक्कम 'श्रीमंत सयाजीराव महाराजांचे दातृत्व' या लेखात दिले आहे. (गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१०/पृ. २०६-२१९). १९३३ पर्यंतच्या या नोंदी महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक, शैक्षणिक कार्य करणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. उदा. अजबखान, पुणे, पशू क्लेशनिवारक मंडळी, पुणे, ललितकला प्रदर्शन, पुणे, मेथॉडिस्ट एपिस्कोपल प्रार्थना मंदिर बांधणी, लष्कर, पुणे, विश्रामबाग वाड्याचा जीर्णोद्धार, माजगाव कॉन्व्हेंट व सेंट एलिझाबेथ विधवा आश्रम, आंतरराष्ट्रीय प्रदर्शन, मुंबई, वांद्रे, धमार्थ दवाखाना, पुणे फीमेल हायस्कूल मुलींसाठी शिष्यवृत्ती, मराठे, कुणबी, माळी वगैरे लोकांमध्ये शिक्षण प्रसार करण्यासाठी गंगाराम भाऊ म्हस्के यांना अर्थसाह्य, खालच्या कुलाब्यात शाळा स्थापन करण्यासाठी अर्थसाह्य, क्षात्रधर्म प्रतिपादक सभा, मुंबई, वैतरणा संकट निवारण फंड, थेराप्युटिक्सच्या शिक्षकांचा तीन महिन्यांचा पगार, मुंबई, फर्ग्युसन कॉलेज, पुणे इमारतीसाठी निधी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांना आश्रयदातृत्वाची देणगी, डॉ. रा. गो. भांडारकर यांना शाळेसाठी आर्थिक मदत, गायन समाज, पुणे, ग्रँट मेडिकल कॉलेज वसतिगृह बांधणीसाठी देणगी, कान व घशाच्या आजारासाठी व्याख्याने आयोजन खर्च

म्हणून ग्रँट मेडिकल कॉलेजला आर्थिक देणगी, मराठा विद्यार्थ्यांस मदत, धारवाड, अनाथ बालिकाश्रम, हिंगणे, पंचाग संशोधन मंडळ, सर भालचंद्र यांना देणगी, शेतकी प्रदर्शनासाठी सर वि. दा. ठाकरसी यांना अर्थसाहाय्य, स्टुडंट लिटररी आणि सायंटिफिक सोसायटी, मुंबई, शिवाजी हायस्कूल, मुंबई, महारोगी आश्रम, मुंबई नगरपालिका, महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मंडळ, मूक विद्यालय, मुंबई, सज्जनगडावर मंडप बांधणीसाठी अर्थसाहाय्य, पुणे, नेटिव्ह इन्स्टिट्यूशन इमारतीसाठी निधी, डेक्कन व्हरनॅक्युलर सोसायटी, पुणे, रानडे स्मारक फंड, पुणे, फीमेल हायस्कूल, टाटा स्मारक फंड, रॉयल म्युझियम, मुंबई, राष्ट्रीय सामाजिक परिषद, कार्ला आरोग्य भुवन, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे, दादाभाई स्मारक फंड, बॉम्बे आर्ट सोसायटी, एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई, शारीरिक खेळांचे व कुस्त्यांचे सामने, अखिल भारतीय पातळीवरील, मुंबई, उदोजी बोर्डिंग नाशिक इमारतीसाठी, महाभारताच्या प्रकाशनासाठी, भांडारकर प्रा. वि. सं. मंदिर, पुणे, मराठा युद्धस्मारक, सोशल वर्कर्स परिषद, मुंबई, रायगड किल्ला, धर्मशाळा, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, पुणे, ज्ञानप्रकाश छापखान्यास आग लागून झालेल्या नुकसानभरपाईचा फंड इ.

यातील जवळपास सर्वच संस्थांना महाराष्ट्राच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकासाचे काम करीत संस्था किंवा व्यक्ती यांना अर्थसाहाय्य किंवा देणग्या देताना एकरकमी मोठी रक्कम न देता काम पाहून टप्याटप्याने दिल्या जात, १९२७ पर्यंतच्या देणग्या स्वीकारणाऱ्या संस्थांच्या या नोंदी आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संघटना, संस्था, स्मारकनिधी, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संपत्ती यांना या देणग्या दिलेल्या आहेत. लक्षावधी रुपये दानासाठी वापरतात, त्या रक्कमा सयाजीरावांच्या खासगी उत्पन्नातून दिल्या आहेत. 'सरकारांमार्फत मोठाल्या देणग्या देण्यात येतात, त्या वेगळयाच' असेही चिं. वि. जोशींनी नोंदविलेले आहे.

कवी, कलावंत, विद्वान, तज्ज्ञ यांनाही त्यांनी राजाश्रय दिलेला होता. दलित, उपेक्षित वा वंचित यांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात हा ध्यास सयाजीरावांना होताच. उपेक्षित, वंचितांसाठी, शिक्षण प्रसारासाठी, सामाजिक सुधारणांसाठी उदार मनाने देणग्या त्यांनी दिल्या. बहुजन समाज, मराठा समाज परिषद, अस्पृश्यता निवारण कार्य करणारी मंडळी आदींना औदार्य दाखविताना समता प्रतिष्ठापना

हे सूत्र सयाजीरावांनी अखंड जपले. मराठा समाजाच्या मंडळींना मदत करताना सामाजिक सुधारणा, सामाजिक समता यांची आठवणही करून देत. सहिष्णुता, बंधुभाव, समता आणि निखळ ज्ञाननिष्ठांचा आग्रह ते करीत असत. परिवर्तनशील काळात क्षत्रियवृत्ती धारण करताना सैन्यात दाखल व्हावे; परंतु शिक्षण घेऊन स्वतःचे उद्योग-व्यवसाय उभारावेत, भाऊबंदकी करण्यापेक्षा सहकाराचे तत्त्व स्वीकारून व्यापार करावा, धंदेशिक्षणात लक्ष घालावे, 'विशिष्ट जात, विशिष्ट व्यवसाय' यांचा आता संबंध नाही. कला, कौशल्ये, तंत्रज्ञान, उद्योजकतावर्धक ज्ञान, व्यवसाय शिक्षण घ्यावे, जातीसंस्था तेढ-भेद निर्माण करते, तिचा विसर पडावा, सर्वांना आपल्या बरोबरीने घ्यावे वगैरे खास उद्बोधन मराठा समाजाला त्यांनी केले आहे. ज्ञानलालसा आणि कष्टाळूवृत्ती यांचा संयोग घडवून आणण्याकडे त्यांचा कल होताच.

बडोदा हे सर्व प्रकारच्या आधुनिक शिक्षण सुविधा असणारे शहर म्हणून सयाजीरावांच्या कारकिर्दीत उदयास आले. सर्व शिक्षण केंद्र, आधुनिक विद्याशाखा केंद्र, असे त्याचे स्वरूप बनल्यामुळे बहुजनांतली, मराठे समाजातील कितीतरी होतकरू मंडळी बडोद्याला शिक्षणासाठी जाऊ लागली. पुणे हे तेव्हाही विद्येचे माहेरघर मानले जायचे आणि मुंबई हे व्यापार, शिक्षणाचे अत्याधुनिक केंद्र होते; परंतु बहुजन समाजातले लोक 'आपला राजा, मराठ्यांचे राज्य' म्हणून बडोद्याला जाऊन उच्चशिक्षित बनले. कला, क्रीडा, प्राच्यविद्या, वास्तुशिल्पविद्या, रसायने, रंग, वस्त्रोद्योगविद्या, नगररचना, कृषी विद्या या आधुनिक शिक्षणासाठी मराठमोळे वाटावे असे विद्याकेंद्र बनले होते. जगभरातील कला, क्रीडा, चित्र-शिल्प, व्यवसाय, भाषा, शास्त्रे यातील तज्ज्ञ बडोद्यात असल्यामुळेही बहुजनांना 'बडोदे शिक्षण' आकर्षक वाटत होते. उच्च दर्जाचे कला-कौशल्य किंवा ज्ञान कमावले, यश मिळवले तर शिष्यवृत्ती योजनेतून परदेशी जाऊन शिक्षण घेता येत असे, कर्जाऊ शिष्यवृत्ती योजनाही होती. 'बहुजनांचा राजा' म्हणून बडोद्यात सरकारी नोकरीही मिळण्याची शक्यता असायची.

महाराष्ट्रातल्या विविध कर्तबगार व्यक्तींचे उच्चशिक्षण, धंदेशिक्षण, कलाशिक्षण बडोद्यात झाल्याचे दिसते. महाराष्ट्रातल्या मराठा समाज परिषदा, मराठा समाजाची वसतिगृहे यात शिक्षण घेणाऱ्यांना अप्रत्यक्षपणे सयाजीरावांची प्रेरक मदत मिळत असे. समाज सुधारकी संस्थांना वर्षासने, निधी, शिष्यवृत्तीसाठी निधी राखीव

असल्याने महाराष्ट्रातील दोन-तीन पिढ्या सयाजीरावांच्या हयातीत उच्चशिक्षित होऊ शकल्या.

महाराष्ट्रातील प्रतिभावंत आणि सयाजीराव

ना. गोखले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, लोकहितवादी, डॉ. केतकर आणि म. फुले ही महाराष्ट्रातील कर्ती-प्रतिभावंत मंडळी होत. यांच्याशी सयाजीरावांचे वैचारिक देवघेवीचे नितळ स्नेहबंध होते, त्यांच्या संस्था व विचार प्रसारणाला सयाजीरावांची मोठी मदत झाली. म. फुले यांनी तर सयाजीरावांनी आदर्श राज्य निर्माण करताना स्त्री-शूद्रांची काळजी वाहावी, शिक्षणप्रसार करावा असे साकडेच घातलेले होते. म. फुले यांच्या विचारांचे, सत्यशोधकीय कारकिर्दीचे अगत्यही होते.



युग पुरुषांशी सयाजीरावांचे स्नेहबंध

रामचंद्र धामणस्कर हे सत्यशोधकीय कार्यकर्ते सयाजीरावांकडे नोकरीत होते. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे नायब सुबे ते थेट दिवाणपदी पोहोचले होते. धामणस्करांमुळे म. फुले व सयाजीराव यांच्यात स्नेहबंध निर्माण झाले. 'शेतकऱ्याचा असूड'चे वाचन म. फुल्यांनी केले, सयाजीरावांनी त्यातील आशयही समजावून घेतला. म. फुले यांची 'दलितोद्धार', 'स्त्री स्वातंत्र्य' आणि 'हिंदुस्थानातील शेतकरी' या विषयांवर बडोद्यात व्याख्यानेही आयोजित करण्यात आली होती. सयाजीराव म. फुले यांच्यातील संबंध सामाजिक सुधारणावादी विचार-कृतींमुळे घट्ट झालेले होते. सयाजीरावांना म. फुले यांच्यासंबंधी उच्च दर्जाचा आदरभाव होता.

"...महाराज पुण्यास आले म्हणजे जोतिरावांकडे आपली घोडागाडी पाठवून त्यांना भेटीस बोलावत असत. महाराजांनी मागासलेल्या बहुजन समाजाच्या समाज सुधारणेकडे लक्ष पुरवावे म्हणून जोतिरावांनी प्रथम प्रथम प्रथम चांगले प्रयत्न केले व त्यांना त्यात यश येऊन येऊन महाराज जेव्हा बहुजन समाजाच्या सुधारणेकडे लक्ष देऊ लागले तेव्हा त्यांना मोठा आनंद झाला होता..."

"...तर यासंदर्भात म. फुल्यांचे व्याही श्री. ग्यानोबा कृष्णाजी ससाणे लिहितात, की श्रीमंत सयाजीराव महाराज जोतिरावांचा फार मान राखतात. ते जोतिरावांशी सल्लामसलत करून समाजसुधारणा करत असत. थोडक्यात म. फुले आणि सयाजीराव महाराज या उभयतांना परस्परांसंबंधी कमालीचा आदर होता..."

(उद्धृत/म. फुले आणि बडोद्याचे सयाजीराव गायकवाड/डॉ. रमेश जाधव/ गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. ५१८ ते ५२३)

सयाजीरावांच्या समता प्रतिष्ठापनेची प्रेरणा म. फुले यांच्या कृती-लेखन व सान्निध्यातून मिळाली होती. म. फुले यांना आर्थिक मदतही त्यांनी केली होती. सयाजीराव म. फुले यांची योग्यता एका पत्रात नोंदवतात-

"...तत्कालीन समाजाचा जुलूम त्यांना अत्यंत सहन करावा लागला. त्यामुळे त्यांच्या भाषेत कठोरपणा साहजिकच दिसून येतो. पूर्वी अमेरिकेत बुकर टी वॉशिंग्टन याने ज्याप्रमाणे तेथील निग्रो लोकांच्या मागासलेल्या जनतेच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. त्याचप्रमाणे जोतिरावांनी हिंदुस्थानातील मागासलेल्या जनतेच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. त्यांना गरीब, दुबळ्यांची खरी कळकळ असे आणि असे लोक हिंदुस्थानात निपजतील, तर हिंदुस्थान झपाट्याने पुढे येईल, यात शंका नाही."

(उद्धृत/पूर्वोक्त/पृ. ५२३)

वैचारिक घुसळणीच्या काळात सयाजीरावांना म. फुले यांचे विचार-दर्शन भावलेले होते. समता प्रस्थापनाचे सयाजीरावांचे काम अशा दर्शनामधून चलित झालेले होते.

न्या. महादेव गोविंद रानडे यांनी नवशिक्षितांच्या पहिल्या पिढीतले विचारवंत म्हणून समताधिष्ठित-सुधारकी विचारांचा महाराष्ट्र घडविण्याचे कार्य केले. धर्म, सुधारणा, सामाजिक सुधारणा व शिक्षणविस्तार आधी व्हावा, असे त्यांना

अपेक्षित होते. न्या. रानडे यांनी ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्यावरही याच सनदशीर सुधारणांचा संस्कार केलेला होता. पहिल्या पिढीतले नेमस्त पुढारी विचारवंत कार्यकर्ते म्हणून न्या. रानडेंनी विविध माध्यमांमधून प्रयत्न केलेले होते. राजकीय सुधारणा म्हणजे स्वराज्यप्राप्ती होण्यापूर्वीच सामाजिक सुधारणा व्हाव्यात असेच त्यांना वाटत होते. दि. ब. रघुनाथराव, सर टी. माधवराव यांच्या सहकार्याने त्यांनी 'राष्ट्रीय सामाजिक परिषद' स्थापन केली होती. सयाजीरावांनाही सामाजिक, धार्मिक सुधारणांची आस्था होती. शिक्षणप्रसार व सामाजिक सुधारणा हेच प्रजाकल्याणाचे सूत्र सयाजीरावांनी जोपासले होते. सामाजिक परिषदांच्या निमित्ताने सयाजीराव न्या. रानडे यांच्या कार्याकडे आकर्षित झाले होते.

काँग्रेसचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनी काँग्रेसने राजकीय प्रश्नांची मांडणी करावी. काँग्रेसचे स्वरूप राजकीय आहे म्हणून काँग्रेसने सामाजिक प्रश्नांचा विचार करावा, असे आग्रही प्रतिपादन केले. रघुनाथराव आणि रानडे यांना दादाभाईंची ही भूमिका मान्य नव्हती. 'म्हणून १८८७ साली मद्रास येथील काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी त्यांनी काँग्रेसशी संलग्न असलेली पण; स्वतंत्र अशी संस्था स्थापना केली व त्या संस्थेचे नाव 'राष्ट्रीय सामाजिक परिषद' असे ठेवले.' (न्या. महादेव गोविंद रानडे/त्र्यं. कृ. टोपे/रोहन प्रकाशन, पुणे/दुसरी आवृत्ती/२०१४/पृ. २९६) स्थानिक सुधारणांच्या चळवळींना प्रोत्साहन देणे आणि वर्षातून एकदा त्या चळवळीतील व्यक्तींनी एकत्र येऊन परस्परपरिचय करणे, सामाजिक चळवळींसाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविणे इ. उद्दिष्टे या परिषदेची होती. न्या. रानडे यांच्या सामाजिक परिषद अधिवेशनात सयाजीराव सहभागी होत असत. अठरावी सामाजिक परिषद ३० डिसेंबर १९०४ रोजी झाली होती. या परिषदेचे प्रास्ताविक भाषण सयाजीरावांनी केले होते. सामाजिक सुधारणांचा पाया राष्ट्रीय तत्त्वांवर रचावा. देशाची खरी सुधारणा सर्व प्रजाजनांस जी पुढे नेईल तीच होय, असे विचार त्यांनी परिषदेत मांडले.

सयाजीरावांच्या सामाजिक सुधारणांच्या कार्यास न्या. रानडे वा महाराष्ट्रातील तत्कालीन सुधारकी विचारांचा, कार्यकर्त्यांचा पाठिंबा असायचा. न्या. रानडे यांनी दिवाणपदी यावे, अशी सयाजीरावांची इच्छा होती. सविनय नकार कळवताना न्या. रानडे यांनी बडोदा राज्यकारभारात करायच्या सुधारणांचे मार्गदर्शन केले

होते. सत्तेचे विक्रेंद्रीकरण, लोकशाही समतावादी राज्यप्रणाली आदी सूत्रे त्यांनी सांगितली होती.



भारत सेवक समाजास पाठबळ

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी १२ जून १९०५ रोजी भारत सेवक समाज या संस्थेची पुण्यात स्थापना केली होती. न्या. रानडेंच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होताच. सामाजिक विकास, मानवकल्याणकारी विकास, व्यक्ति विकास ही भारत सेवक समाजाची कार्यसूत्रे होती. व्यक्तिजीवनात आणि सामाजिक जीवनात सुधारणा व्हाव्यात, शिक्षण प्रसारातून सुधारणा व्हाव्यात हे या संस्थेचे ध्येय होते. 'लोकसेवा' हे तत्त्व सयाजीरावांना आवडले होतेच. ना. गोखले यांच्या कार्यप्रणालीशी, वैचारिक निष्ठांशी सयाजीराव सहमतही होते. भारत सेवक समाज संस्थेस भेट देणे, संबोधित करणे व इतर पाठबळ देणे अशा तऱ्हेने सयाजीराव ना. गोखले यांच्या संपर्कात आले होते. स्वच्छता, आरोग्य सुधारणा, विषमता निर्मूलन, अस्पृश्यता नष्ट करणे, शिक्षण प्रसार करणे या कृती उपक्रमांबद्दल सयाजीरावांनाही आस्था होतीच.

अस्पृश्यता निवारण व सामाजिक सुधारणाविषयक कार्य करणारे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्यास सयाजीरावांचा सर्वांगीण पाठिंबा व आधार होता.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी सयाजीरावांनी शिष्यवृत्तीही दिली होती. शिष्यवृत्तीची तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर बडोदे सरकारात नोकरीची अटही होती. पदवी प्राप्तीनंतर विठ्ठल रामजी शिंदे यांना धर्मशिक्षणासाठी विलायतेत जायचे होते. विठ्ठल रामजींनी नोकरीकरून कर्जाऊ शिष्यवृत्तीची फेड करणे अपेक्षित होते. ते सयाजीरावांना भेटले व म्हणाले, "महाराज, पदवीपर्यंत शिकवण्यासाठी आपण शिष्यवृत्ती दिली, त्याबद्दल मी बांधील आहे; पण आता माझी धर्मशिक्षणाच्या अभ्यासासाठी विलायतेत शिष्यवृत्तीसह निवड झाली आहे.

मी पत्करलेलं कार्य ईश्वराचं आहे. धर्मसुधारणा, समाजसुधारणा अशा प्रागतिक गोष्टींचं बाळकडू आपण आजपर्यंत पुष्कळच दिलेलं आहे. आता तर विलायतेतील युनिटेरियन समाजानं माझा अर्ज मान्य केला आहे. ही चालून आलेली संधी आपल्या कृपेनं पूर्ण होईल अशा भरवशावरच आपणाकडं आलो आहे. माझ्या प्रवासाचे दीड हजार रुपये जर आपण कृपाळूपणे द्याल, तर अर्थातच माझे मागचे दीड हजार रुपयांचे ऋण फिटले असेच मी समजेन.' (युगद्रष्टा महाराज/ बाबा भांड/साकेत प्रकाशन/२०१२/पृ. २४५)

सयाजीरावांना तौलनिक धर्मशास्त्र या विषयाची आवड होती, शिवाय विठ्ठल रामजी यांचे युक्तिवाद, कौशल्य आणि धर्मचिकित्सा–जिज्ञासा हे सारेच भावले. सयाजीरावांनी प्रवासखर्च येण्या-जाण्याचा मान्य केला. राजकर्तव्य आणि धर्मकर्तव्य यांची सांगड घातली. प्रवासखर्च दिला, आधीची कर्जाऊ शिष्यवृत्ती माफ केली. महत्त्वाचे म्हणजे परत आल्यानंतर नोकरी करण्याची अटही मागे घेतली.

विठ्ठल रामजी शिंदे यांचा महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारमंथनात मोठाच वाटा आहे. सयाजीरावांच्या पुरोगामी विचार कृतींशी विठ्ठल रामजी शिंदे यांचा परिचय होता. सामाजिक समता प्रतिष्ठापना, अस्पृश्यता निवारण, धर्मसुधारणा, सामाजिक सुधारणा या क्षेत्रांत महाराष्ट्राची जडणघडण विठ्ठल रामजींच्या कार्यातून झाली, अशा विठ्ठल रामजींना शिक्षणासाठी मदत करणे ही मोठीच गोष्ट आहे. म. शिंदे यांनी स्थापन केलेल्या डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्यास सयाजीरावांनी सहकार्य केले. सप्टेंबर १९०९ व ऑक्टोबर १९०९ मध्ये डिप्रेस्ड क्लास मिशनच्या पुणे व मुंबई येथील शाळांच्या बक्षीस समारंभास ते उपस्थित राहिले, सामाजिक समतेचे विचारसंस्कार त्यांनी केले. सयाजीरावांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याबद्दल विठ्ठल रामजींनी गौरवोद्गार काढले आहेत. हे कार्य विस्तृत व दूरगामी असून, समाजसुधारणेसाठी हळूहळू लोकमत घडवून केल्याबद्दल, कार्यकौशल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. ते म्हणतात, 'महाराज हे एक अस्पृश्य निवारकच नसून अस्पृश्योद्धारकही आहेत.' विठ्ठल रामजींनी इ. स. १९१८ मध्ये निराश्रित साह्यकारी मंडळींची एक खास अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद भरवली होती. तिचे अध्यक्ष सयाजीराव होते. त्यावेळच्या अध्यक्षीय भाषणास 'एक महत्त्वाचे वाङ्मय' असे संबोधले आहे. श्री. महाराजांचे अस्पृश्योद्धारक कार्य' या लेखात विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात, ''इ. स. १९०३ च्या सप्टेंबरअखेर

मी ऑक्सफर्ड विद्यालयातील धर्मशिक्षण संपवून स्वदेशी आलो. महाराजसाहेबांनी मला लगेच भेटीला बोलावले आणि बडोदे शहरातील अंत्यजांच्या त्यावेळी चार शाळा बऱ्या चालल्या होत्या, त्या तपासून मला काय वाटते ते समक्ष कळविण्याची आज्ञा केली... एकंदर या थोरपुरुषाच्या अंतःकरणात या हतभागी लोकांचा ध्यास लागला होता, हे माझ्या ध्यानात तेव्हाच येऊन चुकले. इतकेच नव्हे, तर या महत्त्वाच्या विषयासंबंधी माझ्या स्वतःच्या विचाराला नवीन प्रोत्साहन मिळून ब्राह्मोसमाजाच्या अखिल भारतातील माझ्या कार्याबरोबर या लोकांची निरनिराळ्या प्रांतांतील स्थिती स्वतः डोळ्यांनी निरखून अजमावण्याची मलाही प्रेरणा मिळाली..."
(गौरवगाथा युगपुरुषाची/संपादक बाबा भांड/२०१७/महाराष्ट्र शासन/पृ. ३०४)
या उद्धृतातील 'हतभागी लोकांचा ध्यास' आणि 'मलाही प्रेरणा मिळाली' हे शब्दबंध कळीचे मुद्दे आहेत. विठ्ठल रामजी शिंदे यांनी वंचित, उपेक्षितांसाठी मोठे काम केले होते, सामाजिक सुधारणा, धर्मसुधारणा ही दोन्ही क्षेत्रे सयाजीरावांची आस्था केंद्रे होती. विठ्ठल रामजी शिंदे जेव्हा सयाजीरावांमध्ये- त्यांच्या आस्थाकार्यामध्ये प्रेरणा शोधतात तेव्हा सयाजीरावांच्या सामाजिक सुधारणांचे द्रष्टेपण ठळक होते. विठ्ठल रामजींनी 'ते अखिल भारताचे एक अग्रगण्य पुढारी होते,' असा गौरवही केला आहे. डिप्रेस्ड क्लास मिशनला वैचारिक पाठबळ, अस्पृश्योद्धार निबंधपुस्तिका व 'स्पर्शास्पर्श' पुस्तकाचे प्रकाशन, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती वगैरे सयाजीरावांच्या कृतींनी विठ्ठल रामजी भारावून गेले होते.

सामाजिक समता व अस्पृश्यता निर्मूलन चळवळीचे उद्गाते डॉ. बाबासाहेब आंबेडकरदेखील सयाजीरावांच्या समता प्रतिष्ठापना, मानवमुक्ती, सामाजिक सुधारणा व धार्मिक सुधारणा या कार्याशी परिचित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य-दिव्य शैक्षणिक कारकिर्दीची जडणघडण सयाजीरावांच्या शिष्यवृत्तीमुळे होऊ शकली. १९०७ साली मॅट्रिकच्या परीक्षेत बाबासाहेब एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये उत्तीर्ण झाले. डबका चाळीतल्या लोकांना आनंद झाला, एक समारंभ आयोजित केला गेला. अस्पृश्य जातीतला विद्यार्थी मॅट्रिक होणे ही अभिमानाची आणि आनंदाची घटना होती. अभिनंदन समारंभास हायस्कूलचे मुख्याध्यापक कृ. आ. केळुसकरही उपस्थित होते. बाबासाहेबांना कॉलेज शिक्षण मिळावे असे केळुसकरांना वाटले; पण कौटुंबिक, आर्थिक अडचणींमुळे ते अशक्य असल्याचे लक्षात आले. दामोदर सावळाराम यंदे हे पुस्तक प्रकाशक

आणि वृत्तपत्रांचे प्रकाशक होते, केळुसकरांच्या परिचयातले होते. केळुसकरांनी यंदे यांच्यामार्फत बाबासाहेबांची सयाजीरावांशी भेट घडवून आणली. अस्पृश्य जातीतला मुलगा कॉलेज शिक्षण घेऊ पाहत आहे, सयाजीरावांना खूप आनंद झाला. स्पेशल केस म्हणून पन्नास रुपये दरमहा शिष्यवृत्ती मंजूर केली. सयाजीराव म्हणाले, "शिक्षण संपादन केल्यानंतर तुम्ही आपल्या जातीच्या व विद्येत मागे पडलेल्या लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्याची कामगिरी हाती घेतली पाहिजे. आम्ही बडोद्यात अस्पृश्य आणि शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य सुरू केले आहे. त्या कार्याप्रीत्यर्थ तुम्ही आपल्या शिक्षणाचा व ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे." (गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. ३१५) पाच वर्षांच्या शिष्यवृत्तीचे आर्थिक पाठबळ मिळाल्याने आपल्या बौद्धिक गुणवत्तेवर जानेवारी १९१३ मध्ये बाबासाहेब बी. ए. उत्तीर्ण झाले. अटीनुसार बाबासाहेब बडोद्यात मिलिटरी विभागात शिकाऊ उमेदवार म्हणून नोकरी करू लागले . कार्यालयातील लोकांचे भेदभावाचे वागणे बाबासाहेबांना जाचक वाटले. राग, नैराश्य अशा अवस्थेत वडिलांच्या आजारपणात ते मुंबईस परतले, वडील निवर्तले. त्याकाळात सयाजीराव मुंबईत होते. बाबासाहेब त्यांना भेटायला गेले, बडोद्यातल्या अपमानकारक घटनाही सांगितल्या.

सयाजीरावांनी बाबासाहेबांना अमेरिकेतील उच्च शिक्षणासाठी पाठवायचे ठरवले. १५ जून १९१३ ते १४ जून १९१६ पर्यंतची शिष्यवृत्ती मंजूर केली. कोलंबिया विद्यापीठातून बाबासाहेब २ जून १९१५ ला एम. ए. उत्तीर्ण झाले. अर्थशास्त्रात पीएच. डी. करावी आणि बॅरिस्टर व्हावे, असे त्यांना वाटले. जून १९१६ ला शिष्यवृत्ती बंद होणार असल्याने सयाजीरावांकडे दोन वर्षे शिष्यवृत्ती मुदत वाढीसाठी अर्ज पाठवला, दिवाणांनी आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. सयाजीरावांनी एक वर्ष शिष्यवृत्ती चालू ठेवण्याचा निर्णय केला. लंडनला 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्ये प्रवेश मिळवला. एका वर्षात बरेच काम केले; पण अवधी कमी होता. पुन्हा कागदपत्र, विनंती सारे सोपस्कर होऊन दिवाणांनी शिष्यवृत्ती मुदतवाढ नाकारली. नियमांचे बंधन दाखवले. बाबासाहेबांना परत यावे लागले. जुलै १९१७ ला ते मुंबईस परतले. अर्थखात्यात मंत्री म्हणून बाबासाहेबांना नेमण्याचा सयाजीरावांचा विचार होता. सुरुवातीला मिलिटरी खात्याचे सेक्रेटरी म्हणून नियुक्ती झाली. अस्पृश्यता पाळणाऱ्या

सहकाऱ्यांकडून, हाताखालच्या कर्मचाऱ्यांकडून भेदभावाची वागणूक मिळाली. ३१ ऑगस्ट १९१७ ला सयाजीरावांची त्यांनी भेट घेतली, "ही परिस्थिती नाजूक आहे. त्याबद्दल मलाही एकदम अधिकार गाजवून सवर्ण हिंदू लोकांत असंतोष माजविता येत नाही, आहे त्या परिस्थितीत धैर्याने तोंड देत राहा," असे सयाजीरावांनी समजावून सांगितले. बाबासाहेबांना अवमान सहन करणे अशक्यच झाले. सयाजीरावही प्रवासास निघून गेले होते. अवमानकारक वागणूक दिली जाते, हे सारे असहनीय झाले, सामान्यतः १९१७ ला तीनेक महिने बाबासाहेब बडोद्यात राहिले आणि मुंबईस परतले.

पुढे पुणे अहिल्याश्रमात सयाजीरावांनी भाषणात सांगितले, "अस्पृश्यवर्गीय पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी आम्हीच मदत केली. अमेरिकेतील उच्चशिक्षण माझे खर्चाने दिले. ते परत आल्यानंतर बडोद्यात नोकरी दिली होती; परंतु त्यांना राहावयास घरासंबंधी अडचण आल्यामुळे ते मुंबईस गेले. ते गेल्यामुळे त्यांच्यावर आमचा रोष न राहता आम्हास आनंदच झाला; कारण ते शिकून शहाणे होऊन आपल्या समाजाच्या उद्धाराचे काम करीत आहेत. ते बघून आमचा हेतू सफल झाला असेच आम्हाला वाटते..." (पूर्वोक्त/पृ. ३१८)

त्यानंतर बाबासाहेबांचा सयाजीरावांशी फारसा संबंध आलेला नाही. १९३१ साली लंडन गोलमेज परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते, सयाजीरावांचेही परिषदेत भाषण झाले. डॉ. बाबासाहेबांचे भाषण ऐकून सयाजीराव अत्यंत प्रभावित झाले. अस्पृश्योद्धाराचे डॉ. बाबासाहेबांचे कार्य सयाजीरावांना महत्त्वाचे वाटले, सयाजीरावांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कौतुक केले, सर्वांना मेजवानी दिली. मेजवानीदरम्यान अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मी काम करीत आहे, याकरिता आपण आर्थिक साहाय्य करावे, असे विनंतिपत्र डॉ. बाबासाहेबांनी सयाजीरावांना दिले, सयाजीरावांनी १५० पौंडांचा चेक तात्काळ सुपूर्त केला.

सयाजीरावांच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्याचा आणि सामाजिक सुधारणांसाठी शिक्षणविस्ताराचा अत्युच्च शिखरबिंदू म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ. बाबासाहेबांना बडोद्यात मिळालेली विषम वागणूक, अपमान क्षण पाहता त्यांना कटुता निश्चितच वाटली असेल; परंतु सयाजीरावांना डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांचा निश्चितच अभिवान वाटत होता. १९३१ नंतर सयाजीरावांची व डॉ. बाबासाहेबांची भेट झालेली दिसत नाही. डॉ. बाबासाहेबांच्या मनात सयाजीरावांबद्दल कृतज्ञताभाव होता, शैक्षणिक उत्थानात सयाजीरावांनी केलेल्या मदतीचे संस्मरणही अखेरपर्यंत होते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या निर्मितीतून बहुजन समाज, अल्पसंख्य व अस्पृश्य समाज यांच्या शैक्षणिक उन्नतीचा ज्ञानयज्ञ चालविलेला होता. शाहू महाराजांचाही कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यास सक्रिय पाठिंबा होता. स्वावलंबी शिक्षण, जातिअंताचे शिक्षण, समत्त्वावर आधारलेले शिक्षण, गांधी विचारांचा प्रभाव असलेले जीवन शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नित्य शैक्षणिक प्रयोगात होते. अस्पृश्य आणि बहुजन समाजाला स्वावलंबनाचे धडेच भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक संस्थेतून दिले जात होते. वाई, सातारा येथे सत्कार-भेटी असे करीत करीत आठवणीने भाऊरावांच्या कळकळीच्या विनंतीवरून सयाजीराव श्री. शाहू छत्रपती बोर्डिंग हाऊसला पोहोचले. हे बोर्डिंग हाऊस सर्व जातीपातींच्या विद्यार्थ्यांना आश्रय देणारे होते. भाऊरावांनी उत्तम स्वागत, सत्कार केला. (१६ एप्रिल १९३३) भाऊरावांनी स्वागतपर भाषणात पूर्वस्मृतींना उजाळा देत सयाजीरावांचा गौरव केला, ''महाराज, आपण थोर विभूती असून, आपल्या विलक्षण राज्यपद्धतीमुळे व राजकारण, पटुत्वामुळे फक्त हिंदुस्थानचेच नव्हे तर अखिल दुनियेचे डोळे आपल्याकडे वेधून घेतले आहेत. त्याशिवाय आपण कट्टे सुधारक व उच्चत्तम कोटीतील देशभक्त आहात. १९०६ साली मी आपले अंत्यजोद्धारासंबंधी भाषण वाचले व त्या भाषणाने माझ्या मनामध्ये अतिशय खळबळ उडवून दिली. मी तेव्हाच निश्चय केला, की श्रीमंत महाराजांनी दर्शविलेल्या विचारांप्रमाणे व व्यक्त केलेल्या ध्येयास अनुसरून आजन्म प्रयत्न करावयाचा. उपजीविकेस साधन म्हणून नोकरी करून जे काही पैसे शिल्लक राहतील ते हीन मानलेल्या लोकांस ज्ञान देऊन त्यांना पुढे आणण्यामध्ये खर्च करावयाचे...'' (लोकपाळराजा सयाजीराव/बाबा भांड/साकेत प्रकाशन/आवृत्ती ४ थी/२०१६/पृ. २०९) यावरून दिसून येते, की सयाजीरावांच्या कृती, उक्ती महाराष्ट्राला प्रेरक ठरत होत्या. अंत्यजोद्धारासंबंधीचे सयाजीरावांचे कामकाज, विचार, कायदे आणि प्रत्यक्ष वर्तन हे पुरोगामित्वाचे निदर्शक होते. त्यामुळेच भाऊरावांना उपेक्षित, वंचित, अंत्यज यांच्या शिक्षणासाठी संस्था उभारणीचे

प्रेरक बळ मिळाले. स्वाभिमान व स्वावलंबीपणाचे शिक्षण, ज्ञान देण्याची योजना मिळाली. याच स्वागतपर भाषणात भाऊराव पाटील म्हणाले -

"येथे आम्ही विद्यार्थ्यास स्वाभिमानी होण्यास शिकवतो. आम्ही याचना करीत नाही व त्यांना याचना करण्यास शिकवत नाही. दान देण्यास हात वर ठेवा; पण ते घेण्यास हात पसरू नका असे आम्ही त्यांना सांगतो आणि म्हणूनच कष्ट सोसण्यास ते उद्युक्त होतात. या संस्थेतून ते स्वाभिमानी, कार्यक्षम व उदारमतवादी नागरिक बनून बाहेर पडतील, असे ध्येय आम्ही ठेविले आहे..." (पूर्वोक्त/पृ. २१०) भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक भूमिकेचे दर्शन या उद्‌गारांमधून घडते. सयाजीरावांनी कार्यगौरव केला आणि सांगितले, 'आज आपल्या देशात सर्व जातींची मुले एकत्रित राहतील, अशा बोर्डिंगांची खरोखर फार जरूरत आहे... खरा धर्म म्हणजे समता आहे... सर्व जातींत ज्ञानप्रसार होण्यानेच खरी सुधारणा होईल...' सयाजीरावांची समताधिष्ठित जीवनदृष्टी आणि शिक्षणविस्ताराची भूमिका याही भाषणातून दिसली. अस्पृश्यता निर्मूलन समताधिष्ठित, सामाजिक न्यायाची चाड असलेला मूल्यसंस्कारित समाज, राष्ट्र अस्तित्वात यावे, हेच त्यांचे ईप्सित होते. सयाजीरावांनी बडोदे राज्यात शिक्षणातून संस्कार आणि शैक्षणिक संस्कारांतून सामाजिक सुधारणा असे जे कार्य केले होते, त्या कार्याचेच एक मूर्तिमंत वैचारिक कृतिरूप म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य होय. रयत शिक्षण संस्थेत सामाजिक समता आणि स्वावलंबी शिक्षण या गुरुमंत्रानुसारच कामकाज चाललेले दिसते. तेथील प्रत्येक घटक स्वतःला 'रयतसेवक' असे मानतो. विद्यार्थी, शिक्षक, संस्था सदस्य सर्वांचे 'रयत' हेच एक शैक्षणिक केंद्र ठरते.

रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई सयाजीरावांच्या सेवेत जवळपास ३७ वर्षे होते. बी. ए. झाल्याबरोबर वयाच्या तेविसाच्या वर्षापासून साठ वर्षे पूर्ण होईपर्यंत ते बडोदे राज्याचे अत्यंत विश्वसनीय सेवक होऊन वावरले. सयाजीरावांचे रीडर, खासगी अधिकारी, राजपुत्रांचे शिक्षक, दप्तर विभागाचे प्रमुख अशा विविध पदांवर ते होते. सयाजीरावांच्या संबंधीच्या सर्व कागदपत्रांची, पत्रव्यवहाराची, लिखित, छापील दस्ताऐवजांची उत्तम व्यवस्था त्यांनी लावली. महत्त्वाचे म्हणजे सयाजीरावांच्या नित्य व निकट सहवासातच त्यांची कारकीर्द घडली. सयाजीरावांच्या इतक्या निकट वर्तुळातले ते होते, की सयाजीरावांची

मानसिक आंदोलनेही त्यांच्या लक्षात येत. सयाजीरावांची विद्याव्यासंगी म्हणून जी जडणघडण झाली त्यातही सरदेसाईंचा सहभाग होता. विविध ग्रंथांचे वाचन, ज्ञानोबा-तुकोबा यांचे अभंग, संकीर्तन, इतिहास, तत्त्वज्ञान, धर्म व संस्कृती, राजकारण वगैरे चर्चेचे विषय असत. सयाजीराव आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या सेवेचे काम करीत करीत सरदेसाईंचीही वाढ होत गेली. सयाजीरावांच्या समवेत राजवाड्यात, राज्याच्या दौऱ्यावर किंवा देश, परदेशांत प्रवासातही ते असत. जागतिक वा राष्ट्रीय महत्त्वाच्या पुरुषांचा सयाजीरावांशी संवाद असायचा. ये-जा असायची. अशा अनेक महनीय व्यक्तींचे बौद्धिक सान्निध्य अनायसेच सरदेसाईंना लाभले.

महाराष्ट्रातील विविध विचारवंत, कलावंत, राजकीय नेते, सांस्कृतिक क्षेत्रातील कर्तबगार व्यक्ती बडोदे येथे जात तेव्हा सरदेसाई हे मध्यस्थ वा आधारभूत व्यक्ती असायचे. काही तज्ज्ञ वा लेखक, कलावंत सरदेसाईंकडे उतरत असत. इष्ट-मित्र, प्रसंगी लांब, जवळचे नातेवाईक सयाजीरावांच्या जवळ पोहचताना सरदेसाईंना मध्यस्थी करावी लागत असे. सयाजीरावांच्या विद्याव्यासंगी व जिज्ञासू वृत्तीमुळेच सरदेसाई इतिहास संशोधनाकडे आकर्षित झाले. 'मी सयाजीराव महाराजांमुळेच रियासतकार होऊ शकलो,' असेही ते म्हणत.

सयाजीरावांच्या कार्यकर्तृत्वाचे ते प्रत्यक्ष साक्षीदार होते. 'पुण्यातील कित्येक पुढारी नरसोपंत केळकर, समर्थ विद्यालयाचे विजापूरकर, हिंगण्याचे कर्वे, पांगारकर, प्रो. भानू, अहिताग्नी राजवाडे व इतिहासतज्ज्ञ विसुभाऊ राजवाडे अशा अनेक व्यक्तींना मीच महाराजांकडे आणून भेटवले...' असे त्यांनी नोंदविले आहे. सयाजीरावांची योग्यता प्रकट करताना सरदेसाई म्हणतात, "भारताच्या सामाजिक व वैचारिक जीवनाच्या सुधारणेत सयाजीरावांचा भाग केवढा मोठा आहे याची आता बाहेर फारशी कोणास कल्पना नाही. हळूहळू पन्नास-साठ वर्षे ही सुधारणा केवळ सयाजीरावांच्या पुरस्काराने सर्व देशात न समजता घडून येत होती. विधवाविवाह, वधू-वरांचे योग्य वय, स्पृश्यास्पृश्य, जातीभेदाचे निर्मूलन इत्यादी विषयांचे कायदे व आचार प्रत्यक्षात आणणारे पहिले सत्ताधीश सयाजीराव होत."

(श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात/सरदेसाई/एस. जगन्नाथ आणि कं. पुणे २/१९५६/पृ. ८३)

सयाजीरावांनी सरदेसाईंचीही कारकीर्द उजळून टाकली. सयाजीरावांनी त्यांनी निवृत्ती घेऊ नये, असे सांगून पाहिले. सयाजीरावांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढलेल्या, नातवंडांचे घरच्यासारखे पालकत्व सरदेसाई करू शकले असते. निश्चयी सरदेसाई महाराष्ट्रात परतले, इतिहास संशोधन, ऐतिहासिक कागदपत्रांचे व्यवस्थापन, पेशवे दप्तरांचे संशोधन व रियासतींची निर्मिती त्यांनी महाराष्ट्रात राहून केली.

शिक्षणविस्तारक आणि बहुजनांच्या सर्वांगीण विकसनात स्वतःला झोकून घेणारे बा. ग. जगताप हेदेखील सयाजीरावांच्या सेवेत होते. फेब्रुवारी १९१६ मध्ये खासगी खात्यात ए.डी.सी. म्हणून नियुक्त होते. त्यांनीही उपेक्षितांच्या शिक्षणासाठीच्या सयाजीरावांनी केलेल्या बडोद्यातील सोयीसुविधा पाहिल्या. पुण्यात त्यांनी मागासलेल्या वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून शाळा काढली. मे १९१८ मध्येच बडोद्याची नोकरी सोडून जगतापांनी महाराष्ट्रात शिक्षण प्रसाराचे कार्य केले. त्यांच्या शिक्षण संस्थेसही सयाजीरावांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदत केली आणि मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणास उत्तेजन दिले. त्यांनी श्री. शिवाजी मराठा हायस्कूलची जुलै १९१८ मध्ये सुरुवात केली होती. सयाजीरावांनी हे काम बडोद्याच्या सेवेत करावे, असे सुचवले होते. जगताप यांनी महाराष्ट्रातल्या शिक्षण प्रसारात लक्ष घातले. महाराष्ट्राचे शिक्षण सुधारणा व समाज सुधारणाविषयक काय चालले आहे, याकडे सयाजीरावांचे लक्ष असायचे आणि सयाजीरावांबद्दल आस्था असणाऱ्यांना बडोद्यातील सुधारकी विचार-कृतींचे महाराष्ट्रात अनुसरण करावेसे वाटत असे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनाही सयाजीरावांच्या कारकिर्दीबद्दल आणि तेथील सुधारणांबद्दल आकर्षण होते. इतिहासाचा आणि कर्तृत्वांचा धांडोळा घेताना 'महाराष्ट्रातील बुद्धिवान, प्रतिभावान व कर्त्या लोकांची मोजदाद' राजवाड्यांनी केली होती. शंभर वर्षांतले बुद्धिवान, प्रतिभावान कर्ते पुरुष म्हणून पहिल्या क्रमांकाचे स्थान राजवाड्यांनी सयाजीरावांना दिले. (गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०४७/पृ. ४२६). 'बडोद्यातील सुधारणा' या लेखात (पूर्वोक्त/पृ. ३८७ ते ४१२) बडोद्यासाठी म्हणजेच सयाजीरावांच्या काही सुधारणा राजवाड्यांनी सुचविल्या आहेत. उदा. शेतजमिनींची मालकी काढून घेऊ नये, शेतसारा कमी करावा, धान्य स्वस्त मिळावे, महागाई वाढू नये

म्हणून आयातकर, निर्यातकर यांचे उचित प्रमाण ठेवावे. स्थानिक कारखाने उभारावेत, गायरान वनजमिनी, जंगले शेतकऱ्यांना मुक्त करावीत, परदेशी साखर, मुंबईचे मीठ, परदेशी दवाखाने बंद करावेत. संस्थानची भाषा मराठी किंवा गुजराती करावी, इंग्रजी भाषा बिलकुल काढून टाकावी. दारूबंदी करावी, शेतकऱ्यांना शरीरपोषणार्थ सौम्य दारू पिऊ द्यावी, संस्थांनी पोस्टाला सेव्हिंग्ज बँका जोडाव्यात, सरकारी विमा कार्यालय सुरू करावे, ब्रिटिश सेवक, नोकर यांना मिळणाऱ्या वेतनाशी तुलना करून बडोद्याच्या सेवकांना अधिक वेतन द्यावे, सरकारी बँक काढावी, नाणी गायकवाडी ठेवावी, गवई, कवी, नायकिणी, क्षुद्र, ग्रंथकार, जादूगार, नट, तमासगीर, मस्करे यांना एक कवडीही देऊ नये. परदेशी शिक्षणासाठी पाठवण्यात येणारांना आधी पाच-सहा वर्षे नोकरी करायला लावून मगच पाठवावे, हत्यारांच्या बंदीचा कायदा नको. खिचडी बंद, शास्त्री-भिक्षुकांची दक्षिणा बंदी, वर्तमानपत्रांना स्वतंत्र विचार प्रकट करण्याचे स्वातंत्र्य, तज्ज्ञांचे कौन्सिल इ.

राजवाडे यांना परंपराशरणता महत्त्वाची वाटत असावी. उदा. लेकवळ्यांना व संकरजातींना संस्थानात नोकऱ्या देऊ नयेत, वेदोक्तासंबंधीचा निर्णय चुकीचा.

मराठा राजा म्हणून स्वराज्यवादी, महत्त्वाकांक्षी आणि सनातनी विचारांचा राजा-राज्य व सुधारणा राजवाड्यांनी अपेक्षिल्या होत्या.

सयाजीरावांच्या सुधारणावादी धोरणांना न्या. रानडे, ना. गोखले आदींचा पाठिंबा होता, तर लो. टिळक किंवा न. चिं. केळकर, जहालमतवादी मराठी नेत्यांना सयाजीरावांचे स्वातंत्र्याकांक्षी निर्णय आवडत होते.

सयाजीरावांच्या राजकीय कृतींवर लो. टिळकांचा प्रभाव होता, काही टिळकभक्त सयाजीरावांच्या सेवेतही होते. लोकमान्यांच्या 'केसरी', 'मराठा'चे वाचनही सयाजीराव करीत असत. उघडपणे टिळक व सयाजीराव यांचे संवाद होत नसत. स्वातंत्र्याकांक्षी कृती उपक्रमांना परस्परांचा पाठिंबा होता, हे मात्र नक्की ! 'केसरी'साठी सयाजीरावांनी 'गायकवाड वाडा' दिला; परंतु ब्रिटिशांची वक्रदृष्टी, संशयग्रस्तता पाहून रीतसर व्यवहाराची कागदपत्रे करावी लागली होती. 'स्वा. सावरकर आणि बडोदे' यांचे अतूट नाते होते, असे दादूमिया यांचे प्रतिपादन आहे. स्वा. सावरकरांनी डॉक्टर झालेल्या भावाला सयाजीरावांना भेट असा सल्ला दिला होता. स्वा. सावरकर तेव्हा तुरुंगात होते. स्वराज्यवादी क्रांतिकारकांचा मित्रमेळा जसा नाशिकला होता, तसाच बडोद्यातही होता.

समारोप

सयाजीराव मराठी राज्यकर्ते म्हणून महाराष्ट्राला आदराचे व आश्रयाचे स्थान वाटत होते. महाराष्ट्रातल्या सामाजिक सुधारणावादी नेत्यांशी आणि स्वराज्याकांक्षी नेत्यांशी, विचारवंतांशी त्यांचा संवादसंबंध कायम राहिला.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक घडणीत सहभागी असलेल्या संस्था किंवा व्यक्ती यांना तसेच कलावंत, कोशकार, लेखक, विचारवंत यांना वैचारिक आणि आर्थिक पाठबळही सयाजीरावांनी दिले.

बडोद्याच्या सेवेत असलेल्या मराठी सेवकांना कार्यप्रणाही सयाजीरावांनी दिली. महाराष्ट्राची वाढ करणारे कितीतरी कार्यकर्ते बडोद्यात शिकले, काहींना सयाजीरावांच्या देणग्या-शिष्यवृत्त्या यांचे लाभ घेत महाराष्ट्र आणि हिंदुस्थानाच्या अभ्युदयात भाग घेता आला. मराठीत ललित, अललित पुस्तके तयार करवून घेण्याचे धोरण असो वा कोशकार्याला आर्थिक बळ देणे असो, मराठी साहित्यनिर्मिती, मराठी साहित्य संस्थांना त्यांच्याकडून उदार आश्रय मिळाला. लेखक, प्रकाशकांना, पत्रकारांना 'सयाजीविजय', 'जागृती' अशा मराठी वर्तमानपत्रांना राष्ट्रवादी, समाजसुधारकी विचारांचा मुक्तपणे प्रसारही करता आला.

महाराष्ट्राच्या विविध जीवनक्षेत्रांतील विकसनात सयाजीरावांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मोठे योगदान मिळाले आहे. मराठीबरोबरच गुजराती भाषेचे स्थानही त्यांनी उंच ठेवले. राष्ट्रीय ऐक्यभावना वृद्धिंगत व्हावी म्हणून शिक्षणात हिंदीलाही स्थान दिले.

मात्र सयाजीरावांचे कार्य, विचारमंथन, राजकीय नेतृत्व, केवळ बडोदे, महाराष्ट्र एवढ्यापुरते मर्यादित नाही. एक थोर राष्ट्रपुरुष म्हणूनच त्यांचे आकलन व मूल्यमापन झालेले दिसते. 'जागृती'कार भगवंतराव पाळेकर म्हणतात,

'सयाजीरावांमध्ये बडोद्याच्या प्रजेलाच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थान देशाला एक समर्थ देशभक्त दिसत होता. सयाजीरावांना पाहून राष्ट्राचा आत्मा प्रफुल्लित होत होता. परकी सत्तेपुढे परकेपण आणि सत्तेच्या मर्यादेची कल्पना आणून देणारा राजा म्हणून सयाजीराव लोकप्रिय झाले.'

१२.

महाराजांची भाषणे : कृतिप्रेरक ज्ञानकोश

महाराजांनी विविध ठिकाणी विविध प्रसंगी आपल्या वक्तृत्वकलेचा उत्तम आणि गुणवत्तापूर्ण आविष्कार केला. इ. स. १८७७ ते १९३८ या काळातील जवळपास २५० भाषणे उपलब्ध आहेत.

ते विचारवंत वक्ता, सहृदय महाराजा, व्यासंगी अभ्यासक आणि चतुर प्रशासक म्हणून भाषणांमधून प्रकट झालेले दिसतात. विविध संस्थांचे आश्रयदाते, मार्गदर्शक, हितचिंतक, प्रशासक म्हणून सभा-संमेलनांना त्यांना उपस्थित राहावे लागत असे. प्रासंगिक महत्त्व त्यांच्या भाषणांना होते; परंतु भाषणांतील विचारमंथन दीर्घकालीन विचारसूत्रांना प्रक्षेपित करणारे असायचे. विशिष्ट प्रसंगांची औचित्यपूर्णता साधत मार्गदर्शन करण्याचा, व्यासंग मांडण्याचाच हेतू त्यांनी ठेवलेला होता.

प्रसंगाचे महत्त्व, श्रोते, समकालीन घटना, भविष्यकालीन अपेक्षित स्थिती, त्या प्रसंग किंवा विषयाची पूर्वपीठिका पाहून भाषणाची उभारणी केलेली दिसते. विविध विषय, विद्या, कला यांचा व्यासंग असल्यामुळे सर्वस्पर्शित्व आणि नवविचार दिग्दर्शन त्यांना साध्य करायचे असे. विषयाचे पूर्वसूत्र, विचारमंथनाचा आढावा, वाचन, प्रसंगी चर्चा करून चिंतनशील भाषणे त्यांनी केली. विषयाचे वाचन, चिंतन करून टिपणे काढणे, भाषणाप्रसंगी त्या टिपणांचा वापर करणे, नवे मुद्दे सुचल्यावर त्यांची नोंद करून घेणे, लिखित संहिता भाषणानंतर उपलब्ध करून देणे, संहिता मुद्रित करून ठेवणे अशी भाषणांच्या उभारणीची व्यवस्था त्यांनी केलेली दिसते. त्यामुळे शेकडो भाषणांपैकी निवडक अडीचशेहून अधिक भाषणे छापील स्वरूपात उपलब्ध झालेली आहेत.

राजकीय घटना, शैक्षणिक घटना, सांस्कृतिक उत्सव, वाङ्मयीन घटना, सामाजिक घटना, कृषी-उद्योजगतातील घटना, मेजवानीसारख्या घटना अशा विविध घटनांचा मूल्यात्मक अर्थ लावण्याचा प्रयत्न ते करीत असत. उदा. महाराणी व्हिक्टोरिया यांनी 'हिंदुस्थानची सम्राज्ञी' ही पदवी धारण केली. त्यानिमित्ताने बडोदे येथे स्थानिक समारंभ आयोजित केला गेला होता, त्यात ते म्हणाले-

''इतरांचे संरक्षण करण्यास समर्थ असणाऱ्या खऱ्या क्षत्रियत्त्वाची जी श्रेष्ठता या सार्वभौम पदवीने व्यक्त होते त्या श्रेष्ठतेच्या गुणधर्माचे ज्ञान आम्हाला आहे, अनुभवही आहे आणि मोठ्या मनाने आम्ही ते मान्यदेखील करीत आहोत. ते गुणधर्म कोणते ! प्रथम तर या श्रेष्ठतेच्या अंगी अलोट सामर्थ्य असते आणि ते फक्त बेशिस्त, जुलमी आणि फाजील महत्त्वाकांक्षी लोकांनाच भयप्रद वाटणारे असते. दुसरे देशकालाचा विचार करता सर्वांच्या अनुभवजन्य व विचारजन्य ज्ञानाचा कारभार संग्रहित करणारे शहाणपणही या श्रेष्ठतेला असते. तिसरे जाती, पंथ, हितसंबंध यांच्या भांडत्या गलबत्यातही न्यायाचा तराजू काटेतोल ठेवण्याची कला या श्रेष्ठतेला अवगत असते. तिचा चौथा आणि शेवटचा गुण म्हणजे जगातील दुःखाचा जाच कमी करण्यासाठी आणि सुखाची अभिवृद्धी करण्यासाठी सदैव तत्पर असलेली जी विश्वकुटुंबी परोपकारवृत्ती तीसुद्धा या श्रेष्ठतेमध्ये असते. या सर्व गुणधर्मांनी एकवटून एक साम्राज्यविषयक कर्तव्याचा उच्च आदर्श निर्माण केला आहे आणि तो आदर्श शक्य तितका साध्य करून घेण्यासाठी एकनिष्ठ, सुसज्जित आणि बुद्धिमंत असा अधिकारीवर्ग अहर्निश झटत आहे...'' (महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह खंड १, भाग १/संपादक रमेश वरखेडे/महाराष्ट्र शासन, २०१७/पृ. ०२)

महाराजांना महाराणी व्हिक्टोरिया यांचा 'हिंदुस्थानची सम्राज्ञी' म्हणून गौरव येथे करायचा आहे. ब्रिटिश सत्तेची पकड राणीच्या जाहीरनाम्याने पक्की झाली होती. जाहीरनाम्याच्या तपशिलांचा आणि 'सम्राज्ञी' सत्तेचा अन्वयार्थ स्वदेशीच्या संदर्भाने महाराज निश्चित करीत होते. अत्यंत सूचकतेने क्षत्रियत्वाचा उल्लेख येथे आला आहे. राणीची सार्वभौम सत्ता आणि देशी क्षत्रियत्वांची सत्ता यांची अप्रत्यक्ष तुलना ते करतात. अलोट सामर्थ्य, अनुभवजन्य शहाणपण, संतुलित समान सामाजिक न्यायाची आस्था, विश्वकुटुंबी परोपकार वृत्ती हे गुण क्षत्रिय

राजामध्ये किंवा कोणत्याही सत्ताप्रमुखामध्ये असावेत, ही त्यांची धारणा आहे. देशी संस्थानिक आणि लोक यांना क्षत्रियत्वाचे महत्त्व या निमित्ताने त्यांनी सुचविलेले आहे. आपली क्षत्रियत्वाची, सत्ताप्रमुखाची भूमिकाच ते मांडतात. प्रसंगोपात्त भाषणातील औपचारिकता काढून भूमिकांमागील सार्वकालीनता, विचारदक्षता त्यांनी मांडलेली होती.

महाराजांनी केलेल्या प्रसंगोपात्त भाषणांतील विचार प्रगल्भता प्रत्येक भाषणात दिसून येते. दि. २९ डिसेंबर १८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्त झाल्याबद्दल पुण्याच्या सार्वजनिक सभेने शिष्टमंडळ पाठवून मानपत्र दिले. या मानपत्राचा स्वीकार करताना त्यांनी स्वतःची परिपक्व वैचारिकता प्रकट केली होती. ते म्हणाले -

‘‘... माझ्या प्रिय प्रजाजनांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करणे हाच माझ्या जीवनाचा पहिला व प्रबळ असा उद्देश आहे. अर्थात हे काम प्रजेच्या वाजवी आकांक्षा आणि चालू सुधारत्या युगाचे मुख्य सिद्धांत यांना धरूनच मला केले पाहिजे...’’ (पूर्वोक्त/पृ. ११)

२७ मे १८७५ रोजी महाराजांचे दत्तकविधान व राज्यारोहण झाले. दिवाण टी. माधवराव आणि मातोश्री जमनाबाई यांच्या पालकत्वाखाली हे सारे राज्य चालले. डिसेंबर १८८१ मध्ये खऱ्या अर्थाने सयाजीराव ‘महाराज’, ‘अधिपती’ बनले. मराठी माणूस महाराष्ट्रातून बडोद्याचा राजा बनला. या घटनेचा आनंद सार्वजनिक सभा, पुणे यांना झाला. त्यांनी मानपत्र दिले, त्या मानपत्राच्या स्वीकाराप्रसंगी आपली राजकीय भूमिकाच मांडली आहे, राजकीय कारकिर्दीची भावी दिशाच त्यांनी निर्देशित केली.

महाराष्ट्राचे अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्र असलेल्या पुणे शहरातल्या सुप्रसिद्ध संस्थेने अभिनंदन करावे, याचा संतोष ते प्रकट करतात. स्वतःच्या जबाबदारीची जाणीव स्वतःला आणि जनतेलाही करून देतात. राजाच्या दृष्टीने प्रजाजन प्रिय असतात, प्रजेने राजाला ईश्वरीअंश मानून स्वीकारलेले असते आणि राजाचे प्राणाहून प्रिय फक्त ‘प्रजाजन’च असतात. लोककल्याण, लोकहितसंवर्धन हेच जीवितध्येय मानणारे ‘राजा’ ही त्यांची कार्यदिशा त्यामुळेच आहे. राजाचे आद्यकर्तव्य लोककल्याण हेच असते. राजाने लोकांच्या ‘वाजवी’ इच्छा, आकांक्षा पूर्ण करायच्या, लोकभावनांचा आदर करून सर्वंकष लोककल्याण साधणे आवश्यकच असते. महाराजांचे ‘राजकीय

घोषवाक्य', 'सूत्ररूप राजकारणाचे तत्त्व' म्हणूनच ही भूमिका, हे भाषण महत्त्वाचे आहे. लोककल्याण आणि सुधारणावादी ही भूमिका, हे भाषण महत्त्वाचे आहे. लोककल्याण आणि सुधारणावादी विचारधारा यांचा समन्वय साधणारी ही विचारप्रणाली आहे. परंपरागत राजेशाही, सामाजिक उणिवा आणि आधुनिकतावादी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विचार यांचा समन्वय साधत राजकीय व प्रशासकीय कामगिरी त्यांना पार पाडायची होती. उक्ती आणि कृती यात अद्वैत निर्माण करणारी महाराजांची राजकीय वाटचाल झाली होती.

'बोलेन तेच करेन', 'आधी करीन व मग बोलेन' ही त्यांच्या भाषणामागील विचारकृती प्रक्रिया होती. मुंबईच्या १८ व्या सामाजिक परिषदेपुढे त्यांनी १० डिसेंबर १९०४ रोजी 'समाज सुधारणा' या विषयावर केलेले प्रास्ताविक भाषण यादृष्टीने पाहता येईल.

महाराष्ट्रात १८८६ च्या सुमारास सामाजिक सुधारणा व्हाव्यात म्हणून सामाजिक परिषद स्थापन झाली. सामाजिक सुधारणांचा आढावा घेऊन कृती-नियोजन करण्याचे काम या परिषदेत केले जात होते. समाजातील 'वजनदार व सुप्रसिद्ध' बुद्धिमान सुधारकांनी ही परिषद स्थापन केली होती. बडोदा संस्थानात महाराजांनी आपल्या राजकीय करकिर्दीत सामाजिक सुधारणावादी अनेक कृतियोजना राबवल्या. शैक्षणिक उत्थानातून, समाज, राज्य, प्रजा यांचा विकास त्यांना अपेक्षित होता. राष्ट्रीय तत्त्वांवर सुधारणेचा सामाजिक पाया रचण्याचा त्यांचा पवित्रा होता. ''सुधारणेचा मुख्य हेतू म्हणजे सर्व राष्ट्राची सुधारणा करणे हा होय. देशाची खरी सुधारणा म्हणजे सर्व प्रजाजनास जी पुढे नेईल तीच होय.'' (पूर्वोक्त/पृ. १२५)

सामाजिक सुधारणांना राष्ट्रीयतेच्या स्थितीशी त्यांनी जोडले आहे. या भाषणात स्त्री शिक्षण, बालविवाह-प्रतिबंध, विधवाविवाह, अनेकपत्निकत्वास विरोध, जातीभेद निर्मूलन, पोटजातींत बेटी व्यवहार, सर्व जातींत रोटी व्यवहार, परदेशगमन व समुद्रप्रवासाविषयी स्वातंत्र्य, नीच म्हणून मानलेल्या जातींचा उद्धार, मद्यपान निषेध, देवस्थानादी परोपकारी संस्थांची सुव्यवस्था इत्यादी सुधारणा त्यांनी सुचवलेल्या आहेत. मुख्य म्हणजे यातील कितीतरी सुधारणा बडोद्यात त्यांनी अमलात आणलेल्या होत्या. जातीभेद निर्मूलन, स्त्रीविषयक सुधारणा या प्रश्नांची सोडवणूक करणारे कायदे त्यांनी केलेले होते.

या भाषणात इतिहास, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, लोकसमूह मानसशास्त्र, वेद-उपनिषदे, आधुनिकतावादी समाजशास्त्र या ज्ञानाशाखांतील पुरोगामी विचारांचा त्यांनी केलेला अभ्यास, व्यासंग लक्षात येतो. भारतीय समाजाचे, बहुभाषिक, बहुसांस्कृतिक, बहुधार्मिक अस्तित्व त्यांनी गृहीत धरलेले आहे. आवाहनात्मक संबोधनाची भाषणपद्धती त्यांनी स्वीकारलेली दिसते.

''...आपल्या पूर्वीच्या ध्येयांचा अवलंब करूया, ती ध्येये चांगली समजून घेऊया आणि व्यक्तीच्या नात्याने आणि राष्ट्राच्या नात्याने ती ध्येये साध्य करण्याचा प्रयत्न करूया. आम्हाहून जे निराळे आहेत त्यांचे गुण चांगले ओळखूया. जातीने आपणाहून जे भिन्न आहेत, त्यामध्ये कोणते सदाचार व गुण आहेत ते शोधूया आणि त्यांच्यात जे दोष आहेत ते पलीकडे सारूया. हिंदुस्थानच्या भावी स्थितीचे जे आपले ध्येय आहे ते आपल्या डोळ्यांपुढे अक्षय ठेवून सर्वजण वागूया...'' (पूर्वोक्त/पृ. १४१) अशा तऱ्हेचा आवाहनात्मक कथनावेग त्यांच्या भाषणांत असतो.

श्रोत्यांच्या पातळीवर उतरून आपल्या अनुभवकथनात आणि विचारकथनात श्रोत्यांना सामावून घेणारे त्यांचे वक्तृत्व-कौशल्य प्रभावी ठरते. श्रवणातून श्रोत्यांनी कृतिपरायण व्हावे, अशी प्रेरकता त्यांच्या भाषणांमध्ये आहे. पूरक संदर्भ व पुरावे देत, युक्तिवाद कौशल्याने आपले म्हणणे पटवून देणारी संवादशैली त्यांच्या भाषणांमध्ये उपयोजलेली आहे. अमरोळी येथे काठी समाजाची परिषद भरली होती. ४ फेब्रुवारी १९११ च्या त्या भाषणात महाराज म्हणाले होते, ''माणसाची किंमत, त्याचा दर्जा हा त्याच्या सदाचारावर आणि सत्कर्मावर अवलंबून असतो. अमुक एका जातीत त्याचा जन्म झाला म्हणून त्याला मोठा दर्जा आपोआप झाला असे म्हणणे न्यायाला धरून होणार नाही.'' (पूर्वोक्त/ पृ. २३८) जातीभेद ही मानवी हक्कांची, समत्वबुद्धीची, न्यायपणाची पायमल्ली करणारी सामाजिक कुप्रथा महाराजांना मान्य नव्हती. जाती मानवनिर्मित आहेत, देवाने असा भेदभाव करण्याची परवानगी कोणालाही दिली नाही. 'जन्माने जाती पडत नसून गुणाने पडतात' (पूर्वोक्त/पृ. २३८) असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. जातीभेदातून उद्‌भवलेल्या स्पर्शास्पर्शाची चालही त्यांना अनुचित असण्याचे सांगायचे आहे, हा मुद्दा प्रभावीपणे मांडण्यासाठी युक्तिवादाचा वापर ते करतात.

''स्पर्शास्पर्शाची चालही किती कृत्रिम आहे हे सहज समजणार आहे. कुत्रा, मांजर वगैरे हलक्या प्राण्यांना शिवण्याचा काहीही दोष आपण मानीत नाही; पण एकाच ईश्वराने निर्माण केलेल्या आपल्या अमुक जातीतल्या भाऊबंदाला शिवणे हा विटाळ मानतो, हा परमेश्वराच्या घरी अन्याय होत नसेल का?...'' (पूर्वोक्त/पृ. २३८) पशू-प्राण्यांचा विटाळ मानायचा नाही. मात्र, माणसाला दूर सारायचे, हे अत्यंत हिणकस व अनुचित वर्तन असल्याचे ते या उदाहरणातून दाखवून देतात.

श्रोत्यांशी थेट संवाद साधणारी त्यांची वक्तृत्वशैली असल्याने श्रोत्यांना ते आपल्या अनुभवकथनात सहभागी करून घेत असत. श्रोत्यांच्या विवेकबुद्धीला आवाहन करून जाणीवजागृतीचा मार्ग त्यांनी अनुसरलेला होता.

उदाहरणार्थ :

''माझ्या रयतेशी प्रत्यक्ष बोलणे माझे कर्तव्यकर्म आहे. स्थानिक स्वराज्याचे प्रयत्न सफल होण्यासाठी आपण फार परिश्रम घेतले पाहिजेत. यातील सफलता आपल्याच हाती आहे. आपल्या न्यायी आणि विवेकबुद्धीवर ती अवलंबून आहे. लोकांची जेवढी लायकी असेल तेवढेच हक्क त्यांना दिले पाहिजेत...'' (पूर्वोक्त/पृ. २४०)

अमरेली येथील शेतकी आणि उद्योगधंदे यांच्या प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ५ फेब्रुवारी १९११ च्या भाषणातील हे विवेकी भाषण आहे. थेट प्रजासंवाद महाराजांना अपेक्षित होता. प्रजेचे कल्याण साधण्यासाठी केवळ प्रशासकीय योजना, साधनसामग्री, मनुष्यबळ असून चालत नाही. कल्याणकारी योजना, सुधारणावादी कृती कार्यक्रम यात लोकांनी स्वतःहून सहभाग घेणे त्यांना इष्ट व अपरिहार्य वाटत होते. प्रजासंवाद त्यांना कर्तव्यकर्माचा भाग वाटत होता. विविध व्यासपीठांवरून विचारकथन किंवा अनुभवकथन करताना श्रोत्यांना विवेक जागरणासाठी ते तयार करवून घेत असत. उत्स्फूर्त, भावपूर्ण अशी त्यांची भाषणे वाटायची; परंतु ऐनवेळी काहीही बोलून वेळ मारून नेऊ, असे धोरण कधीही नव्हते. 'विचार-कृती' यांची सांगड घालून श्रोत्यांच्या मनपरिवर्तनावर त्यांचे लक्ष होते. प्रजा असो वा श्रोते यांच्या न्यायी, विवेकबुद्धीवर त्यांचा विश्वास होता.

“कर्तव्य-परिपालन व स्वार्थत्याग ही उच्च ध्येये स्वतः पुढे ठेवण्याचा आणि अज्ञान व पूर्वग्रह या बेड्या तोडून टाकण्याचा तुम्ही प्रयत्न करा... निराशावादी बनू नका. यत्नदेवाच्या कल्याणकारक सामर्थ्यावर विश्वास ठेवा. ‘उत्तिष्ठत, जाग्रत’– जाग्रत म्हणजे अज्ञान व खुळ्या समजुती घालवून टाका... माझ्या मताने सध्याची वेळ अशी आलेली आहे, की यावेळी प्रत्येकाने आपले शक्ती-वर्चस्व वेचून आपली ऐहिक परिस्थिती आधी सुधारली पाहिजे. अनेक सामजिक दोषांना जेथे तोंड द्यावयाचे आहे. तेथे चिमूटभर सक्रिय सहानुभूतीची किंमत खंडीभर अध्यात्म चिंतनाबरोबर आहे.” (पूर्वोक्त/पृ. २५०–२५१)

आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण

भाषणाच्या विषयाचे स्पष्टीकरण करीत असताना महाराज आत्मपरीक्षणासाठी सदैव तयार असत. श्रोत्यांना आत्मचिंतनास प्रेरणा देत-देत स्वतःला सावध करणारी भूमिका ते घेत असत. उदा. “...राज्यकर्त्यांनी आपल्या प्रजेचे संरक्षण जसे कुण्या व्यक्तीच्या हल्ल्यापासून करावयाचे असते, तसेच ते एखाद्या समूहाच्या हल्ल्यापासूनदेखील करावयाचे असते. प्रजेला आपले आवडते उद्योग शांतपणे चालू ठेवता येतील. रोजचे व्यवहार सुरळीतपणे पार पाडून त्यांना सुखी होता येईल, अशी निर्वेध परिस्थिती राज्यकर्त्यांनी राखली पाहिजे; पण याहून मोठे असे एक प्रजेसंबंधीचे कर्तव्य राज्यकर्त्यांचे आहे. मुलांच्या बाबतीत बापाचे जे कर्तव्य असते, तसेच हेही कर्तव्य आहे. ते कर्तव्य कोणते? गेल्या पिढीपेक्षा चालू पिढीला शरीराने, बुद्धीने पुढे सरसावणाऱ्या जगात आपल्या प्रजेलाही जगाबरोबर चालवावे हे राजकर्तव्य आहे...” (पूर्वोक्त/पृ. २५५) पुरुष-शिक्षणपद्धती पाठशाळेच्या इमारतीची कोनशिला महाराजांच्या हस्ते बसवण्यात आली होती, त्याप्रसंगी दिनांक २० मार्च १९११ रोजी केलेल्या भाषणाचा हा अंश आहे. शैक्षणिक विकसनात महाराजांना सर्वाधिक रस होता. शिक्षण हे महत्कार्य असल्याची जाणीव ते श्रोत्यांना म्हणजे प्रजेला करून देत होते. याप्रसंगी राजाचे राजकर्तव्य कोणते? हे प्रजेला आणि स्वतःलाही सांगत आहे. महाराज स्वकर्तव्याचे चिंतन मांडून श्रोत्यांना चिंतनशील बनवत होते, हेच त्यांच्या या आत्मपर जागृतीच्या चिंतनातून ठळक होते.

“समाजाला सुशिक्षित करण्याऐवजी त्याला अज्ञानीच ठेवणाऱ्या शास्त्री– पंडितांच्या ज्ञानाचे चीज त्या समाजाकडून जर झाले नाही, तर तो दोष समाजाचा

नाही... शंभर वर्षांपासून आजपर्यंत बडोदा संस्थानातून शास्त्री मंडळीस उत्तेजनार्थ श्रावणमास दक्षिणा देऊन वर्षासने वगैरे देऊन-चालवून लाखो रुपये खर्च होत आले आहेत. तथापि, इतका खर्च होऊनदेखील या शंभर वर्षांच्या काळात एखाद्याने तरी स्वतंत्र शोधकबुद्धीने अध्ययन केले व खर्चाच्या मानाने त्याचा योग्य तो लाभ पुस्तकरूपाने अगर लेखरूपाने जनसमाजाला दिला आहे काय?..." (पूर्वोक्त/पृ. ३४२)

अशा तऱ्हेने शास्त्री मंडळीची नवज्ञान निर्मितीची क्षमता त्यांनी प्रश्नांकित केली आहे. गत शतकातील गायकवाडांच्या राजवटीने दक्षिणा-वर्षासने देऊन काही साधले नाही, हा आत्मपरीक्षणाचा विचारही महाराजांनी अप्रत्यक्षपणे मांडला आहे.

मूळ समस्यांचा शोध

विशिष्ट विषयावर मतप्रतिपादन करताना त्या विषयाचा मुळापासून अभ्यास ते करीत. इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, कला, समाज, शिक्षण अशा विविध क्षेत्रांचा व्यासंग करताना त्यांना मूलभूत समस्यांची जाणीव व्हायची. शेतकरीवर्गाच्या अधोगतीचे काय करावे? शेतकऱ्यांना कोणत्या संकटांना सामोरे जावे लागते? का जावे लागते? शेतकऱ्यांची समकालीन व पूर्वकालीन स्थिती अशी का बनली आहे? अशा तऱ्हेने मूलगामी विचार ते करीत. प्रश्न कोणता ! प्रश्नाचे असे स्वरूप का बनले? कारण-परिणाम-तर्क-अनुमान अशी चिंतनशीलता त्यांच्या मूळ समस्यांचा शोध घेताना लक्षात येते. प्रश्नाचा इतिहास, प्रश्नाचे वर्तमान आणि प्रश्न सोडवण्याचा कृतिउपाय अशी समस्याशोधनाची मांडणी ते करीत असत. 'शिक्षण-नवता-आधुनिकता-ज्ञान' यांची मीमांसा हेच मुख्य सूत्र त्यांनी समस्यांच्या बाबतीत स्वीकारलेले होते.

बडोदे येथे ७ मार्च १९१५ रोजी आरोग्य प्रदर्शनाचा बक्षीस समारंभ महाराजांच्या हस्ते झाला, त्याप्रसंगी त्यांनी आरोग्यासंबंधी मार्गदर्शन केले. त्या भाषणातील काही मुद्दे पाहू. (पृ. ३४८ ते ३५०/पूर्वोक्त)

'निर्मल मनुष्य हा देवासमान होय', 'शरीर निरोगी, तर मन निरोगी', धर्माचरण करू पाहणाराने आरोग्याचा-स्वच्छतेचा-विचार जरूर केलाच पाहिजे... धर्माचरण व आरोग्यरक्षण यांचा संबंध निकटचा आहे... हवा, उजेड, मोकळी जागा, केरकचऱ्यांच्या जागांची स्वच्छता, शुद्ध अन्न, निर्मळ राहणी व शारीरिक व्यायाम

या गोष्टी आरोग्यरक्षणाला अत्यंत आवश्यक... प्रत्येक मातेने आपल्या बालकाला शुद्ध व आरोग्यकारक अशाच वस्तू खाण्या-पिण्यास द्याव्या,' त्याच्या खेळण्याच्या व निजण्याच्या जागी भरपूर उजेड ठेवावा. पुरेशी झोप, स्वच्छ, साध्या आवडी आणि व्यायामादिक नियमित प्रकार या सर्व गोष्टींची काळजी मुलांच्या बाबतीत घेणे आवश्यक आहे... आरोग्यप्राप्तीची गुरुकिल्ली स्त्रीवर्गाच्या हाती आहे. एवढ्याकरिता आरोग्याच्या सर्व बाबतीचे पद्धतशीर शिक्षण तुम्ही स्त्रीवर्गाला द्या, म्हणजे तो स्त्रीवर्ग सबंध राष्ट्राचे आरोग्य सुधारून दाखवील. तुम्हाला लहानाचे मोठे करणारा पूर्वीचा स्त्रीवर्ग असाच सुशिक्षित होता..." प्रजेच्या आरोग्याचा प्रश्न वरील काही मुद्यांमधून मांडून हा प्रश्न सोडवण्याचा उपाय त्यांनी अखेरीस सांगितला आहे. आरोग्यरक्षण कसे करावे? आरोग्याचा प्रश्न कसा सोडवायचा? याचा विचार करीत 'आरोग्यप्राप्तीची गुरुकिल्ली स्त्रीवर्ग' असा मूलभूत उपाय त्यांनी सांगितला आहे. स्वच्छता हे जीवनमूल्य स्वीकारण्यासाठी स्त्रीवर्गाच्या आरोग्य साक्षरतेचा प्रश्न ते सूचित करतात. प्रश्न सोडवायचा, तर मूलभूत चिंतन-उपाय महाराज अशा तऱ्हेने मांडत असत.

अस्पृश्यता-निवारणाच्या प्रश्नाचा असा मुळापासून शोध त्यांनी 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संमेलनाच्या भाषणात दिनांक २३ मार्च १९१८ रोजी घेतला होता. या भाषणातील काही अंश पाहू. "अस्पृश्यता-निवारण हा विषय मला माझ्या कारकिर्दीच्या प्रारंभापासून मोठ्या जिव्हाळयाचा वाटत असल्याने व या विषयासंबंधीचे काही प्रत्यक्ष प्रयोग मी बडोदे राज्यात करीत आहे... आपल्याकडील अतिशूद्रांची ऊर्फ अस्पृश्यांची राहणी व सामाजिक दर्जा सुधरायचा म्हटले, तर त्या कामाला असमान्य धैर्य, विशाल दृष्टी व हसरे, प्रसन्न अंतःकरण यांची फार आवश्यकता आहे... आधुनिक सामाजिक सुधारणा ही अंतःस्फूर्त आहे, नव्हे तो एक अंतःक्षोभ आहे... एखाद्या सामाजिक अनिष्ट चालीला कायमची बंदी करू शकणारी राजकीय किंवा धार्मिक वरिष्ठ सत्ता आपल्याकडे नाही. इतर देशांत ती अडचण नसते... सुधारणा म्हणजे कुणाच्या सामाजिक दर्जाला प्राधान्य न देता जबाबदारी किंवा कामगिरीवरूनच माणसाचे महत्त्व ठरवायचे... सामाजिकदृष्ट्या माणसाची योग्यता ही त्याच्या स्वतःच्या कर्तबगारीवर अवलंबून असते. हे आधुनिक सुधारणेचे प्राणभूत तत्त्व... उच्च जातींना ज्या शैक्षणिक सोयी-सवलती आहेत, त्याच अस्पृश्यांनाही मिळाव्यात.... उदारमतवादाचा

पुरस्कार करून आपापल्या प्रांतात लोकजागृती करू... वेदांमध्ये ही वर्णाबिर्णाची आणि बहिष्कृतांची भानगड जवळजवळ नाहीच म्हटली तरी चालेल... मनुस्मृतीतील बराचसा भाग विशेषतः अतिशूद्रांसंबंधीचा भाग प्रक्षिप्त व खोटा आहे... वर्णभेदाची कल्पना बुद्धीला पटत नाही व शास्त्रीय चिकित्सेलाही उतरत नाही... उच्चवर्णीय ब्राह्मणांनीही ज्यांना पूज्य मानले आहे असे अनेक सुप्रसिद्ध साधू-संत अंत्यजवर्गातच जन्माला आलेले आहेत... खर्ड्याच्या लढाईत शिदनाकाने मोठी बहादुरी गाजवली... संधी मिळाली तर पतितजातीचे लोकसुद्धा उच्च जातीच्या लोकांसारखीच कामगिरी बजावू शकतात... अस्पृश्य जातीची निर्मिती हा एक राक्षसी व हिडीस प्रकार आहे. धर्माच्या नावाखाली अज्ञानाचा आणि कुबुद्धीचा हा केवढा गोंधळ !... पूर्वी जसे ब्राह्मणांच्या बेसुमार कर्मकांडाविरुद्ध आणि यज्ञसंस्थेविरुद्ध बंड उभारण्याची बुद्धावर पाळी आली तशाच बंडाची आग पेटणारी अप्रीती देशभर फैलावण्याची आज भीती आहे... ज्या तत्त्वानुसार तुम्ही राजकीय हक्क मागता त्याच तत्त्वानुसार तुमच्या खालच्या वर्गातील लोकांना तुम्ही सामाजिक हक्क द्यायला नकोत का? जन्मावरूनच वर्ण किंवा जात ठरवा, त्या माणसाच्या गुणकर्माची किंमत नाही, जन्म हेच निर्णायक आहे, असे शास्त्रवचन कोठेही नाही... सुधारणा करायची ती समंजस, सकारण व न्याय्य आहे, अशी प्रजेची खात्री पटवता आली पाहिजे. अस्पृश्यांना स्वतंत्र माणसाचे स्थान व हक्क देणे न्यायाचेच आहे, असे हिंदू समाजाला लवकरच वाटू लागेल... अस्पृश्यांच्या सुधारणेबाबत तुमच्या देशबांधवांनी काय करावे? असा कुणी प्रश्न केला, तर मी सांगेन, 'आंतरवर्णीय विवाह व सहभोजने स्वतःच्या मताविरुद्ध करू नकाच. तूर्त अमक्याला शिवल्याने विटाळ होतो ही कल्पना उपटून काढा."

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह खंड २, भाग २/संपा. वरखेडे रमेश/महाराष्ट्र शासन/२०१७/ पृ. १९ ते २८)

जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद अशी भेदभावांची संकल्पना महाराजांना मान्य नव्हती. सामाजिक सुधारणावादी चळवळींना त्यांचा पाठिंबा आणि आश्रय होता. वरील भाषणांश १९१८ मधील आहे. जातीभेद-वर्णभेद नाकारण्याचा कृती कार्यक्रम महाराजांनी १८७७ पासूनच सुरू केलेला होता. अस्पृश्यतेचा प्रश्न त्यांच्या लक्षात आला. किंबहुना कर्मकांडात्मक धर्मकल्पनाही ते तेव्हापासून नाकारू लागलेले होते. राजाने सामाजिक समता प्रस्थापित करायची, तर परंपरागत

धर्मकल्पना, परंपराशरण प्रजा यांना समजावून घेत-घेत शिक्षण, जनजागरण, संवाद, सभा, यांचा अवलंब त्यांना करावा लागला होता.

या भाषणात खंडनमंडनात्मक निवेदनशैलीचे उपयोजन केले आहे. आधी अभाव आणि नंतर सकारात्मक उपाय, माहिती, उदाहरणे देत-देत अस्पृश्यता निवारणाचे प्रयत्न कसे करावेत हे त्यांनी सांगितलेले आहे. आधुनिकवादी, विवेकवादी सुधारणावादी पक्षाचे समर्थन करताना स्वानुभवाचे क्षणही सांगितले आहेत. 'अस्पृश्यता' ही मानवनिर्मित संकल्पना आहे, पुराणे-वेद वगैरेंमध्ये त्यांना स्थान नाही हे ते दाखवून देतात. जपान-अमेरिका येथील सामाजिक समता, मानवी हक्क याविषयींच्या हालचाली-चळवळींच्या पाश्वभूमीवर भारतातील अस्पृश्यता निवारण कसे साधता येईल, याचे दिग्दर्शन या भाषणात आहे. अब्राहम लिंकनचा दास्यमुक्तीचा जाहीरनामा, रशियाच्या अलेक्झांडर झारचे १८६१ चे आज्ञापत्र आणि जपानच्या आज्ञापत्रातील साम्य त्यांनी दाखवले आहे. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सुधारणांतील आंतरिक साहचर्य संबंधांचे मार्गदर्शन महाराजांनी केलेले आहे.

भारतातील अस्पृश्यता निवारण कसे साधावे? हे सांगताना या प्रश्नाचा इतिहास, भूगोल आणि वर्तमान यांचा धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय अन्वयार्थ त्यांनी लावला आहे.

''अस्पृश्यांची घरे गावाच्या बाहेर असावीत, कुत्री आणि गाढव एवढेच त्यांचे धन असावे, मृतांची वस्त्रे हेच त्यांचे परिधान, फुटक्या भांड्यातून त्यांनी अन्नग्रहण केले पाहिजे. त्यांचे सर्व व्यवहार आपसातच व्हावे व बेटी व्यवहार त्यांनी समान लोकांशीच करावा. रात्रीच्या वेळी त्यांनी गावातून हिंडू नये,'' असे मनुस्मृतीने अस्पृश्यांना नियम घालून दिलेले होते आणि त्यामुळेच अस्पृश्यांना जनावरांपेक्षाही हीन वागणूक दिली गेली. श्रुती-स्मृती किंवा परंपरागत अमानवी असंवेदनशील विचार–कृती महाराजांना अमान्य होती. ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून त्यांनी प्रश्नांचा विचार करीत आधुनिक विवेकवादी, उदारमतवादी दृष्टीने प्रश्नांची उत्तरे आपल्या भाषणांमधून शोधली आहेत.

शिवरायांचा आठवावा प्रताप

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्त्वाचा आणि राजनीतीचा मोठा प्रभाव सयाजी महाराजांवर होता. बडोद्यात ८ मार्च १९३४ रोजी श्री. शिवाजी



शिवरायांची शिकवण अंगिकारावी

महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा अनावरण समारंभ झाला. याप्रसंगी केलेले भाषणही महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, 'शिवाजी महाराज हे एक महाराष्ट्रीय देशभक्त होते आणि त्यांच्या कार्याचा विचार देश-काल-परिस्थितीच्या अनुरोधाने केला पाहिजे.'

'स्वातंत्र्य व स्वमतस्थान, स्वधर्म व स्वदेशाभिमान' यांच्या प्रतिष्ठापनेच्या चळवळीच्या काळात छ. शिवाजी महाराजांना पुण्यप्रेरणा मिळाली. स्वदेशप्रेम व धर्मशक्ती या प्रेरणांची युती नवयुगाचे प्रवर्तन करणारी ठरली.

बेल्जियमच्या अल्बर्ट राजाशी तुलना करताना शिवाजी महाराजांच्या स्फूर्तिदायी व्यक्तिमत्त्वाचा प्रबोध दर्शविलेला आहे. "एका धर्मवेड्या बादशहाशी आणि स्वजनांवर झालेल्या जुलमाचा प्रतिकार म्हणून गोब्राह्मण प्रतिपालक असलेले शिवाजी महाराज जी झुंज खेळले ती मराठ्यांच्या चैतन्यबळावर आणि चैतन्य रक्षणासाठीच खेळले." (पूर्वोक्त/पृ. ३०८)

छ. शिवाजी महाराजांचा संघर्ष राष्ट्रीयत्वाचा आणि आध्यात्मिक स्वरूपाचा असल्याचा निष्कर्ष महाराजांनी सांगितला आहे. जाज्वल्य धर्मनिष्ठ राहूनही

परधर्म सहिष्णू व प्रजावत्सल राजा अशी शिवाजी महाराजांची प्रतिमा ते उभी करतात. लढाया-स्वाऱ्या यांमधून वेळ मिळाल्याबरोबर शिवाजी महाराज शेतकरी व खेड्यातल्या लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यास तत्पर असायचे. महाराष्ट्राला, मराठ्यांना 'स्वराज्याची तळमळ' शिवाजी महाराजांनीच दिली, असे मुख्य प्रतिपादन या भाषणात आहे. छ. शिवाजी महाराज नवयुगाचे व लोकप्रवृत्तीचे प्रतिनिधी होते. त्यांच्या कामगिरीचा सत्त्वांश पुढील शब्दांत मांडला आहे -

"जन्माच्या किंवा दर्जाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांना पाठीशी अनुकूलता नव्हती. एका सामान्य मराठ्याने एका सबंध राष्ट्राचा भाग्यविधाता व्हावे व प्रबळ सत्ताधीशांचा विरोध असताना आपल्या विस्कळित व दुर्बल लोकांना सुसंघटित राष्ट्राच्या पदवीला पोहोचवावे, ही कामगिरी काय सामान्य आहे? केवळ पोटार्थी वाटणारे लोक चाकरीस ठेवावे व त्या सर्वांना देशभक्तीने प्रेरित करून सोडावे, हीच शिवचरित्राची शिकवण आपल्याला अखंड स्फूर्तिदायक ठरणारी आहे." (पूर्वोक्त/पृ. ३१०)

स्वातंत्र्य, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, लोककल्याण, नैतिकता, शांती, सहिष्णुता, सर्वसमावेशक उदारमतवाद, दया, करुणा आदी जीवनमूल्यांचे संस्कार छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वातून करून घेता येतात. मूर्तिमंत स्वातंत्र्यप्रेम आणि पराक्रम यांच्या मुळाशी असलेली उदारमनस्क धर्मनिष्ठा सयाजीराव महाराजांना, छत्रपती शिवाजी महाराजांना दिसली व प्रेरणादायी ठरली. शिवाजी महाराजांच्या पूर्वकाळात आणि समकाळात साधुसंतांनी तयार केलेली अनुकूल भूमिकाही त्यांनी लक्षात घेतली आहे. "या साधू-संतात ब्राह्मण, मराठे, शिंपी, दर्जी, न्हावी, महार, चांभार वगैरे सर्व जातींचे लोक होते." हे सयाजी महाराजांनी खासकरून नोंदवले आहे.

सयाजी महाराजांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा धार्मिक कर्तृत्वात भेदभाव, विषमता यांना अजिबात स्थान नव्हते. हिंदू-मुसलमान-पारशी अशी धर्मबहुल प्रजा त्यांनी समान मानली होती. पुरातन धर्मकल्पनांची चिकित्सा त्यांनी वेळोवेळी केली. लोककल्याणाचा व लोकजागृतीचा स्वातंत्र्यवादी वसा त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरक व्यक्तिमत्त्वातून आणि कर्तृत्वातून स्वीकारला होता.

भाषणांची वैशिष्ट्ये

विषयाचा सखोल व चिंतक आढावा घेत परखडपणे आपली मते महाराज मांडत असत. श्रोत्यांचा अनुनय करीत प्रसंगी त्यांची कानउघाडणी करायलाही ते मागेपुढे पाहत नसत.

आधुनिकता आणि परंपरागतता यांची सांगड घालणारी विवेकवादी विचारशैली त्यांच्या भाषणांमध्ये आहे.

श्रोत्यांना कार्यतत्पर करताना ज्ञानसत्तेची सतत जाणीव त्यांनी करून दिलेली दिसते.

ब्रिटिश सत्ताधारी सभा-संमेलनात असतील, तर त्यांच्या अधिकाराची-स्थानांची जाणीव ठेवून आपण 'बरोबरीचे मित्र' आहोत याची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सूचना मात्र देत.

उदाहरणे, रूपके, दृष्टांत देताना वेद-उपनिषदांपासून आधुनिक शास्त्रांचे संदर्भ, समकालीन, समाजकारण, इतिहास, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, स्थापत्यशास्त्र, आरोग्यशास्त्र, ज्ञान-शिक्षणशास्त्र, ग्रंथपालनशास्त्र, वाङ्मय, कला, स्वरूपशास्त्र, विज्ञान आणि अध्यात्मशास्त्र, रेल्वे-रस्ते-वाहतूक, कृषिविज्ञान, नगररचनाशास्त्र, व्यापार व उद्योग, स्त्री सुधारणा, शारीरिक शिक्षण, नीतिमूल्यशास्त्र, लोकव्यवहार, लोकप्रशासन, संस्कृती अशा कितीतरी विषयांचा व्यासंग करून सर्वस्पर्शी भाषणशैली त्यांनी घडवली होती.

सुधारणावाद, मानवतावाद, उदार मतवाद अशी आधुनिक वैचारिक भूमिका लोककल्याणकारी वृत्तीतून त्यांनी आपल्या भाषणांमधून मांडली आहे.

या भाषणांचे समग्र अवलोकन केले, तर कृतिप्रेरक, ज्ञानकोशाचे स्वरूपच लक्षात येते. तत्कालीन विचार-परिस्थिती-सांस्कृतिक पर्यावरणातील सूर्यसन्मुख चिंतनशीलतेचा प्रत्यय येतो.

१३.

उपसंहार

प्रास्ताविक

सयाजीरावांची राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक वाटचाल पाहताना त्यांच्यातील गुणसत्त्वाची विशालता आणि सखोलता लक्षात येते. बडोदे संस्थानचा राजा ते राष्ट्रपुरुष अशी त्यांची कारकीर्द राहिली आहे. राज्यसत्तेचा प्रजेसाठी, प्रजाकल्याणासाठी वापर करताना एक सुसंस्कृत व संस्कारशील, निर्भय पालक ही भूमिका त्यांनी घेतली. राज्यसत्तेशी निगडित असूनही कोणत्याही प्रकारचा गर्विष्ठपणाचा पवित्रा सयाजीरावांनी कधी घेतला नाही. रात्रंदिवस केवळ प्रजा हेच सयाजीरावांचे चिंतनाचे आणि कृतीचे केंद्रस्थान होते.

गतिमान जीवनधारा

सयाजीरावांच्या जीवनलेखाची छाननी करताना सामान्यतः जीवनक्रमाचे, कृती उपक्रमांचे चार टप्पे मानले जातात. अर्थात यातील कालिक संकेत अगदीच निश्चित किंवा स्थिर नाही. जीवनधारा म्हटले, की अखंडता, चैतन्यशीलता, मार्दव, आल्हादकारकता, संजीवनधारा असे अर्थसंबोध स्मरू लागतात.

इ. स. १८७५ ते १८८७ : पहिला टप्पा : संस्कार व घडण

सयाजीरावांच्या दत्तकविधानापासूनचा हा सगळा कालखंड पहिल्या युरोप सफरीपर्यंतचा कालखंड आहे. शेती-मातीतून थेट सिंहासनाधिष्ठित होणे. ‘मी राजा व्हायला आलो आहे’ या उद्गाराचे, निश्चयाचे, राजकर्माचेच अनुसरण प्रत्येक टप्प्यावर झाले आहे. सर टी. माधवराव, राजमाता जमनाबाई, शिक्षक एफ. एच. इलियट यांचे संस्कारी शिक्षण, प्रशिक्षण या काळात झाले. जिज्ञासू कृतीतून सयाजीराव शिकत राहिले. आपण ‘राजा’ आहोत, हे राजधर्ममान त्यांना दिले गेले. इलियट यांनी सयाजीरावांच्या बौद्धिक क्षमतांना जाग आणली.

शाळा, संस्काराचे, शिक्षणाचे महत्त्व लक्षात आणून दिले. राजकीय मुत्सद्देगिरीचे, चातुर्याचे संस्कार सर टी. माधवराव यांनी केले. प्रत्यक्ष राज्यकारभार २८ डिसेंबर १८८१ मध्ये हाती आला. स्वतंत्रता, सार्वभौमत्व आणि प्रजाकल्याणाचे मूल्यमान याच काळात झाले. राज्यपाहणी, प्रजासंवाद, अस्पृश्योद्धार, शिक्षणाचे महत्त्व अशी लोकहितकारी कामे आरंभली. विवाह, पहिल्या चिमणाबाईंचे निधन, दुसऱ्या महाराणी चिमणाबाईंशी विवाह. पहिल्या चिमणाबाईंपासून राजपुत्र फत्तेसिंह जन्माला आले. राजपुत्रासाठी दुसरा विवाह करणे प्राप्त ठरले. या काळातील घटनाक्रम जरा अधिक गतिमान होता आणि म्हणूनच कौटुंबिक प्रश्न, राजकीय प्रश्न, लोकांचे प्रश्न, ज्ञानप्राप्तीतून उद्‌भवलेले प्रश्न असे निर्माण होत गेले आणि निद्रानाशाचे प्रसंग, प्रकृतीचे अस्वास्थ्य संभवू लागले. डॉक्टरी सल्ल्याने हवापालट, औषधोपचार वगैरे सुरू झाले.

दुसरा टप्पा : १८८७ ते १८९८ - सुधारणा व संघर्षाचा कालखंड

सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या अनुभवी मांडणीचा हा काळ होता. पहिल्या युरोप प्रवासाने विश्वमान आले, आधुनिक विवेकवाद, मानवतावाद यांचे आकलन करून घेत राज्याचा कायापालट घडून आला. राजपुत्र जयसिंहरावांचा जन्म किंवा लक्ष्मीविलास राजवाड्यात गृहप्रवेश, राजपुत्र शिवाजीरावांचा जन्म अशा आनंदवर्धक घटनांबरोबरच सक्तीच्या मोफत शिक्षणाचा क्रांतिकारी कायदा, आजवा धरणातून जलपेय सुविधा अशा प्रजाहितदक्षतेच्या निदर्शक कृती आणि बापट कमिशनच्या निमित्ताने रेसिडेंटचा राजकीय हस्तक्षेप वाढू लागला. सार्वभौमत्व जपण्याचे, संघर्षाचे क्षणही वाट्याला आले. मातोश्री महाराणी जमनाबाई यांचे निधन झाले. सयाजीरावांची निवड त्यांनीच केलेली होती. त्याचप्रमाणे इलियट यांच्या निवृत्तीमुळे सयाजीरावांचा मानसिक, बौद्धिक आधार हरपला. या परिस्थितीत ब्रिटिशांशी संघर्ष आणि प्रजेसाठी कल्याणकारी कामे व कायदे सुरू झाले.

तिसरा टप्पा : १८९८ ते १९१० - संकटांतून संघर्षशीलतेचा कालखंड

प्लेग, दुष्काळ यांचा सामना करतानाच लॉर्ड कर्झनच्या सत्तापिपासू प्रवृत्तीचा प्रतिकार सयाजीरावांना करावा लागला. सामाजिक परिषद, औद्योगिक प्रदर्शन, स्थानिक पंचायतींची निर्मिती, उच्च शिक्षणसंस्थांमध्ये मार्गदर्शन अशा महत्त्वाच्या घटनांचा काळ होय. वैयक्तिक जीवनात युवराज फत्तेसिंहराव यांच्या निधनांचा

मोठा धक्का बसला. सयाजीरावांची मुले शिक्षणात रमली नाहीत, देशी-परदेशी वास्तव्यात दुराव्यात राहिली. युरोपियन संस्कार, व्यसने यात अडकली, नातू प्रतापसिंह यांचा जन्म, रौप्य महोत्सवी मानपत्रे अशा सुखद घटनांच्या पार्श्वभूमीवर राष्टीय घडामोडींमुळे सयाजीराव अधिकाधिक व्यस्त झालेले होते. चीन, जपान, अमेरिका असा प्रवास. राजकीय मुत्सद्दी, उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी भेटीगाठी झाल्याने सयाजीरावांची अनुभव समृद्धता त्यांना सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यास उपकारक ठरली. आर. सी. दत्त अल्पकाळ दिवाणपदी आले, त्यांच्या आर्थिक विचारांच्या प्रभावाखाली सयाजीराव आलेले दिसतात. सयाजीरावांचे शिक्षक इलियट यांचा मृत्यू १७ मार्च १९१० ला झाला. इलियट कुटुंबीयांशी असलेले स्नेहबंध पुढेही सयाजीरावांनी जपले. कला, क्रीडाविषयक उपक्रमांना बळ देणे मात्र सुरू राहिल्याचा अनुभव समृद्धतेचा हा टप्पा ठरतो.

चौथा टप्पा : १९१० ते १९३९ - सर्जक कृतींच्या साफल्याचा कालखंड

चीन व जपान भेटी, सेंट्रल लायब्ररीची स्थापना, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, साहित्य परिषदा, मराठा समाज शिक्षण परिषदा, ग्रंथ परिषदा, ग्रंथनिर्मिती, उत्तेजन, औद्योगिकीकरण, सहकार, शेती अशा विविध क्षेत्रांत अव्वल दर्जाचे काम सयाजीरावांनी केले. ७१ व्या वाढदिवसानिमित्त सर्वत्र सत्कार, मानपत्रांचे कार्यक्रम झाले. राष्ट्रपुरुष म्हणूनच सयाजीरावांची प्रतिमा निर्माण झाली होती. स्वातंत्र्य चळवळ आणि पहिल्या महायुद्धाची धामधुम ही पार्श्वभूमी होतीच. गोलमेज परिषद, व्हाईसरॉय भेटी, राजकीय पुनर्घटना यात सयाजीराव सहभागी झालेले होते. म. गांधींच्या चळवळी आणि ब्रिटिशांच्या हालचालींना वेग आला होता. यातला दीर्घकाळ सयाजीराव परदेश प्रवासातही होते.

व्यक्तिगत जीवनात राजकन्या इंदिरा यांचा कुचबिहारच्या राजपुत्राशी विवाह, राजपुत्र शिवाजीरावांचा विवाह, नात इंदुमतीचा कोल्हापूरच्या महाराजांशी विवाह, पुढे शिवाजीरावांचे निधन (१९२१), जावई कुचबिहारचे राजपुत्र यांचे निधन (१९२२), राजपुत्र जयसिंहरावांचे निधन (१९२३), लहान बंधू संपतरावांचे निधन (१९३४), आजारपण अशा घटना जवळपास अखेरच्या तीस वर्षांत घडल्या. सामाजिक क्षेत्रातील, शिक्षणक्षेत्रातील कामांना उचित फलप्राप्तीही होऊ लागलेली दिसते.

यातील १९१७ ते १९३९ या कालखंड दादूमिया यांनी अज्ञातवासाचा कालखंड मानलेला आहे. त्यांच्या परदेशी वास्तव्याचे आणि सामाजिक, धार्मिक सुधारणांचे कारण तत्कालीन राजकीय घटितांमध्ये शोधले आहे. ''नवीन राजकीय नेत्यांच्या जगावेगळया धोरणांशी जुळवून घेणे त्यांना अवघड होते. ही देशभक्ती वेगळी आहे. नाटकी आहे, इंग्रजांना अनुकूल आहे. निदान प्रतिकूल तर नाहीच नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते...'' (श्रीमंत सयाजीराव गायकवाड/दादूमिया/ गंधर्ववेद प्रकाशन, पुणे/२०१०/पृ. ०) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे टिळकयुग १९२० साली संपले आणि १९२० नंतर गांधीयुग सुरू झाले. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, सत्याग्रह, सविनय कायदेभंग, आतला आवाज, खादी, मूलोद्योगी शिक्षण, हरिजनोद्धार, खेड्याकडे चला ही गांधीवादी सूत्रे होत. सयाजीरावांचे म. गांधी किंवा गांधीवादी चळवळीशी दूरत्व असण्याचे काही कारण दिसत नाही.

स्वदेशीचा पुरस्कार, अस्पृश्यता निर्मूलन, सहभोजन, सर्वांसाठी शिक्षण हे सयाजीरावांचे काम आधीच्या कालखंडातच सुरू झाले होते. ब्रिटिश सरकारची नीती सयाजीरावांना जाचक वाटतच होती; परंतु याच काळात सयाजीरावांवर, त्यांच्या अधिकाऱ्यांवर करडी नजर ठेवली जात होती. राष्ट्रवादी विचारांचे कार्यकर्ते, अधिकारी, क्रांतिकारी बडोद्यात होतेच ! कदाचित ब्रिटिशांचा स्वदेशात सासुरवास सोसण्यापेक्षा युरोपात हिंदुस्थानच्या स्वराज्यासाठी वातावरण, सामग्री किंवा राजकीय आधार ते मिळवत असावेत. सामाजिक, धार्मिक सुधारणांवर लक्ष केंद्रित करण्याचे धोरण आधीपासूनचे होतेच, उलट या कालखंडात सुधारकी विचार, कृतींना प्रजेचा चांगला, सुफळ प्रतिसाद मिळू लागला होता. संघर्षाच्या आधारावर सामाजिक सुधारकी विचारांच्या साफल्याचा हा कालखंड मानता येईल. मात्र हा कालखंड सयाजीरावांच्या मुलांकडून अपेक्षाभंगाचा, वियोगाचा मानता येईल. बृहद समाजाने या कालखंडाच्या अखेरीस मानपत्र, गौरव, सत्कार, गौरवग्रंथ असा यथोचित सन्मान केला होता.

प्रवास : मूल्ययुक्त ज्ञानाचे आत्मसातीकरण

स्वदेश, पौर्वात्य आणि पाश्चिमात्य देश यांच्या प्रवासातून सयाजीराव जिज्ञासू वृत्तीने शिकत राहिले. प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणाने हवापालट करणे भाग पडायचे. राजपुत्रांचे शिक्षण, राणीसाहेबांचे आजारपण, गोलमेज परिषदा,

आंतरराष्ट्रीय सभा, अधिवेशने, परिषदा अशी कारणेही असायची. ब्रिटिशांनी सयाजीरावांच्या परदेशी प्रवसावर बंदी घालण्याचा प्रयत्नही केलेला दिसतो; परंतु त्यांनी दाद दिली नाही. परदेशी असताना ब्रिटिशविरोधी गट, व्यक्ती, क्रांतिकारक यांच्याशी गाठीभेटी घेतात, म्हणून त्यांच्यावर पाळतही ठेवली जात असे. 'सार्वभौमत्व', 'सत्व' आणि स्वातंत्र्याकांक्षा जपतच सयाजीरावांनी परदेशी प्रवास, वास्तव्य केले.

हौसमौज, आनंद किंवा चैनविलासासाठी हे प्रवास केले नाहीत. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय सुधारणांचे चेतकघटक त्यांना परदेश प्रवास, वास्तव्यातूनच लाभले. कला, क्रीडा, शिक्षण, वास्तू, प्रदर्शने, संग्रहालये, राजवाडे, ग्रंथालये, शिक्षणसंस्था यांची ते पाहणी करत, तौलानिक विचार करीत. तिकडील जे काही चांगले, योग्य व आपल्याकडची सांस्कृतिक पातळी राखली जाईल त्यांचे आत्मसातीकरण राज्याच्या आणि प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी केले. ग्रंथ, ग्रंथकार, कलावंत, शिक्षणतज्ज्ञ, वास्तुशिल्पज्ञ, नागरी सुविधा अधिकारी पुरुष, तत्वज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या भेटीगाठीतून सयाजीराव विद्याव्यासंगी, बहुश्रुत बनले. जे तज्ज्ञ अधिकारी, कलावंत, मुत्सद्दी त्यांना बडोद्यासाठी उपयुक्त वाटले, ते त्यांनी तिकडून इकडे आणले आणि रुजवलेही ! संग्रहालये, ग्रंथालये, औषधोपचार केंद्रे, शिक्षण केंद्रे, नागरी सुविधा केंद्रे, उद्याने, रस्ते, रेल्वे सुविधा बडोदे राज्यात नव्याने निर्मिले. तौलनिक दृष्टीने विचार करून देशी परंपरेत आत्मसातीकरण करण्याकडेच त्यांचा कल होता. जपानहून गौतम बुद्धांचा पुतळा आणून तो सार्वजनिक बागेत उभारला. जगभरातील ग्रंथालये पाहून आशिया खंडातील गुणवत्तापूर्ण सेंट्रल लायब्ररी बडोद्यात उभारली.

निलगिरी, सिमला, आग्रा, श्रीनगर, जयपूर, बनारस, मुदरा, महाबळेश्वर, मरी अलाहाबाद, जोधपूर, मद्रास, कलकत्ता, कोचीन, पुणे, काश्मीर, लखनौ, उदेपूर, जगन्नाथ, मद्रास, नैनिताल, दार्जिलिंग, लाहोर, ग्वाल्हेर, बंगलोर, मसुरी, दिल्ली, अजमीर, कानपूर, तंजावर ही हिंदुस्थानातील स्थळे सयाजीरावांनी पाहिलेली आणि अनुभवलेलीही होती. उटी, म्हैसूर, महाबळेश्वर अशा ठिकाणी जाण्याचे कारण बहुधा आजारपण, हवापालट हे असायचे. देशी संस्थानिकांच्या निमंत्रणांना प्रतिसाद म्हणून ते प्रवास करीत आणि तेथील शिक्षणसंस्था, वसतिगृहे, राजगृहे, कलासाधना केंद्रे यांना हमखास भेटी देत. शालेय विद्यार्थ्यांना संबोधित करून

शिक्षणसंस्थेस शिष्यवृत्तीसाठी क्वचित देणगी देत असत. चाकोरीबाहेरचे शिक्षण, मुलींचे शिक्षण यांच्याकडे ते काळजीपूर्वक लक्ष देत असत. या शाळांना भेटीप्रसंगी तेथील विद्यार्थ्यांचे कौतुक करीत. ग्रंथवाचनाचा सल्ला देत. गुणवान कलावंत विद्यार्थ्यांचा जाहीर गौरव करीत. निसर्गसान्निध्यातील स्थळी निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत. हे सारे घडत असताना बडोद्याच्या प्रजेचे स्मरण जागवित. ते जगभरात कोठेही गेले तरी मनात बडोद्याची प्रजा, बडोदे राज्य, लोक हे हमखास असायचे.

इंग्लंड, इटली, सिंगापूर, याकोहामा, फ्रान्स, फिलाडेल्फिया, कॅंटन, टोकिओ, सिलोन, बेल्जियम, सॅनफ्रान्सिस्को, शांघाय, स्वित्झर्लंड, कॅनडा, नागासाकी अशा जगभरातील देशांचा, स्थळांचा आणि शहरांचा प्रवास त्यांनी केला, मुख्य म्हणजे सूक्ष्म अवलोकन केले. प्रत्येक प्रवासात ते नव्या-नव्या गोष्टी शिकत, ज्ञान व तज्ज्ञता आत्मसात करीत.

सयाजीरावांनी परदेश प्रवास २६ वेळा केले. मे १८८७ ते फेब्रुवारी १९८८ इंग्लंडला गेले होते. जून १८८८ ते सप्टेंबर १८८८ या काळात प्रकृती स्वास्थ्यासाठी स्वित्झर्लंडला होते. नोव्हेंबर १८९३ ते जानेवारी १८९५ या काळात इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली, तुर्कस्थान येथे प्रवास-वास्तव्यास होते. मार्च १९१० ते डिसेंबर १९१० मध्ये चीन, जपान, सॅनफ्रान्सिस्को, कॅनडा, लंडन असा प्रवास घडला. एप्रिल १९१४ ते डिसेंबर १९१४ या काळात इंग्लड, फ्रान्स, जर्मनी येथे होते. एक वर्ष, दीड–दोन वर्षे असा कालावधी सलग परदेशी प्रवास, वास्तव्यात गेला तरी सयाजीरावांना इत्थंभूत हालचाली कळल्या जात. निवाडे, निर्णय, हुजूरहुकूमही काढले जात. प्रशासकीय कामकाजाच्या खास पद्धतीमुळे सयाजीरावांची प्रत्यक्ष उपस्थिती नसतानाही राज्यव्यवहार सुरळीत चालू असायचा. निर्णय, सल्ला मसलत, संवाद, आदेश असा भरभक्कम पत्रसंवाद सयाजीराव परदेशातून करीत, लक्ष बडोद्याकडे, प्लेग, दुष्काळ, पाऊसपाणी याकडे असायचे. ब्रिटिश सरकारी अधिकारी, व्हाईसरॉय वगैरे सयाजीरावांवर टीका करीत. कारण ते राज्याबाहेर अधिक काळ असतात म्हणून..., सयाजीराव जगभरात कोठेही असले तरी दिवाण त्यांच्या नित्य संपर्कात असत. खासगी अधिकारी किंवा कार्यकारी विश्वासू आणि परिस्थितीतून सुलभ मार्ग काढणारे असत. बडोद्यातील, मुंबईतील, दिल्ली किंवा इतरत्रची वर्तमानपत्रे

पाहून घेत. उद्देश असा की, बडोद्याबद्दल काय काय छापून येते. खासगी अधिकाऱ्याने गोपनीय माहिती वेळेवर सयाजीरावांपर्यंत पोहोचवणे आवश्यक मानले जात असे.

'एक परिचित' यांनी सयाजीरावांची युरोपातील दिनचर्या पुढीलप्रमाणे नोंदवली आहे -

सकाळी आठ वाजता उठून मुखमार्जन, दैनिक वर्तमानपत्रांचे वाचन, श्रवण, स्नान, न्याहरी.

सव्वादहाच्या सुमारास एक तास चालणे, चालण्यास ते धर्म समजत.

सव्वाअकराच्या सुमारास संस्थानचे कागदपत्र वाचन, निर्णय, आदेश देणे, सूचना व सुधारणा सुचवणे, अत्यंत काळजीपूर्वक प्रकरण समजून घेणे, पत्रे कथन करणे, लेखनिकाने पत्रलेखन करणे, टपाल लक्षात आणून उत्तराची तयारी करणे.

दोन वाजता जेवण. आराम नाही. नवीन प्रसिद्ध होणारी, इतरास रुक्ष वाटतील अशी समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, राजकारण व राजशासन इ. विषयांवरील गहन पुस्तकांचे वाचन.

लंच, डिनर, चहा यावेळी मोठमोठे नामांकित ग्रंथकार, मुत्सद्दी, धंदेवाईक, खेळाडू, शास्त्रज्ञ वगैरे ज्या त्या देशांतील तज्ज्ञ मंडळींना पाचारण करून त्यांच्याशी चर्चा, उपयुक्त माहिती मिळाल्यास तिचा उपयोग बडोदे राज्यामध्ये कसा करून घ्यावा याचे चिंतन, कृतियोजना आखतात.

तिसऱ्या प्रहारानंतर ज्या त्या ठिकाणच्या काही उपयुक्त संस्था किंवा स्थळे पाहण्यास जातात, सूक्ष्म निरीक्षणानंतर काही घेण्यासारखे आहे किंवा काय हे पाहतात.

रस्त्याने जाताना शिशू क्रीडांगण दिसल्यास भेट द्यायची, माहिती घ्यायची, बडोद्यात असे सुरू करता येईल काय? याचा अंदाज घ्यायचा.

तिकडील एखाद्या नगरपालिका काही नव्या गोष्टी, वास्तू, योजना करीत असेल तर संपूर्ण माहिती तपशीलवार मिळवायची आणि बडोद्यात येथील काय राबवता येईल याचा कृती आराखडा तयार करायचा.

सायंकाळी एक तास नियमाने फिरण्यास जाणे.

रात्री वाचन न केल्यास नाटकगृह किंवा चलचित्रपटगृहात जाणे, दोन तास करमणूक.

रात्री सव्वाअकरा वाजता निद्रा.

नाट्यगृह - चित्रपटगृह येथे गृहरचना, मंदिररचना, नटाचा अभिनय, गायनपद्धती यांचे काळजीपूर्वक निरीक्षण करून असे काही बडोद्यात उभारता येईल काय? याचा विचार करीत. (गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. ३८१-३८२)

सयाजीरावांचे परदेशी वास्तव्य दीर्घकाळ होते, या वास्तव्यकाळात औषधोपचार करून घेत; मात्र स्व-शिक्षण हमखास करून घेतले जाई. आधुनिक तत्त्वज्ञान, कला, विवेकी समाजशास्त्र, तंत्रसुविधा तेथून बडोदे राज्यात आणण्याचा सयाजीरावांना आनंद वाटत असे.

पाश्चात्त्यांचे सारेच चांगले असते यावर त्यांचा विश्वास नसायचा. सदसद्विवेकबुद्धीने वैश्विकतेची सांगड स्थानिकतेशी घालून आत्मसातीकरणाकडे त्यांचा ओढा होता.

स्काऊट-गाईड चळवळ, वास्तुकला, शिल्पकला, रस्ते वाहतूक, रस्ते रचना, प्रकाशयोजना, नगररचना, बगीचे, वाचनालये, ग्रंथालये, कला केंद्रे, धंदे-शिक्षण, स्त्री-पुरुष समतेचा विचार, व्यक्तिस्वातंत्र्यादी आधुनिक मूल्ये सयाजीरावांनी चिकित्सक प्रवास साधनेतून आत्मसात केली.

प्रवासकाळातील पत्रव्यवहारात, दैनंदिनीतील प्रवास नोंदीतून, चिकित्सक वृत्ती, चौकसपणा, बदुश्रुतपणा, गुणग्राहकता हे सयाजीरावांच्या व्यक्तिमत्त्वातील गुण दिसून येतात.

सयाजीरावांचा पत्रसंवाद

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संस्था व व्यक्ती यांच्याशी नित्य संपर्क व संवाद सयाजीरावांना राजा म्हणून करावा लागत होता. परदेश प्रवासात किंवा बडोद्याच्या बाहेर असताना राज्याचे दिवाण, अधिकारी, सुभे, सेवक तसेच ब्रिटिश अधिकारी, इतर संस्थानिक आणि आप्तेष्ट यांच्या संपर्कात ते राहत. जगभराचे तज्ज्ञ, परिचित व स्नेहीजनांनाही पत्रे लिहिली होती. बराचसा पत्रव्यवहार इंग्रजी भाषेतून चालत असे. इ. स. १८८६ ते १९३३ या काळातील सुमारे २४५८ पत्रे उपलब्ध आहेत. या पत्रव्यवहारातील शेकडो पत्रे

अप्रकाशित आणि अप्राप्य आहेत. सयाजीरावांना अडचणीची ठरतील अशी ही पत्रे होती. स्वराज्याच्या धारणेतून आणि ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध मजकूर त्यात असावा असे वाटते. सयाजीरावांच्या इंग्रजी पत्रव्यवहाराचे संपादन व जतन चरित्र खात्याचे प्रमुख सरदेसाई यांनी केलेले होते. १९२३ ते १९३३ या कालखंडात हा पत्रव्यवहार प्रकाशित झालेला आहे.

सयाजीरावांच्या पत्रव्यवहारात जवळपास सर्वच पत्रे औपचारिक, प्रशासकीय स्वरूपाची आहेत. मात्र, प्रत्येक पत्रात एखाद-दुसरे वाक्य विचारपूस, अनौपचारिक भाव प्रकट करणारे असते. औपचारिक पत्रांना भावाविष्कारक रूप दिलेले आहे. ज्ञान देणे, माहिती करून देणे, समर्थन करणे, वस्तुस्थिती लक्षात आणून देणे, आदेश देणे, सूचना करणे, समजावणी करणे, निरीक्षणे नोंदवून भाष्य करणे, विचारणा करणे या तऱ्हेचे पत्रांचे स्वरूप दिसते.

सयाजीरावांच्या कारकिर्दीतील सुमारे पन्नास वर्षांचा सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि कौटुंबिक घटनापट त्यातून उलगडतो. पन्नास वर्षांचा अस्सल ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून या पत्रसंवादाला महत्त्व आहे. विचारी राजा, प्रजाहितदक्ष सत्ताधारी, सुधारकी विचारवंत, इतिहासकार, विश्लेषक वृत्तीचा चिंतनशील विद्याव्यासंगी राजा, स्नेहभाव आणि श्रद्धाभाव जपणारा सुसंस्कृत आणि प्रतिभावंत माणूस, सार्वभौमत्व जपणारे संघर्षशील राष्ट्रवादी व्यक्तिमत्त्व आणि आधुनिक हिंदुस्थानची निर्मिती करू पाहणारा कर्मयोगी सत्तापुरुष या पत्रांमधून प्रकट झाला आहे. परदेश प्रवासात पाहिलेली स्थळे, भेटलेले विचारवंत, तज्ज्ञ यांचे सम्यक व सूक्ष्म आकलनही पत्रांमधून मांडलेले आहे. लोककल्याणकारी आणि प्रगतिसन्मुख असे कोठेही आढळले तर ते आपल्या राज्यातही निर्माण करावे, असे त्यांना वाटत होते. कला, कलावंत यांचे चिकित्सक आस्वादनही काही पत्रांमधून आले आहे.

वाचलेल्या व आवडलेल्या पुस्तकांचे मराठी किंवा गुजराती भाषेत भाषांतर व्हावे, यावर त्यांचा कटाक्ष असे. दिवाणांकरवी भाषांतर शाखेला असे ग्रंथ कळविण्याची व्यवस्थाच त्यांनी लावली होती.

मुले व इतर आप्तेष्टांना भावपूर्ण पत्रे त्यांनी लिहिली, काही पत्रे (सुमारे सव्वाशे) मराठीत आहेत. महाराष्ट्रात किंवा गुजरातेत असलेल्या आप्तेष्टांना

लिहिलेल्या अनौपचारिक आणि खासगी पत्रांमधून समजावणे, बोध, आशीर्वाद असा मजकूर आला आहे.

राज्याच्या दिवाणांना लिहिलेल्या पत्रांमध्ये सयाजीरावांच्या कारकिर्दीतील प्रशासकीय, खासगी, लौकिक घटनांची इतिहासदृष्ट्या महत्त्वाची सामग्री आली आहे. बडोदा संस्थानातील घटना, ब्रिटिश अधिकाऱ्यांशी निर्णयाशी संबंधित घटना, अधिकारीवर्गाच्या कृती-उक्तीविषयक, घटना, राज्यातील नैसर्गिक, सामाजिक घटना, समकालीन संस्थानिकांशी संबंधित घटना यांच्यासंबंधीची पृच्छा, तपशील, निर्णय, आदेश, विश्लेषण व भाष्ये अशा पत्रांमध्ये आहेत. ब्रिटिश सरकारला लिहिलेल्या पत्रांमध्ये राजकीय मुत्सद्देगिरी हमखास प्रकटते. सयाजीरावांचे युक्तिवाद कौशल्य, पुराव्यानिशी समर्थन, अपेक्षित व्यवस्थांची आग्रही मांडणी हमखास आली आहे.

अनुभवातून आलेले शहाणपण, अधिकार, व्यासंग यामुळे अनेक पत्रांमध्ये जीवनभाष्ये आली आहेत. उदा. शेवटी प्रत्येकाला आपल्या आयुष्यात स्वतःच उभे राहावे लागते. (पत्र क्र. २०७१) / संपूर्ण भारताची राष्ट्रबांधणी नीट होईपर्यंत राष्ट्रीय एकसत्ताधीश शासन असावे. (पत्र क्र. २०८३) / भविष्याच्या गरजांचा आणि संकटांचा विचार करायला हवा. (पत्र क्र. २१०९) / भारताच्या लोकांनी स्वतःचे कल्याण आणि हित लक्षात घेऊन त्यांचे सर्व प्रश्न स्वतः निर्णय घेऊन सोडवणे ही सद्यःस्थितीत भारताची मोठी गरज आहे. (पत्र क्र. २१५१).

चिंतनशील विचारप्रक्रिया आणि उद्‌बोधनही अशा भाष्यांमध्ये आले आहे. स्वराज्यहित म्हणजेच प्रजाहिताची कळवळ सयाजीरावांच्या पत्रसंवादात सातत्याने प्रकट झालेली आहे. 'समकालीन जीवनात हे पत्रवाङ्मय प्रजा, शासन, सत्ताधारीवर्ग, शैक्षणिक व सामाजिक नेतृत्व करणाऱ्यांचा वर्ग अशा सर्वच बृहद् समाजपुरुषाला प्रेरक आहे, उद्‌बोधक आहे.'

(महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पत्रसंग्रह भाग १/महाराष्ट्र शासन/२०१७/पृ. ४३५).

निर्वाण

सुधारकी विचार व कृती कार्यक्रम, विद्याव्यासंग, सर्जनशील लोककल्याणाची कामे, राजकीय संघर्ष, उद्‌बोधक उपक्रम हे सारे पाहिले तर सयाजीरावांचे

द्रष्टेपण आणि कर्तेपण नजरेत भरते. उत्तर आयुष्यात लोकप्रियतेने कळस गाठला होता. राज्यात, महाराष्ट्रात आणि बाहेरही सयाजीरावांना मानसन्मान मिळत गेले. २७ ऑगस्टला शिकागो येथे जागतिक सर्वधर्म परिषद भरली होती, सयाजीरावांनी अध्यक्ष म्हणून सर्वांना संबोधित केले.

१९३३ साली सयाजीराव सत्तर वर्षांचे झाले, वेगवेगळ्या शहरांतल्या जाणत्या लोकांनी सत्कार समिती स्थापन केली. मुंबईत मोठा सत्कार, मानपत्र, सयाजी गौरव ग्रंथाचे प्रकाशन झाले. मराठी माणसांना सयाजीरावांच्या कार्याला अभिवादन म्हणून, कृतज्ञता प्रकटन म्हणून गौरव करायचा होता. महाराष्ट्रभर सत्कार सोहळे झाले. १९३६ साली राज्यारोहणास ६० वर्षे झाली. राज्यारोहणाचा हीरक महोत्सव साजरा होत गेला. प्रकृतिअस्वास्थ्य होते, ते वाढीस लागले, परदेशात औषधोपचारांना राहावे लागले. १९३५, १९३६-३७, १९३८ या वर्षांतील बराचसा काळ युरोपात घालवावा लागला. कोठेही असले तरी आपल्या प्रजेच्या सुखासमाधानाची आठवण ठेवली जात होती. प्रसंगोपात्त प्रजेच्या सुखदुःखांना आपलेसे करावे लागत होते. सततची प्रजाहितदक्षता जीवनेच्छांना वर्धिष्णू करीत होती.

१९३८ साली प्रकृती खालावली, प्रयत्न-उपचार सुरू होते, ऑक्टोबर १९३८ ला आगबोटीचा प्रवास करीत मुंबईत परतले. मुंबईच्या जय महालामध्ये राहू लागले. महाराणींनी इंग्लंडहून डॉक्टर आणले, बेशुद्धावस्था वाढत गेली. दि. ६ फेब्रुवारी १९३९ च्या संध्याकाळी सयाजीराव इहलोक सोडून गेले.

संघर्षशील, प्रजाहितदक्ष, सुसंस्कृत राजाने निरोप घेतला. आयुष्यभर आदर्श राज्य, आधुनिक राज्य, सुखसमृद्धीचे ज्ञानकेंद्री राज्य निर्माण व्हावे म्हणून कार्यमग्न असलेल्या कर्मयोगी राजाचे निर्वाण म्हणूनच सगळ्यांना शोककारक वाटत राहिले. बडोद्याचे शिक्षण, कला, कलावंत, कायदेकानून, सुसंस्कृत प्रजामन, वास्तुशिल्पे, ग्रंथालये, सांस्कृतिक संस्था, क्रीडाकेंद्र पुढच्या काळातही आधुनिक भारतीयत्वाच्या निर्माणक कार्यातून आविष्कृत होत राहिले...

समारोप

बडोदे संस्थानच्या कार्यक्षेत्रात वावरत राहूनही सयाजीरावांनी स्वराज्याच्या प्रेरणांना आकार दिला, स्वराज्य चळवळीला चेतना दिली. सुराज्य म्हणून प्रजाकल्याणाला महत्त्व दिल्यामुळेच आदर्श राज्य निर्माण केले.

शिक्षणप्रसार, विवेकनिष्ठ धर्मकथन, आचरण, शेतकरी कल्याणकारी योजना, सहकारातून अभ्युदय, सक्तीचे पण मोफत शिक्षण, कला, कलावंत, लेखक आणि प्रकाशकांना उत्तेजन, स्थानिक स्वराज्य, स्त्री-पुरुष समत्वाचे कायदे, अस्पृश्यता निवारण, उच्च जीवनमूल्यांचे आचरण आणि प्रसारण, विद्याव्यासंगी वर्तनव्यवहार, समताधिष्ठित जीवनप्रणाली, विश्वव्यापक दृष्टिकोन हे सारे सयाजीरावांचे कार्य, त्यांची भाषणे, पत्रलेखन, दैनंदिनी यातून प्रकटणारे प्रजावत्सल रूप पाहून त्यांच्या अंगी असलेल राष्ट्रपुरुष सर्वांनाच आपलासा करावा लागतो.

अस्पृश्य-आदिवासींसाठी शिक्षणाचा प्रारंभ करून ज्ञानातून विकास, ज्ञानातून सुसंस्कृत नागरिकत्व, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा आचारधर्म वैश्विक पातळीवर नेणारे सयाजीराव महाराजांचे कार्य आणि व्यक्तिमत्त्व वंदनीय ठरते. आधुनिक भारताचे द्रष्टे शिल्पकार म्हणून ते चिरस्मरणीय ठरतात.



अस्पृश्य-आदिवासींना शिकवणे राजकर्तव्य

रवींद्रनाथ टागोर म्हणाले होते -

''सयाजीरावांचं दातृत्व व मदत त्यांच्या भागासाठी मर्यादित नव्हती, तर त्यांनी देश-परदेशांतील कलावंतांना मदत केली, आश्रय दिला.

प्राचीन भारतीय संस्कृती आणि परंपरेचे डोळसपणे पुनरुज्जीवन करीत, शिक्षणाद्वारे मिळणाऱ्या आधुनिकतेची कास धरली. दूरदृष्टी अन् शहाणपणानं बडोदा सर्व हिंदुस्थानातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले.''

निवडक ग्रंथसूची

१) युगद्रष्टा महाराजा/बाबा भांड/२०१२/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/ २०१२

२) लोकपाळ राजा सयाजीराव/बाबा भांड/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/ ४ थी आवृत्ती/२०१२

३) श्रीमंत सयाजीराव गायकवाड/दादुमिया/श्री गंधर्व प्रकाशन, पुणे/२०१०

४) स्वातंत्र्यलढ्याचे पाठीराखे/सयाजीराव गायकवाड/बाबा भांड/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२०१६

५) महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण/सौ. मंदा हिंगुराव अनु. सुषमा करोगल/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२०१५

६) सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड १/सयाजीराव गायकवाड/ साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२०१३

७) सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड २/सयाजीराव गायकवाड/ साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२०१३

८) सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड ३/सयाजीराव गायकवाड/ साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२०१३

९) इथे सयाजींचिये नगरी/स्मिता भागवत, अविनाश कप्तान/मातृभूमी सेवा ट्रस्ट, मुंबई/२००४

१०) न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे/डॉ. त्र्यं. कृ. टोपे/रोहन प्रकाशन, पुणे/आ. २ री/२०१४

११) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह भाग १ व २/संपा. रमेश वरखेडे/ महाराष्ट्र शासन/२०१७

१२) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पत्रसंग्रह भाग १, २ व ३/संपा. अेकनाथ पगार/महाराष्ट्र शासन/२०१७

१३) महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषाची/संपा. बाबा भांड/महाराष्ट्र शासन/२०१७

१४) निवडक कायदे अर्थात हुजूरहुकूम/सयाजीराव गायकवाड/साकेत प्रकाशन, औरंगाबाद/२०१३

१५) अ. प्रिन्सेस रिमेबर्न/गायत्रीदेवी अनु. आशा कर्दळे/मेनका प्रकाशन, पुणे/२००४

१६) Notes on the famine Tour/Sayajirao Gaekwad/ महाराजा सयाजीराव संशोधन संस्था, औरंगाबाद/२०१६

१७) श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात/रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई/एस. जगन्नाथ आणि कंपनी, पुणे/१९५६

१८) माझी संसारयात्रा/गोविंद सखाराम सरदेसाई, रियासतकार/केशव भिकाजी ढवळे, मुंबई/१९५६

१९) Maharaja Sayajirao Gaekwad Speeches and Address, part I and Part II/Editor. Avinash Sapre/Govt. of Maharastra/2017

लेखक परिचय

अेकनाथ पगार

कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय देवळा (नाशिक) येथे पदवी व पदव्युत्तर वर्गांना मराठी भाषा व साहित्याचे पस्तीस वर्षे अध्यापन व संशोधन मार्गदर्शन

कालाय (कवितासंग्रह), फुलांच्या वाळवंटात (कवितासंग्रह)

लोकसंवाद, गप्पा पारावरच्या (नवसाक्षरांसाठी लेखन)

राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, आगरकर (किशोर वाचकांसाठी लेखन)

'निशाणी डावा अंगठा-समीक्षा', 'समकालीन भाषाव्यवहार',

'श्री कृष्णा महाराजांचे अभंग' 'या पुस्तकांचे संपादन व लेखन.

'बांधिलकी', 'क्रिटिकल इन्क्वॉयरी' व 'नव-अनुष्टुभ' या नियतकालिकांचे संपादन

'महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा इंग्रजी-मराठी पत्रसंग्रह' या सात खंडांचे संपादन.

मराठीतील महत्त्वाच्या वाङ्मयीन नियतकालिकांतून कथा, कविता आणि समीक्षापर लेखन सातत्याने प्रकाशित.

'कवी ग्रेस यांच्या संध्याकाळच्या कविता', 'मराठी कादंबरीची संरचना'

'गाणी : अहिराणी-लोकसांस्कृतिक अभ्यास', 'मराठी वर्तमानपत्रांचा भाषाव्यवहार', 'कवी सतीश काळसेकर यांचे लेखन', 'नव्वदोत्तर मराठी कविता' हे संशोधनपर लेखन केले आहे.